
''आनंदनिकेतन म्हणजे आनंदाचे निधान...घर.
सुख आणि आनंद या भावना समान नव्हेत.
उपभोगातून मिळते ते सुख, मालकी हक्कातून येते ते सुख,
निर्मितीतून मिळतो तो आनंद.
Possession वर अवलंबून नसतो तो आनंद.
या अर्थाने सुख ही Reactive भावना आहे तर
आनंद हा Proactive आहे... म्हणूनच तर
संन्यास घेणाऱ्यांच्या नावानंतर 'आनंद' लावण्याची पद्धत पडली...
शिक्षणक्षेत्रामध्ये झालेल्या 'सुखनिकेतनां'च्या सुकाळाच्या पार्श्वभूमीवर
आनंदनिकेतनची प्रगती अतिशय आश्वासक आहे.
प्रवाहाविरुद्ध पोहणाऱ्यांसाठी नेहमी या पुस्तकासारख्या
'लाईफ जॅकेट्स' ची जरुरी असते. शिक्षणक्षेत्रात
नेटाने स्वाध्यायी प्रयोग करणाऱ्या सर्वांना उत्साह आणि
दिलासा दिल्याबद्दल आनंदनिकेतन टीमचे अभिनंदन.''

-डॉ.आनंद नाडकर्णी

आनंदनिकेतन
नाईस वजनकाट्या शेजारी, कामगारनगर जवळ, सातपूर, नाशिक : 422007
फोन : 0253-2351286
email : anandniketan98@gmail.com


सहजशिक्षणाची प्रयोगशाळा

संपादक
विनोदिनी पिटके-काळगी



सहजशिक्षणाची प्रयोगशाळा

संपादक
विनोदिनी पिटके-काळगी



आनंदनिकेतन

सहजशिक्षणाची प्रयोगशाळा
संपादक : विनोदिनी पिटके-काळगी

पहिली आवृत्ती : २ ऑक्टोबर २०१२
दुसरी आवृत्ती : २ ऑक्टोबर २०१३

मुखपृष्ठ : अरुण पटके

मांडणी : आर्ट ॲडव्हर्टायझिंग

प्रकाशक : आनंद निकेतन,
नाईस वजनकाट्याजवळ,
कामगार नगरसमोर, सातपूर,
नाशिक - ७
दूरध्वनी : ०२५३-२३५११८६
इ-मेल : anandniketan98@gmail.com
वेबसाइट : anandniketan.ac.in

वितरक : युनिक बुक्स, पुणे

मुद्रक : स्मिता प्रिंटर्स, पुणे

मूल्य २०० रुपये


अर्पणपत्रिका

महाराष्ट्रात बालककेंद्री शिक्षणाची
ध्वजा
पुन्हा एकदा फडकावणाऱ्या,
आनंददायी अर्थपूर्ण शिक्षणाचा
पाया घालणाऱ्या,
केवळ तात्त्विक चर्चेत न रमता,
'सृजन आनंद' उभं करून
प्रत्यक्ष प्रयोग करणाऱ्या,
या विषयावर अनेक पुस्तकं लिहून
या संकल्पनेचा प्रसार करणाऱ्या,
'आनंदनिकेतन' सुरू करताना,
थोडं पाहून करा आणि जास्त करून
पाहा,
असा आगळा आशीर्वाद देणाऱ्या व
वेळोवेळी मार्गदर्शन करणाऱ्या
लीलाताई पाटील यांना
हे पुस्तक
कृतज्ञतापूर्वक अर्पण.

मनोगत

हे पुस्तक म्हणजे 'आनंदनिकेतन'च्या चौदा वर्षांच्या वाटचालीचं फलित आहे. १९९८ साली आम्ही मित्रमंडळींनी कायम विनाअनुदान तत्त्वावर संपूर्ण मराठी माध्यमाची शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला. महाविद्यालयाची नोकरी सोडून मी नाशिक इथल्या माणिकनगरच्या छोट्या खोलीत बालवाडी शिक्षिका म्हणून उभी राहिले, तेव्हा बाकी सारं अनिश्चित होतं; पण शिक्षण आनंददायी, अर्थपूर्ण व प्रयोगशील होऊ शकतं, हा विश्वास निश्चित होता. त्यामुळेच या स्वप्नात रमणाऱ्या उत्सुक सहकारी 'आनंदनिकेतन'मध्ये येत गेल्या. पाहतापाहता जमलेल्या २८ जणींच्या सर्जनशील मनांनी घडविलेला आविष्कार म्हणजे हे विविध उपक्रम. केवळ नावीन्यपूर्णता हे याचं मोल नाही. कारण काहीतरी वेगळं करायचं, असा याचा हेतू नाही. प्रत्येक उपक्रमाची साधकबाधक चर्चा केल्यानंतर त्याचं शैक्षणिक मूल्य जोखूनच हे उपक्रम करण्यात आले आहेत. 'आनंदनिकेतन'मध्ये पूर्ण लोकशाही पद्धतीनं चर्चा करून निर्णय घेण्याचा प्रघात आहे.


या पुस्तकातले बरेच लेख दै. 'लोकसत्ता'मध्ये लेखमालेच्या स्वरूपात प्रसिद्ध झाले होते. त्यावेळी मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक होता. शेकडो पालकांनी, अन्य शाळांच्या शिक्षकांनी शाळेला भेट देऊन हे सारं मुळातून समजून घेण्याचा प्रयत्न केला. आपल्या शाळेतही असं काही करण्याचा निश्चय केला. मुलांच्या शिक्षणाबाबत पालक व शिक्षक यांनी दाखवलेली ही संवेदनशीलता दिलासादायक होती. अर्थात, केवळ आमचीच शाळा वेगळं काही करते आहे, असा आमचा दावा नाही. ज्या-ज्या शाळेत शिक्षक प्रयोगशील आहेत, तिथे ते वेगळ्या वाटेनं मुलांना पुढे नेण्याचा प्रयत्न करतच आहेत.



नवा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, तसंच शिक्षण हक्क कायदा यात बालककेंद्री शिक्षण, ज्ञानरचनावाद, सातत्यपूर्ण मूल्यमापन, अर्थपूर्ण-आनंददायी शिक्षण हे शब्द वारंवार येतात. त्या आधारे दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणवर्गात या शब्दांची वारंवार उजळणीही होते; पण नेमकं करायचं काय व कसं, याचा उलगडा होत नाही, त्यामुळे शिक्षक गोंधळतात. नवं काही करू इच्छिणाऱ्या शिक्षकांना या पुस्तकातून याबाबत काहीतरी प्रेरणा मिळेल. आमच्यासारखंच सर्वांनी करावं, असा याचा अर्थ नाही. शिक्षकांनी आपल्याला उपलब्ध गोष्टी व आपली कल्पनाशक्ती यातून नवं काही घडवावं, हेच अपेक्षित आहे. हे शक्य आहे, असा विश्वास निर्माण करणं एवढाच या पुस्तकाचा हेतू आहे. आमचा अनुभव फक्त चौदा वर्षांचा आहे. अजून आम्हालाही बरंच काही शिकायचं आहे व करायचं आहे.

प्रयोगशील आनंददायी शिक्षणाची ही वाट खर्चिक नाही, हे शिक्षकांपर्यंत, पालकांपर्यंत पोहोचावं व महाराष्ट्रातल्या मुलांची शाळेतली वर्षे निर्मितीच्या आनंदात कारणी लागावीत, यासाठी ही धडपड आहे. मातृभाषेतून, परिसरभाषेतून शिकणाऱ्या मुलांनाच पाठांतरातून मिळणाऱ्या माहिती ऐवजी स्वत: ज्ञाननिर्मिती करण्याचा आत्मविश्वास मिळू शकतो. शाळेतून बाहेर पडल्यावर मोठ्या जगात प्रवेश करताना मुलांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास दिसणं, हे शाळेचे यश मानलं पाहिजे. अनेक शिक्षणबाह्य गोष्टींनी प्रभावित होऊन पालक आपल्या पाल्यासाठी शाळा निवडतात. यातून आपण मुलांसाठी खूप काही केल्याचं खर्चिक समाधान त्यांना मिळतं; पण मुलांच्या आयुष्यातली महत्त्वाची वर्षं अर्थशून्य पाठांतरात खर्ची पडतात. स्वत:ची भाषा, स्वत:चा परिसर गमावलेली मुलं अधांतरी जीवन जगत राहतात. पालकांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे.

लेखमाला व त्याचं पुस्तक करताना माझे सहकारी दीपा पळशीकर, शोभना भिडे, अरुण ठाकूर व पती राज काळगी यांनी मोलाचं योगदान दिलं आहे. या आमच्या शिक्षणदृष्टीला साथ देणारी 'आनंदनिकेतन'मधली मुलं, त्यांचे पालक व शिक्षिका हे आमचे या प्रयोगातले सक्रिय भागीदार आहेत. या प्रयोगाच्या यशाचं



श्रेय मुख्यत: त्यांचंच आहे.

'लोकसत्ता'नं आपल्या 'चतुरंग' पुरवणीत या मालिकेला वर्षभर स्थान दिलं, त्याबद्दल शुभदा चौकर व तत्कालीन संपादक कुमार केतकर यांचे आम्ही आभारी आहोत. तसंच काही लेख 'महाराष्ट्र टाईम्स' व 'लोकमत' या दैनिकांनी प्रकाशित केले होते. 'महाराष्ट्र टाईम्स'चे संपादक अशोक पानवलकर व 'लोकमत'च्या 'मंथन' पुरवणीच्या संपादक अपर्णा वेलणकर यांचेही आम्ही आभार मानतो.

डॉ. आनंद नाडकर्णी यांनी शाळेच्या प्रेमापोटी आपल्या अतिशय व्यग्र कामकाजातून वेळ काढून या पुस्तकासाठी अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिली, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

पुस्तकाचे मुखपृष्ठ अल्पावधीत उत्कृष्टपणे रेखाटणारे चित्रकार श्री. अरुण पदके तसेच पुस्तकाची आकर्षक मांडणी करणारे श्री. प्रदीप खेतमर यांचे आम्ही ऋणी आहोत. पुस्तकाच्या वितरणाची जबाबदारी स्वीकारून ते महाराष्ट्रभर पोहोचवण्यास हातभार लावणारे समकालीन प्रकाशनाचे श्री. सुहास कुलकर्णी यांचेही मनःपूर्वक आभार.


'शाळा - एक मजा' हे शाळेची संकल्पना संक्षिप्तपणे आणि चित्राद्वारे स्पष्ट करणारं पुस्तक २०१० मध्ये आम्ही प्रकाशित केलं होतं. त्यालाही महाराष्ट्रातल्या शिक्षणप्रेमीजनांनी भरभरून प्रतिसाद दिला होता. आता ही कल्पना अधिक स्पष्ट करणाऱ्या या पुस्तकाचंही असंच स्वागत होईल, असा मला विश्वास वाटतो.

- विनोदिनी पिटके-काळगी

दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

पहिल्या आवृत्तीचे सर्व शिक्षणप्रेमींनी जोरदार स्वागत केल्याने एका वर्षातच दुसरी आवृत्ती काढण्याचा योग येत आहे. शिक्षणातील प्रयोगशील बदल सर्वांनाच हवे आहेत असा याचा अर्थ! शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल वाढीस लागोत, या सदिच्छेसह ही दुसरी आवृत्ती आम्ही आनंदाने प्रकाशित करत आहोत.

- विनोदिनी पिटके-काळगी





प्रस्तावना

सहज शिक्षणाचं समीकरण

'मी आणि माझं शिक्षण या दोहोंच्या मध्ये मी शाळेला कधीच येऊ दिलं नाही', अशा अर्थाचं लेखक मार्क ट्वेनचं एक उद्धृत आहे. शाळा ही एक व्यवस्था (system), एक रचना (structure) आहे. एखादी व्यवस्था जेव्हा अंगीकृत उद्दिष्टासाठी झटत असते, तेव्हा ती व्यवस्था उत्क्रांत होत असते... तिला स्वत:ची गतिशीलता असते. जसे कुटुंब या व्यवस्थेचं उद्दिष्ट त्यात राहणाऱ्या सर्वांचा आत्मवृत्तीप्रमाणे, एकमेकांबरोबरचा प्रेमयुक्त विकास असं आहे. या ध्येयासाठी झटणारी कुटुंबव्यवस्था रसरशीत असते. त्यात पोषण असतं, शोषण नसतं.

शाळा या व्यवस्थेचं उद्दिष्ट आहे मुलांमध्ये लपलेल्या गुणांना प्रकाशात आणून, उणिवांवर पर्याय शोधून, शरीर-बुद्धी-भावनांना स्व-वृत्तीनुसार विकसित करणं... उद्दिष्टपूर्तीमध्ये रंगलेली शाळा म्हणजे कशी रंगलेली मैफलच होऊन जाते; परंतु शाळा या व्यवस्थेच्या पोषणासाठी शिक्षण हे साधन म्हणून वापरलं गेलं, की शोषण सुरू होतं. कारण या ध्येयामध्ये विद्यार्थी 'कच्चा माल' नावाच्या कप्प्यात फेकला गेलेला असतो. चकाचक कॅम्पस मिरवणाऱ्या शिक्षणसम्राटांना आपण 'उद्योजक' म्हणायला लागलो आहोत. कोचिंग क्लासेसची मजल शेअर बाजारात पब्लिक इश्यू काढण्यापर्यंत गेली आहे... हे सारे उद्योजक आपल्या गुणवत्तेचे प्रमाण म्हणून कशाची जाहिरात करताहेत?...





जास्तीत जास्त गुण मिळवून पुढच्या टप्प्यावर जाणाऱ्या मुलांची. हा झाला 'पक्का माल'... म्हणजे या व्यवस्थेमध्ये व्यापार आला. व्यापार आला की नंबरांची स्पर्धा आली. व्यक्ती-व्यक्तींमधली तुलना आली. शिक्षण खुरटलं, चिरडलं, नामशेष झालं.

अशा घनघोर अंधारामध्ये शांतपणे तेवणारी एखादी पणती दूरवरून दिसू लागते. शांत पणतीमध्ये उद्याच्या सूर्याची चाहूल दडलेली असते. आनंदनिकेतन शाळेचा प्रयोग म्हणजे अशा आश्वासक सूर्याचा कवडसा आहे... मुलं, पालक, शिक्षक, चालक, हितचिंतक अशा साऱ्यांच्या एकजीव प्रवासातून त्यानं ऊर्जा मिळवली आहे.

या शाळेतल्या अनेक अनुभवांचा गुच्छ म्हणजे प्रस्तुतचं हे पुस्तक. या अनुभवांचा समान पाया आहे 'स्वाध्याय'. स्व-अध्यायाला गती देतं ते खरं शिक्षण. श्रुती, स्मृती आणि कृती हे तिन्ही टप्पे वापरले जातात ते शिक्षण. जिथे असं होतं ती शाळा... वर्ग, फळे, बाकं असतानाही बऱ्याच ठिकाणी अशी शाळा असेलच असं नाही.

'आपण शिक्षण घेत आहोत' असा भाव उत्पन्न झाला, की शिक्षणातलं स्वारस्य गेलंच म्हणून समजावं, असं विनोबा म्हणत ते खरं आहे. त्यांचा मुद्दा समजावा म्हणून विनोबा रामायणातलं उदाहरण देतात. विश्वामित्र मुनी दशरथाकडे विनंती करतात, की 'माझ्या यज्ञाचं रक्षण करण्यासाठी मला राम आणि लक्ष्मणाची 'सेवा' दे.' सेवाकार्य करण्याच्या प्रवासामध्ये विश्वामित्र या दोघांबरोबर बोलतात. वाटेत उजाड प्रदेश लागला, की तिथला गतइतिहास शिकवतात. झाडपाल्याच्या बिछान्यावर झोपण्याची सवय लावतात, पण पहाटे मधुर वाणीनं उठवतात देखील. अशा प्रकारे विश्वामित्रांच्या विश्वविद्यालयामध्ये राम-लक्ष्मण धनुर्विद्या तर शिकतातच; पण इतरही बरंच काही शिकतात.

ही गोष्ट सांगून विनोबा लिहितात, ज्ञान देणाऱ्याची आपण ज्ञान देत आहोत, ही भावना नव्हती व ज्ञान घेणाऱ्याचीही आपण ज्ञान घेत आहोत, अशी भावना नव्हती. तरी पण उत्तम प्रकारचं ज्ञान दिलं गेलं आणि घेतलं गेलं.

To teach म्हणजे शिकवणं आणि To learn म्हणजे शिकणं. यातल्या शिकण्याची प्रक्रिया जशी जोमदार बनेल तशी शिकवण्याची प्रक्रिया अदृश्य व्हायला हवी. पुढे जाऊन असंही म्हणता येईल की शिकवणं अदृश्य, झाल्याशिवाय शिकण्याचा आकार निर्माण होणारच नाही. म्हणजे असं, की शिकवणाऱ्याचा अहं विसर्जित केल्याशिवाय शिक्षण सुरूच होणार नाही.

शिक्षकाचा अहंकार म्हणजे काय? 'मी शिकवतो ती पूर्व दिशा, मी सांगतोय त्यावर प्रश्न नकोत, माझं ऐकायचं नसेल तर लाग आपल्या वाटेला.' अशी वाक्यं म्हणजे अहंकाराच्या विचारलहरी... अहंकारविरहित गुरू हा शिष्याला स्वत:ची परीक्षा घेण्याची मोकळीक देतो. विवेकानंद (त्या वेळचा नरेंद्र) रामकृष्णांच्या संपर्कात आला, तेव्हा त्याच्या मनात गुरूंच्या वर्तन-विचारांबद्दल खूप शंका आणि प्रश्न होते. पुढची तीन-चार वर्ष तो गुरूंची सतत परीक्षा घ्यायचा. जेव्हा त्याच्या लक्षात आलं, की आपण परीक्षा घेतोय त्यात हा माणूस उतरलेलाच नाही, तेव्हा त्यानं रामकृष्णांना गुरू मानलं. रामकृष्ण एकदा बोलताना म्हणतात, 'सुवर्ण-चांदी याचा स्पर्शही मला रोगप्रवणता देणारा आहे.' तर सत्यासत्यता पडताळून पाहायला शिष्य नरेंद्र त्यांच्या बिछान्याखाली नाणं ठेवतो. या साऱ्यामध्ये हसतमुखानं आणि आस्थेनं रामकृष्ण सहभागी होतात. चक्क तीन-चार वर्ष. विवेकानंदांवर प्रभाव पाडणारा एक प्रसंग त्यांनी लिहिला आहे. रामकृष्णांना घशाचा कर्करोग झाल्यावर हळूहळू अन्न गिळणं कठीण होऊ लागतं. नरेंद्र त्यांना सुचवतो, की ही वेदना कमी करण्याचं आवाहन तरी कालीमातेला करून पाहा. त्यावर रामकृष्ण म्हणतात, 'कालीमाता म्हणतेय, की ही हजारो खाणारी, गिळणारी तोंडं तुझी नाहीत, असं तुला म्हणायचंय का?... काय मागतोहेस माझ्याकडे?...'

रामकृष्णांच्या सहज प्रतिक्रियेत त्यांच्या साऱ्या तत्त्वज्ञानाचं सार इतकं उत्स्फूर्तपणे येतं, की विवेकानंद 'शिकतात' आणि 'मोठे' होतात... शिक्षणानं मोठं होणं म्हणजे काय? छोट्याचं मोठं होणं म्हणजे कक्षा वाढणं, व्यापकता येणं, आधी न कळलेला, दडून राहिलेला अर्थ कळतो. अचानक जाणवणं की आधीचं आपलं वर्तुळ जर 'क्ष' व्यासाचं असेल, तर आत्ताचा व्यास आणि परीघ अधिक व्यापक झालाय... आधीही वर्तुळ होतं, आताही वर्तुळ आहे... पण हे वेगळं. अधिक सखोल, अधिक विचारगर्भ...

'आवळ्याएवढ्या पूज्यातून भोपळ्याएवढं पूज्य म्हणजे शिक्षण' ही विनोबांची व्याख्या. 'पूर्णात पूर्णम् उदच्यते' या उपनिषदाच्या वचनाचा हा अर्थ. पूर्णातून पूर्ण निर्माण होणं म्हणजे शिक्षण!

'गुरुपद' विसर्जित झालं की येतं ते शिक्षण. Teaching चं sharing होतं. माझे मनोविकारशास्त्राचे प्राध्यापक आम्हाला त्यांनी पाहिलेल्या, उपचार केलेल्या केसेसच्या कहाण्या सांगायचे. विस्फारलेल्या मनानं आम्ही त्या ऐकायचो. त्यातून कधी शिकायचो ते कळायचं सुद्धा नाही. मीही आता विद्यार्थ्यांसमवेत तेच करतो. तेव्हा लक्षात येतं, की आदान-प्रदानामधे शक्ती आहे. पूर्वसुरींनी बांधलेल्या

ज्ञानाच्या भिंतीमधल्या एका कोनाड्यात स्वत:ची वीट बसवून मी ती भिंत समोरच्या विद्यार्थ्यांसमोर प्रेमानं ठेवत असतो. तेव्हा त्या ज्ञान देण्यामागे प्रेमाची, आत्मीयतेची भावना असते आणि रचलेली भिंत माझ्यापर्यंत ज्यांनी पोचवली त्यांच्याबद्दलची कृतज्ञताही असते. माहितीच्या देवाण-घेवाणीला अनुरूप भावनांचं कोंदण मिळाल्याशिवाय 'ज्ञान' निर्माण होत नाही. घोकंपट्टी होईल; पण 'शिक्षण' काही होत नाही.

आनंदनिकेतन शाळेतल्या शिक्षकसंघाचं कौतुक यासाठी करायला हवं, की त्यांना ही सारी जाणीव झालेली आहे. त्यामुळेच त्यांची उपक्रमशीलता आणि मुलांची कल्पकता यांचा मेळ प्रत्येक प्रयोगामध्ये बसलेला आहे.

सलगपणे वाचन करताना सर्व लेखांचं लेखन एकाच व्यक्तीनं केलं आहे, असं वाटावं हा अक्षरश: चमत्कार आहे. विद्यार्थ्यांचा पुस्तकातला सहभाग किती मनोरम आहे. विनोबांचंच एक विधान आहे, 'शिक्षकाच्या भूमिकेतल्या प्रत्येक प्रौढानं लहान मूल व्हायला हवं, तरच ते शिक्षण; आणि मुलांमध्ये त्याच वेळी प्रौढ जाणीव जन्माला यायला हवी तरच ते शिक्षण!' पुस्तकातले लेख वाचताना यातल्या सत्यतेचा पडताळा येत होता.

प्रवाहाविरुद्ध पोहणाऱ्यांसाठी नेहमी या पुस्तकासारख्या 'लाईफ-जॅकेट्स'ची जरुरी असते. शिक्षणक्षेत्रात नेटानं स्वाध्यायी प्रयोग करणाऱ्या सर्वांना दिलासा आणि उत्साह दिल्याबद्दल 'आनंदनिकेतन' टीमचं अभिनंदन.

'आनंदनिकेतन' म्हणजे आनंदाचं निधान, घर... सुख आणि आनंद या भावना समान नव्हेत. उपभोगातून मिळतं ते सुख, मालकी हक्कातून येतं ते सुख. निर्मितीतून भेटतो तो आनंद. स्वामित्व भावनेवर अवलंबून नसतो तो आनंद. या अर्थानं सुख ही प्रतिक्रियात्मक भावना आहे, तर आनंद हा सक्रिय आहे... म्हणूनच तर संन्यास घेणाऱ्यांच्या नावानंतर 'आनंद' लावण्याची पद्धत पडली... शिक्षणक्षेत्रामध्ये झालेल्या 'सुखनिकेतनां'च्या सुकाळाच्या पार्श्वभूमीवर 'आनंदनिकेतन'ची प्रगती अतिशय आश्वासक आहे.

- डॉ. आनंद नाडकर्णी

अनुक्रमणिका

१

हे बंध रेशमाचे

उज्ज्वला मोरे, मुक्ता पुराणिक

“बालवाडी म्हणजे काही काळ घरच्यांना सोडून राहायची, आपल्या वयाच्या मुलांबरोबर खेळायला शिकण्याची, एकमेकांशी जमवून घेण्याची सवय करण्याची, तसंच शाळा, शिक्षण यांची गोडी लावण्याची जागा. सामाजिक विकासाची पहिली पायरीच. पुढे जाऊन शिकायच्या अनेक विषयांची पूर्वतयारी इथे व्हायला हवी. विषयांबद्दलची उत्सुकता वाढायला हवी.”

बालवाडीत तीन वर्षं आमच्याबरोबर राहिलेली मुलं जेव्हा पहिलीत जातात, तेव्हा आम्हाला अगदी चुटपूट लागते आणि ती पण इतकी जीव लावतात, की रोज काहीतरी सांगायला, दाखवायला येतात. आज सगळे जण त्यांच्या वर्गात बोलावत होते. त्यांनी स्वत: तयार करून लिहिलेल्या गोष्टी वर्गात लावल्या होत्या. 'ताई माझी वाचा, माझी वाचा' असं चाललं होतं. पाच-सहा ओळींच्याच गोष्टी, पण प्रत्येकाची वेगळी कल्पना. वाचून खूप बरं वाटलं आणि याच मुलांच्या बालवाडी प्रवेशाच्या वेळचे कितीतरी प्रसंग आठवले.

''दप्तरात काय काय पाठवू?'' यशची आई उत्साहानं विचारत होती.

मी म्हटलं, ''रुमाल, चड्डी, डबा आणि वॉटरबॅग.''

''ते आहेच हो; पण अभ्यासासाठी पाटी, पेन्सिल, वही, पुस्तक काय द्यायचं?''

''काहीच नाही. आपल्या शाळेत खूप साहित्य आहे. त्याचाच उपयोग करून आपण शिकवतो. बालवाडीत मुलांना काहीच लिहायला शिकवत नाही. फक्त भरपूर चित्रं काढायला देतो. त्यासाठी जाड खडू आणि पाठकोरे कागद शाळेतूनच मिळतात.'' असं सांगितल्यावर आता आपला यश लेखनात मागे पडणार की काय, अशा धाकधुकीनंच तिनं यशसाठी प्रवेश घेतला.

तर बालवाडीत आम्ही फक्त एक ते दहाच संख्या शिकवतो म्हटल्यावर

दीपिकाच्या बाबांची निराशा झाली होती. मैत्रेयीच्या आईनं तिला शाळा दाखवली. ''किती खेळणी आहेत. मग तू येणार ना शाळेत? रडणार नाहीस ना?'' यावर ''रडणार'' असं मैत्रेयीचं ठाम उत्तर आणि त्यामुळे आईचाही रडवेला झालेला चेहरा. क्षिप्रा आधी वेगळ्या बालवाडीत जात होती. तिथल्या बाईंचा धाक आणि शिस्तीच्या अनुभवानं अगदी भेदरून गेली होती. ती इथे कशी रुळेल, याचा ताण तिच्या आई-बाबांच्या चेहऱ्यावर उमटला होता.

असे अनुभव आम्हाला दरवर्षीच येतात. कारण आजूबाजूला बाराखडी गिरवणारी, एक ते शंभरची घोकंपट्टी करणारी मुलं पालक बघत असतात आणि रडणाऱ्या मुलांना धाकानं गप्प बसायला लावणाऱ्या शाळांच्या कथा त्यांनी ऐकलेल्या असतात.

बालवाडी म्हणजे काही काळ घरच्यांना सोडून राहायची, आपल्या वयाच्या मुलांबरोबर खेळायला शिकण्याची, एकमेकांशी जमवून घेण्याची सवय करण्याची, तसंच शाळा, शिक्षण यांची गोडी लावण्याची जागा. सामाजिक विकासाची पहिली पायरीच. पुढे जाऊन शिकायच्या अनेक विषयांची पूर्वतयारी इथे व्हायला हवी. विषयांबद्दलची उत्सुकता वाढायला हवी, असं आम्ही मानतो.

तुम्ही कधी बालवाडीतल्या मुलांच्या डोळ्यांत बघितलंय? त्यात असते प्रचंड उत्सुकता आणि कुतूहल. त्यांना सगळ्याच गोष्टी जाणून घ्यायच्या असतात. म्हणूनच खूप प्रश्न विचारायचे असतात. त्यांचं ऐकून घेतल्यावर आपण बोललो, तर आपलं म्हणणं ऐकून घ्यायला त्यांचं मन तयार होतं. शिवाय आपल्या बोलण्याचे संदर्भ त्यांच्या भावविश्वातले असतील, तरच त्यांचं बोलण्याकडे लक्ष



राहतं. म्हणूनच रोज मुलं जेव्हा शाळेत येतात, तेव्हा प्रत्येक वर्गात अनेक गोष्टी त्यांच्या स्वागताला तयार असतात. ठोकळे, बिया, बाहुला-बाहुली, भातुकली, रंगीत चित्रांचं पुस्तक, नरसाळ्यातून बाटलीत भरायला बारीक वाळू, बांगडीच्या काचा असं बरंच काही. मुलं आपापल्या आवडीच्या गोष्टीकडे पळतात. काही मुलांच्या बाबतीत ते शरीरानं जरी शाळेत आले असले, तरी त्यांचं मन घरातून शाळेत यायला जास्त वेळ लागतो. त्यांना या खेळांचा फारच उपयोग होतो. १०-१५ मिनिटं त्यांना खेळू दिल्यावर आपापल्या वर्गात ताई आणि मुलं गोलात बसतात. गोलात बसल्यावर मुलांना ताईंना हवं ते सांगायला वेळ दिला जातो. तेव्हा 'आमच्या घरातली सगळी बिस्किटं संपली', 'आमच्या बागेतल्या मनीमाऊला पिल्लं झाली' पासून 'आपण कसे रस्त्यात भेटलो होतो' पर्यंत काहीही बोलून मुलं ताईंशी आपुलकीचं नातं प्रस्थापित करतात. मग ताई पण 'मी येणार आहे माऊची पिल्लं बघायला', 'अरे, श्रेयसनं केस कापले वाटतं', 'नेहाचा नवा फ्रॉक छान आहे', असं बोलत मुलांशी बंध पक्का करतात. त्यानंतर प्रार्थना म्हटली जाते.


नंतर एखाद्या वर्गातली मुलं ताईंनी वाटलेले खेळ खेळण्यात गुंग होतात. वर्गात फिरून ताई प्रत्येकाजवळ जाऊन काही अडलं तर सांगत असते. हे खेळ तर्कसंगत विचार करणं, एकास एक संगती जोडणं, परस्परसंबंध शोधणं अशी गणितासाठी उपयुक्त कौशल्यं विकसित करण्यावर आधारलेले असतात. म्हणजे खरंतर मुलं गणिताची पूर्वतयारीच करत असतात; पण त्यांच्या नकळत! मोठ्या गटातली मुलं अशोकाच्या बिया, बदामाची टरफलं, काचा यांची वाटावाटी करत बेरीज, वजाबाकी शिकत असतात.

दुसऱ्या वर्गात मुलांसमोर त्यांच्या नावांच्या, तसंच आई, बाबा, काका, मामा असे शब्द लिहिलेल्या चिठ्ठ्या पसरलेल्या असतात. त्यातून ताई सांगतील तो शब्द शोधण्याचा मुलं प्रयत्न करत असतात, तर काही जण चित्रं आणि त्यांच्या नावांच्या जोड्या लावत असतात.

एखाद्या वर्गातली मुलं आपल्याला हवं तसं बसून-लोळून चित्र काढण्यात रमलेली असतात. रोहितनं मारलेला फराटा हे त्याचं घर असतं, तर कीर्तीचा गोल ठिपका तिची आई असते. ताई प्रत्येकाजवळ जाऊन काय काढलंय हे समजून घेते आणि त्याच्या चित्राजवळ ते लिहून ठेवते.

शिवाय मुलांच्या शारीरिक विकासाकडेही लक्ष द्यायचं असतं. त्यासाठी भरपूर पळणं, उड्या मारणं यापासून कागदाचे बोळे करणं, मातीकाम, कातरकाम करणं अशा सूक्ष्मकारक विकासाचे उपक्रम रोजच असतात.

हे सर्व चालू असताना मुलं भरपूर बोलतही असतात. वर्गात जेवढी गडबड-



बडबड असेल तेवढं शिक्षण चांगलं होतंय, असं समजावं. यातूनच यश शब्द वाचायला लागला. अक्षर ओळखायला लागला. तेव्हा कुठे त्याच्या आईच्या जिवात जीव आला. दीपिकाच्या बाबांनी स्वत: येऊन ताईंना सांगितलं, की दीपिकाची एक अंकी संख्यांची बेरीज-वजाबाकी इतकी पक्की झालीय, की त्यांनी मुद्दाम चुकवायचा प्रयत्न केला तरी ती चुकत नाही.

अशी सगळ्या विषयांची पूर्वतयारी चालू असली, तरी या वयात सर्वांत जास्त महत्त्व असतं भावनिक नात्यालाच. मुलांना ताई आपलीशी वाटली, की मग तिचं सगळे ऐकतात; पण हा विश्वास मिळवायला ताईंना विशेष प्रयत्न करावे लागतात. कधीकधी वाट बघावी लागते. मैत्रेयीनं सांगितल्याप्रमाणे ती पूर्ण दोन महिने रडत होती. आधी शाळेच्या पायऱ्यांवर बसायची, मग पॅसेजमध्ये, तिथून वर्गाच्या दारात, असं करत हळूहळू वर्गात बसायला लागली. आता इतकी मजेत असते, की आपण तिच्या रडण्याची आठवण काढली, तर ती कबूलही करत नाही.

भूषणचं उदाहरणही अगदी सांगण्यासारखं आहे. पहिल्या दिवशी भूषण शाळेत त्याच्या बाबांसोबत आला. दारातच ताईंनी त्याला जवळ घेतलं; पण भूषण ताईंना हात लावू द्यायला तयार नव्हता. त्याला वर्गात घेऊन रमवण्याचा प्रयत्न बरेच दिवस चालू होता; पण तो त्याच्या शक्तीनिशी ताईंपासून पळून जायचा प्रयत्न करायचा आणि रडायचा. भूषण कोणाशी बोलत नव्हता, हसत नव्हता. निर्विकार चेहरा असायचा. आपण बोलतो ते त्याला समजतं का, त्याला भाषेची अडचण आहे का, हे समजून घेण्यासाठी आम्ही बालवाडीच्या सर्व ताईंनी त्याच्या घरी भेट द्यायला जावं, असं ठरलं. भूषण नाशिकच्या जवळ जलालपूर या गावात शेतात राहतो. मग सर्व ताई शेतात त्याच्या घरी गेल्या. त्याच्या घरी एकत्र कुटुंब, सगळे जण आपापल्या कामात दंग दिसले. आम्हाला बघून भूषणच्या चेहऱ्यावर आनंद दिसला. त्यानं आम्हाला घर, गोठ्यातल्या गाई-म्हशी दाखवल्या. घरातल्या सगळ्यांशी गप्पा झाल्या. शाळा आणि घर यात एक पूल निर्माण व्हावा म्हणून त्याच्या आईनं दर पंधरा दिवसांनी शाळेत यायचं ठरलं. त्या एका घटनेनं भूषणमध्ये बदल झाला. नंतरच्या सोमवारी शाळेत येताना तो खूपच खूश होता. आता आमची चांगलीच ओळख झाली होती. विचारलेल्या प्रश्नांना तो उत्तरं देत होता. ताईजवळ बसायला त्याला आवडायला लागलं. इतर मुलांमध्ये छान खेळायला लागला. आता त्याच्यात चांगलीच प्रगती दिसू लागली. भूषण तिसरीत गेला आणि त्यानं स्नेहसंमेलनात अतिशय उत्तम प्रकारे नाच केला. त्याचा नाच बघून बालवाडीच्या सर्व ताईंच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटले.

भूषणसाठी तुम्हालाही छान वाटत असेल ना, मग हीच सहानुभूती आपण आपल्या छोट्यांनाही दाखवूया. त्यांच्या नैसर्गिक वाढीनुसारच त्यांच्याकडून अपेक्षा ठेवूया. भरपूर ऐकणं, बोलणं, वाचणं झाल्यावरच लिहिण्याचा आग्रह धरूया. शेवटी प्रत्येक मूल हे वेगळंच रसायन असतं. त्याच्या क्षमता वेगळ्या, कौशल्यं वेगळी आणि विकासाचे टप्पेही वेगळे, त्यामुळे तुलना नकोच. आपण त्यांच्या डोळ्यांतलं कुतूहल आणि चेहऱ्यावरचा उत्साह टिकवण्याचा प्रयत्न करूया.



२

आम्ही प्रतिज्ञा करतो की...

शोभना भिडे

“

**मूल्यशिक्षण म्हणजे ठरावीक काळात घालण्याचा रतीब नक्कीच नाही.
मूल्यशिक्षण केलं जात नाही, तर ते होतं ताईंच्या वागण्यातून.
मुलांशी वागताना मुलांची हुशारी, रंग, दिसणं, आर्थिक स्थिती,
स्वत:ची मुलं असा कोणत्याच प्रकारचा भेदभाव त्या करत नाहीत.
वर्गसफाईपासून संडासस्फाईपर्यंत सर्व कामं मुलांबरोबर करतात.
वेळ पाळणं, शब्द पाळणं, शाळेच्या वस्तू नीट वापरणं, जागच्या जागी ठेवणं
हे सर्व त्या कटाक्षानं पाळतात. म्हणूनच
'आमच्याकडे मूल्यशिक्षणाचा स्वतंत्र तास नाही.'**

”

'तुझं काम आहे झाडू काढण्याचं. जास्त बोलण्याचं काम नाही!' कोणी म्हटलं असेल हे वाक्य? घरात मोलकरणीला रागावणाऱ्या मालकिणीनं, की ऑफिसमधल्या शिपायाला समज देताना बॉसनं? नाही, हे वाक्य ऐकू आलं शाळेत! आणि तेही पहिलीच्या वर्गात. पहिलीत अशी आगाऊपणे व ठसक्यात बोलणारी व्यक्ती कोण? अर्थातच आर्या! खरंतर एक गोड, हुशार मुलगी, पण इतरांना तुच्छ लेखणारी. वरील प्रसंग घडला आनंददादांच्या बाबतीत. आनंददादा आणि सुरेखाताई हे दांपत्य शाळेची स्वच्छता, सफाई आणि इतर वरची कामंही जबाबदारीनं पार पाडतात. आर्या आनंददादांना नेहमीच काही ना काही बोलते, ऐकत नाही, तिचं बघून इतर मुलंही असंच बोलायला लागली आहेत, असं वर्गताईचं निरीक्षण होतं.

सुहास आणि मृण्मय, सहावीतली दादामंडळी. 'तुझं माझं जमेना, तुझ्यावाचून करमेना' अशी त्यांची मैत्री; पण भांडणाला कारणच लागायचं नाही. त्या दिवशी खेळावरून वाजलं आणि दोघांच्याही तोंडातून शिव्यांच्या फैरी सुरू झाल्या. हे वाङ्मय त्यांच्या तोंडी आलं कुठून, या विचारानं भांडण सोडवायला गेलेल्या ताई स्तंभितच झाल्या.

शाळेचं कंपाऊंड नव्यानंच तयार झालं होतं. दोन फुटांची भिंत, त्यावर तारेची बांधीव चौकट. कंपाऊंडच्या आतून नव्यानंच लावलेली झाडं. या छोट्या भिंतीवर चढून जाळीला लटकणं हा आमच्या छोट्यांचा आवडीचा खेळ झाला. खेळाच्या तासाला चेंडू बाहेर गेला, तर जाळीवरून बाहेर उडी टाकणं हा मोठ्यांचा दिनक्रम. या खेळाच्या दरम्यान झाडं तर सहजच तुडवली जात.

असे प्रसंग घडतात तेव्हा अयोग्य वर्तनाची समज तर त्यांना यायला हवी, ती सकारात्मक हवी, वृत्तीबदलाकडे नेणारी हवी, हे पटलेलं असतं; पण यासाठी मार्ग कोणता अनुसरावा ते कळत नाही. प्रसंगाचं स्वरूप, मुलांचा वयोगट लक्षात घेऊन त्या-त्या वेळी योजलेल्या उपायांत उत्स्फूर्तता होती. त्याचप्रमाणे शिक्षा मनाला व्हायला हवी हा भावही होता.


पहिलीच्या वर्गात भाषापूरक तासाला ताईंनी मुलांना आपल्यासाठी वेगवेगळी कामं करणारी, आपल्याला मदत करणारी माणसं यांची यादी करायला सांगितली. या यादीत आनंददादांचं नाव प्रामुख्यानं येणं अपरिहार्य होतं. मग आनंददादा आपल्याला कशी मदत करतात, याची भली मोठी यादीच फळ्यावर तयार झाली. ''आम्हाला खूप भूक लागलेली असते, बरोब्बर तेव्हाच सुट्टी झाल्याची घंटा वाजवतात, आम्ही सांडलेलं पाणी पुसायला मदत करतात. आम्ही शाळेत विसरलेल्या वस्तू जपून ठेवतात, कोणी पडलं तर उचलून घेतात, औषधं लावतात. बालवाडीच्या मुलांना तर भरवतात, आमची प्रेमानं काळजी घेतात.' या मुलांना जाणवलेल्या खास गोष्टी! हे सर्व फळ्यावर लिहिल्यानंतर देवांगची उत्स्फूर्त प्रतिक्रिया आली, ''बापरे! आनंददादा किती मदत करतात आपल्याला आणि ही आर्या त्यांना काय काय म्हणते!'' ही सगळी चर्चा सुरू राहिली आणि आर्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलत गेले. तिनं हळूच स्टुलावर डोकं ठेवलं आणि चेहरा लपवला. हे मुलांच्याही लक्षात आलं. आनंददादा आज त्यांना वेगळे दिसले. नंतरच्या कार्यानुभवाच्या तासाला सर्वांनी छान छान शुभेच्छापत्रं खास आनंददादांचे आभार मानण्यासाठी तयार केली.

सहावीच्या वर्गात ताईंनी पाठकोरे कागद नेले. सर्वांना वाटले आणि सांगितलं, की यावर तुम्हाला माहीत असलेल्या सर्व शिव्या लिहून काढायच्या आहेत. ५-१० मिनिटांनंतर कागद गोळा केले. मूर्ख... बावळट... गाढव... पुढच्या ग्रेडचेही काही शब्द होते. ''लिहिताना काय वाटलं?'' ताईंनी विचारलं. ''खूप लाज वाटली. काही शब्द आम्ही लिहूच शकलो नाही. या शब्दांचे अर्थ काय होतात, याचा आम्ही आधी विचारच केला नव्हता; परंतु लिहिताना आम्हाला तो कळला. बोलणं सोपं असतं.'' अशा अनेक प्रतिक्रिया आल्या. या

पुढच्या काळात तरी 'शब्द निवडून बोलावा' हे यापैकी काहींना तरी नक्कीच लक्षात राहील.

'प्रतिज्ञा' हा शालेय परिपाठातला महत्त्वाचा घटक 'भारत माझा देश आहे...' ही प्रतिज्ञा मुलं तोंडपाठ म्हणतात. या रचनेचा वापर करून शाळेविषयीची प्रतिज्ञा त्यांनाच लिहायला द्यावी, असं ठरवलं. या प्रतिज्ञेमध्ये शाळेशी संबंधित सर्व चेतन-अचेतन गोष्टींचा समावेश होणं गरजेचं होतं. यासाठी 'शाळा' हा शब्द उच्चारताच तुम्हाला कोणकोणत्या गोष्टी आठवतात, अशी मुलांना विचारणा केली. शाळा म्हणजे इमारत, शाळा म्हणजे वर्गखोल्या, बाक, फळे, मैदान, कंपाऊंड, प्रयोगशाळा. शाळा म्हणजे शिक्षक, विद्यार्थी, भेटीला आलेले पाहुणे, पालक. शाळा म्हणजे शाळेतले कार्यक्रम, उत्सव अशा अनेक शब्दांचं संकल्पना चित्र तयार झालं.

यानंतर प्रतिज्ञा म्हणजे काय, यावर चर्चा झाली. प्रतिज्ञा म्हणजे 'पण', 'निश्चय' अशा अर्थांसोबतच ती विचारपूर्वक करायला हवी. त्यात सांगितलेल्या गोष्टी स्वतःहून करायला हव्यात. आपल्याला जमतील अशा गोष्टी ठरवाव्या. जे



शाळेची प्रतिज्ञा

आम्ही आनंद-निकेतनचे विद्यार्थी अशी प्रतिज्ञा करतो की —
आम्ही आमच्या शाळेचे, सभोवतालच्या झाडांचे,
वर्गातील व वर्गाबाहेरील साहित्याचे
नुकसान होईल असे कृत्य करणार नाही.
शाळेच्या नियमांचे पालन करू.
स्वच्छता गृहे, वर्ग, शाळेचे आवार, कायम स्वच्छ ठेवू.
शाळेतील वीज, पाणी, कागद यांचा काटकसरीने वापर करू.
शाळेतील वस्तूंचे रक्षण जसे – बाके, खुर्च्या, खडू,
ट्यूबलाईट, पंखे, दिव्यांची बटणे, पुस्तके, खिडक्या,
दरवाजे इत्यादींचा काळजीपूर्वक वापर.
शाळा आम्हाला जे ज्ञान देते, त्यामुळे
आम्ही शाळेचे ऋणी आहोत.
आमची व पर्यायाने शाळेची श्रेष्ठ
ख्याती व्हावी यासाठी आम्ही प्रयत्न करू.

सांगू ते केलं की नाही हे तपासण्याची जबाबदारीही आपलीच आहे, अशा निकषांचा मुलांनी चर्चेत उल्लेख केला. या पूर्वतयारीनंतर मात्र मुलं झपाट्यानं कामाला लागली. या प्रतिज्ञा तपासण्यासाठी जेव्हा आमच्या हातात आल्या तेव्हा भाषा, आकृतिबंध यांबरोबरच शाळेच्या विश्वाशी मुलांची भावनिक गुंतवणूक किती असते, याचीही प्रचीती आली. मुलांनी त्यांच्या या लिखाणात अनेक निश्चय केले. यातून त्यांच्या शाळा, शालेय परिसर आणि शाळेतले मानवी घटक (शिक्षक, विद्यार्थी) या सर्वांविषयीच्या भावना व्यक्त होतात. या लेखनातून प्रगटतं प्रत्येकाचं 'मिशन स्टेटमेंट.' हे सर्व विचार यांच्या मनातून आले, म्हणूनच त्यांचं नातं आहे यातल्या प्रत्येक शब्दाशी, प्रत्येक भावनेशी. या सर्व प्रतिज्ञांचा गोषवारा घेऊन नंतर एक छोटी, सुटसुटीत प्रतिज्ञा तयार केली. अशीच एक पर्यावरणरक्षण प्रतिज्ञाही बनवली. एक फटकारूपी प्रार्थना मुलं म्हणत होतीच. त्यात शिव्यांसंबंधी अशी भर घातली...

'शिव्या आणिक वाईट शब्द तोंडी माझ्या येऊ नये
मतभेदाच्या प्रसंगातही संयम कधी मी सोडू नये'

मुलं या सर्व प्रतिज्ञा, प्रार्थना, फटका जोशात म्हणतात. म्हणताना कधी गालातल्या गालात हसतात. यातल्या अर्थाच्या विपरीत असं जे वर्तन आदल्या दिवशी त्यांच्याकडून झालं असेल, ते त्यांना आठवतं. नकळत एक खूणगाठ बांधली जाते.

हल्लीची मुलं निष्काळजी असतात. त्यांना कशाचंच काही पडलेलं नसतं. अनेक गोष्टी त्यांना सहजतेनं, न मागता मिळतात, म्हणून त्यांना पैशाची किंमत नसते, आई-वडलांच्या कष्टाची त्यांना पर्वा नसते, असं कधी ना कधी पालक म्हणून आपल्याला वाटत आलेलं आहे आणि त्या त्या वेळी 'आमच्या काळात'नं सुरू होणाऱ्या वाक्यांनी आपण 'नॉस्टेल्जिक'ही झालेले आहोत. या कल्पनाविस्ताराला छेद देणारा हा प्रयोग आशेला खूप जागा आहे, हा विश्वास नक्कीच जागृत ठेवेल.

मूल्यशिक्षण म्हणजे ठरावीक काळात घालण्याचा रतीब नक्कीच नाही. मूल्यशिक्षण केलं जात नाही, तर ते होतं जाणीवपूर्वक प्रयत्नांतून, मोठ्यांच्या वर्तनातून, उदाहरणांतून, दाखल्यांतून म्हणजेच मुख्यतः कृतीतून. ताईंचं रोजचं वागणं म्हणजे मुलांसाठी वस्तुपाठच असतो. त्या मुलांशी वागताना हुशारी, रंग, दिसणं, आर्थिक स्थिती, स्वतःची मुलं असा कोणत्याच प्रकारचा भेदभाव करत नाहीत. वर्गसफाईपासून संडाससफाईपर्यंत सर्व कामं मुलांबरोबर करतात. वेळ

पाळणं, शब्द पाळणं, शाळेच्या वस्तू नीट वापरणं, जागच्या जागी ठेवणं हे सर्व त्या कटाक्षानं पाळतात. म्हणूनच 'आमच्याकडे मूल्यशिक्षणाचा स्वतंत्र तास नाही.'

अनेक मुलांनी लिहिलेल्या प्रतिज्ञेतल्या वाक्यांचं हे कोलाज-

- मुलांनी आनंदानं शिकावं यासाठी खूप प्रयत्नांनी तयार केलेल्या 'आनंदनिकेतन' या शाळेची मी विद्यार्थिनी आहे. या शाळेतले सर्व विद्यार्थी माझे मित्र आहेत.
- माझ्या शाळेतल्या सगळ्याच विद्यार्थ्यांमधे कोणते ना कोणते गुण आहेत, याचा मला अभिमान आहे. इतरांच्या अंगातले गुण माझ्या अंगी यावेत म्हणून मी प्रयत्न करते.
- माझ्या शाळेतल्या विविधतेनं व समृद्धतेनं नटलेल्या संस्कारांचा मला अभिमान आहे. ते संस्कार माझ्या अंगी बाणावेत म्हणून प्रचंड प्रयत्न करेन.
- माझ्या हातून चूक झाल्यास ताईंनी दिलेल्या शिक्षेचं मी पालन करेन. शाळेला वेगवेगळ्या स्तरांवर यश मिळवून देण्याचा प्रयत्न करेन.
- शाळेतली वीज जास्तीत जास्त वाचवण्याचा प्रयत्न करेन. आम्ही जास्तीत जास्त मुलं शाळेत सायकलवरून येण्याचा प्रयत्न करू.
- शाळेतली स्वच्छतागृह स्वच्छ राखणं, हेही आमचं कर्तव्य आहे.
- वर्गात मिळून मिसळून, भेदभाव न करता वागू. शाळेत प्रत्येक खेळ न चिडता खेळू.
- शाळेतर्फे किंवा शाळेच्या मुलांकडून पर्यावरणाचा ऱ्हास होईल, असं कृत्य करणार नाही.
- मी शाळेतली बाकं, हस्तकलेचं सामान, प्रयोगशाळेतलं व खेळाचं साहित्य, वाचनालयातली पुस्तकं यांचा नीट वापर करेन.
- शाळेला नुकसान व निसर्गाला हानी पोचेल, असं कृत्य करणार नाही. शाळेला नेहमी आनंदात ठेवू.
- माझी शाळा आणि माझे मित्र-मैत्रिणी यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. शाळेची प्रगती व समृद्धी यातच माझं सौख्य सामावलेलं आहे.

●



भाषा म्हणावी आपुली!

सुजाता साबळे

> **हत्यारांची निर्मिती आणि भाषेची निर्मिती यामुळेच तर निसर्गापेक्षा वेगळ्या अशा माणसाच्या स्वतंत्र जगाची वाटचाल सुरू झाली. आता फक्त हत्यारंच पुरेशी आहेत, भाषेची गरज नाही, हा विचार उलटी वाटचाल करणारा आहे. शीव इथल्या लोकमान्य टिळक रुग्णालयात विद्यार्थ्यांच्या अध्ययन अक्षमतेविषयी केलेल्या संशोधनात या विद्यार्थ्यांचा भाषाविकास नीट न झाल्याचं स्पष्ट झालं. याचं कारण मुख्यत: इंग्रजी माध्यमाचा पालकांचा आग्रह हे आहे, असं लक्षात आलं. याला दुजोरा देणारी अनेक उदाहरणं आपल्याला खरं म्हणजे दिसतात. पण लक्षात कोण घेतो?**

जून आला की शाळेचं नवीन वर्ष सुरू होतं. मुलांसाठी नवी कोरी पुस्तकं आणली जातात. ती हाताळताना मुलं काय करतात, हे तुम्ही पाहिलं आहे का? मुलं सर्वप्रथम भाषेच्या पुस्तकातले धडे पाहतात. गोष्टीरूप गद्य, चित्रं जास्त आकर्षक वाटतात आणि शेवटी लक्ष जातं कविता अथवा पद्याकडे! हा अनुभव सर्वच विद्यार्थ्यांच्या बाबतीत सामान्यत: आढळून येतो. कवितेतली तांत्रिकता, शब्दांच्या कसरती आणि अर्थ जाणण्यासाठी करावी लागणारी धडपड हे सर्व 'धडा आधी आणि कविता नंतर' या मनोवृत्तीला कारणीभूत होत असेल. मुलांना कविता आपलीशी वाटावी, कवितेतली गंमत त्यांनी समजून घ्यावी, कवितेबद्दल त्यांच्या मनात आवड निर्माण व्हावी म्हणून विशेष प्रयत्न करावे लागतात. मग मात्र मुलांना त्यातली गंमत आवडायला लागते. त्यासाठी आधी शिक्षकाला कवितेकडे डोळसपणे बघावं लागतं. कवितेचं मर्म जाणून ते मुलांपर्यंत पोचवावं लागतं.

छोट्या कविता, बडबडगीतं अगदी जन्मापासून मुलांच्या कानावर पडत असतात. आमच्या बालवाडीतही ताई मुलांना गाणी, कविता शिकवतात. मुलं हावभावांसहित ताईबरोबर या कविता तालासुरात म्हणतात. कविता म्हणताना

नाचतात. पहिलीत गेल्यावर पाठ्यपुस्तकात कविता असतातच. त्याशिवाय शाळेत जाणीवपूर्वक निवडलेली कवितांची पुस्तकंही मुलांना हाताळायला मिळतात. ताई वेगवेगळ्या कविता मुलांना वाचून दाखवतात. मंगेश पाडगावकर, विंदा करंदीकर, अनंत भावे, नीलिमा गुंडी अशी अनेक नावं पहिली-दुसरीपासूनच त्यांच्या कानावर पडतात.

तिसरीच्या पाठ्यपुस्तकात यमक जुळवण्याचा खेळ आहे. त्यासाठी कवितेच्या ओळींतले शेवटचे शब्द कसे जुळवलेले आहेत, हे मुलांच्या लक्षात आणून देतो. मग मुलंही जुळणारे शब्द शोधायला लागतात. त्यांची वाक्यं बनवून सुरुवातीला निरर्थक कविता करतात. पहिल्या ओळीचा दुसऱ्या ओळीशी काही संबंध नसतो; पण त्याही गमतीदार असतात. आता हेच बघा ना,

तिसरीतल्या नुवेशनं -

'मुंगीताई, मुंगीताई,
मला भिंतीवर चालायला शिकव बाई'

अशी मुंगीकडून वेगळी कृती शिकण्याची इच्छा व्यक्त केली आहे. तर विराजनं-

'झाडदादा झाडदादा, फिरायला जाऊ
भेळभत्ता मजेत खाऊ'

असं म्हणून झाडाशी संवाद साधला आहे. मुलांच्या मनातल्या इच्छा, भावनाही अशा प्रकारे व्यक्त होताना दिसतात. अशा कवितांचं पीक संपलं, की ताई सर्वांनी मिळून कविता करायला सांगतात. त्यात सगळेच ओळी सुचवतात; पण तेच योग्य ओळीची निवडही करतात. यातून कवितेत थोडा थोडा अर्थ भरायला लागतो.

एकदा तिसरीत 'विंदां'ची 'एटू लोकांचा देश' ही कविता वाचून दाखवल्यानंतर सर्वांनी मिळून अशी कविता केली.

'एटू घालतात कपडे लोकरी,
ढील संपला की संपते चकरी
एटूंची भरते आकाशात शाळा
ताई म्हणतात शिस्त पाळा
एटूंचे असते उघडे दार
म्हणून भरावा लागत नाही कर.'

कल्पनाविस्तार आणि शब्दरचनेचं काम आम्ही मुलांकडे सोपवतो. प्रोत्साहनाबरोबरच कवितेसाठी अनुभव निर्माण करतो. मुलंही आनंदानं आणि कुतूहलानं उत्स्फूर्त प्रतिसाद देतात. सर्वांनाच चांगल्या कविता करणं जमतं असं

नाही; पण त्या करण्यातला उत्साह, प्रयत्न, धडपड मात्र अनोखी असते आणि मला कविता करता येते, या भावनेनंच स्वतःवर खूष होतात.

मोठ्या गोगलगायीचं निरीक्षण करून दुसरीच्या मुलांनी केलेल्या या कविता


'गोगलगाय, गोगलगाय
तुला शिंग कसे नाय?
पाठीवरती घर घेऊन चाललीस काय?
पावसाळ्यात येतेस काय?'

'गुणी गुणी गोगलगाय
देवाने दिले पोटात पाय,
नावात तुझ्या गाय,
पण तू दूध देत नाय,
खाते तू काय, कळलेच नाय!'

चौथीच्या मराठीच्या पुस्तकातली 'खार' ही कविता शिकताना मुलांना त्यांच्या आवडीचा प्राणी, किंवा पक्ष्यांवर कविता करायला सांगितल्या. कवितेत खारीचं वर्णन, तिचे गुण, तिच्याबद्दल आलेली विशेषणं यावर बोलणं झालं. 'खारीचा वाटा उचलणं' हा वाक्प्रचार कशावरून आला, खारीच्या पाठीवरील पट्टे यावरही मुलांशी बोलणं झालं. आता मुलांनी त्यांना आवडतील, सोप्या वाटतील अशा प्राण्यांवर कविता केल्या. त्यापैकीच ओंकारची ही कविता.

'पळा पळा वाघ आला, वाघ आला
वाघ एका घरामध्ये घुसून बसला
वाघाने नाशिककरांची धूळधाण उडवली
नाशिककरांनी इंगा दाखवला, वृक्ष कापायला सुरुवात केली
वाघाने चिडून नर्सरीतली झाडं चोरून लावली जंगलात
नाशिककरांनी थकून केला जंगलाचा जीर्णोद्धार.'

टीव्हीवरील बातम्या, घरातली चर्चा, स्थानिक घटना, बातम्या यांतलं अनुभवविश्व ओंकारच्या कवितेत डोकावलं. मध्यंतरी नाशिकमध्ये एक बिबट्या मानवी वस्तीत आला होता. त्याचा घरात होणारा मुक्त संचार टीव्हीवर दाखवला गेला होता. त्याला पकडताना झालेला त्रास, तो मानवी वस्तीत का आला, त्यावर उपाय कोणते, हे सर्व ओंकारनं कवितेत मांडलं. माणसानं काही केलं नाही, तर वाघच काहीतरी उपाय शोधेल, हेही तो सांगण्याचा प्रयत्न करतो आहे. घरातल्या गप्पा, अभ्यासक्रमात शिकलेल्या धुळधाण, जीर्णोद्धार यांसारख्या शब्दांचा छान वापर त्यानं कवितेत केलेला दिसतो.



झुरळ काका, झुरळ काका,
तुम्हाला आवडतो का मका,
हो मला आवडतो मका,
पण मी खातो बका बका
रस्त्यावरती होते एक झुरळ
त्याचे डोळे नव्हते सरळ
झुरळ सारखी जाते झाड
त्याचे झाले मोठे पहाड
पहाडावर चढता चढता तुमचा घसरेल पाय
मग तुम्ही कराल काय ?
इ. ३ री
ऋषिकेश, कामत,

प्रभंजननं त्याच्या कुत्र्यावरील कवितेत त्यांच्या वेगवेगळ्या जातींचा, वैशिष्ट्यांचा उल्लेख केला. कुत्रा घरी पाळण्याआधी झालेली कुत्र्यांच्या जातीची चर्चा त्याला कविता करताना आठवली. हृषिकेशनं झुरळावर केलेल्या कवितेत छान लय पकडली.

'कळ्यांकळ्यांतूनी फुलाफुलांतूनी
नाचते फुलपाखरू,
कीटकांचा राजा जणू असे हे फुलपाखरू'

अशी फुलपाखरावर कविता लिहिणारी ओवी कवितेखाली स्वतःचं नाव लिहिण्याआधी कवयित्री असा उल्लेख आवर्जून करते. काही मुलं कवितेलाच आपलं अभिव्यक्तीचं माध्यम बनवतात. या कवितांमधून मुलांनी केलेलं निरीक्षण, त्यांना जाणवलेले प्रश्न डोकावतात. अशा पद्धतीनं आपले प्रश्न, आपलं निरीक्षण पद्यरचनेतून मांडणं ही भाषाशिक्षणाची एक महत्त्वाची पायरी आहे.

एकदा चौथीच्या मुलांना कविता करण्यातून तुम्ही आणखी काय काय शिकलात, असं सहजच विचारलं. मुलं त्यावर फार बोलतील, असं वाटलं नव्हतं; पण त्यांच्या प्रतिक्रिया बोलक्या, उत्स्फूर्त, स्तिमित करणाऱ्या होत्या.

निनाद - ''आता आम्हीच कविता करायला लागल्यामुळे मोठेपणी अवघड कविता समजायला लागतील.''

सायली - ''मन रमवण्यासाठी आम्ही कविता करू शकतो.''

प्रभंजन - ''आपल्याला मोठ्या माणसांना एखादी गोष्ट सांगायची असेल आणि नंतर ते रागावतील, असं वाटलं तर कविता करून ती त्यांना वाचायला देता येईल.''

सृष्टी - ''प्रवास करताना आम्हाला एखादी कविता सुचेल.''

स्वप्नील - ''इतरांच्या कविता वाचल्यावर नवीन शब्दही कळतात.''

ओवी - ''एखाद्या विषयावरची कविता करताना त्याबद्दलची माहिती गोळा करावी लागते, मेंदूला ताण द्यावा लागतो.''

अशा प्रतिक्रिया आल्या.

एक भाषिक खेळ म्हणून सुरुवात केलेला हा कवितेचा खेळ मुलांच्या मनाची दारं हळुवारपणे उघडतो. मुलांच्या आवडीनिवडी, अपेक्षा, मतं, त्यांचं अनुभवविश्व, भावविश्व मुलांच्या कवितेत दिसू लागतं. मुलं कविता अधिक जाणिवेनं वाचतात. कवितेतल्या खाचाखोचा, गमतीजमती त्यांना न सांगता समजू लागतात. सगळी मुलं पुढे जाऊन कविता करतीलच असं नाही; पण या शिकण्या-शिकवण्याच्या प्रक्रियेचं साधन म्हणून 'आपण केलेल्या कविता' मुलांना बरंच काही शिकवून जातात. शिवाय कविता केली नाही तरी वाचायची, ऐकायची, आस्वाद घ्यायची तरी गोडी लागते. सातवीत जाईपर्यंत 'विंदां'च्या कवितेतलं पिशीमावशीचं एकटेपण त्यांना जाणवतं आणि मुलं अंतर्मुख होतात. कवितेला विषयाचं बंधन राहत नाही. भाषा हा विषय अनेक अभ्यासविषयांशी व जीवनातल्या विविध बाबींशी सहजपणे जोडला जातो.

या साऱ्यात काव्यगुण किती, याची आम्ही चर्चा करत नाही. मुलांना भाषेशी विविध प्रकारे खेळता आलं पाहिजे. आपली अभिव्यक्ती महत्त्वाची आहे, असं ताई मानतात, हे त्यांच्यापर्यंत पोचलं, की मग ते सर्व प्रकारे लिहिते होतात. इतिहासाच्या ताई त्यांना शिवाजी महाराजांकडे नोकरीसाठी अर्ज करायला सांगतात, कधी ते कुणाची मुलाखत घेतात तेव्हाही आत्मविश्वासानं शब्दरचना करतात. संवाद लिहितात. पत्र लिहितात, जाहिरात लिहितात. घोषणा तयार करतात. असं बरंच काही. ज्ञान महत्त्वाचं आहेच; पण सादरीकरणही फारच महत्त्वाचं आहे. यातून हजरजबाबीपणा वाढतो, चपखल शब्द शोधण्याची सवय लागते, शब्दांचे नाद, वजन आपोआप उमगतं. हे अनुकरणातून होत नाही, प्रत्यक्ष भाषा वापरानंच होतं. पाठ करून होत नाही, रचना करूनच होतं. मग ती कविता असो की गद्य. यासाठी

माधुरी पुरंदरेंनी तयार केलेली 'लिहावे नेटके', 'वाचू आनंदे' यांसारखी सुंदर सुंदर पुस्तकंही खूप मदत करतात. त्याचा पुरेपूर वापर केला, की भाषा हा किती सोपा विषय होऊन जातो. मराठीत अशी सुंदर पुस्तकं असताना शिक्षकांनी फक्त पाठ्यपुस्तकात का अडकून पडावं?

आपल्या मुलांनीही छान छान कविता कराव्यात, शब्दांशी खेळावं, आपल्या आठवणीतल्या कविता त्यांनाही आपल्याशा वाटाव्यात, असं नक्कीच आपल्यालाही वाटत असणार. त्यासाठी काय करावं लागेल? थोडासा वेळ काढावा लागेल. भरपूर, वेगवेगळ्या कविता त्यांना म्हणून दाखवता येतील. कवितांची पुस्तकं त्यांच्यासाठी आवर्जून विकत आणता येतील. बोलता बोलता जुळणाऱ्या यमकाकडे जाणीवपूर्वक त्यांचं लक्ष वेधून घेता येईल. अशा अनेक गोष्टी घरबसल्या सहज करता येतील.

अलीकडे एका विद्वान संस्था चालकांनी, फक्त विज्ञान शाखेचीच महाविद्यालयं असावीत, बाकी ज्ञानशाखा महत्त्वाच्या नाहीत, असा महान विचार मांडला. हा दृष्टिकोन समाजात मूळ धरतो आहे, हे एकूणच ज्ञानप्रक्रियेविषयी असलेलं गाढ अज्ञान वाढत चालल्याचं द्योतक आहे! भाषाविकास हा सर्व ज्ञानाचा पाया आहे. हत्यारांची निर्मिती आणि भाषेची निर्मिती यामुळेच तर निसर्गापेक्षा वेगळ्या अशा माणसाच्या स्वतंत्र जगाची वाटचाल सुरू झाली. आता फक्त हत्यारंच पुरेशी आहेत, भाषेची गरज नाही, हा विचार उलटी वाटचाल करणारा आहे. भाषाविकास व्हायचा, तर मुलांना भाषेच्या अधिकाधिक स्वतंत्र वापराची सवय लावली पाहिजे. भाषेची बहुविध पद्धतीनं त्याला हाताळणी करता यायला पाहिजे. तर्क करणं, सुसंगत विचार मांडणं हे सारं भाषेतूनच तर घडतं. भाषा ही माणसाची आद्य निर्मिती आहे. त्याच्या सर्व निर्मितिक्षमतेला आधार देणारी, आकार देणारी मूलभूत क्षमता.

शीव इथल्या लोकमान्य टिळक रुग्णालयात विद्यार्थ्यांच्या अध्ययन अक्षमतेविषयी केलेल्या संशोधनात या विद्यार्थ्यांचा भाषाविकास नीट न झाल्याचं स्पष्ट झालं. याचं कारण मुख्यत: इंग्रजी माध्यमाचा पालकांचा आग्रह हे आहे, असं लक्षात आलं. याला दुजोरा देणारी अनेक उदाहरणं आपल्याला खरं म्हणजे दिसतात.

पण लक्षात कोण घेतो?

●



४

देखो, मगर ध्यानसे !

भावना भट

“ कोणतीही गोष्ट ढोबळपणे बघणं वेगळं आणि त्यातल्या बारकाव्यासहित बघणं वेगळं. लहानपणी मुलं स्वत:हून हे बारकावे टिपत असतात. पुढे मात्र त्यांची ही सवय कायम राहावी म्हणून विशेष प्रयत्न करावे लागतात. त्यातून अनेक गोष्टी नकळत टिपायची मेंदूला सवय होते. त्याचा अभ्यासात उपयोग होतोच, पण जगात सतर्क राहण्यासाठीही हे आवश्यक आहे. ”

लहान मुलं म्हणजे प्रचंड कुतूहल आणि औत्सुक्याचा धबधबाच! त्यांना काय पाहू आणि किती बोलू, असं झालेलं असतं. त्यांचे कुतूहलानं लुकलुकणारे डोळे आणि उत्साही बडबड ऐकून आम्ही वय, चिंता सगळं विसरून जातो. आज तर मुलं विशेष उत्साहात होती. त्याला कारणही तसंच होतं. त्यांच्याशी खेळायला शाळेत ससे येणार होते.

त्यांचं सगळं लक्ष दाराकडे होतं. तेवढ्यात सुचेता शुक्लमावशी जाळीची बास्केट घेऊन वर्गात आल्या आणि त्यांनी बास्केटमधून दोन गुबगुबीत ससे काढले. सगळे जण गलका करून एकदम त्यांच्याभोवती जमले, तरी ईशान त्यांना समजावत होता, "अरे, वो डर जायेंगे." मग ताई म्हणाल्या, "जे गोलात छान बसतील, त्यांच्याकडे ससे आपणहून येतील." ही मात्रा लगेचच लागू पडली. सगळे गोलात बसल्यावर ससे इकडेतिकडे फिरू लागले. सगळ्यांनी मिळून त्यांची चिंटू आणि पिंटू अशी नावं ठेवली आणि त्या नावानं हाका मारू लागली. "ए पिंटू, माझ्याकडे येतोस? ये ना! मी तुला खाऊ देतो..." वगैरे मुलं म्हणू लागली. मग सगळी गंमतच झाली. ते दोन्ही ससे इतके सारखे होते, की मुलांना कोणता चिंटू आणि कोणता पिंटू हे ओळखताच येईना.

"त्याची शेपटी बघा, तो कसा चालतोय" वगैरे गोष्टी ताई मुद्दाम त्यांच्या लक्षात आणून देत होत्या. त्याचबरोबर, "ताई, त्यांचे डोळे गोल आहेत. तो बघा-

नाक सारखं हलवतोय. कान ताठ करतोय...'' अशी मुलांची टिपणीही चालू होती. मग एकेकानं त्यांना मांडीवर घेण्याचा कार्यक्रम झाला. ज्ञानदाला सशाला मांडीवर घ्यायचं होतं; पण भीतीही वाटत होती. ताईंनी हळूच सशाला तिच्या मांडीवर टेकवलं. मांडीवर घेतल्यावर मुलांना, त्याचा स्पर्श किती मऊ आहे; पण त्याची नखं टोचतात, हे जाणवलं.

आता मुलांनी मावशींकडे मोर्चा वळवला. 'तुम्ही ससे कुठून आणलेत? त्यांना आंघोळ कशी घालता? ते किती वेळ झोपतात? त्यांना भूक लागलेली तुम्हाला कशी समजते?...' अशी प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. मावशींनी पण त्यांच्या प्रश्नांची मनापासून उत्तरं दिली. एवढ्या वेळात ससे इतके मुलांचे होऊन गेले होते, की निरोप देताना जणू आपलेच ससे या मावशी घेऊन चालल्या आहेत, असे भाव त्यांच्या चेहऱ्यावर होते.

मुलांना अनेक गोष्टींची उत्सुकता असते. मुलं सहजपणे अनेक गोष्टी बघत असतात. कोणतीही गोष्ट ढोबळपणे बघणं वेगळं आणि त्यातल्या बारकाव्यांसहित बघणं वेगळं. शाळेत प्रत्येक गोष्टीकडे जाणीवपूर्वक बघण्यासाठी (निरीक्षण करण्यासाठी) सतत प्रोत्साहित केलं जातं. मग अनेक न लक्षात आलेल्या गोष्टी त्यांच्या लक्षात येतात. तसंच त्याबाबतचे अनेक प्रश्नही पडतात. निरीक्षणाचे प्रत्येकाचे अनुभव वेगळे, प्रतिक्रियाही वेगळ्या आणि अभिव्यक्तीही स्वतंत्र असतात. मुलांकडून कविता, गोष्टी, चित्रं, छोटी वाक्यं यांतून त्या व्यक्त होतात. अशा प्रत्येक अभिव्यक्तीची दखल घेतली गेली, की या स्वातंत्र्यातून निरीक्षणशक्ती वाढते, आणखी माहिती गोळा करण्याची आवड निर्माण होते.

एकदा शाळेसमोरच्या रस्त्याचं काम चालू असताना जेसीबी आला. मुलांनी पुढचा अर्धा तास त्याचं निरीक्षण, त्यावर गप्पा आणि त्याची चित्रं काढणं ओघानंच आलं. कधी नंदीबैल येतो, तर कधी लग्नाची वरात. असे काही प्रसंग आपोआप चालून येतात. कुणी शाळेत गोगलगाय घेऊन येतं, तर कुणी फुलपाखरू. नुसते प्राणीच नाही, तर घरटी, वैशिष्ट्यपूर्ण फुलं, भाज्या, पानं, दगड अशा कितीतरी वस्तू शाळेत येत असतात. ताई, पालक, मुलं सर्वजण काही छान, वेगळं काही दिसलं की शाळेत घेऊन येतात. शाळेच्या या उपक्रमाची माहिती आता अनेक जणांना झालेली आहे. इतकी, की एकदा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या मागच्या जंगलात एक घोरपड सापडली. ती प्राणिसंग्रहालयात जमा करण्यासाठी पाठवायची होती. तिथून सरांचा फोन आला- 'जाता जाता तुमच्या शाळेत पाठवतो. थोडा वेळ ती मुलांना दाखवू आणि मग पुढे जाऊ.' मग काय, फक्त तानाजीच्या गोष्टीत माहीत असलेली घोरपड मुलांना प्रत्यक्ष बघायला

मिळाली. तोपर्यंत मुलांनी आणि आम्ही ताईंनीसुद्धा घोरपडीच्या नुसत्या कल्पनाच केल्या होत्या. तिची सापासारखी जीभ आणि मोठ्या पालीसारखा आकार बघून बहुतेकांना आश्चर्यच वाटलं.

काही गोष्टी मुद्दाम घडवून आणाव्या लागतात. असे उपक्रम बालवाडीपासून सुरू होतात आणि पुढे वाढत जातात. काही एखाद्या प्रसंगापुरते असतात, तर काही वर्षभर चालतात. शिवाय ते शाळेतच चालतात असं नाही, तर कधी ते गृहपाठाचाही भाग असतात. जसं, पाचवीतल्या मुलांना घरासमोरचं एक मोठं झाड निवडून त्याचं रोज निरीक्षण करायला आणि त्या झाडात होणाऱ्या विशेष बदलांच्या नोंदी ठेवायला सांगितलं. झाडं तर आसपास असतातच; पण सवयीनं आपल्याला ती सावलीपुरतीच जाणवतात. मात्र, अशा नोंदी ठेवायला सांगितल्यावर वर्षभरात २५ झाडांच्या माहितीचा कोशच तयार झाला.

झाड वर्षभर हिरवं असतं का? पानगळ कधी होते? फुलं येतात का? आली तर कधी येतात? त्यांना वास येतो का? फळं कधी येतात? त्यांचा आकार कसा असतो? झाडावर पक्षी येतात का? कुठले? ते घरटी बांधतात का?... अशा अनेक नोंदी मुलांनी ठेवल्या. मुलांबरोबर पालकही या नोंदी ठेवण्यात नकळत सहभागी झाले. केतकीच्या नादानं तिच्या आईनंही आपल्या ओट्यासमोरच्या रोज स्वयंपाक करताना दिसणाऱ्या झाडाच्या नोंदी ठेवल्या. ते चेरीचं झाड होतं. त्यामुळे ओट्यावर अंधार पडतो, याबाबत कुरकुर करणाऱ्या आईला इतके दिवस न दिसलेले पक्षी त्या झाडावर दिसले. त्यांची घरटी, त्यांचा किलबिलाट, झाडाचा



हिरवेगारपणा अशा अनेक गोष्टी टिपल्या गेल्या आणि ते झाड तिच्या जीवनाचा भाग बनून गेलं. हे तिनं आवर्जून शाळेत येऊन सांगितलं. अशा गोष्टींमुळे मुलांची निसर्गाकडे बघण्याची दृष्टीच बदलून जाते.

निसर्ग हा एक भाग झाला; पण निरीक्षणासाठी इतर गोष्टींचाही सहज उपयोग करता येतो. टेबलावर कोणतीही वस्तू ठेवून त्याबद्दल प्रत्येकानं नवी माहिती सांगायची, असा खेळ मुलांना फार आवडतो. कधी चित्राचा उपयोग करता येतो. विज्ञानाचे प्रयोग करताना तर हे फारच आवश्यक असतं. निरीक्षण व काटेकोर नोंदी हाच तर विज्ञानाचा पाया असतो. तो रुक्ष न करता रम्य केला की झालं. मुलांना मग ती सवयच लागते. कितीतरी नव्या गोष्टी मुलं टिपू लागतात.

मुलं जन्माला आल्यापासून आजूबाजूचं, भोवतालचं निरीक्षण करत असतात. सुरुवातीला मुलांच्या मेंदूची वाढ झपाट्यानं होत असते. त्यातून निरीक्षणांना प्रतिसाद म्हणून त्यांच्या मनात जगाबद्दल असंख्य प्रश्न निर्माण होतात. मग या प्रश्नांना उत्तरं मिळवण्यासाठी, ते समजून घेण्यासाठी, ज्ञान मिळवण्यासाठी धडपड सुरू होते. यातूनच मुलं शिकतात. त्यांच्या मर्यादित जगामध्ये सुरुवातीला शिक्षक व पालक यांच्याकडून त्यांना उत्तरं मिळवता येतात. त्यामुळे मुलांच्या प्रश्नांना उत्तरं देणं हे पालकांना व शिक्षकांना महत्त्वाचं वाटायला हवं. नाहीतर मुलांचं प्रश्न विचारणं कमी होत जातं आणि मुलांची निरीक्षणाची सवयही तुटते.

रोजच्या रस्त्यावरचं दुकान कसं माहीत नाही? समोरच्या कप्प्यातली वस्तू कशी दिसत नाही? अनेक पालकांची अशी चिडचिड होताना दिसते. कोणतीही गोष्ट ढोबळपणे बघणं वेगळं आणि त्यातल्या बारकाव्यासहित बघणं वेगळं. लहानपणी मुलं स्वतःहून हे बारकावे टिपत असतात. पुढे मात्र त्यांची ही सवय कायम राहावी म्हणून विशेष प्रयत्न करावे लागतात. त्यातून अनेक गोष्टी नकळत टिपायची मेंदूला सवय होते. त्याचा अभ्यासात उपयोग होतोच, पण जगात सतर्क राहण्यासाठीही हे आवश्यक आहे.

तुम्हालाही मुलांच्या निरीक्षणशक्तीचा, त्यासोबत येणाऱ्या प्रश्नांचा अनुभव नेहमीच येत असेल, मग तुम्ही काय करता? मुलांना गप्प करता, की आपणही त्यांच्या खेळात सामील होता? यासाठी साहित्य काहीच लागत नाही. उलट, मुलांबरोबर आपल्याला पण मजा येते. करून तर पाहा!

●



५

जागवू संवेदना

विनोदिनी पिटके-काळगी

“

आता पालकांनी ऐपतीनुसार शाळा निवडायला सुरुवात केली आणि मुलांना वेगळं केलं. शाळांनी आपला परिसर बंदिस्त केल्यानं त्यात शिकणाऱ्या मुलांची व्यक्तिमत्त्वंही बंदिस्त झाली आहेत. प्रत्येक घटकाबद्दलच्या ऐकीव माहितीवरून मुलांच्या मनात प्रतिमा तयार होतात. याचे अतिशय घातक परिणाम होताना दिसत आहेत.

”

सातवीतली निशा - एक अंध मुलगी - आम्हाला दोरी मल्लखांबाचं प्रात्यक्षिक करून दाखवत होती आणि आम्ही सर्व जण श्वास रोखून बघत होतो. ती खाली उतरली तेव्हा क्षणभर आम्ही टाळ्या वाजवायचंही विसरून गेलो. आम्ही अंधशाळेला भेट दिली, तेव्हाचा हा प्रसंग. ती शाळा पाचवी ते दहावीतल्या अंध मुलींची निवासी शाळा होती. त्या मुलींनी आमच्या मुलांना नाच करून दाखवला. शाळेच्याच वर त्यांचं वसतिगृह होतं, तिथे नेऊन स्वतःची झोपण्याची जागा दाखवली. एका वर्गातल्या मुली सहजपणे ब्रेल लिपीत पुस्तकं वाचत होत्या, तर दुसऱ्या वर्गात कार्यानुभवाच्या



तासाला कापडी फुलं बनवण्याचं काम चालू होतं. हे सर्व पाहून आमच्या शाळेतली मुलं अवाक् झाली. आमच्या मुलांनी त्यांच्याशी खूप गप्पा मारल्या. दीड-दोन तासांत त्यांची अगदी मैत्रीच झाली. शाळभेटीला येताना त्यांच्या मनात 'बिचाऱ्या मुली' अशी भावना असणार; पण त्यांची जिद्द आणि स्वावलंबन बघून आमच्या सर्वांच्या डोळ्यांत पाणी दाटलं.

''आम्हाला या मुलींसाठी काहीतरी द्यायचं आहे, काय देऊ तुम्ही सुचवा ना.'' मुलांनी त्या शाळेतल्या बाईंना विचारलं. तेव्हा या मुलींना स्पर्शानं वाचायचे नकाशे लागतात, ते तुम्ही बनवून द्या, असं बाईंनी सुचवलं. त्याप्रमाणे मुलांनी आनंदानं तसे नकाशे करून दिले.

आम्ही कुकुडणे इथल्या आश्रमशाळेत राहायला गेलो, तेव्हाही असाच अनुभव आला होता. नाशिकपासून गुजरातकडे जाणाऱ्या रस्त्यावरचं एक अगदी छोटं गाव. तिथल्या आश्रमशाळेतल्या मुलांची सहल नाशिकला आली होती, तेव्हा आम्ही त्यांना शाळेत बोलावलं. मुलांच्या एकमेकांशी गप्पा झाल्या. नाच-गाणी झाली. क्रिकेटसुद्धा खेळून झालं. परत जाताना त्यांच्या शिक्षकांनी आम्हाला त्यांच्या शाळेत यायचं आमंत्रण दिलं. ते लगेच स्वीकारून आम्ही आमच्या मोठ्या मुलांची मुक्कामाची सहल तिकडेच नेली. दोन दिवस आम्ही तिथे राहिलो. ती निवासी शाळा होती. आपलं आवरणं, पाणी भरणं, स्वतःचे कपडे धुणं, शाळेची स्वच्छता ठेवणं, जेवण झाल्यावर ताट-वाटी घासून ठेवणं ही सर्व कामं मुलं स्वतःच करत होती. हे सर्व आमच्या शहरी मुलांना नवीनच. तिथल्या मुलांची घरं खूप लांब, जायची सोय नाही. म्हणून फक्त दिवाळी आणि मे महिन्याच्या सुट्टीत त्यांना घरी जाता यायचं. हे सर्व ऐकून आमची मुलं थोडी समजूतदारपणे वागत होती. दुपारी जंगलात फिरायला गेलो. तिथली मुलं प्रत्येक झाडाबद्दल पटापट माहिती सांगत होती, औषधी वनस्पती ओळखून त्यांचे उपयोग सांगत होती. राहणीमानामुळे स्वतःला जरा शहाणं समजणाऱ्या आमच्या मुलांना तेव्हा आदिवासी मुलांबद्दल वेगळंच भान आलं. एकमेकांना पत्र लिहिण्याची आश्वासनं घेऊनच मुलं तिथून निघाली.

सरकारनं शालाबाह्य मुलं नसल्याची कितीही ग्वाही दिली, तरी आपण हॉटेल, चहाची टपरी, भाजी बाजार अशा अनेक ठिकाणी काम करणारी लहान मुलं बघतो. काय असेल या मुलांचं भावविश्व, हे जाणून घेण्यासाठी आमच्या मुलांना घेऊन मार्केट यार्डमध्ये गेलो. बालकामगारांबरोबर गप्पा मारताना आपल्याच वयाच्या या मुलांना शाळेत शिकण्याची 'चैन' परवडत नाही, हे लक्षात आलं.

घरात खायला काही नाही म्हणून त्यांच्यावर कधी कधी भाजी चोरायची वेळ येते, हे ऐकून त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटली.

शाळेत सामाजिक प्रश्नांवर नेहमी चर्चा होत असतात. त्यामुळे मुलांना 'नर्मदा बचाव' आंदोलनाबाबत माहीत होतं. तिथल्या विस्थापितांच्या मुलांसाठी चालवल्या जाणाऱ्या जीवनशाळा बघायला मुलांना धडगावच्या पुढे गुजरात-महाराष्ट्र सीमेवरच्या गावात घेऊन गेलो. त्या शाळा पाहिल्यावर, त्या विद्यार्थ्यांशी बोलल्यावर 'लढेंगे-पढेंगे साथ साथ' म्हणजे काय, याची जाणीव मुलांना आपोआपच झाली. त्या झोपडीवजा शाळा, भोवती पसरलेलं नर्मदेचं अफाट पाणी, स्थानिक बोलीतली गाणी यांनी मुलांच्या भावविश्वात कायमचं घर केलं. कधी कर्णबधिर शाळेतल्या मुलांशी गप्पा, कधी मासवण इथल्या आदिवासी सहज शिक्षण केंद्रातल्या मुलांशी संवाद अशा कितीतरी भेटी दरवर्षी पाचवीपासून पुढच्या मुलांसाठी योजल्या जातात. हे अनुभव मुलांना समाजाच्या प्रत्येक घटकाची ओळख करून देतात, त्यांच्या संवेदनशील मनावर कोरले जातात. त्यांचा दृष्टिकोन घडवतात.

आचार्य विनोबा म्हणत, 'थोडी शाळा समाजात व थोडा समाज शाळेत घुसायला हवा, तरच चांगलं शिक्षण होतं.' म्हणूनच 'आनंदनिकेतन'नं 'कॉमन स्कूल' या संकल्पनेचा पुरस्कार केला आहे.

शाळेत सर्व वर्ग, धर्म, पंथ, जातीची मुलं असली पाहिजेत, याकडे कटाक्षानं लक्ष दिलं जातं. मुळात मुलांच्या मनात कोणतेही भेद नसतात. ते सर्वांशी दोस्ती करायला, खेळायला तयार असतात. तीच त्यांची नैसर्गिक भावना बदलू नये म्हणून आम्ही प्रयत्न करतो. स्पर्धेपेक्षा सहकाराचे महत्त्व मुलांना गटकामातून लक्षात येतं. मुलं शाळेतल्या सफाई कामात सहभागी होतात. अगदी स्वच्छतागृहाची सफाईसुद्धा. याला पालक प्रथम बिचकतात; पण मुलं मात्र ताईबरोबर उत्साहानं सहभागी होतात. कुठलंच काम हलकं नसतं, हे मग सांगावं लागतच नाही. शाळेची सफाई तर आपण करतो; पण गावाची सफाई कोण करतं? हा प्रश्न मुलांनाच पडला. मग घंटागाडी कामगारांना शाळेत बोलावलं. मुलांनी त्यांची मुलाखत घेतली. त्यांच्या आरोग्याच्या अडचणी जाणून घेतल्या. दिवसभर प्रदूषित हवेत राहून होणारा त्रास समजला. लोक फुटलेल्या काचाही तशाच कचऱ्यात टाकतात. त्यानं या कामगारांचे हात कापतात, हे लक्षात आलं. मग मुलांनी महापौरांना पत्र लिहून या कामगारांना रबरी हातमोजे आणि नाकाला मास्क देण्याची विनंती केली. वीटभट्टी पाहायला नेल्यावर तिथल्या कामगारांशी मुलं आवर्जून बोलली. शाळेत

वर्तमानपत्रं टाकायला येणाऱ्या दादाचीही मुलाखत घेतली. या कष्टकरी लोकांमुळेच आपण मजेत राहू शकतो, याची त्यांना हळूहळू जाणीव होते आहे.

कर्णबधिर, दृष्टीदोष असणारी, गतिमंद, बुद्धीचा विकास झाला आहे पण शारीरिक वाढ नाही अशा काही मुलांना शाळेत जाणीवपूर्वक प्रवेश दिला जातो. ज्या वर्गात प्रवेश द्यायचा आहे त्या वर्गातील मुलांशी आधी सविस्तर चर्चा होते. मुलांना पूर्ण कल्पना देऊन त्यांची मानसिक तयारी करूनच प्रवेश दिला जातो. नंतर मात्र सर्व मुलं या मुलांची मनापासून काळजी घेतात.

पूर्वी समाजातल्या वेगवेगळ्या आर्थिक परिस्थितीतली मुलं, शारीरिक वेगळेपण असणारी मुलं शिक्षणासाठी एकाच ठिकाणी येत असत. त्यामुळे मुलांना सहजपणे समाजाची ओळख होत होती; पण आता पालकांनी ऐपतीनुसार शाळा निवडायला सुरुवात केली आणि मुलांना वेगळं केलं. शाळांनी आपला परिसर बंदिस्त केल्यानं त्यात शिकणाऱ्या मुलांची व्यक्तिमत्त्वंही बंदिस्त झाली आहेत. प्रत्येक घटकाबद्दलच्या ऐकीव माहितीवरून मुलांच्या मनात प्रतिमा तयार होतात. याचे अतिशय घातक परिणाम होताना दिसत आहेत. मुलांना परिसरातल्या लोकजीवनाचा अनुभव तर सोडाच, नुसती ओळखही नसते. यातून पालकांना खोट्या सुरक्षिततेचा दिलासा मिळत असेलही, पण मुलं खुरटून जातात. त्यांना वास्तवाचं भान येत नाही. सामाजिकीकरण हा शिक्षणाचा एक प्रमुख हेतू आहे, तोच नाहीसा होतो. कारण सामाजिकीकरण हे पुस्तकांतून होत नाही. तो जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवाचा परिणाम असतो.

आपण ज्या चष्म्यातून मुलांना समाज दाखवणार, त्यातूनच ती बघणार. त्यात त्यांचा काहीच दोष नाही, हे लक्षात घेऊन पालकांनी वागायला हवं. सर्व प्रकारच्या लोकांत मिसळल्यानं मुलांचं काही वाईट होत नाही. उलट ती समृद्धच होतात, हे जाणायला हवं. असं झालं तर सामाजिक भिंती मोडून पडायला वेळ लागणार नाही.

●



६

सहज साध्य इंग्रजी

सोनाली साळगावकर

> **“दुसरीच्या वर्गात एकानं वर्णनावरून कोडी तयार करायची आणि इतरांनी ओळखायची असा खेळ सुरू होता. प्रणव कोडं घालत होता, I am a bird, I am black, I am small. मुलं म्हणाली, crow. प्रणव म्हणाला, No, I am उलटा! मग मुलांच्या लक्षात आलं, वटवाघूळ! मुलांना इंग्रजी शब्द माहीत नव्हता. मग मी त्यांना सांगितलं, त्याला इंग्रजीत bat म्हणतात. Bat या शब्दाचा आणखी एक अर्थ आज मुलांना समजला.”**

'तुमची मराठी मीडियमची शाळा! मग निदान सेमी इंग्लिश तरी आहे की नाही?' हा शाळाप्रवेशाच्या वेळी बहुसंख्य पालकांकडून विचारला जाणारा प्रश्न! मुलाला मराठी माध्यमाच्या शाळेत घातलं, तरी इंग्रजी न आल्यामुळे आयुष्यात तो कुठे कमी पडू नये, ही त्यामागची भावना. अर्थात, इंग्रजी न आल्यामुळे कुणीही आयुष्यात मागे पडत नाही, हा भाग वेगळा. यशापयशाचे मापदंड प्रत्यक्षात वेगळेच असतात; पण शाळेनंतरचं बरंचस शिक्षण दुर्दैवानं मराठीत/परिसरभाषेत उपलब्ध नसल्यानं आणि इंग्रजी ही जगाची भाषा आहे, असं मानून घेतल्यामुळे ती येणं गरजेचं आहे, अशी बहुतेक पालकांची समजूत असते. क्षणभर हे खरं मानलं, तरी इंग्रजी चांगली येण्यासाठी 'सेमी इंग्लिश' हा पर्याय होऊ शकत नाही, हेही तितकंच खरं. कुठलीही भाषा शिकण्यासाठी काही विषय त्या भाषेत शिकणं, हा त्यावरील उपाय नव्हे. भाषा ही 'भाषा' म्हणूनच शिकली पाहिजे.

बाळ जन्माला येतं, तेव्हा ते आपली भाषा कशी शिकतं? घरातली माणसं त्याच्याशी सतत बोलत असतात. ते ऐकूनच बाळ ती भाषा सहज, नैसर्गिकपणे शिकतं. कुठलीही भाषा शिकण्याच्या पायऱ्या श्रवण, संभाषण, वाचन, लेखन अशा असतात हे आता सर्वमान्य आहे. 'आनंदनिकेतन'मध्येही इंग्रजीची ओळख

मुलांना श्रवणाच्या माध्यमातून केली जाते. बालवाडी, तसंच पहिली, दुसरीमध्ये जास्तीत जास्त ऐकणं आणि सोपी वाक्यं बोलणं यावरच भर असतो. त्याकरता मुलांना छोटीशी गोष्ट इंग्रजीतून सांगणं, इंग्रजीतून सोप्या सूचना सांगून त्याप्रमाणे मुलांकडून कृती करून घेणं, क्रिया करणारे शब्द (क्रियापदं) शिकवायला 'शिवाजी म्हणतो' हा खेळ घेणं, इंग्रजीतून सोप्या सूचना देऊन त्याप्रमाणे चित्रं काढणं किंवा रंगवणं, जोड्या लावणं अशा कितीतरी गोष्टी मुलांकडून करून घेतो. मुलांना आवडतील अशा आणि त्यातून काहीतरी शिकतील (शरीराचे अवयव, प्राण्यांचे आवाज इ.) अशा सोप्या कविता मुलं ऐकतात, साभिनय म्हणतात, नाचतात. सतत इंग्रजी कानावर पडल्यामुळे मुलांचा शब्दसंग्रह चांगलाच वाढतो.

ऐकण्याच्या बरोबरीनं बोलणंही असतंच. मुलांना सोप्या प्रश्नांची उत्तरं द्यायला प्रवृत्त करता येतं. चित्रातली वस्तूंची नावं सांगणं, आपल्या रोजच्या बघण्यातल्या वस्तू, घरी रोज लागणाऱ्या वस्तू, फळांची नावं, रंग, संख्या, आठवड्याचे वार, महिने सांगणं मुलांना सहज जमतं. अगदी निम्न आर्थिक स्तरातली मुलं, ज्यांचे पालक फारसे शिकलेले नाहीत, घरी इंग्रजीचा फारसा संबंध नाही अशा मुलांचा शब्दसंग्रहही या पद्धतीनं चांगला तयार होतो. त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

दुसरीतली मुलं स्वत:बद्दल चार-पाच वाक्यं सहज बोलू शकतात, विचारलेल्या सोप्या प्रश्नांची उत्तरं देऊ शकतात. "Who am I?" असं म्हणून एखाद्या वस्तूचं वर्णन करणारी इंग्रजीत विचारलेली कोडी छान ओळखतात. स्वत:ही अशी कोडी तयार करून एकमेकांना विचारतात. याचबरोबर इंग्रजीतून एखादा परिच्छेद वाचून दाखवला आणि त्यावर इंग्रजीतून प्रश्न विचारले, तर मुलं मराठीतून अचूक उत्तरं देतात. रोजच्या व्यवहारात वापरता येतील अशी वाक्यं मुलांच्या तोंडात बसावीत म्हणून फोनवरचे संवाद, दुकानातले संवाद वर्गात चालू असतात. शिवाय एक गट पुढे येऊन मूक अभिनय करतो आणि इतर मुलं त्यातले संवाद सुचवतात. असे भरपूर खेळ शोधता येतात. परवाच मला एका गटसंमेलनात शिक्षकांना इंग्रजीचं प्रशिक्षण देण्यासाठी बोलावलं होतं. तिथे मी याच सर्व कृती शिक्षकांकडून करून घेतल्या, तर त्यांनाही खूप मजा आली. अशा प्रकारे शिकवल्यामुळे मुलं इंग्रजीच्या तासाला खेळाचाच तास समजतात. पहिलीतला अभिज्ञ तर हल्ली प्रत्येक तासाला विचारतो, की आपण इंग्रजीचा अभ्यास कधी सुरू करणार?

तिसरीपासून आम्ही कार्यात्मक इंग्रजी म्हणजेच Functional English हा अभ्यासक्रम सुरू करतो. मुंबईच्या डॉ. मीनल परांजपे यांनी इंग्रजी माध्यमात न शिकणाऱ्या मुलांना इंग्रजी शिकवण्यासाठी हा अभ्यासक्रम तयार केला आहे. यात फक्त लिखाणालाच नव्हे, तर ऐकणं, बोलणं आणि वाचणं अशा चारही कौशल्यांना सारखंच महत्त्व दिलं जातं. मुलांना पारंपरिक पद्धतीनं ए, बी, सी, डी असं न शिकवता 'फोनेटिक्स' म्हणजे त्या अक्षरांच्या उच्चारानुसार अँ, ब, क, ड... असं शिकवलं जातं. जेणेकरून मुलांना शब्दांचे स्पेलिंग्ज पाठ करावे लागत नाहीत. शब्द ऐकून त्याच्या उच्चाराप्रमाणे मुलं स्पेलिंग्ज तयार करू शकतात. असे अनेक स्पेलिंग पॅटर्न आहेत. हे पॅटर्न शिकल्यावर मुलांना वेगळं आणि एरवी खूप अवघड वाटणारं स्पेलिंगही सोपं वाटतं. त्याचबरोबर छोटी वाक्यं तयार करण्यापासून ते चित्रवर्णन लिहिण्यापर्यंत मुलांची छान तयारी होते. व्याकरण शिकण्याची पद्धतसुद्धा रंजक आहे. वेगवेगळे खेळ, तोंडी सराव करणं, कृतीतून वाक्यरचना पक्की करून मगच लेखनाकडे मुलं वळतात. पहिली, दुसरीपासून फ्लॅश कार्ड्सच्या मदतीनं मुलं वाचतात. असं करता करता वाक्य आणि मग पुस्तकही मुलं वाचू लागतात. फ्लॅश कार्ड्स वाचायला सुरुवात केल्यावर तिसरीत गेल्यावर हीच फ्लॅश कार्ड्स एकापुढे एक ठेवून मुलं स्वत: वाक्य तयार करतात. वाक्य तयार करायला आणि वाचायला मुलांना खूप मजा येते.

आम्ही सर्व ताईही इंग्रजीच्या तासाला कटाक्षानं इंग्रजीतूनच बोलतो. मुलांनीही इंग्रजीतूनच बोलावं, असा आग्रह धरतो. सुरुवातीला बिचकणारी मुलं नंतर न घाबरता चुकतमाकत का होईना बोलण्याचा प्रयत्न करतात. लिहिण्याबरोबरच मुलांचा बोलण्याचा आत्मविश्वासही हळूहळू वाढू लागतो. ही मुलं पुढे पाचवी-सहावीत गेल्यावर एखादा ओळखीचा विषय मुलांना दिला जातो. त्यावरची बरीच माहिती शोधून मुलं प्रकल्प सादर करतात. शिवाय ती केंब्रिज युनिव्हर्सिटीच्या यंग लर्नर्सच्या परीक्षांचाही अभ्यास करतात. ही परीक्षा सातवीच्या मुलांसाठी असते. या परीक्षांमध्ये श्रवण, संभाषण, वाचन आणि लेखन या चारही कौशल्यांची परीक्षा असते. संभाषणाच्या कॅसेट्स ऐकून कधी एखादं चित्र रंगवायचं असतं, तर कधी आकलनात्मक प्रश्नांची उत्तरं एक-दोन शब्दांत लिहायची असतात. शब्दाचा ढोबळ अर्थच नव्हे, तर अर्थाच्या छटाही मुलांना व्यवस्थित समजल्या आहेत ना, हेही तपासलं जातं. ब्रिटिश कौन्सिलच्या परीक्षकाबरोबर इंग्रजीतून संवाद साधायचा असतो. हे सगळं ही मुलं आत्मविश्वासानं करतात. इंग्रजी माध्यमाच्या, आंतरराष्ट्रीय शाळेच्या मुलांच्या बरोबरीनं परीक्षा देतात आणि उत्तमरित्या पास होतात. त्यातून त्यांचा आत्मविश्वास द्विगुणित होतो.

अशा पद्धतीनं इंग्रजी भाषा मुलांसमोर आल्यानंतर मुलांच्या मनात तिची भीती अजिबात राहत नाही. म्हणूनच शाळा बघायला आलेल्या अमेरिकन पाहुण्यांबरोबर सातवीच्या मुलांनी उत्तम संवाद साधला. (एरवी अमेरिकन पाहुणे म्हटल्यावर त्यांच्याशी बोलायला आपण मोठेही बिचकतो.) त्यांचा हा आत्मविश्वास बघून फक्त इंग्रजीच नाही तर दुसरी कोणतीही भाषा मुलं या पद्धतीनं आत्मसात करू शकतील याची खात्री पटली. कारण भाषा कशी शिकायची, याचं तंत्र त्यांना अवगत झालं आहे. त्यांची इंग्रजीबरोबर छान दोस्ती झाली आहे. स्वतःच्या मनानं एखाद्या विषयावर बोलणं, लिहिणं, स्वतःच्या भावना व्यक्त करायलाही ती बिचकत नाहीत. गोष्टी लिहितात, चित्रवर्णनं लिहितात, इतकंच काय तर कविताही करतात. नुकताच आमच्या दहावीच्या वर्गाचा निरोपसमारंभ झाला, तेव्हा दहावीतल्या गार्गीनं तिच्या भावना कवितेतून कशा व्यक्त केल्या आहेत, ते पाहूया!

Days had come and days had gone
I am not going to have
Them again, from now on.
I know
I have to go with
The time's flow.
But I have those memories
To share and enjoy.
The little girl,
Who introduced herself first with a cry
Today she is promising you that
"I will try
To make you proud"
Before she is going to mix
In the big crowd.
Remember me !
You will be mine
Always.
- Gargi Patil
Std 10th

असे प्रयत्न करणं कोणत्याही शाळेला किंवा पालकांना सहज शक्य आहे. त्यासाठी इंग्रजी भाषा म्हणजेच जणूकाही ज्ञान आहे, असं समजण्याची आवश्यकता नाही आणि कसलाही न्यूनगंड बाळगण्याची गरज नाही. तेव्हा इंग्रजीचा बागुलबुवा न करता एक भाषा म्हणून तिच्याकडे पाहिलं आणि मातृभाषेप्रमाणे नैसर्गिकरित्याच इंग्रजी शिकण्या-शिकवण्याचा प्रयत्न केला तर ती तुम्हाला नक्कीच आपलं मानेल. आपल्या भाषेची पाळंमुळं पक्की रुजल्यावर कोणत्याही भाषेच्या फांद्या तोलता येतात.



७

मुलांच्या घरात डोकावताना...

दीपा पळशीकर

“

मुलं वेडीवाकडी वागली की आपल्याला नेहमी 'मुलं अशी का वागतात?' असा प्रश्न पडतो. त्याचं उत्तर बऱ्याचदा 'आपण असं वागतो म्हणून' असं असतं!

”

शाळेत स्त्री-पुरुष समानता, अहिंसा, स्पर्धेपेक्षा सहकार अशा अनेक गोष्टी रुजवण्याचा प्रयत्न असतो. घर आणि शाळा यांतली शिकवण समान असेल, तर ही रुजवात चांगली होते. घर आणि समाजातल्या शिकवणीचाही मुलांवर पगडा असतोच, तो मुलांशी गप्पा मारताना असा अचानक समोर येतो.

प्रसंग एक :

एकदा चौथीचा मराठीचा तास सुरू होता. संवादलेखन या लेखनप्रकाराची ओळख करून द्यायची होती. मी मुलांना म्हटलं, ''मी तुम्हाला एक प्रसंग सांगते. तुम्ही त्यावर नाटक सादर करा.''

नाटक करायचं म्हटल्यावर मुलं खूष झाली. मी प्रसंग सांगितला... ''एका घरात नवरा-बायको दोघंही दमून घरी आले आहेत. त्यानंतर त्यांच्यात काय संवाद असेल?'' माझं वाक्य पूर्ण व्हायच्या आतच ''ईऽऽ, नवरा-बायको? आम्ही नाही करणार?'' असा एकच घोष सुरू झाला. कितीही दटावून, आग्रह करून, समजावून सांगितलं, तरी कुणीच तयार होईना. शेवटी मी म्हटलं, ''ठीक आहे, मीच होते बायको. माझा नवरा कोण होणार?'' यावरही थोडं हसणं-खिदळणं झालं; पण थोड्या वेळानं क्षितिज तयार झाला. नाटक सुरू झालं.

... दार उघडून आम्ही घरात शिरलो. आधी तो, मग मी. घरात गेल्यावर त्यानं हातातली बॅग फेकली. मी जरा हाश्शहुश्श करत टेकले न टेकले तोच नवरोबा गरजले, ''चहा कर लवकर... मी दमलोय!'' मी म्हटलं, ''मीसुद्धा दमलेय. आज तूच कर चहा!'' आमच्या नाटकातल्या नवरोबाला हे उत्तर अगदी अनपेक्षित होतं.

तो आपल्या भूमिकेतून बाहेर येत म्हणाला, ''ओ ताई, असं कधी बायको म्हणते का?'' मी म्हटलं, ''मी अशीच बायको आहे.'' मग काही न सुचून क्षितिज म्हणाला, ''ठीक आहे. पाहू काय होतं ते.'' पुन्हा नाटक सुरू झालं. शेवटी तणतणत बायकोनंच चहा केला आणि नवरोबासमोर नेऊन आदळला. नवरा चहाचा एक घोट घेऊन म्हणाला, ''शीऽऽ दुधाला करपल्याचा वास येतोय.'' बायको म्हणाली, ''मला असाच चहा करता येतो. आवडत नसेल तर स्वत: करून घे!'' आमचं नाटक इथेच संपलं.

आता थोडे आढेवेढे घेऊन काही मुलं-मुली तयार झाली. कधी दोन्ही भूमिकेत मुलं, कधी मुलगी बायको व मुलगा नवरा, तर कधी मुलगा बायको, मुलगी नवरा अशा वेगवेगळ्या प्रकारे सर्वांनी हा प्रसंग सादर केला.

मात्र, बहुतेक प्रसंगांत नवऱ्याचं वर्चस्व व बायकोचं नमणं दिसत होतं. शतकानुशतकं चालत आलेल्या या साचेबद्ध प्रतिमा मुलांच्या मनात किती खोलवर रुजलेल्या होत्या, ते पाहून वाईट वाटलं. एका मुलीनं नवऱ्याची भूमिका केली, तेव्हा तीही पारंपरिक नवऱ्याप्रमाणेच वागली. फक्त रोहित त्यातल्या त्यात कनवाळू नवरा होता. बायको दमली म्हणून त्यानं आपणहून ब्रेड आणला आणि घरी येऊन स्वत:ला वाढूनही घेतलं; पण बायकोला वाढायचं मात्र तो विसरलाच!

एका प्रसंगात बायको झालेली वैष्णवी आधी 'मी दमले' म्हणून कुरकुरली; पण शेवटी उठून स्वत:च स्वयंपाकाला लागली. आणि हेच बरोबर आहे, असा तिचा अविर्भाव होता.

हाच प्रयोग मग पाचवीच्या वर्गातही केला. चौथीसारखाच प्रकार इथेही झाला; पण त्यात नाटकीपणा जरा जास्तच होता. काहींना तर नवरा घरी दारू पिऊन आला आणि बायकोला मारू लागला असे दाखविले, मग मात्र मुलांना आवरावं लागलं. 'तुमच्या घरी असं वातावरण असतं का? असलं तर तुमच्या पालकांशी बोलावं लागेल', असं सांगितल्यावर गाडी रुळावर आली. मग सर्वच मुलं आपल्या घरी आदर्श परिस्थिती आहे, असंच ठासून सांगायचा प्रयत्न करू लागली. मग मी मुलांना एक नवा खेळ सांगितला. खेळ असा होता- 'जर असं झालं तर कोण कसं वागेल?' यात मी काही प्रसंग सांगितले आणि त्यात आई-बाबा कसे वागतील, असं विचारलं. त्यावरही आधी आदर्श उत्तरंच येऊ लागली; मात्र काही प्रसंगांमध्ये आईची किंवा बाबांची बाजू घेण्याची वेळ आली, तेव्हा मात्र मुलं विचार करायला प्रवृत्त झाली. जेव्हा, घरातले महत्त्वाचे निर्णय कोण घेतं? असं विचारलं, तेव्हा 'दोघं मिळून घेतात' असं आदर्श उत्तर आलं. मग 'समजा- एखाद्या वेळेस, आई आणि बाबा दोघांच्याही नात्यातलं लग्न एकाच

वेळी, पण वेगवेगळ्या गावी असलं, तर कुठल्या लग्नाला जायचं ते कोण ठरवतं?' या आमच्या प्रश्नाचं उत्तर मुलं पटकन देऊ शकली नाहीत. थोडा विचार करून वीणा म्हणाली, ''अशा वेळी आईच म्हणते, की बाबांच्या नात्यातल्या लग्नालाच जाऊया.''

यावर मी काहीही भाष्य केलं नाही; पण मुलं विचार करू लागली होती. आम्ही विचारलं, ''समजा, आईची एखादी मालिका आणि बाबांचा आवडता कार्यक्रम टीव्हीवर एकाच वेळी असेल तर काय होतं?'' त्यावर उत्तर आलं, ''आई बाबांना म्हणते, तुम्ही बघा, मला काम आहे.''

मी शांतपणे पुढचा प्रसंग सांगायला सुरुवात केली. ''समजा- आईला वाटलं की मैत्रिणीबरोबर बाहेर फिरायला जावं, सिनेमा पाहावा, बाहेरच जेवावं - तर ती मोकळेपणानं जाऊ शकते का?''

बरीच मुलं एक सुरात उद्गारली, ''आईला मैत्रिणीच नाहीत!''

मी विचारलं, ''का नाहीत?''

'आईला वेळ नसतो, तिला काम असतं.' अशी उत्तरं आली; मात्र त्यांच्या उत्तरातला जोर आता कमी झाला होता. आपल्या घरातल्या आदर्श वाटणाऱ्या परिस्थितीतला विरोधाभास मुलांच्या नजरेस येऊ लागला होता.

मी म्हणाले, ''आपल्यासारख्या सुशिक्षित, कमावती स्त्री घरी असलेल्या कुटुंबात स्त्री-पुरुष नात्याचं हे रूप दिसत असेल, तर खेड्यांमध्ये जिथे शिक्षणाचं वारं फारसं पोचलेलं नाही, तिथे काय स्थिती असेल, याचा विचार करा.'' या सगळ्या विचारमंथनानंतर मुलं नक्कीच अधिक डोळसपणे आपल्या पालकांकडे पाहू लागली असतील. त्यातून ती पालकांना काही प्रश्न विचारतील, तेव्हा पालकांनी वैतागण्याऐवजी अंतर्मुख होऊन विचारास प्रवृत्त होणं जास्त संयुक्तिक ठरेल.

प्रसंग दोन :

त्या वर्षीच्या चौथीच्या वर्गातली मुलं सतत भांडणं आणि मारामाऱ्या करतात, अशी सगळ्याच ताईंची तक्रार होती. त्यांना वेगवेगळ्या मार्गांनं समजावलं, कठोरपणे बोललं तरी पुन्हा 'पहिले पाढे पंचावन्न!' एकेक मूल पाहावं तर वागायला-बोलायला इतकं गोड, लोभसवाणं, की त्याच्याविषयी तक्रार करणाऱ्यावर कुणी विश्वासच ठेवणार नाही; पण ही गोंडस मुलं एकत्र आली, की मग जो काही 'क्रिटिकल मास' तयार व्हायचा, तो हाताळणं सगळ्याच ताईंना अवघड व्हायचं.

एकदा मी याबाबत मुलांशी बोलायचं ठरवलं. आज तासाचा विषय म्हणजे आपण स्वत:च आहोत, हे कळल्यावर मुलांचा उत्साह वाढला. एरवीही मुलं मोकळेपणानं ताईंशी बोलतातच, आज तर काय स्वत:विषयीच बोलायचं होतं.

''तुम्ही सारखे मारामारी का करता?'' मी सरळ त्यांना विचारलं.

''आम्हाला खूप राग येतो म्हणून.'' तेजसचं उत्तर.

''तुम्ही ऐकत नाही, गडबड करता, तेव्हा राग तर आम्हालाही येतो. मग आम्ही काय तुम्हाला मारतो का?'' माझी समजावणीची प्रक्रिया सुरू.

''आपल्या शाळेचा नियमच आहे ना, मारायचं नाही असा. म्हणून तुम्ही मारत नसाल.'' वैष्णवीचा तर्क तयार.

''मारल्याशिवाय शिस्त लागतच नाही, असं माझे बाबा म्हणतात.'' ही क्षितिजची भर.

''पण ताई, मारल्यावर शिस्त लागत नाहीच. उलट जास्तीच राग येतो.'' कौस्तुभचं परस्पर उत्तर.

''अरे, पण आपण शिस्तीविषयी बोलतच नाहीये. तुम्ही एकमेकांशी नीट का वागत नाही, एवढंच मी विचारते आहे.''

''आम्हाला कुणी काही चिडवलं की सहनच होत नाही.'' प्रथमेशची तात्त्विक मांडणी.

''कुणी तुला मारलं की तू उलट मार, असं आई-बाबाच सांगतात.'' नितीनचं उत्तर.

''हो ताई, आम्ही सहन तरी किती करायचं?'' कोण म्हणेल हा चौथीतला कौशल बोलतोय म्हणून!

''काय सहन करावं लागतं रे तुम्हाला? आणि मग काय लागलीच मारायचं?''

''मग आई-बाबा नाही का राग आला की आम्हाला मारत?'' बहुसंख्य मुलांचा अनुभव एकदम प्रकटला.

मीही जरा गडबडले. आम्ही इतक्या पालकसभा घेतो, तरी पालकांचेही 'पहिले पाढे पंचावन्न' पाहून मुलांना समजावण्याचा आत्मविश्वास जरा डळमळलाच.

''होय ताई, रागावलं की मारायचंच असतं!'' मुलांनी आता मलाच समजावायला सुरुवात केली होती.

''बरं, मग आपण असं करू, तुम्हाला राग आला की तुम्ही ताईंनाच मारा.'' मी गांधीवादी मार्ग अवलंबायचं ठरवलं.

''काहीतरीच काय बोलताय! ताईंना कधी मारतात का मुलं?'' मुलं परत मला समजावत म्हणाली.

''अरेच्चा! मग आता करायचं तरी काय?''

''ताई, आपण बॉक्सिंगवाले जसं पोतं बांधतात ना, तसं एक पोतं आपल्या वर्गात बांधू. मी टीव्हीवर पाहिलंय तसं!'' फैजनं एक तोडगा काढला.

''त्यानं काय होईल?''

''आम्हाला राग आला की आम्ही त्या पोत्याला गुद्दे मारू!'' फैजचं स्पष्टीकरण.

ही सूचना चांगली होती; पण मी काही बोलणार एवढ्यात रोहन म्हणाला,

''नको ताई. सगळ्यांना एकदम राग आला की सगळे एकदम धावतील आणि मग कुणी आधी मारायचं त्यावरूनच मारामाऱ्या होतील!''

त्याला सगळ्यांचा रोजचा अनुभव असल्यानं त्यानं रास्त शंका काढली होती.

''त्यापेक्षा प्रत्येकाला एक उशी द्या ना, म्हणजे राग आला की प्रत्येक जण उशीला मारेल!''

हा उपाय पटण्यासारखा होता खरा. राग काढायला हक्काचं साधन असल्यावर काही फरक पडतो का, ते तरी बघता येईल. या गोंडस सैतानांच्या रागाची वाफ काढण्यासाठी उशीचा सेफ्टी व्हॉल्व्ह लावून तर पाहू. सर्व मुलांसाठी एक एक उशी आणायचं मी वचन दिलं.

मी वर्गाबाहेर पडले; पण मनात मुलांची वाक्यंच घोळत होती. आपण समाजातल्या हिंसाचारावर चवीनं चर्चा करतो, त्यासाठी विशिष्ट जाती-धर्माला जबाबदार ठरवून मोकळे होतो; पण हिंसा ही योग्य गोष्ट आहे, असं आपण स्वत:च तर आपल्या वर्तणुकीनं मुलांच्या मनात रुजवतो! दुसरा जर आपल्या मनाप्रमाणे वागत नसेल, तर त्याला मारण्यात काहीच गैर नाही, असंच आपण ठसवत असतो. शाळेला या विपरीत स्थितीत मुलांच्या मनातली हिंसा घालवायची आहे. हे आव्हान अवघड होतं आणि म्हणूनच आकर्षकही. एकाच प्रयोगात काही रामबाण उत्तर सापडेल असं नाही.

अर्थात, आमच्या मदतीला मुलं आहेत. ती यातून नक्की काही मार्ग सुचवतील. मिळून काहीतरी शोधूच!



८

प्रयोगातून विज्ञान, की विज्ञानातले प्रयोग?

शोभना भिडे

विज्ञान सतत आपल्यासोबत असतंच. फक्त 'अतिपरिचयात अवज्ञा' असं आपलं झालं आहे. आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात मुलांना विज्ञानाची गोडी लावायची असेल, उत्सुकता निर्माण करायची असेल, तर छोटे-छोटे प्रयोग, परिसरातल्या वैज्ञानिक गमतीजमती, सृष्टीविज्ञान या सर्वांचा परिचय मुलांना करून द्यायला हवा. म्हणूनच आवश्यकता आहे ती मुलांमधलं कुतूहल जोपासण्याची.

'युनेस्को'नं प्रकाशित केलेल्या विज्ञानशिक्षण मार्गदर्शन पुस्तिकेत सुरुवातीलाच एक विधान आहे. 'If it is to be learnt effectively, science must be experienced. Good science teaching must be based on observation and experiments.'

प्रयोग हा विज्ञानाचा अंगभूत घटक नव्हे, आत्माच आहे. विज्ञानाचा अभ्यास व अध्यापन हे प्रयोग-कृती यांपासून वेगळं काढताच येत नाही. हे लक्षात घेऊन शाळेत अगदी बालवाडीपासून प्रयोग व निरीक्षणाच्या संधी मुलांना उपलब्ध करून देता येतात. अशा संधी कोणत्या असू शकतात, ते माहीत करून घेण्यासाठी वर्गावर्गातून चक्कर मारूया.

बालवाडीच्या वर्गात ताईंनी पाण्याचा टब आणलाय. सर्व मुलं गोल करून भोवती बसली आहेत. एकेक जण पुढे येऊन त्या टबात बिल्ले, लाकडी खेळणी, खोडरबर, खडू, पेन्सिल, नाणं... अक्षरश: जे हाताला मिळेल ते टाकून बघताहेत. या वस्तू तरंगतात की बुडतात? मुलांचं हे सर्व निरीक्षण कुतूहलभरल्या डोळ्यांनी

चालू आहे. असं दृश्य नेहमीच बघायला मिळेल. कधी ही छोटी मंडळी बागेतली खादाड अळी बघतात. कधी काडी किड्यानं बांधलेलं छोटं घर, तर कधी छोट्या भिंगातून मुंगीचं निरीक्षण करतात. घाबरून शंखात जाणारी गोगलगाय बघतात, सात-आठ ग्लासांतून ठेवलेल्या पाण्यामध्ये- मीठ, साखर, खडूची पूड, माती... घालून, ढवळून काय विरघळतंय, काय नाही, याचं निरीक्षण करतात.

पहिलीतल्या सारंगनं आज सर्व मित्रांना व ताईंना दाखवायला कोश आणलाय. त्यांच्या बागेतल्या झाडावर त्याला तो सापडला. आज कोश, उद्या शंखशिंपले, परवा फुलपाखरांचे पंख... अशा नाना गोष्टी वर्गात येत राहतील व ताई त्यावरच सर्वांना माहिती, गोष्ट, गाणी असं काय काय सांगतील.

चौथीच्या वर्गानं आज एक प्रदर्शन भरवलंय. विषय आहे पाणी. बघायला येण्याचं निमंत्रण शाळेतल्या सर्वांना गेलंसुद्धा. पाण्याच्या थेंबाचा सूक्ष्मदर्शक, पाणचक्कीची प्रतिकृती, केशाकर्षणाचा प्रयोग, पाण्यात मेण टाकून बनवलेले मणी, जलतरंग... अशा नाना वस्तू प्रदर्शनात आहेत.

सातवीच्या वर्गात घनतेचा प्रयोग सुरू आहे. एकमेकांत न मिसळणारे द्रवपदार्थ एकत्र केले, की घनतेनुसार त्यांचा एकमेकांवर तयार होणारा थर आणि घनतेचं सूत्र याचा पडताळा मुलांना घ्यायचा आहे. रॉकेल, पाणी, तेल, पेट्रोल असे द्रवपदार्थ जमा झालेत. काचेच्या एका बाटलीत विविध रंगांचे एकावर एक तयार झालेले थर खूपच आकर्षक दिसत आहेत. आता प्रश्न आहे, या द्रवांचं वस्तुमान मोजण्याचा! मग मनोजचं डोकं चालतं, की प्लॅस्टिकच्या पिशवीत द्रव ओतू व ताणकाट्याला पिशवी अडकवू. त्यापेक्षा बालवाडीच्या भातुकलीच्या खेळातली छोटी स्टीलची बादली वापरूया की, ही स्वप्नाची सूचना लगेच अमलात येते. आकारमान समान असेल, तर पदार्थांची घनता वस्तुमानानुसार बदलते, हे तत्त्व आता या मुलांना शिकवण्याची गरज नाही. एका कृतीनं शंभर शब्दांचं काम करून टाकलंय.

विज्ञान म्हणजे प्रयोगाधारित ज्ञान, प्रयोगाच्या कसोटीवर जी तथ्यं खरी उरतात त्याचाच स्वीकार म्हणजे विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन. असा वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणं, हे विज्ञानशिक्षणाचं उद्दिष्ट सर्वज्ञात आहे; परंतु हा दृष्टिकोन विकसित करणं ही जादूची कांडी नाही. ही मनाची सवय आहे, प्रशिक्षण आहे. अशी सवय मनाला प्रयोग, कृती, निरीक्षण, नोंदी, निष्कर्ष या प्रक्रियेतूनच लागू शकते. जसं आठवीच्या वर्गात ताईनी स्वतःचे, आई-वडलांचे, आजी-आजोबांचे नाडीचे ठोके मोजून यायला सांगितले. या नोंदीत वयानुसार फरक दिसून

आला. कारणांवर चर्चाही झाली. दुसऱ्या दिवशी शरीराच्या तापमानाची नोंद करायची होती. यातही वयानुसार फरक पडणार, अशी मुलांना खात्री होती. त्यांनी तसं ठामपणे मांडलंही. दुसऱ्या दिवशी नोंदींची तुलना करताना त्यात वयपरत्वे फरक आढळला नाही. तापमान वयानुसार बदलत नाही, हे मुलांच्या लक्षात आलं. प्रयोग करण्यापूर्वी निष्कर्ष न सांगता 'करून पाहूया मग ठरवूया' या भूमिकेतून सर्व प्रयोग व्हायला हवेत. तसं झाल्यास प्रयोगापूर्वीची कल्पना व प्रयोगानंतरचे अनुमान यात फरक पडू शकतो आणि म्हणूनच 'ऐकलं' पेक्षाही 'केलं', 'पाहिलं' नंतरच 'विश्वास ठेवला' ही प्रक्रिया प्रयोगाच्या माध्यमातून विकसित होऊ शकते. शाळेच्या सुरुवातीपासूनच व छोट्या वर्गातच हातानं करून पाहा, निरीक्षण करा, त्यावर आधारित मतं मांडा, निष्कर्ष काढा, कारण शोधा, अशा कृतियुक्त वाटेनंच विज्ञानअध्यापन व्हायला हवं.

एकदा अध्यापक महाविद्यालयातल्या डी. एड.च्या विद्यार्थ्यांसमोर विज्ञानदिनानिमित्त विज्ञानअध्यापनाविषयी 'युक्तीच्या चार गोष्टी' सांगायला शाळेतल्या ताई गेल्या. व्याख्यानपद्धती बाजूला ठेवून कृतीद्वारे अध्यापनाचा मार्ग त्यांनी स्वीकारला. चुंबकाभोवती लोहकीस पसरून तयार होणाऱ्या बलरेषा, अंतर्वक्र, बहिर्वक्र आरशातल्या प्रतिमा, सूक्ष्मदर्शकातून दिसणारं सूक्ष्मजीवांचं जग, विद्युतमंडल पूर्ण केलं की पेटणारा दिवा, सपाट आरसे एकमेकांना चिकटवून वेगवेगळ्या कोनात ठेवले की मिळणाऱ्या प्रतिमा, शोभादर्शक अशा अनेक गोष्टी त्यांनी या मुलांना (भावी शिक्षकांना) दाखवल्या. थोड्याच वेळात त्या एक उत्कृष्ट जादूगार आहेत, अशीच भावना श्रोतृवर्गात निर्माण झाली. या साध्या सोप्या वस्तूंनी प्रयोगशाळेशिवायही विज्ञानाची अनेक तत्त्वं शिकवता येतात, हे त्यांना सविस्तर सांगावं लागलं. भाषण संपल्यावर हे प्रयोग करून पाहण्यासाठी श्रोत्यांमध्ये अहमहमिकाच लागली. कारण त्या दिवसापर्यंत या वस्तू हाताळून बघण्याची संधी शालेय जीवनात त्यांना मिळालीच नव्हती. अशा स्थितीत प्रयोग करण्याचा आत्मविश्वास शिक्षकांमध्येच नसेल, तर मुलांमध्ये कुठून येणार?

अनेकदा शालेय स्तरावर विज्ञानशिक्षण आहे; पण प्रयोग नाहीत, अशी स्थिती दिसते. प्रयोगशाळा नाहीत, साधनं नाहीत. रसायनं संपल्यास, किंवा साधनांची मोडतोड झाल्यास ती नवीन घेण्यास पैसे नाहीत, अशी अनेक कारणं प्रयोग न होण्यास जबाबदार धरली जातात. परिणामी प्रयोग ही विशेष साधनांद्वारे, विशिष्ट ठिकाणी करण्याची गोष्ट आहे, असं विद्यार्थ्यांना वाटतं. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांत, स्वयंपाकघरात, निसर्गात सर्वत्र विज्ञान

सामावलेलं असतं; परंतु ते पाहण्याची, जाणण्याची दृष्टी मात्र विकसित झालेली नसते. अशा वेळी विज्ञान चमत्कृतीच्या मार्गानं अंधश्रद्धेच्या वाटेला जाऊ शकतं. हे होऊ नये असं वाटत असेल, तर विज्ञान हे व्यवहारात उतरायला हवं. यासाठीचे जाणीवपूर्वक प्रयत्नही व्हायला हवेत.

'आनंदनिकेतन'मध्ये प्रयोगाच्या संधी भरभरून पुरवणारी, होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राची पुस्तकं इयत्ता तिसरी व चौथीसाठी पाठ्यपुस्तकं म्हणून वापरण्यास सुरुवात झाली. या पुस्तकांचं नावच आहे 'हलकं फुलकं विज्ञान.' या वापरामुळे आमचे वर्ग, वर्गातल्या प्रत्येक मुलाचं घर ही एक प्रयोगशाळाच बनून जाते. प्लॅस्टिक पिशवीचा वापर करून पचनसंस्था बनते. त्यातल्या पहिल्या पिशवीत केळ टाकलं, की घुसळल्यामुळे शेवटी जोडलेल्या कापडी पिशवीला दाबल्यावर द्रवरूप केळ बाहेर येतं. यातून अन्न- चवर्ण/घुसळणं- द्रवरुप अन्न- आतड्यात शोषण- उर्वरित चोथ्याचं उत्सर्जन या सर्व प्रक्रिया स्वतः करून पाहिल्यानं मुलांच्या चांगल्याच लक्षात येतात.

प्रायोगिक कौशल्यं व आत्मविश्वास वाढावा, यासाठी शाळेत वर्गावर्गाची विज्ञान प्रदर्शनं आयोजित केली जातात. काही वेळा ही प्रात्यक्षिकं पालकांसमोर केली जातात. यात पाचवी-सहावीच्या मुलांनी सादर केलेले कागदी पेल्यात पाणी तापवणं, पेल्यातली अदृश्य नाणी त्यात पाणी ओतताच प्रकट होणं, कोऱ्या कागदावरचा मजकूर दृश्यमान करणं, सुरीनं लिंबू कापताना रक्तासारखे थेंब सांडणं असे अनेक छोटे छोटे प्रयोग व त्यामागचं विज्ञान पालकांची उत्स्फूर्त दाद मिळवतात. शाळेतल्या मुलांना मिळणाऱ्या या संधीची थोडीशी ओळख इतर मुलांनाही करून देण्याच्या उद्देशानं शिबिरांचंही आयोजन केलं जातं.

एकदा एका सामाजिक संस्थेतर्फे आठवी, नववीत शिकणारी काही मुलं हस्तकला शिकण्यासाठी शाळेत आली. या कार्यशाळेत हस्तकलेच्या वस्तूंबरोबर दोरीवर चढणारा जोकर, दृष्टी सातत्याच्या तत्त्वावर आधारित पिंजऱ्यातला पोपट, उघडणारा-मिटणारा पंखा हे विज्ञानाधारित सोपे नमुने मुलं शिकली. प्रत्यक्ष कृतीतून विज्ञानाचं तत्त्व शिकताना 'अजि म्या ब्रह्म पाहिले' अशी भावना त्यांच्या डोळ्यांत स्पष्टपणे वाचता येत होती.

मे महिन्यात सहावी ते नववीतल्या मुलांसाठी सहा दिवसांचं निसर्ग विज्ञान शिबिर आयोजित केलं जातं. मुलांमध्ये भूत, चमत्कार, पुनर्जन्म अशा विषयांबद्दल मुळातच उत्सुकता असते. दूरचित्रवाणीवरील मालिकांच्या माध्यमातून विपर्यस्त स्वरूपात हे विषय मुलांपर्यंत पोहोचतात व त्यांचं मन साशंक बनतं. त्यामुळे मुलांशी या विषयावर बोलणं आवश्यक असतं. शिबिराची सुरुवात अंधश्रद्धा व विज्ञान या विषयातून केली. वक्त्यांनी काही प्रयोगच या वेळी सादर केले. पांढऱ्या शुभ्र कागदाला उदबत्ती लावली आणि भुताचा आकार बनला. रिकाम्या तांब्यातून पाणी निघालं, तर हातातले दोरे आपोआप रंगीत झाले. ते पाहून मुलं थक्क झाली. मग अंधश्रद्धा पसरवण्यासाठी हातचलाखी, विज्ञानाचा उपयोग करून केली जाणारी फसवणूक, संमोहनाचा वापर करून केलेली दिशाभूल हे सारं मुलांच्या लक्षात आणून दिलं. नंतर तेच प्रयोग मुलांनीही केले.

इतर सत्रांमध्ये रासायनिक अभिक्रियांचे प्रकार, सायफनचं तत्त्व, अपकेंद्रबल (सेंट्रीफ्युगल फोर्स), आरशातली प्रतिमा, घरगुती पदार्थातून आम्ल, आम्लारी शोधणं, अन्नातली भेसळ ओळखणं असे अनेक प्रयोग मुलांनी धमाल करत केले. सूक्ष्मदर्शिकेतून जीवाणू, बुरशी यांच्या काचपट्ट्या, पानातल्या पेशी, परागकण बघितले, रक्तगट ओळखायला शिकले, सापांची माहिती घेतली, साप हाताळून पाहिले. घरगुती गॅस व वायरिंगबाबतची काळजी कशी घ्यायची, याची माहिती घेतली. प्रथमोपचाराची प्रात्यक्षिकं केली. एक दिवस मुक्त विद्यापीठाच्या कृषिविज्ञान केंद्राला भेट दिली.

रोज घरातून कचरा आणून त्याचं वर्गीकरण करायचं. गांडूळखतासाठी त्याचे थर रचायचे हे कामही झालं. काहींनी नाइलाजानं, नाक मुरडत, नाकावर रुमाल बांधत; तर काहींनी सहजतेनं केलेलं हे काम आपण केलेल्या कचऱ्याचं



व्यवस्थापन किती महत्त्वाचं आहे, हे शब्दाविना शिकवून गेलं. मुलं इतकी रममाण झाली होती, की रोजचे पाच तास कसे संपत होते, ते मुलांना समजलंच नाही.

शिबिराच्या शेवटच्या दिवशी भरून घेतलेल्या प्रतिसाद-प्रश्नावलीत उपकरणं आम्ही प्रथमच हाताळली, घरातलं व परिसरातलं विज्ञान आम्हाला या निमित्तानं जाणवलं, आमच्या घरच्या कचऱ्याचं आता आम्ही कुंडीत खत बनवू, अशा प्रतिक्रिया शिबिरार्थींना दिल्या. या सर्व उपक्रमांतून कृतिशील विज्ञानापासून झालेली मुलांची फारकत प्रकर्षानं जाणवली व विज्ञान शिक्षणातला उणेपणाही. या नैमित्तिक उपक्रमांना मिळणारा प्रतिसाद पाहून आता शाळेत समाजोपयोगी विज्ञान केंद्राची उभारणी करण्यात येत आहे.

विज्ञान सतत आपल्यासोबत असतंच. फक्त 'अतिपरिचयात अवज्ञा' असं आपलं झालं आहे. आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात बहुतेक पालकांची आपल्या मुलांनी दहावीनंतर विज्ञान शाखेत प्रवेश घ्यावा, अशी इच्छा असते. त्याला विज्ञानाची गोडी लावायची असेल, उत्सुकता निर्माण करायची असेल, तर छोटे-छोटे प्रयोग, परिसरातल्या वैज्ञानिक गमतीजमती, सृष्टीविज्ञान या सर्वांचा परिचय मुलांना करून द्यायला हवा. म्हणूनच आवश्यकता आहे ती मुलांमधलं कुतूहल जोपासण्याची. बाजारात घरगुती साधनातून प्रयोग शिकवण्याची पुस्तकं उपलब्ध आहेत. विज्ञानप्रसाराचं व्रत घेतलेल्या अरविंद गुप्तांची अनेक पुस्तकं आहेत. त्यांच्या arvindguptatoys.com या साईटवर तर वैज्ञानिक खेळण्यांचा खजिनाच उपलब्ध आहे. त्यामुळे पालकांनी मनावर घेतलं, तर अनेक गोष्टी करणं सहज शक्य आहे.

●



९

निर्मितीचे डोहाळे

वंदना खरोटे, भारती खैरनार

“

श्रमप्रतिष्ठा नसलेल्या आपल्या देशात बुद्धी फक्त पाठांतरासाठी व हात केवळ घडी घालून ठेवण्यासाठी आहेत, असं मानलं गेल्यानं मुलांमधला सर्व …सच आटूनीबेला आहे. स्वत: काही तयार करण्याची मुलांची क्षमताच नष्ट झाली आहे. अशा वेळी कार्यानुभवाचे तास आपण खूप कौशल्यानं व विचारपूर्वक वापरले पाहिजेत. तरच या सृजनाच्या तिजोऱ्या भरतील.

”

'देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहाळे, मंगलाने गंधलेले सुंदराचे सोहळे!'

'आनंदनिकेतन'मध्ये असे सुंदराचे सोहळे अखंड, अविरत सुरू असतात. आपल्या हातांनी आपण काय काय करू शकतो, हे मुलं अजमावत असतात, स्वत:वरच खूष होत असतात आणि आम्ही सगळ्या अचंबित होऊन ती देखणी निर्मिती न्याहाळत असतो, कौतुकानं एकमेकींना दाखवत असतो.

आम्ही शाळेच्या हस्तकला-कार्यानुभवाच्या शिक्षिका. खरंतर इतर शाळांत आमचे विषय तसे दुर्लक्षित असणारे, जणू जास्तीचं काम, अभ्यासक्रमाचा भाग नाहीच. त्यामुळे बऱ्याचदा कधीतरी काहीतरी घरून करून आणायचं असा कार्यानुभव आपण बघतो; पण इथे मात्र गणित-विज्ञानाच्या बरोबरीनं याही विषयांना स्थान! नियोजनही अगदी काटेकोर!

सृजनशीलता ही मुलांची सहजप्रवृत्ती आहे. मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी त्यांना निर्मिती करण्यास पूर्ण वाव दिला पाहिजे. मुलांना जसजशी सभोवतालच्या विविध रंगांची, आकारांची आणि वस्तूंची ओळख होत जाते, तसतशी मुलं माती, खडू, कागद, पेन्सिल, रंग असं सहज मिळणारं साहित्य वापरून निर्मिती करण्याचा प्रयत्न करू लागतात. ही कृती म्हणजेच कार्यानुभव, हस्तकला!

याची सुरुवात बालवाडीत कागदांवर मारलेल्या रेघोट्या, माती-प्लॅस्टिसिनच्या वस्तू यांपासून होते. कागदांच्या घड्यांचे प्राणी, बोटांच्या ठशांची चित्रं, रंगीत कागद-कापडांचे तुकडे चिकटवून कोलाज, बिया-काचांचे तुकडे-ठोकळे यांच्या रचना यांतून बालवाडीच्या मुलांना आपल्या हातातली जादू समजते. पुढे त्यातले प्रकार वाढत जातात. सोप्यातून अवघड वस्तू, सुबक काम यांकडे मुलांचा प्रवास सुरू होतो. त्याचबरोबर रांगोळी, पेपर क्विलिंग, बागकाम, भरतकाम, शिवणकाम, कातरकाम, कागदाच्या लगद्यापासून तयार करायच्या वस्तू असे अनेक प्रकार मुलं शिकतात. भरतकाम, शिवणकामात मुलींबरोबर मुलगेही सहभागी होतात आणि सफाईदार काम करतात. सहावीच्या मुलांची क्रोशाच्या साखळी-खांबाशी ओळख होते. पार्थला तर याची इतकी गोडी लागली की त्याने आईच्या मोबाईलसाठी कव्हर विणून दिलं. सातवीची मुलं पहिल्या सत्रात मशीनवर टीप मारायला शिकतात, तर दुसऱ्या सत्रात शाळेच्या परसबागेत भाज्या लावून स्वतः पिकवलेली भाजी खातात. आम्ही प्रत्येक कामाचं तंत्र मुलांना समजावून सांगतो. मग त्या तंत्राचा वापर करून जी निर्मिती मुलं करतात, ते त्यांचं सृजन असतं. ही तंत्रं मुलं वेगवेगळ्या गोष्टींसाठी वेगवेगळ्या प्रकारे वापरतात. मग एखाद्या विषयाचं पोस्टर तयार करण्यासाठी घडीकामाचा वापर करतात, तर ठसेकामाच्या विविध प्रकारांनी आपल्या आवडीच्या, किंवा दिलेल्या थीमनुसार दिनदर्शिका तयार करतात, किंवा एखाद्या प्रोजेक्टसाठी कोलाज तयार करतात. अशा निर्मितीत मुलं मनापासून रमतात. यातील काही गोष्टी ते वैयक्तिक करतात तर काही गटात मिळून करतात. शाळेत येणाऱ्या पाहुण्यांना, मुलांना त्यांच्या वाढदिवसाला मुलांनी बनवलेल्या भेटवस्तू मिळतात. घरगुती कार्यक्रमांसाठीही मुलं स्वतः काहीतरी बनवून देतात. त्यामुळे त्यांची भेट नेहमीच अनोखी ठरते. स्वतः बनवलेला पदार्थ खाणं म्हणजे तर आनंदाची पर्वणीच.

कार्यानुभवाच्या तासाचं नियोजन म्हणजे एक खटाटोपच असतो. कारण आम्हीच आम्हाला जाणीवपूर्वक घालून घेतलेलं बंधन! जास्त महागडं, पर्यावरणाची हानी करणारं, तयार (रेडीमेड) साहित्य वापरायचं नाही. शक्यतो 'टाकाऊतून टिकाऊ' असाच प्रयत्न करायचा. पाठकोरेच कागद वापरायचे. प्रत्येकात मुलाची कल्पना, सृजन फुलवायचं. आपली मतं, आवडनिवड मुलांवर लादायची नाही. मुलांच्या कलाकृतींमध्ये डावं-उजवं करायचं नाही. प्रत्येकानं कामात रस दाखवला पाहिजे म्हणून सतत प्रोत्साहन द्यायचं, मुलांनी नक्कल न करता स्वतः विचार करून स्वतःच काहीतरी निर्माण करावं यासाठी दक्ष

राहायचं... या सगळ्या खटाटोपाचा प्रत्ययही आम्हाला वेळोवेळी येतो. सगळ्यांमध्ये न मिसळणारा, आपल्या वयाच्या मानानं अभ्यासात मागे असणारा विनय तल्लीन होऊन आपली वस्तू बनवतो आणि ती वस्तू तयार झाल्यावर एक वेगळाच आत्मविश्वास त्याच्या चेहऱ्यावर झळकतो, तेव्हा सगळ्या प्रयत्नांचं सार्थक झाल्यासारखं वाटतं. अनेक वेळा हस्तकलेतली प्रगती, एकाग्रता इतर विषयांनाही पूरक ठरते. शिक्षकदिनाच्या, दिवाळीच्या, नववर्षाच्या शुभेच्छा व्यक्त करताना मुलं स्वतः तयार केलेली वस्तू ताईंना देतात, हे सगळं समाधान देणारं असतंच; पण मुलांच्या दृष्टीनंही बऱ्याच गोष्टी यातून साधता येतात. अनुभवांतून शिकताना मुलांना मजा येते, स्वयंनिर्मितीचा आनंद मिळतो, आत्मविश्वास वाढतो, सृजनशीलता वाढते, कल्पनाशक्तीला चालना मिळते, स्नायूंच्या हालचालींमध्ये लवचिकता येते, तसंच नियंत्रणही येतं, शोधकवृत्तीला प्रोत्साहन मिळतं, कोणत्याही वस्तूमधलं सौंदर्य शोधण्याची वृत्ती तयार होते, स्वतःचा विचार कृतीतून मांडण्याची संधी मिळते, एकाग्रता साधते, मनावरचा ताण हलका होतो. त्याचप्रमाणे मुलं श्रमाचं महत्त्व आणि सहकार्यही शिकतात. स्त्री-पुरुष, उच्च-नीच असा भेदभाव विसरून कामाशी एकतानता, समरसता साधतात.

'मी केलं आणि मला समजलं' हे शाळेचं ब्रीद असल्यानं हे 'करणं' अनेक विषयांशी मैत्री फुलवते. या करण्यातूनच मुलं शिकती होतात. वैज्ञानिक खेळणी तयार करून विज्ञानातली संकल्पना समजून घेणं, हिंदी-इंग्रजीतून दिलेल्या सूचना ऐकून भाषेबरोबरच हस्तकलाही शिकणं, मणी ओवता ओवता गणिताच्या संकल्पना शिकणं, किंवा ओरिगामीतून भूमिती समजून घेणं, खाऊ तयार करताना स्वयंपाकघरातल्या कौशल्यांबरोबरच भाषा, गणित, विज्ञान, इतिहास आणि भूगोलाशीही मैत्री करणं हे सगळं सहजच साधतं.

या सगळ्या निर्मितीला, सुंदराच्या सोहळ्याला कळस चढतो तो दुकानजत्रेनं! मुलं कार्यानुभवाच्या तासाला फक्त वस्तू बनवणं एवढंच शिकतात असं नाही, तर दरवर्षी होणाऱ्या दुकानजत्रेमध्ये आपण बनवलेल्या वस्तूंची विक्रीसुद्धा करतात. या वस्तूंच्या यादीकडे नजर टाकली, तरी या वैविध्याची प्रचीती येते. विविध प्रकारची शुभेच्छापत्रं, भरतकाम केलेले रुमाल, पेपर क्विलिंगचे दागिने, फ्रेम्स, चटण्या, कागदी-कापडी फुलं, मुलांनी शिवलेल्या कापडी पिशव्या, छोट्या मुलांसाठी मण्यांची खेळणी, दरवर्षी नवीन पद्धतीचा आकाशकंदील... मुलं स्वतः बनवलेल्या खाऊचाही स्टॉल मांडतात. गटकामाचा मोठा वस्तुपाठच या स्टॉलमधून मिळतो. मुलांनी केलेल्या वस्तूंचा सुबकपणा व विविधता पाहून

देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहाळे!



बघणाऱ्यांना आश्चर्यच वाटतं. वास्तविक हे काही फक्त 'आनंदनिकेतन'मधल्या मुलांचं वैशिष्ट्य नाही. ही सृजनाची शक्ती सर्वच मुलांमध्ये असते; पण आपण मुलांना केवळ पुस्तकाशीच बांधल्यानं आता आपल्यालाच त्यांच्यातल्या सृजनशक्तीचा विसर पडला आहे.

भांडवल, कच्च्या मालाची खरेदी, वस्तू बनवणं, मजुरीचं मूल्य, बाजारात त्या वस्तूची किंमत, त्यानुसार योग्य नफा मिळवून विक्रीची किंमत ठरवणं, पॅकिंग करणं, आकर्षक जाहिराती तयार करणं, प्रत्यक्ष स्टॉलवर उभं राहून वस्तू विकणं, हिशेब लिहिणं, ग्राहकाशी संवाद साधणं अशा अनेक गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव मुलांना या दुकानजत्रेतून मिळतो. बिलं बनवणं, नफा-तोटा, खरेदी-विक्री या गणिती क्रिया मुलं शिकतातच; पण त्याचबरोबर विक्रीकौशल्य, धीटपणा, ग्राहकांशी संवाद, गटकामातून सहकार्य अशी जीवनकौशल्यंही आत्मसात करतात. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास येतो, उद्योजकता मूळ धरू लागते. स्वत:च्या पायावर उभं राहू शकण्याचा आत्मविश्वास जागृत होतो.

दुकानजत्रेच्या उद्घाटनासाठी येणारे पाहुणेही खास असतात. कधी चहाच्या टपरीवर काम करत असणाऱ्या मुलींच्या हस्ते, तर कधी शाळेच्याच रिक्षाकाकांच्या हस्ते उद्घाटन असतं. यावर्षी, आधी छोटीशी दाबेलीची गाडी चालवणारा पण आता स्वत:चं अद्ययावत हॉटेल चालवण्याच्या प्रयत्नात असणारा विजूदादा उद्घाटनासाठी आला होता. मुलांमध्ये उद्योजकता विकासाचं मूल्य रुजवतानाच सामाजिक दृष्टिकोनही नकळत रुजतो.

मन, हात व बुद्धी (heart, hands & head) या तिन्हींचा समन्वय साधून झालेली निर्मिती, त्यातलं देखणेपण मुलांनाही भारून टाकतं. आपल्या निर्मितीबरोबरच इतरांच्या निर्मितीचा निकोप मनानं आनंद घेता येतो. आनंदानं जगण्यासाठी कला आणि कलेचा आस्वाद ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. पुढील आयुष्याच्या धकाधकीत फक्त भौतिक सुखाच्या आहारी न जाता आपल्या मनाच्या आनंदासाठी काहीतरी करण्याची बीजं मुलांच्या मनात या कार्यानुभवानं नक्कीच रोवली जात असतील ना?



१०

शिवराय आणि बालमावळे

दीपा पळशीकर

“ शिवराय व विद्यार्थ्यांच्या पत्रसंवादानं एक नक्की झालं, मुलांच्या मनातली स्वराज्यविषयक जाणिवांची चर्चा सुरू झाली. मुलांना, आपला शत्रू आता बदलला आहे आणि त्यांच्याविरुद्ध लढण्याचे मार्गही बदलले आहेत, हे उमजलं. दैनंदिनी लिहिताना दुसऱ्या व्यक्तीच्या भूमिकेत शिरून विचार करायला मुलांनी सुरुवात केली. इतिहासाला दोन बाजू असतात आणि दुसरी बाजूही महत्त्वाची व दखलयोग्य असू शकते, या दिशेनं मुलं विचार करू लागली. ”

इयत्ता चौथीला शिवाजीमहाराजांचं जीवनकार्य हा इतिहासाचा विषय आहे. स्वराज्यस्थापनेची ओळख यापलीकडे जाऊन मुलांना स्वातंत्र्याची प्रेरणा समजावणं, हा इतिहासाच्या शिक्षकापुढचा जटील प्रश्न असतो. इतिहास शिकवताना अनेकदा शिक्षकच भावनेच्या आहारी जाण्याचा धोका असतो. तसं न करावं, तर इतिहास केवळ सनावळ्यांची जंत्री बनून जातो व मुलांना त्यात रस वाटेनासा होतो. पाठ्यपुस्तकाची भाषाही चौथीच्या मुलांना समजेल अशी नाही. मुलांच्या भावविश्वात नसलेले दाखले देणारी अलंकारिक भाषा या पुस्तकात आहे. भावनात्मकता टाळून त्याचा वर्तमानाशी संबंध जोडून मुलांना त्यात रस निर्माण करण्यासाठी शिक्षकाला नेहमीच सज्ज राहावं लागतं.

शिवरायांच्या मृत्यूनंतरच्या पाठांत शिवरायांची युद्धनीती, राजनीती यांची चर्चा आहे. हे पाठ मुलांना खूप कंटाळवाणे वाटतात. कारण शिवरायांच्या जीवनातलं नाट्य त्यात नसतं. या पाठांत एक वाक्य असं आहे, की 'जवाहिरा जसे मोती पारखून घेतो, त्याचप्रमाणे एकेक गुण पारखून शिवरायांनी माणसं निवडली.' त्यावरून वर्गात चर्चा सुरू झाली, की शिवरायांना कोणते गुण असलेली माणसं हवी असतील? यावर विचार करून मुलांनी शौर्य, प्रामाणिकपणा, प्रसंगावधान, स्वाभिमान, निर्णयक्षमता अशा १६ गुणांची यादी केली. मग तुम्हाला शिवरायांच्या सैन्यात सामील व्हायचं असेल तर आणि यादीतले गुण तुमच्यात असतील तर

तुम्ही शिवरायांकडे कामासाठी अर्ज करणार का, असं मुलांना विचारलं, तेव्हा सर्वच मुलांनी उत्साहानं व हिरिरीनं अर्ज लिहिले. त्यातली बालसुलभता व मोकळेपणा मोहून टाकणारा आहे.

साक्षीनं लिहिलं, की 'तुम्ही काढलेल्या कंपनीत आपण काम करण्यास तयार आहोत!' तर 'मी तुमचं नाव फार ऐकून आहे. मी फितुरी करणार नाही; पण शत्रूला फितूर करून घेईन', असंही धनश्रीनं लिहिलं!

या पत्राला अनपेक्षितपणे शिवाजीमहाराजांचं उत्तर आलं!

''आनंदनिकेतन'मधल्या माझ्या मावळ्यांनो,

तुमची पत्रं मिळाली. स्वराज्याच्या कार्यात तुम्हीही सामील होऊ इच्छित आहात, हे वाचून आनंद वाटला. शौर्य, आत्मविश्वास, एकनिष्ठता यात तुम्ही कधीच कमी पडणार नाही, याची मला खात्री आहे. मला तुमचा सच्चेपणा खूपच आवडला. रोहिणीनं लिहिलंय, 'मला थोडंसंच युद्ध करता येतं; पण मी अमात्य म्हणून जमाखर्च ठेवण्याचं काम करेन.' स्वराज्यात सर्वच गुणांची गरज आहे आणि सर्वच कामं सारख्याच महत्त्वाची आहेत. तुम्ही मुलं स्वराज्यासाठी जे काम करता, त्याकडे माझं लक्ष असतं. नाशकात पुस्तकप्रदर्शनाच्या आयोजकांनी काम झाल्यावर सर्व कचरा तसाच टाकून दिला. हे पाहून मला फार वाईट वाटलं; पण मग 'आनंदनिकेतन'ची सातवीची मुलं व काही जागरूक तरुण-तरुणींनी मिळून आपल्या परीनं कचरा आवरला, हे पाहून मला फार आनंद झाला. शिवजयंतीला वा नंतर काही लोक मिरवणुका काढतील; पण त्यापेक्षा स्वच्छता करणारी मुलंच माझे खरे मावळे म्हणून मला प्रिय आहेत. कारण आता आपली लढाई आपल्यातल्या दुर्गुणांविरुद्धच आहे. त्यासाठीही तेवढंच शौर्य लागणार आहे जेवढं लढाईला लागत होतं. तुम्हा सर्वांना मी माझ्या सैन्यात घेतलंय; पण आता केवळ मारामारी करायचं काम करून चालणार नाही. हा देश सुंदर बनवायचा आहे. गरिबांना शिक्षण मिळवून द्यायचं आहे. आपल्यापेक्षा जो दुबळा असेल त्याला मदत करायची आहे.

या कामात तुम्ही मदत करणार ना?

यापुढेही मला जरूर पत्र पाठवत राहा. माझंही तुमच्याकडे लक्ष आहेच.

तुमचा,

शिवाजी महाराज, रायगड'

हे उत्तर शाळेत आल्यावर एकच खळबळ उडाली. मुलांना खूप आनंदही वाटला आणि अविश्वासही! ताईंनीच आपल्याला शिवराय बनून उत्तर लिहिलंय, असं मुलांना वाटत होतं. मुग्धा तर म्हणालीच, ''ताई, आम्ही आता स्कॉलरशिपची

परीक्षा दिली आहे. तुम्ही आम्हाला फसवू शकत नाही!'' तरीही सर्व मुलांनी त्या पत्रास तातडीनं उत्तरं लिहिली. त्यात आपण यापुढेही प्लॅस्टिक, कचरा, घाण होऊ नये यासाठी प्रयत्नशील राहू, असं आश्वासन दिलं. चिन्मयनं तर पोस्टकार्ड लिहून शिवाजीमहाराज, रायगड या पत्त्यावर पाठवलं!

याही पत्रांना शिवाजी महाराजांचं उत्तर आलं; पण या वेळेला शिवाजी महाराजांनी 'आपला शिवराय', असं लिहून आपलेपणा व्यक्त केला होता.

'माझ्या 'आनंदनिकेतन'मधल्या मावळ्यांनो,


तुम्ही मला तातडीनं पाठवलेली उत्तरांची पत्रं मिळाली. प्लॅस्टिक, कचरा, घाण हेही आपल्या देशाचे शत्रू आहेत, हे तुम्हाला मनापासून पटलं, याचा मला खूप आनंद वाटला. तुमची सहल जाणार आहे, असं कळलं. सहलीत तुम्ही चांगलेच वागाल, याची मला खात्री वाटते. ही सहल समुद्रावर जाणार आहे. तुम्हाला माहीत असेलच, माझ्या आरमाराचा प्रमुख कान्होजी आंग्रे याच्याविषयी तुमच्या शाळेतले अरुणदादा चांगली गोष्ट सांगतात. तुम्ही ती ऐकली नसेल, तर ताईंना सांगून त्यांना बोलावून जरुर ऐका व समुद्राची माहितीही गोळा करा. आपल्या भारताला एवढा मोठा समुद्रकिनारा आहे; पण आपल्याला समुद्राची माहितीच नाही. यामुळेच आपण इंग्रजांकडून पराभूत झालो. आताची लढाई शस्त्रांची नाही, तर ज्ञानाची आहे. तेव्हा खूप ज्ञान मिळवा आणि स्वराज्याचं रक्षण करा.

मलाही तुम्हाला भेटायला यायचं आहे; पण स्वराज्य राखायचं तर सगळीकडे सारखं फिरावं लागतं. तेव्हा वेळ आली की जरूर भेटू. तोवर पत्र लिहीत राहा.

तुमचा,
शिवराय, रायगड.

हे दुसरं पत्र आल्यावर तर मुलांची उत्सुकता अगदी शिगेला पोचली. हे खरे शिवराय असणं शक्यच नाही, असं त्यांना मनोमन वाटत होतं. मग पत्र पाठवणारी व फक्त ताईंनाच ठाऊक असलेली व्यक्ती कोण, याविषयी चर्चा सुरू झाली. त्यांनी इतर ताईंनाही विचारून बघितलं; पण कोणीच दाद लागू देईना. पत्रव्यवहाराची ही साखळी अशीच वाढवत न्यावी का, अशी चर्चा शिक्षकांमध्येही सुरू झाली; पण यातून मुलांमधे भ्रामक कल्पना पसरतील व ते अंतिमत: चांगलं ठरणार नाही, असं वाटलं. मात्र या रहस्याचा भेदही तितक्याच दमदारपणे करावा, असं ठरलं.

मी नुकतंच 'सम्राट अशोकाची दैनंदिनी' हे पुस्तक वाचलं होतं. या पुस्तकापासून प्रेरणा घेऊन मुलांसाठी 'दैनंदिनी लिहिणं' या प्रकल्पाची आखणी



केली होती. शिवाजी महाराजांच्या संबंधात पुस्तकात उल्लेखलेल्या सर्व व्यक्तींनी आपली दैनंदिनी लिहिली तर ते काय लिहितील, याची कल्पना करून मुलांनी लिहावं, असं सांगितलं. शिवरायांच्या कालखंडाचे साधारणपणे ३० टप्पे करून प्रत्येक टप्प्यातल्या महत्त्वाच्या व्यक्ती निवडल्या. मुलं मनापासून लेखन करीत होती. जिजाबाईपासून बडी बेगमपर्यंत आणि व्यंकोजीपासून अफझलखानापर्यंत सर्वांची मनोगतं मुलांनी दैनंदिनीच्या रूपात लिहिली. त्यांच्या लेखनात ताईंनी जराही हस्तक्षेप केला नाही. त्यामुळे ती अगदी बालसुलभ निरागसतेनं नटलेली आहेत.

उदा. लहानपणी एका मावळ्याच्या घरी शिवाजी महाराजांना बोलावलं जातं, असा प्रसंग मल्हारनं लिहिला आहे. त्या वेळी 'आई! मी या काकूंकडे जेवायला जाऊ का?' असं बालशिवाजी आईला विचारतो.

तर व्यंकोजीच्या मनात निर्माण झालेल्या शंकेचं वादळ यशनं लिहिलं आहे. सर्वांनी लिहिलेल्या मजकुराबाबत वर्गात चर्चाही झाली.

शिवराय म्हणून कोण लिहीत आहे, हे जाणण्याची मुलांना उत्सुकता होती. हा रहस्यभेद करण्यासाठी या 'दैनंदिनीचं' पुस्तक दस्तुरखुद्द शिवरायांच्या हस्ते प्रकाशित करण्याचं ठरलं!

शेवटी हस्तलिखित तयार झालं. त्याच्या प्रकाशनासाठी शाळेतले अरुणदादा व एक पाहुण्या विभा देशपांडे यांना बोलावलं. ताईंनी मुलांना विचारलं, ''यातलं कोण शिवाजी असेल?'' बहुसंख्य मुलांनी विभाताईंकडे बोट दाखवलं. शेवटी दीपाताईंनी हस्तलिखित प्रकाशनासाठी अरुणदादांकडे दिलं आणि मुलं म्हणाली, ''अरे! हा शिवाजी तर आपलाच निघाला!''

इतिहास वर्तमानाशी जोडला नाही, तर मिथ्याभिमानाचं ओझंच केवळ मानगुटीवर बसतं. यातून शिक्षकांची आणि मुलांची सुटका झाली, तर कितीतरी नवीन गोष्टी घडू लागतात. नेहमीच्या नीरस प्रश्नोत्तरांपेक्षा यात मुलं मनापासून रमली. त्यांनी लेखनाचे नवनवे प्रकार हाताळले. भाषा समजून घेतली. त्यातल्या शब्दांचं वजन समजून घेतलं, भावनांचं योग्य प्रकटीकरण करायला शिकली, हे सर्व इतिहास वर्तमानाशी जोडल्यानं झालं.

शिवाजी महाराजांविषयी केवळ भावनिक उमाळे आणून हे साध्य झालं असतं का? इतिहासाकडे पाहण्याचा एक विकृत दृष्टिकोन गेल्या काही वर्षांपासून सर्वत्र पसरतो आहे. त्यापलीकडे मुलांना नेण्याचा एक छोटासा प्रयत्न होता.

●



चला बाजाराला जाऊ !

निवेदिता भालेराव

“ **मुलांना वेळ द्यायचा म्हणजे नेमकं काय करायचं, त्याची अभ्यासाला जोड कशी द्यायची, याबाबतचे अनेक प्रकार त्यात दिलेले आहेत. प्रत्येक विषयाच्या पाठ्यपुस्तकात स्वाध्यायानंतर काही उपक्रम दिलेले असतात. पाठ्यविषयाला पूरक अशा गोष्टी यात आहेत. प्रकल्प, क्षेत्रभेटी, अवांतर वाचनासाठी पुस्तकांची नावं, मुलाखती...** ”

'क्वालिटी टाईम' हा आजकाल एक कळीचा शब्द बनला आहे; पण मुलांना 'क्वालिटी टाइम' द्यायचा, म्हणजे नक्की काय करायचं, असा प्रश्न अनेक पालकांना पडतो. मिळेल त्या वेळात मुलांशी अभ्यासाबद्दल बोलावं, तर मुलांना वाटतं, दुसरं काही बोलतच नाही आणि इतर गप्पा माराव्या, तर आपल्याला चुटपुट लागते, अभ्यास चुकला! पाठ्यपुस्तकं हे शिक्षणाचं एकमेव साधन नाही. त्याला अनेक गोष्टींची जोड देणं गरजेचं आहे आणि पाठ्यपुस्तकंही शिक्षक-पालकांनी वेगळं काय करावं, हे सांगत असतात. मुलांची पाठ्यपुस्तकं काळजीपूर्वक बघितली तर आपल्या लक्षात येतं, की मुलांना वेळ द्यायचा म्हणजे नेमकं काय करायचं, त्याची अभ्यासाला जोड कशी द्यायची, याबाबतचे अनेक प्रकार त्यात दिलेले आहेत. प्रत्येक विषयाच्या पाठ्यपुस्तकात स्वाध्यायानंतर काही उपक्रम दिलेले असतात. पाठ्यविषयाला पूरक अशा गोष्टी यात आहेत. प्रकल्प, क्षेत्रभेटी, अवांतर वाचनासाठी पुस्तकांची नावं, मुलाखती...

'क्षेत्रभेट' हा बहुतेक वेळा पुस्तकातच राहिलेला आणि 'ऑप्शन'ला टाकलेला विषय. वर्गातली भरमसाठ विद्यार्थिसंख्या, वेळेचा अभाव, नियोजनाची कमतरता अशा अनेक गोष्टींमुळे या उपक्रमाच्या आनंदापासून बहुतेक विद्यार्थी वंचित राहतात. मात्र क्षेत्रभेटी हा 'आनंदनिकेतन'चा अविभाज्य भाग आहे. शाळेच्या बाहेर गेल्यावर जीवनोपयोगी शिक्षण मिळतं, यावर ताई आणि पालकांचा विश्वास आहे. त्यामुळे अगदी बालवाडीपासून मुलं परिसरात फेरफटका


मारायला सुरुवात करतात. पहिली-दुसरीची मुलं कधी चांभारकाका, कधी कुंभारदादा, तर कधी भाजीबाजाराला जाऊन येतात. तिसरीत जाणाऱ्या मुलांना वीटभट्टीच्या भेटीची नवलाई वाटत असते. विज्ञानातील कचरा व्यवस्थापन या धड्याचा अभ्यास करण्यासाठी 'निर्मलग्राम' निर्माण केंद्राची भेट पाचवीसाठी ठरलेली, तर नाणेसंग्रहालयाची भेट आठवीसाठी नक्की झालेली. सहावी-सातवीची वेधशाळेला आणि रक्तपेढीला भेट. अशा अनेक क्षेत्रभेटी जाणीवपूर्वक आखलेल्या! शाळेबाहेर जाऊन माहिती मिळवायची म्हणजे मुलांच्या उत्साहाला उधाण. अशीच एक क्षेत्रभेट तुमच्यासाठी!

पाचवीच्या भूगोलाच्या अभ्यासक्रमातला 'आठवडे बाजाराला भेट' हा ठरलेला उपक्रम. आमच्या शहरी मुलांना 'आठवडी बाजार' हा ऐकून माहीत असतो; पण प्रत्यक्ष कधीच बघितलेला नसतो. दरवर्षी मुलं वेगळी, त्यांचे प्रतिसाद वेगळे, गोष्टींबद्दल औत्सुक्य वेगळं. त्यामुळे क्षेत्रभेटी म्हणजे आनंदाचा भाग असतो. यावर्षी या भेटीत काय घडलं? नाशिकजवळच्या गिरणारे या खेडेगावातल्या आठवडे बाजाराला भेट देण्यापूर्वी वर्गात आठवडी बाजार म्हणजे काय, कुठे भरतो, बाजारात काय मिळतं, विकत घेणारे लोक कोण, खूप स्वस्त मिळतं का, गावातला माल ताजा आणि शुद्ध असतो का, अशा चर्चा सुरू झाल्या. तिकडे जाऊनच प्रश्नांची उत्तरं मिळणार होती.

आम्ही सकाळी सव्वादहाच्या सुमारास बसस्थानकावर पोहोचलो. बाजार बसस्थानकाच्या जवळच होता. बसमधून उतरल्याबरोबर 'शी! किती घाण वास येतोय!' ही मुलांची पहिली प्रतिक्रिया. बसस्थानकाला लागूनच एक मुतारी, तिथे फिरणारी डुकरांची पिलावळ हे हल्लीच्या शहरी मुलांसाठी सुदैवानं दुर्मीळ असलेलं दृश्य. मानसचं यावर समजंस उत्तर, ''अरे, शहराला सगळं पाणी मिळतं. खेड्यात पाण्याची कमतरता असेल म्हणून अस्वच्छता जास्त.''

बाजारात गेल्या गेल्याच आमचं स्वागत झालं ते डोंबाऱ्याच्या खेळानं. ८-१० वर्षांची मुलगी उंच दोरावरून चालली होती. तिचे बाबा ढोलकं वाजवून तिला प्रोत्साहन देत होते. उपस्थित सगळेच तो खेळ श्वास रोखून पाहत होते. पोट भरण्यासाठी जिवावर उदार झालेली ती मुलगी पाहून जराशी गंभीर होऊनच मुलं पुढे निघाली.

बाजार फार मोठा नसला, तरी मुलांनी पूर्वी कधीच न पाहिलेल्या नाना प्रकारच्या गोष्टी तिथे होत्या. तंबाखूची पानं, कपडे धुण्याचा मोठा पिवळा साबण, पाम तेल, मसाल्याच्या पदार्थांचे ढीग, मोठा सुक्या मासळीचा बाजार (ज्याचा वासच मुलांना माहीत होता.) जुन्या कपड्यांचा बाजार. जुन्या कपड्यांच्या


वेदांत, यश, मृण्मयी, विराज इ. पाचवी

बाजारात तर मजाच झाली. एक चांगली नायलॉनची साडी फक्त पाच रुपयांत मिळत होती. मिहीर तर उडालाच. एवढी स्वस्त साडी आपण आईसाठी नेली तर आई किती खूष होईल, या कल्पनेनं साडी विकत घेण्यासाठी परवानगी मागू लागला. यावर शहरांतून लुप्त होणाऱ्या जुन्या कपड्यांच्या बदल्यात भांडी देणाऱ्या बोहारणीच्या संस्कृतीबद्दल त्याचं थोडक्यात बौद्धिक घेतलं आणि शाळेत यावर सविस्तर चर्चा करण्याचं आश्वासन देऊन मिहीरचं समाधान करण्याचा प्रयत्न केला. बाजारातले विक्रेतेही आज या वेगळ्याच पाहुण्यांना बघून आनंदले होते. उत्साहानं माहिती सांगत होते. वजनावर मिळणारं हळदीपासून तयार होणारं शुद्ध कुंकू पाहून मुलं अचंबित झाली. तेल गिरणी मुलांनी पहिल्यांदाच पाहिली. आपल्या शेतात पिकवलेला जवस घेऊन शेतकरी तेल काढण्यासाठी आले होते.

तेल काढल्यावर उरलेली पेंड जनावरांचं खाद्य म्हणून वापरतात, हे पुस्तकात वाचलेलं त्यांनी प्रत्यक्ष पाहिलं. त्याच ठिकाणी तांदूळ सडण्याची गिरणीसुद्धा होती; पण तांदळाचा हंगाम नसल्यामुळे तिचं काम बघायला मिळालं नाही. मुलांनी विक्रेत्यांना अनेक प्रश्न विचारले आणि त्यांची उत्तरं मिळवली. प्रत्येक गावाला वेगवेगळ्या दिवशी आठवडी बाजार असतो. ही मंडळी रोज आपला माल घेऊन वेगवेगळ्या गावाला जातात. पावसाळ्याचे चार महिने हा बाजार बंद असतो. तेव्हा ही मंडळी शेतावर कामाला जातात. हे सगळं मुलांना नवीन समजलं. तिथे जवळच आम्ही एका सोनाराच्या दुकानात गेलो. तिथे मुलांना सोन्यासारख्या मौल्यवान धातूचं वजन किती काटेकोरपणे करावं लागतं, हे बघायला मिळालं.

यासाठी आम्ही विशेष काय केलं, काहीच नाही. पाठ्यपुस्तकातला एक नेहमी 'ऑप्शन'ला टाकला जाणारा उपक्रम राबवला. यातून जे घडलं, ते मात्र खास-विशेष होतं. एका वेगळ्याच विश्वात मुलं विहार करून आली. त्यांच्या जाणिवेच्या कक्षा रुंदावल्या.

शाळेत आल्यावर त्यांनी आपल्याला दिसलेला बाजार रेखाटला. डोंबाऱ्याच्या मुलीच्या जागी आपण आहेत, असं कल्पून तिचं मनोगत लिहिलं. पाच रुपयांत साडी विकणं कसं परवडत असेल, याचे हिशेब मांडले. घरच्या जवसाचं तेल आणि आपण बाजारातून आणतो ते प्रक्रिया काढलेलं तेल यांची तुलना केली. त्यामागचं विज्ञान अभ्यासलं. लोप पावत चाललेल्या बोहारणीच्या संस्कृतीकडे त्यांचं लक्ष वेधलं. आपल्या शहरातल्या रविवार पेठ, बुधवार पेठ या नावांच्या मागचा इतिहास त्यांच्या लक्षात आला.

एका भेटीतून हे सगळं समजणार असेल, विषयामधल्या भिंती दूर होणार असतील, तर त्यासाठी आपण काढलेला वेळ म्हणजे 'क्वालिटी टाईम' नाही का? मित्र-मैत्रिणींच्या मुलांचा गट करून आळीपाळीनं जबाबदारी घेऊन मुलांना वेळ देणं पालकांना सहज शक्य आहे. थोडा विचार केला, तरी आपल्या आजूबाजूला मुलांना नेऊन दाखवण्याजोगी अनेक ठिकाणं लक्षात येतील आणि थोडं नियोजन केलं, तर शनिवार-रविवारी, हिवाळ्याच्या-उन्हाळ्याच्या सुट्टीतही बऱ्याचशा गोष्टी साधता येतील. दुसऱ्या कुणीतरी आयोजित केलेल्या शिबिरांपेक्षा आपल्या मुलांपर्यंत काय पोचलं पाहिजे, हे पालकांपेक्षा जास्त चांगलं कोणाला समजणार?

●



१२

गणिताशी गट्टी

अश्विनी अडावदकर

"गणितासाठी तार्किक विचार करणं, परस्परसंबंध शोधणं, एकास एक संगती लावणं अशा अनेक गोष्टी पायाभूत ठरतात. मूर्ताकडून अमूर्ताकडे जाण्यासाठी भरपूर साहित्याचा वापर करता येतो. शाब्दिक गणितातून जीवनव्यवहार शिकवता येतात, सामाजिक भान जागृत करता येतं. रोजच्या जीवनातले गणिती व्यवहार, सर्वेक्षणातून सांख्यिक माहितीचं संकलन अशा सहभागातून गणित मुलांच्या जवळचा विषय बनतो. शेवटी उपलब्ध माहिती आणि पर्यायांतून समस्या सोडवण्याच्या क्षमतांचा विकास होणं महत्त्वाचं. जीवनाचं गणित तरी याहून वेगळं काय असतं?"

एकदा डॉ. विवेक मॉंटेरो शाळा बघायला आले होते. त्यांचा गणित-विज्ञानाचा भरपूर अभ्यास आहे आणि ते या विषयांच्या प्रसाराचंही काम करतात. पाचवीच्या वर्गात त्यांनी मुलांना विचारलं, ''तुमचा आवडता विषय कोणता?'' तर खूप मुलांनी ''गणित'' असं उत्तर दिलं. मुलं त्यांना बघून सांगत आहेत की खरं, हे बघण्यासाठी त्यांनी मुलांना गणितं, कोडी सोडवायला दिली, अपूर्णांकांच्या संकल्पना विचारल्या आणि मुलांच्या प्रतिसादावर समाधान व्यक्त केलं. गणित हा विषयच असा आहे, की जो जमला की आवडतो आणि आवडला की जमतो; पण मग ते जमवायसाठी शिक्षक काय करू शकतो, याची चर्चा आज आपण करणार आहोत.

गणिताची पूर्वतयारी बालवाडीतच सुरू होते. मात्र बालवाडीत आम्ही संख्यालेखन शिकवत नाही. जाणीवपूर्वक. पालकांनी आग्रह केला तरीही. अर्थ न समजताच एखादं स्तोत्र पाठ म्हणणं काय, किंवा एक ते शंभर म्हणणं काय, सारखंच. पाठांतर उत्तम, पण आकलन काही नाही. त्याऐवजी संख्या समजण्यासाठी वस्तूंचा वापर करता येतो. 'मुक्तातार्इंना चार ठोकळे दे', 'इथे तीन

बिया मांड' यांसारख्या कृतींमधून संख्या म्हणजे काय हे समजत जातं. शिवाय वस्तूंच्या-चित्रांच्या जोड्या लावणं, सावलीचा खेळ, पाना-फुलांचे, चित्रांच्या पत्त्यांचे वेगवेगळ्या प्रकारे गट करणं असे बालवाडीच्या ताईंनी तयार केलेले खेळ मुलं खेळतात. त्यातून मुलं तुलना, वर्गीकरण, पाहुणा ओळखणं अशी अनेक कौशल्यं शिकतात. पुढे गणिताच्या अभ्यासात हीच कौशल्यं महत्त्वाची ठरतात.

एरवी गणित म्हटलं, की अपूर्णांक, काळ-काम-वेग, सम-व्यस्त प्रमाण, चक्रवाढ व्याज, भूमितीतली प्रमेयं हे सगळं आठवतं आणि अनेकांना धडकी भरते. कारण हा अमूर्त विषय आहे; पण प्रत्यक्ष वस्तूंचा वापर करत, रोजच्या जीवनातली उदाहरणं देत शिकवलं की संकल्पना स्पष्ट होतात, उपयुक्तता समजते आणि गणिताशी गट्टी होते.

चौथीपर्यंत तर साहित्याचा भरपूर वापर करता येतो. गणिताचा तास म्हणजे प्रत्येक वर्गात मुलांसमोर मणी, काड्या, नोटा, पत्ते असं खूप सारं साहित्य असतं आणि प्रत्येक जण काहीतरी कृती करून ताईंना दाखवत असतो. बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार या चारही क्रिया साहित्य वापरून आणि मुलांच्या भावविश्वातली उदाहरणं घेऊनच शिकवल्या जातात. हातच्याची वजाबाकी दुसरीच्या मुलांना थोडी अवघड वाटते, अशी नेहमीची तक्रार असते; पण प्रत्येक मुलानं दशक म्हणजे आईस्क्रीमच्या १० काड्यांचा गठ्ठा आणि एकक म्हणून सुट्या काड्या वापरल्या आणि प्रत्यक्ष दशक सुटा करून स्वत: वजाबाकी करून पाहिली की समजायला सोपं जातं. पाढेसुद्धा मुलं आधी तयार करतात, त्यातून पाढे आणि गुणाकाराचं नातं मनात पक्कं होतं, मगच पाठ करतात.

दिलेली उदाहरणं मुलं सोडवतातच; पण दिलेल्या क्रियेसाठी स्वत: उदाहरणं तयार करताना खरा कस लागतो. माहितीवरून-चित्रावरून उदाहरणं तयार करताना फारच मजा येते. योग्य उदाहरण तयार करता आलं, म्हणजे ती क्रिया पक्की झालीच म्हणून समजा! या प्रक्रियेत मुलांशी अनेक गोष्टींवर चर्चाही करता येते. एकदा दुसरीतल्या निनादनं, माझ्याकडे १२ चेंडू होते, मावशीनं मला अजून ६ चेंडू दिले असं बेरजेचं उदाहरण तयार केलं. लगेच इतके चेंडू असणं बरोबर आहे का, अशी चर्चा इतर मुलांमध्ये सुरू झाली. निनादलाही आपली चूक मान्य झाली. त्यानं चेंडूच्या जागी गोष्टीची पुस्तकं घालून उदाहरण पूर्ण केलं.

आकडेमोड हा गणिताचा महत्त्वाचा भाग आहे; पण केवळ आकडेमोड म्हणजे गणित नव्हे, तार्किक विचारही महत्त्वाचा. त्यासाठी वर्कशीट्स तयार करता येतात. एकदा तिसरीला एक वर्कशीट सोडवायला दिलं होतं. एखादी आकृती वेडीवाकडी कापली, तर होणाऱ्या दोन भागांपैकी एक भाग डावीकडे दिला होता



आणि ती आकृती पूर्ण होण्यासाठी कोणता भाग जोडावा लागेल ते उत्तराच्या पर्यायातून निवडायचं होतं. मुलांना ते थोडं अवघड वाटलं, मग वर्गात प्रत्येकाला एक कागद देऊन मधे वेडीवाकडी रेघ काढायला सांगितली. त्यांनी आपापल्या रेघेवर कात्री चालवली आणि झालेल्या दोन भागांचं निरीक्षण केलं. इतरांचे तुकडेही बघितले तेव्हा आदित्य म्हणाला, ''ताई, एका तुकड्याला जिथे खड्डा असतो, समोरच्या तुकड्याला तिथे उंचवटा असतो.'' नंतर मला काही सांगावं लागलंच नाही. दुसऱ्या तासाला त्यांना लगेच योग्य पर्याय निवडता आले.

सममित आकृत्यांचीही (Symmetric diagram) अशीच मजा आली. चौथीच्या मुलांना सममित आकृत्या ओळखता येतात, सममितीचा अक्ष समजतो आणि सोप्या सममित आकृत्या काढताही येतात. हे सर्व शिकून झाल्यावर गंमत म्हणून दोन्ही बाजूला तंतोतंत सारख्या असणाऱ्या अवघड आकृत्या काढायला सांगितल्या. ते काही जमेना. तेव्हा कागदाला घडी घालून अर्धी आकृती काढून ती दुसऱ्या बाजूला कशी उमटवायची याचं तंत्र दाखवलं. मग काय, त्या आठवड्याचा चित्रकलेचा तास याच चित्रांनी सजला, तर हस्तकलेच्या ताईंनी कागदाला घडी घालून कातरकाम करून डिझाइन्स बनवायला शिकवली.

एखाद्या गोष्टीबद्दल योग्य अंदाज बांधणं हेही महत्त्वाचं कौशल्य आहे. मुलांना ढिगातल्या ठोकळ्यांची संख्या, ताईंची उंची, स्वत:चं वजन, दोरीची लांबी अशा अनेक गोष्टींचे अंदाज करायला देता येतात. नंतर प्रत्यक्ष मोजून दाखवल्यानं बरोबर उत्तराकडे जाण्याचं कौशल्य वाढतं. प्रत्यक्ष करून शिकायला मुलांना फार आवडतं. त्यामुळे तराजू वापरून वजन करणं, टेपनं लांबी-रुंदी मोजणं, कागदी पैसे वापरून खरेदी-विक्री करणं, पुठ्ठ्याचं घड्याळ बनवून तास-मिनिटं शिकणं अशा

कितीतरी गोष्टी मुलांना देता येतात. अपूर्णांक समजावून देताना कार्डशीटचे तुकडे वापरता येतात. शिवाय चॉकलेटचा बार, दाण्याची चिक्की अशी माहितीची उदाहरणंही उपयोगी पडतात. सातवीची मुलं दोन दिवस पूर्णवेळ दुकानात काम करतात. यात हिशेब, जमाखर्च, तोंडी आकडेमोड यांची उजळणी तर होतेच, शिवाय मालाचे भाव, एकक, लोकांशी बोलायची पद्धत, दुकानाची मांडणी असं बरंच काही समजतं.

एकीकडे मूर्त रूपात हे चालू असतानाच हळूहळू मुलांना, 'विचार कर, कल्पना कर' असे सांगत अमूर्ताकडे जायला शिकवावं लागतं, तरी पुढेही गणित प्रात्यक्षिक असा तास असतोच. यावेळी मुलं कार्डशीट, स्ट्रॉ, जिओबोर्ड, माती, तार असं विविध प्रकारचं साहित्य वापरतात. वृत्तचितीचं घनफळ शंकूच्या घनफळाच्या तिप्पट असतं, असं सूत्र सांगतं. मग मुलं कार्डशिटची वृत्तचिती आणि त्याच उंची-त्रिज्येचा शंकू बनवतात आणि बारीक वाळू किंवा रांगोळी घेऊन वृत्तचिती भरण्यासाठी शंकू किती वेळा ओतावा लागतो ते तपासतात. असे कितीतरी गुणधर्म, सूत्रं पडताळून पाहता येतात. मुलं कार्डशीटच्या त्रिमित आकृत्या बनवतात. स्वत: गोळा केलेल्या माहितीचे आलेख काढतात.

गणिताची गोडी लागावी, टिकून राहावी म्हणून अनेक कोडी, खेळ, पत्यातला बेरीजझब्बू अशा खूप गोष्टींचा उपयोग होतो. शिवाय मुलांशी बोलताना 'चला आता एक गंमत करू', 'किती मजा येतये ना अशी गणितं सोडवायला', 'हे तर एकदम सोपं आहे' अशा वाक्यांचा उपयोग केला, की होणारा चांगला परिणाम आम्ही अनुभवतो आहोत. प्रत्येक परीक्षेत एक स्टारचे उदाहरण असते. त्याला गुण नसतात पण तो स्टार मिळवण्यासाठी मुलांची धडपड असते.

हे सर्व उपक्रम पालकही घरी घेऊ शकतात. क्रिया शिकवताना दगड, बिया, गोळ्या कशाचाही उपयोग करता येईल. क्रिकेटची मॅच बघताना आलेखाची ओळख करून देता येईल. किराणा, भाजीबाजार इथे वस्तुमान, खरेदी-विक्रीचा अनुभव देता येईल. वस्तूचे भाग करताना अपूर्णांकाबद्दल बोलता येईल. मुलांबरोबर तुम्हीसुद्धा लांबी मोजणं, वजन करणं यात सहभागी होऊ शकता. अंदाज करण्याची गंमत अनुभवू शकता. कोडी घालू शकता आणि सोडवूही शकता. एकदा ठरवलं की तुमची यादी अजून मोठी होईल. मग तुम्हालाही वाटेल 'हे तर एकदम सोपं आहे.'



१३

चवदार प्रयोग

सुधा कर्वे

"स्वयंपाक हे महत्त्वाचे जीवनकौशल्य आत्मसात केल्यानंतर आपलं कुठे काही अडणार नाही, हा आत्मविश्वास येतो. आपल्याच अन्नाकडे विविध अंगानी मुलं बघतात. अन्न पिकवण्यापासून शिजवण्यापर्यंत किती प्रकारच्या लोकांनी किती श्रम केले आहेत याची जाणीव होते. अन्न तयार होण्यामागचं विज्ञान समजतं, त्याचं पोषणमूल्य समजतं, अन्नापासून वंचित राहणाऱ्यांच्या वेदना समजून घ्यायलाही मदत होते."

भाषा, गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, नागरिकशास्त्र, पर्यावरण, मूल्यशिक्षण या सगळ्या विषयांचा मिलाप कुठे होतो, असा विचार केला, तर येणाऱ्या उत्तरांपैकी एक उत्तर 'स्वयंपाकघर' असं नक्कीच मिळेल. म्हणूनच 'आनंदनिकेतन'मध्ये 'खाऊ करणं' ही नुसती गंमत नसते, तर ते एक महत्त्वाचं शैक्षणिक साधन असतं. चौथीची मुलं मोड आलेल्या कडधान्यांची कोशिंबीर कशी करतात हे बघू. विज्ञानामध्ये जेव्हा मोड आल्यावर कडधान्यांचं पोषणमूल्य वाढतं असा भाग अभ्यासाला असतो, तेव्हा 'मोड कसे येतात' हे जास्त शास्त्रोक्त पद्धतीनं अभ्यासावं म्हणून ताई प्रत्येकाला घरून वेगवेगळ्या प्रकारची कडधान्यं आणायला सांगतात. कडधान्यं आणल्यावर भिजवण्यापूर्वी सगळी मुलं आपापल्या कडधान्यांचं वजनकाट्यावर वजन करतात आणि नोंदवतात. शाळेत आल्यावर भिजवलेल्या कडधान्यांचं निरीक्षण पुन्हा एकदा केलं जातं. कुठल्या कडधान्याचा आकार कसा दिसतो, दाणे कसे फुगले याचं निरीक्षण करून मुलं पुन्हा एकदा वजनात घट झाली की भर पडली, गायब झालेल्या, पाण्याच्या वजनाचा काही ताळमेळ लागतोय का, हे त्या कडधान्याचं वजन करून बघतात, त्याचबरोबर भिजण्यापूर्वीचं आकारमान, आत्ताचं आकारमान याचंही निरीक्षण होतं. एकमेकांची कडधान्यं बघून होतात. नंतर काही जण आपली कडधान्यं



फडक्यात बांधतात, काही जण कपाटात झाकून ठेवतात, तर काही जण वाटी तशीच उघडी ठेवतात. दुसऱ्या दिवशी शाळेत येऊन पुन्हा आपापल्या कडधान्यांना आलेले मोड न्याहाळतात. वेगवेगळ्या ठिकाणी ठेवलेल्या कडधान्यांना कशा प्रकारे मोड आले याचं निरीक्षण करतात, नंतर कोशिंबीर करण्यासाठी आणलेले कांदे-टोमॅटो चिरतात, चिरता चिरता करत असलेल्या कृतींना हिंदीतून, इंग्रजीतून काय म्हणतात ते ताईकडून, एकमेकांकडून समजून घेतात. क्रियांशी संबंधित म्हणी/वाक्प्रचार शोधतात. महाराष्ट्रातल्या कुठल्या भागात कुठली कडधान्यं पिकतात हे धुंडाळतात. भाज्या चिरणं, कोशिंबीर तयार करणं, भांडी स्वच्छ करणं, नंतरची आवराआवर करणं, एकत्र बसून गप्पा मारत खाणं, ताईंना आपण केलेला खाऊ कौतुकानं खायला देणं, ताईंनी केलेल्या कौतुकानं हुरळून जाणं या सगळ्यांतून श्रमप्रतिष्ठा, मूल्यशिक्षण, पर्यावरणशिक्षण अशा सगळ्या गोष्टी साध्य होतात.

असा हा आमचा चवदार प्रयोग! मोड आलेल्या कडधान्यांची कोशिंबीर हा खाऊ उदाहरणादाखल आपण बघितला; पण अशाच उद्देशांनी बालवाडीपासूनच खाऊ बनवण्याचा सिलसिला सुरू होतो. बालवाडीमध्ये मुलांनी खाऊ कसा तयार होतो, याचं निरीक्षण करणं, त्यातल्या घटकांचे रंग, गंध, स्पर्श यांचा अनुभव घेणं, मटार सोलणं, भाजी निवडणं या क्रिया करून बघणं. पदार्थाशी निगडित गप्पा

मारणं, अनुभवकथन करणं अशी अपेक्षा असते. वेगवेगळ्या ऋतूंमध्ये मिळणाऱ्या विशिष्ट भाज्या, फळं बघणं, खाणं, काही परदेशी फळांचीही ओळख करून घेणं केलं जातं. फळं, भाज्या कशा कापतात, कुठल्या फळांची सालं आपण खातो, खाता येतील अशा बिया कोणत्या भाजीत असतात, या सगळ्या गप्पांबरोबरच लहान-मोठे, जाड-बारीक या संकल्पना समजून घेणं, मोजणी, बोरासारख्या छोट्या फळांचे सारखे गट करणं, तुझी दोन बोरं मित्राला दिलीस आता तुझ्याकडे किती, मित्राकडे किती, अशी आंबटगोड बेरीज-वजाबाकी मुलं हसत-खेळत समजून घेतात.

शाळेच्या पहिल्या दिवशी स्वागताला दारात इतर फळांबरोबरच फणसही विराजमान असतो. 'अबबब! अबबब! केवढा फणस आई?' म्हणत मुलं घाबरत घाबरत फणसाला हात लावून बघतात आणि ताईंनी फणस चिरल्यावर 'आत गरेच गरे!' अचंब्यानं बघतात, रडायचं विसरून जातात. काही मुलं तर फणसाची चवही पहिल्यांदाच घेत असतात.

मुलांनी सोललेले मटार घालून ताई पोहे करतात, वेगवेगळ्या प्रकारच्या लाह्या फोडून दाखवतात. असे वेगवेगळे खाऊ तयार होताना बालवाडीतली मुलं बघतात, काही क्रियांमध्ये सहभागीही होतात. उकडलेले बटाटे सोलून मीठ लावून खातात. खाऊशी, पदार्थाशी संबंधित गोष्टी ऐकतात, गाणी म्हणतात आणि अनुभवही सांगतात.

पहिली-दुसरीत मुलांना स्वतः घरी करता येतील असे खाऊ मुलं करतात- दाण्याचा लाडू, पोळीचा लाडू, सँडविच, भेळ, सोलर कूकरमध्ये उकडलेल्या बटाट्याची भाजी. तिसरी-चौथीत हळूहळू सुरीनं भाज्या कापायला लागतात, अभ्यासक्रमाशी संबंधित खाऊ असतात. सूप, कडधान्यांची कोशिंबीर, दही-बुंदी रायता किंवा ढोकळा (आंबवण्याची क्रिया बघण्यासाठी), फोडणीची पोळी, वांग्याचं भरीत इत्यादी.

पाचवीपासून मुलं गॅसचा वापर करून जास्त गुंतागुंत असलेले खाऊ बनवतात. कटलेट, मिक्स भाजी, पावभाजी, मेथीचे ठेपले, सोलरकूकरमध्ये खिचडी इत्यादी. आठवीची मुलं तर खाऊ बनवण्यात इतकी तरबेज होतात, की दुकानजत्रेत खाऊचा स्टॉलही मांडतात. दुकानजत्रेसाठी कुठला पदार्थ करायचा हे ठरवतात, किती पालक येतील याचा अंदाज करतात, त्यानुसार ठरवलेल्या पदार्थासाठी किती साहित्य लागेल, याचा हिशेब करतात. आपण जो पदार्थ करणार त्याची बाजारात काय किंमत आहे, याची पाहणी करतात. त्यासाठी शाळेकडून

पैसे उसने घेतात. दुकानजत्रेच्या दिवशी सकाळपासून त्यांची लगबग सुरू असते. सकाळी लवकर मार्केट यार्डात जाऊन होलसेलमध्ये सामान खरेदी करणं कसं फायदेशीर ठरतं, याचाही अनुभव घेतात. प्रत्यक्ष दुकानजत्रा सुरू झाली, पालक-मुलं येऊ लागली की खरी तारांबळ उडते. गर्दीच्या वेळेला एखाद्या हॉटेलच्या किचनमधल्या सर्व कामांमधली सुसूत्रता कशी असेल, तिथे काम करणाऱ्यांमध्ये किती समन्वय लागत असेल हे शिकतात. गर्दीच्या वेळी गल्ला सांभाळणं किती कौशल्याचं असतं, हे समजून घेतात. एखादा व्यवसाय चालवायचा असेल, तर काम सामूहिकरीत्या करणं किती गरजेचं असतं, याची जाणीव त्यांना होते. हा स्टॉल सांभाळताना आपोआपच कोणतं काम आपल्याला चांगलं जमतं, जमत नाही याचाही शोध लागतो. त्याप्रमाणेच कामांची विभागणी होते; पण प्रत्येक कामाचा अनुभव प्रत्येकाला मिळालाच पाहिजे हेही कटाक्षानं बघितलं जातं. दुकानजत्रा संपल्यावर आपण केलेला अंदाज किती बरोबर होता, काय चुकलं, पुढच्या वेळी कोणत्या गोष्टी टाळायच्या, काय पुन्हा केलं तरी चालेल, किती फायदा झाला, शाळेसाठी आपण किती पैसे कमावले, अशा गप्पाच रंगतात.

या सगळ्या उटारेटीतून मुलं घरी काय नेतात? मुलांशी यावर चर्चा केली तेव्हा लक्षात आलं, की स्वयंपाकघरात वावरण्याचा, तिथल्या वस्तू हाताळण्याचा, कामं करण्याचा, पदार्थ तयार करण्याचा 'आत्मविश्वास'. सातवीपर्यंत मुलं घरी चहा, सँडवीच, ऑम्लेट, पोहे, बटाट्याची भाजी असे पदार्थ सहज करतात. सातवीतला पार्थ म्हणतो, ''गॅस कसा पेटवायचा ते शाळेमुळे समजलं.'' स्वयंपाकाची जात्याच आवड असणारा आणि आजोबांकडून स्वयंपाकाचं बाळकडू मिळालेला पार्थ तर हल्ली पुरणपोळ्याही करतो, असं त्याची आई सांगत होती. किती मीठ घालायचं, तिखट, कांदा, लसूण यांचं प्रमाणही शाळेत केलेल्या खाऊमुळेच कळलं, असं समृद्धानं नोंदवलं. सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे भीती गेली. घरी एकटं असताना आपण उपाशी राहणार नाही, याचा विश्वास वाटू लागला. ओंकार म्हणतो, ''आई नसताना आम्ही बाहेरून जेवण कधीच मागवत नाही. मी आणि बाबा मिळूनच स्वयंपाक करतो.'' शाळेत खाऊ केल्यामुळे घरी आई स्वयंपाकघरात काय काय करते, पदार्थांत काय काय घालते, याची उत्सुकता वाढली आणि पावलं स्वयंपाकघराकडे वळली, असं मुग्धा म्हणाली, तर एकत्र कुटुंबात राहणारा अधिषेक म्हणाला, ''काका, माझे बाबा, आम्ही भावंडं यांना स्वयंपाकघरात जाण्याची वेळ कधीच येत नाही. कारण आई नसली, तरी काकू असतेच! पण तरीही मला ऑम्लेट बनवता येतं.''

शाळेत खाऊ करतानाचा अनुभव कसा वाटतो, असं विचारल्यावर मुलं म्हणतात, की सगळ्यांना सगळी कामं करायला मिळतात, आम्हाला प्रमाण कळतं. टोमॅटो चिरायला कशी सुरी लागते ते कळलं, अंदाज समजला. स्वयंपाक झाल्यावर नंतरची आवराआवर करायलासुद्धा मजा येते, शेवटी सगळ्यांनी मिळून भांडी घासायलाही आनंद वाटतो. घरी आई भांडी घासू देत नाही, त्यापेक्षा अभ्यास कर, असं म्हणते.

घरी जी कामं करण्यापासून मुलांना दूर ठेवलं जातं, अशी कामं मुलांना खाऊच्या निमित्तानं शाळेत करायला मिळतात आणि शाळेत ही कामं शिकल्यानंतर घरी स्वयंपाकघरात त्यांची लुडबुड आईलाही हवीहवीशी वाटू लागते. मुलांशी गप्पा केल्यानंतर असंही लक्षात आलं, की स्वयंपाक हे स्त्रियांचंच काम, ही भावनाही दूर होते. सुनीलच्या घरी रोज बाबाच स्वयंपाक करतो, हे समजून घेणंही सोपं होतं. असे 'चवदार प्रयोग' घरोघरी व्हावेत, ही यानिमित्तानं सदिच्छा !



१४

चित्रपट : एक प्रभावी माध्यम

शोभना भिडे

"

दृकश्राव्य माध्यमं ही ऐकून शिकणाऱ्या (ऑडिटरी) व पाहून शिकणाऱ्या (व्हिज्युअल) अशा दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांना प्रभावी अध्ययन अनुभव देतात. विषयातली निरसता किंवा क्लिष्टता कमी करता येते. जास्त माध्यमांच्या सहभागामुळे असे अनुभव दीर्घकाळ स्मरणात राहतात. चित्रपट हे कला, अभिव्यक्ती, रसग्रहण, भावनापरिपोष यांचं एक उत्तम माध्यम असतं. त्यामुळे भावनिक विकासासाठीही ते पूरक ठरू शकतं.

"

चित्रपट खरंतर एक प्रभावी दृकश्राव्य माध्यम. दूरचित्रवाणीचा वाढता प्रसार, प्रभाव, वाहिन्यांची वाढत जाणारी संख्या आणि २४×७ घातला जाणारा मनोरंजनाचा रतीब, या सर्वांतून चित्रपटासारखं प्रभावी माध्यम शिक्षणासाठी वापरता येईल? अशक्य वाटते ना ही गोष्ट? पण आम्ही एकदा तो प्रयोग करून बघितला आणि अशक्य ते शक्य होऊ शकतं, हे आम्हाला शिकवलं आमच्या मुलांनी! तेव्हापासून आम्ही वरचेवर त्याचा उपयोग सुरू केला.

शाळेत दर महिनाअखेरच्या दिवशी मुलांसाठी विशेष कार्यक्रम असतो. एका वर्षी ३० नोव्हेंबरला आम्ही मुलांना चित्रपट दाखवायचं ठरवलं. चित्रपट मुलांच्या वयाशी सुसंगत असावा, उत्तम चित्रपट कसा बघावा, त्यातलं नेमकं काय पाहावं, याकडे या निमित्तानं मुलांचं लक्ष वेधावं, एवढाच हेतू मनात धरून 'हयात' या इराणी चित्रपटाची निवड केली.

हयात नावाची चौथीत शिकणारी मुलगी, तिचे आई-वडील, छोटा भाऊ व सहा महिन्यांची छोटी बहीण असं हे कुटुंब. वडील आजारी व आईचा भागीदारीत दुधाचा व्यवसाय. आर्थिक ओढाताण तर नित्याचीच! त्या दिवशी पहाटे आई हयातला अभ्यासासाठी उठवते. कारण तिची त्या दिवशी स्कॉलरशिपची परीक्षा

असते. ही परीक्षा उत्तीर्ण होणं तिच्यासाठी आत्यंतिक गरजेचं, कारण त्याआधारे तिचा पुढच्या शिक्षणाचा मार्ग खुला होणार असतो. अन्यथा, मुलीला शिकवण्याची ऐपत तिच्या पालकांची नसते. आई तिला उठवून वडलांना हाक मारते, तर ते बेशुद्ध झालेले आढळतात. सहा महिन्यांची तान्ही बहीण, शाळेत जाणारा भाऊ, गुरं-ढोरं, घरची सर्व जबाबदारी हयातवर सोडून तिची आई नवऱ्याला डॉक्टरांकडे घेऊन जाते. नंतर येणाऱ्या अडचणींवर मात करून हयात परीक्षेला कशी पोहोचते, या मधल्या तासांचं चित्रण करणारा हा चित्रपट. वेगवान घटना नाहीत, किंबहुना हा कालपटच तेवढा मोठा नाही. गाणी नाहीत, मारामारी नाही. खलनायक नाही. विनोद नाहीत; पण तरीही जे घडतं, ते खिळवून ठेवतं. शब्दांची गरजच नाही. परदेशी वातावरणाचा अडथळा नाही. असा हा दीड तासाचा चित्रपट मुलांनी शांतपणे पाहिला. निरुपायानं आपल्या सहा महिन्यांच्या बहिणीला घरातच झोपवून परीक्षेला जाऊ इच्छिणाऱ्या हयातला पाहताना ''अगं जा! जा! लवकर जा ना!'' असे सहजोद्गार प्रेक्षकांमधून उत्स्फूर्तपणे निघत होते.

हा चित्रपट संपल्यानंतर यातली कोणती गोष्ट तुमच्या लक्षात राहिली, ती एका वाक्यात सांगा, असं मुलांना म्हणताच प्रतिक्रियांसाठी अनेक हात वर आले.

''परीक्षा असूनही घरचं एकही काम किंवा जबाबदारी तिनं टाळली नाही.''

''तिथली भौगोलिक परिस्थिती व जागेचा कमाल वापर- कारण गोठा हा जमिनीखाली भुयारात होता, यावरून तिथल्या थंडीची कल्पना येते.''

''छोट्या बाळाला घरात एकटं ठेवतानाही, त्याचा हात लागू नये म्हणून तिनं छोटा कंदील वर उचलून ठेवला.''

''बाळाला कोंबड्यांनी त्रास देऊ नये, म्हणून खोलीला कुलूप घातलं.''

''विहिरीत पडलेली चावी शोधण्यासाठी चुंबक शोधून दोरीला बांधला.''


''छोटा भाऊ शाळेत गेला, तरी बहिणीसाठी ही परीक्षा महत्त्वाची आहे, हे त्याला कळलं होतं, म्हणून तोही बहाणा करून घरी येण्याच्या प्रयत्नात होता.''

''हयातची तिच्या वर्गातली स्पर्धक मुलगी स्पर्धा विसरून तिला मदत करायला तयार झाली.''

''मुलीला शिकून काय करायचं, म्हणून तिच्या बहिणीला सांभाळायला कुणी तयार होत नाही, म्हणजे तिथे मुलींना दुय्यमपणाची वागणूक मिळते.''

''अंघोळ करून येते, असं खोटं सांग. परीक्षेला जातेस, असं सांगू नकोस.' असं मैत्रिणीनं सांगूनही हयात खोटं बोलायला नकार देते.''

''परीक्षा गेली तरी चालेल; पण बाळाला वाईट स्थितीत ठेवण्याची हयातची



तयारी नसते.''

''सर्व कामं करताना तिच्या मनात एकीकडे परीक्षेसाठी गणित, विज्ञान अशा विषयांची उजळणी सुरूच होती.''

अशी अनेक निरीक्षणं मुलांनी नोंदवली. भूगोल, सामाजिक परिस्थिती, नातेसंबंध, आर्थिक स्थिती अशा अनेक अंगांनी मुलं चित्रपटाला भिडली.

या चित्रपटासंबंधी घरी बोललात का, असं विचारलं असता, सर्वांनी एकमुखानं होकार दिला. मग पालक काय म्हणाले?

''कळलं गं, बास आता.''

''माझ्या बाबांनी असे खूप चित्रपट पाहिले आहेत, त्यामुळे त्यांनी खूप गप्पा मारल्या.''

''आई लगेच म्हणाली, बघ जबाबदाऱ्या घ्यायला पाहिजेत. मग मीच म्हटलं- बास गं आई!''

''तुझ्या बाबानं तर तुला चांगलंच समजावलं असेल?''

''नंतर सांग हं, मी जरा कामात आहे.''

या प्रतिक्रियाच इतक्या बोलक्या आहेत, की त्यांच्या विश्लेषणाची गरजही नाही. ९० टक्के पालकांना मुलांच्या मनाचा धांडोळा घेण्यासाठी वेळच नाही, किंवा त्यांना घाई आहे त्यातून तात्पर्य काढण्याची. या चित्रपटातून मुलांच्या मनावर काय ठसलं, हे जाणून घेण्याचा प्रयत्न जरी केला असता, तरी त्यांना समजलं असतं, की हयातची जिद्द, शिक्षणाची तळमळ, जबाबदारीची जाणीव, अभ्यासू वृत्ती, हुशारी हे सर्व त्यांना जाणवलंय. कारण हे वयच संवेदनशील आहे.

आम्हाला जे मुलांपर्यंत पोहोचवावं असं वाटत होतं, ते तर मुलांपर्यंत पोहोचलंच, शिवाय त्याच्या पलीकडचंही मुलं पाहू शकतात, हे लक्षात आलं. या माध्यमाचा उपयोग पाठ्यविषयासाठी कसा करून घेता येईल, यावर विचार करताना तशा जागाही सापडल्या.

सातवीच्या मराठीच्या पुस्तकात अरुणा ढेरेंचा धडा आहे, 'वाट पाहताना.' या धड्यात आपण कशाकशाची वाट पाहतो, वाट पाहताना मनात कोणत्या भावना दाटून येतात, वाट पाहिल्यानंतर जर एखादी गोष्ट मिळाली, तर ती किती विशेष वाटते, वाट पाहण्याचे कोणते फायदे असतात अशा मुद्द्यांवर विविध उदाहरणांच्या साहाय्यानं ओघवत्या, संवादी भाषेत चर्चा केली जाते. धड्यातच 'Postman in the mountain' या चिनी चित्रपटाचा उल्लेख आहे. या चित्रपटात पोस्टमनची नोकरी एक व्रत म्हणून करणारा पोस्टमन आपल्याला भेटतो. अतिशय दुर्गम भागात मैलोन् मैल अंतर पायी तुडवत हा टपाल पोचवतो. कारण तिथे कुणीतरी त्याची, त्याच्यामार्फत प्रियजनांकडून येणाऱ्या संदेशाची वाट पाहत असतं. तो आपल्या मुलाला त्याचं हे जग फिरून दाखवतो. तेव्हा वडिलांच्या कष्टामागची प्रेरणा त्याच्याही लक्षात येते. या चित्रपटात ते वाट पाहणारे चेहरे व अपेक्षित पत्र मिळाल्यानंतरची भावना यांचं सुरेख चित्रण केलं आहे. हा चित्रपट पाहिल्यानंतर मुलांबरोबरची चर्चा अधिक संवादी होते. तुम्ही व घरातल्या इतर व्यक्ती आई, बाबा, आजी, आजोबा, कसली वाट पाहता, वाट बघणं नेहमीच आनंद देणारं असतं का, तुम्हाला किंवा घरातल्या कुणालाही बाहेरून घरी यायला खूप उशीर झाला, तर घरी कसं वातावरण असतं, वाट पाहिल्यावर एखादी गोष्ट मिळणं व वाट न पाहता मिळणं, याचे काही अनुभव, अशा अनेक मुद्द्यांवर झालेल्या चर्चेतून धड्यातला आशय, त्याच्या अर्थाच्या विविध पैलूंसकट मुलांपर्यंत पोचतो.

नववीच्या वर्गात 'अर्थशास्त्र' हा विषय नव्यानं येतो. अतिशय सैद्धांतिक स्वरूपाचा हा विषय अनेक मुलांना कंटाळवाणा वाटतो. चार्ली चॅप्लीनचा "Modern Times" वरवर बघता चार्लीच्या अभिनयामुळे विनोदी वाटणारा चित्रपट. १९३०-३१ मधे युरोपला आलेली मंदीची लाट व त्यानंतरची औद्योगिक क्रांती या काळाच्या बॅकड्रॉपवर हा चित्रपट चित्रित केला आहे. कथेसोबत भांडवलशाही, औद्योगिकीकरण, यंत्राच्या जगातलं माणसाचं स्थान, हळूहळू त्यांचंच कसं यंत्र बनतं, या सर्वांवर विनोदी अंगानं टिपणी केलेली आढळते. रुक्ष, कोरड्या विषयामध्ये रंग भरण्याचं काम हा चित्रपट करतो. चित्रपटावर केलेली चर्चा अर्थशास्त्रीय संकल्पनांमधला रुक्षपणा कमी करते. शिवाय इतिहासाचे संदर्भही देता येतात.

चित्रपट पाहून झाल्यावर कायमच चर्चा घडावी, असा आग्रह मात्र नसावा.

इतिहासात भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा भाग आहे. स्वातंत्र्यलढ्याचा एक मोठा कालखंड गांधीजींनी व्यापला आहे. त्यांचं कार्य, स्वातंत्र्यलढ्याला त्यांनी दिलेलं वळण, सामान्य लोकांना या लढ्याशी जोडण्याचं त्यांचं कौशल्य, सत्याग्रहाचं हत्यार या सर्वांचा परिचय 'गांधी' चित्रपटातून देता येतो. चित्रपट पुरेसा बोलका असल्यानं नंतर चर्चेची गरजच नसते.

चित्रपट, 'National Geographic' सारख्या वाहिन्या, विविध विषयांवर (प्रदूषण, कचरासमस्या, जैवतंत्रज्ञानानं विकसित केलेली बियाणी, विविध प्रजातींचं रक्षण इत्यादी.) केले गेलेले लघुचित्रपट ही सर्व प्रभावी माध्यमं ठरू शकतात. या माध्यमाद्वारे अभ्यासक्रम, मूल्यशिक्षण यांचं प्रभावी संप्रेषण सहजपणे होऊ शकतं.

मग आपण एक पालक म्हणून काय करूया? मुलांशी खूप खूप बोलूया, नव्हे जास्तीत जास्त त्यांचं ऐकूया. दृक्‌श्राव्य माध्यमांशी भांडण मांडण्यापेक्षा चांगलं बघण्याची चव मुलांना देऊया. चांगल्या कार्यक्रमाची सहअनुभूती त्यांच्याबरोबर घेऊया. या अनुभवाबद्दल बोलूया; पण बोधकथेसारखा तात्पर्याचा आग्रह सोडूया. शाळा, पुस्तकं यापलीकडे जाऊन शिक्षणाची नवनवी माध्यमं शोधूया.

ता. क. - ऋचानं 'हयात'नंतर तिच्या बाबांबरोबर 'प्रलय २०१२' पाहिला. ती बाबांना म्हणाली, 'मराठीत नाही का हो असे चित्रपट बनत?' आता तिच्या बाबांनी तिला 'शेजारी' दाखवायचं ठरवलंय.

●



१५

प्रश्न आणि प्रश्न!

दीपा पळशीकर

> “माहितीचं रूपांतर ज्ञानात केव्हा होतं? जेव्हा आपण त्यावर आपल्या अनुभवाशी जोडण्याची प्रक्रिया करतो तेव्हा. यासाठी तो विषय नीट समजून घ्यावा लागतो. समजण्यासाठी प्रश्न विचारावे लागतात पण इंग्रजीत बोलण्याची सक्ती झाली, की ती प्रश्न मनातच ठेवतात. मग माहिती केवळ पाठांतराच्या स्वरूपात काही काळ साठवली जाते, तिचं ज्ञानात रूपांतर होतच नाही! सजलेल्या गुणपत्रिका आणि रिकामी मनं हेच फलित शेवटी उरतं. उत्सुक मनांना हे परभाषेचं कुंपण घालून आपण मुलांचं किती भयंकर नुकसान करतो, हे पालकांना कधी कळेल?”

'सोमवारी आपल्याकडे शेतकरीदादा येणार आहेत. आपल्याला त्यांची मुलाखत घ्यायची आहे. त्यासाठी आपण आज प्रश्न काढूया!' असं चौथीच्या वर्गात जाहीर केल्यानंतर वर्गात एकच कल्लोळ उठला आणि प्रश्नांच्या फैरी झडू लागल्या. मुलांचे प्रश्न आधी समोर येऊ दे, मग आपण चर्चा करून ठरवू, म्हणून मी मुलांना प्रश्न विचारायला उत्तेजन देत राहिले. बुजऱ्या मुलांनीही प्रश्न काढावेत, त्यांच्या प्रश्नांचाही समावेश व्हावा, याकडे लक्ष देऊ लागले. इतक्यात ओवीचा आवाज आला, ''नाही, असले पांचट प्रश्न नाही हं विचारायचे, त्यांना काय वाटेल?'' ओवीला 'पांचट' वाटलेले प्रश्न कुठले, तर तुमचं लग्न झालंय का, तुम्हाला मुलं किती, असे विषयाशी संबंध नसलेले प्रश्न! मी मुलांना सांगितलं, की तुमच्या मनात जे प्रश्न येतील ते कागदावर लिहा; पण शेतीशी, आपल्या अभ्यासक्रमाशी संबंधित प्रश्नांवर भर असूदे. यावर सायलीचं म्हणणं होतं, ''पण ताई, जीवनाशी संबंधित प्रश्न पण हवेत ना?'' (चौथीच्या मुलीच्या तोंडी जीवन हा शब्द जरा भारीच वाटतो; पण मुलांना असले भारी भारी शब्द वापरून बघायची हौस असतेच!)

- तुमची शेती किती एकर आहे?
- तुम्ही कुठली कुठली पिकं घेता?
- सिंचनाच्या सोयी काय आहेत?
- तयार झालेला माल विक्रीसाठी कुठे पाठवता?
- तुम्हाला पुरेसं उत्पन्न मिळतं का?
- तुम्ही पशुपालनाचा जोडव्यवसाय करता का?
- तुम्ही रासायनिक खतं वापरता की सेंद्रिय?
- यावर्षी पाऊस कमी पडला, त्याचा तुमच्या उत्पन्नावर काय परिणाम झाला?
- तुमची पत्नी तुमच्याबरोबर काम करते का?
- तुम्ही स्वत:ही शेतात काम करता की, माणसं ठेवली आहेत?
- त्यात स्त्रिया किती व पुरुष किती?
- तुम्ही बैलपोळा साजरा करता का?
- तुमच्या आधीची पिढी शेतात काम करायची का?
- शेतकरी होण्यासाठी काही शिक्षण घेतलं आहे का?
- तुम्ही सुधारित बियाणं वापरता का?
- त्याचा उत्पन्नावर परिणाम होतो?
- दुसरं कोणतं काम करायला तुम्हाला आवडलं असतं...

प्रत्येकाला एक प्रश्न विचारायची संधी मिळाली. ते प्रश्न झाल्यानंतर मात्र दिलखुलास मनमोकळ्या गप्पा! आणि एक गंमत या मुलाखतीच्या वेळी झाली. शेतकरीदादा कसा दिसत असेल, याचं एक कल्पनाचित्र काढण्यास मी मुलांना



सांगितलं होतं. मुलांनी अगदी टिपिकल शेतकऱ्याचं चित्र काढलं. टोपी घातलेला, धोतर नेसलेला शेतकरी; पण प्रत्यक्षात शेतकरी आला तो जीन्स घालून! या सगळ्यामुळे मुलाखत चांगलीच रंगली.

उदाहरणादाखल इथे फक्त एकाच मुलाखतीचा सविस्तर वृत्तांत दिला आहे. 'आनंदनिकेतन'मध्ये वेगवेगळे विषय जाणून घेण्यासाठी आम्ही नेहमीच पाहुण्यांना बोलावत असतो. कधी मुलं मुलाखती घेतात, कधी महिनाअखेरीला आलेल्या कलाकार पाहुण्याचं सादरीकरण बघून त्याविषयी माहिती मिळवतात, तर कधी सातवी-आठवीची मुलं घरी, कामाच्या ठिकाणी जाऊन मुलाखती घेतात, विषय समजून घेतात. हे विषय कधी एखाद्या समस्येशी, एखाद्या कलाकाराशी, एखाद्या व्यावसायिकाशी, सामाजिक कार्यकर्त्यांशी, कधी लघुउद्योजकाबाबत, तर कधी बड्या कारखानदाराशी निगडीत असतात. सगळेच पाहुणे प्रथितयश, प्रसिद्ध असतातच असं नाही. खाणावळ चालवणाऱ्या मावशी, पेपर टाकणारा दादा, रंग तयार करणाऱ्या कारखान्याचे मालक, एखादा शिकाऊ चित्रकार, बँकेत नोकरी करणारे काका अशा सगळ्या प्रकारच्या व्यक्ती त्यामध्ये असतात.

मुलांना या पाहुण्यांबद्दल खूप काही जाणून घ्यायचं असतं. मुलांचे प्रश्न ऐकताना मला दरवेळी नव्यानं जाणवतं, की मुलांना प्रत्येक मोठ्या माणसाबद्दल असे प्रश्न पडत असतील. ही मोठी माणसं असतात तरी कशी? ती अशी कशामुळे झाली? त्यांची सुखदु:खं काय असतील? त्यांच्या कुटुंबात, जीवनात काय घडत असतं? आपण मोठेपणी यांच्यासारखे होणार, म्हणजे कसे होणार...

या प्रश्नांची उत्तरं शोधता शोधता नकळत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचीही जडणघडण नक्कीच होते. त्यामुळे त्यांचे प्रश्न समजून घेणं, प्रश्नांमागची त्यांची निश्चित अशी तर्कसंगती असणं, ती लक्षात घेणं गरजेचं आहे. त्यांचे 'पांचट' प्रश्नही याचसाठी महत्त्वाचे असतात. जेव्हा तुमचं लग्न झालंय का, तुम्हाला मुलं किती, असं मुलं विचारतात, तेव्हा त्यांच्या मनातला पुढचा प्रश्न असतो- तुमच्या मुलांनीही शेती केली तर तुम्हाला आवडेल का? शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबद्दल संवेदनशील असलेली रसिका काळजीपोटी आणि निरागसतेनं 'तुमच्या पोटापुरतं तरी तुम्हाला मिळतं का' असं विचारते. रासायनिक खतं वापरता, की सेंद्रिय? तुमची शेती कोरडवाहू आहे, मग एखाद्या वर्षी पाऊस पडलाच नाही तर तुम्ही काय करता, या प्रश्नामधून मोसमी पावसावर शेती अवलंबून असते, या पाठ्यपुस्तकातल्या कोरड्या वाक्यामागचं वास्तव त्यांच्यापर्यंत पोचतं, ते लक्षात येतं. शेती करायला आवडते का, या प्रश्नातून हे शेतकरीदादा खरंच मनापासून शेती करतात का, हे त्यांना समजून घ्यायचं असतं. या प्रश्नांतून मुलांच्या

विचारांची दिशा, त्यांचा कल, सभोवतालच्या परिस्थितीचं त्यांच्या मनात उमटणारं प्रतिबिंब नक्की दिसून येतं.

या मुलाखतींमधून, प्रश्नोत्तरांमधून केवळ मुलंच समृद्ध होतात असं नाही, तर कधी कधी येणाऱ्या पाहुण्यांनाही स्वत:चा शोध लागतो. काही वर्षांपूर्वी मेस चालवणाऱ्या वंदनाताईंना मुलांनी जेव्हा विचारलं, की हे काम करायला तुम्हाला आवडतं का, तेव्हा त्या म्हणाल्या, ''हो, आवडतं.'' यावर पुढचा प्रश्न, ''आणखी कुठलं काम करायला तुम्हाला आवडलं असतं?'' थोडा विचार करून त्या म्हणाल्या, ''मला चित्रं काढायला खूप आवडतं.'' यानंतर पुढचा प्रश्न तयारच होता, ''मग तेच काम तुम्ही का नाही करत? आता मात्र वंदनाताई पेचात पडल्या. ''खरंच, हेच काम आपण का नाही करत,'' असा विचार त्यांनी आधी कधी केलाच नव्हता. त्यांनीही मग ठरवलं, की प्रयत्न करून बघायला काय हरकत आहे? आज वंदनाताईंच्या रूपानं 'आनंदनिकेतन'ला एक विद्यार्थिप्रिय कलाशिक्षक मिळाला आहे. चित्रकला, कार्यानुभव यात नवनवे प्रयोग करण्यात, पेपर क्विलिंगसारखे नवे कलाप्रकार शिकण्यात, शिकवण्यात त्या मग्न आहेत. 'मुलाखतीमुळे माझ्या विचारांची दिशाच बदलून गेली', असं त्या आनंदानं कबूल करतात.

असं हे घडणं-घडवणं दोन्ही बाजूंनी होतं. जेव्हा मुलांना मुक्त आणि खुलं वातावरण मिळतं, तेव्हा त्यांची मनंही मोकळी होतात. अभ्यासक्रमातला व्यवसाय/व्यावसायिक जीवनाशी जोडलेला भाग ती आनंदानं समजून घेतात. अगदी पहिली-दुसरीपासूनच वेगवेगळ्या व्यक्तींच्या मुलाखती घेण्याची, त्यांच्याशी गप्पा मारण्याची संधी मिळाल्यानं आपल्या मनातले प्रश्न विचारण्याचा धीटपणा त्यांच्यात येतो. आत्मविश्वासानं ती संवाद साधू शकतात. आपल्याला हवी ती माहिती मिळवण्यासाठी नेमकं काय विचारलं पाहिजे, हे हळूहळू त्यांच्या लक्षात येऊ लागतं. आजकाल कळीचा विषय असणारं 'कम्युनिकेशन स्किल' कुठलाही वेगळा क्लास न लावता आपोआपच मुलं शिकतात. शिक्षक म्हणून, पालक म्हणून हे सर्व समजून घेण्याची कुवत आपल्यात हवी, जाणीवपूर्वक संधी निर्माण करण्याचा प्रयत्न आपण करायला हवा. त्यांचे 'पांचट' प्रश्न उडवून न लावता, गांभीर्यानं त्यांना उत्तरं देण्याचा समजूतदारपणा आपणच दाखवायला हवा. ●



स्पर्धा स्वत:शी, सहकार सर्वांशी!

अरुण ठाकूर

“ प्रत्येक मूल ही एक अद्वितीय निर्मिती असते. प्रत्येकाची आवडनिवड वेगळी, शरीरप्रकृती वेगळी, मनोधर्म वेगळा. त्यांना एका साच्यात कोंबून एका छापाचे गणपती घडवणं हे शिक्षणाचं काम नाही, याबाबत आमचं एकमत आहे. जर हे सारे निसर्गत: भिन्न आहेत ही वस्तुस्थिती असेल, तर त्यांच्यात मागे-पुढे, जिंकणं-हरणं यासारखे भ्रम निर्माण करून काय साधणार? ”

एकेका युगाचा एकेक मंत्र असतो. विसाव्या शतकाचा मंत्र होता स्पर्धा! पण या मंत्राची जादू विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात संपत गेली. एकेका माणसानं आपल्या स्वत:च्या परिश्रमानं, एकांडेपणानं काही शोध लावणं, काही निर्मिती करणं हा काळच आता राहिला नाही. आता ज्ञानाचं क्षेत्र इतकं विस्तारलं आहे, की सर्व ज्ञानशाखांना परस्परांची मदत घेऊनच वाटचाल करावी लागते. औद्योगिक क्षेत्रातही हल्ली collaboration शिवाय पान हलत नाही. आता व्यक्तिगत स्पर्धेचं युग संपलं आणि नवा मंत्र अवतरला, संघभावना! टीम स्पिरिट!

पण भारतातला मध्यमवर्ग अद्याप जुन्या युगाचाच मंत्र जपत बसला आहे. त्यामुळे कुठलेच दरवाजे उघडत नाहीत. आधीच जातीय मानसिकतेनं विभागलेल्या या समाजात समूहभानाचा अभाव आहे. त्यात हे स्पर्धेचं वेड डोक्यात शिरलेलं, त्यामुळे सर्व जण एकेकटे धावून कुठेच पोचत नाहीत अशी अवस्था निर्माण झाली आहे! नुकतंच आपल्या पंतप्रधानांनी, 'भारत विज्ञान संशोधनाच्या क्षेत्रात खूप मागे पडला आहे,' असं विज्ञान संमेलनात सांगितलं.


याची कारणं शिक्षणव्यवस्थेतला मागासलेपणा, जनभाषेतून शिकण्याची सोय नसणं, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव असणं अशी अनेक आहेतच; पण या साऱ्याच्या पार्श्वभूमीवर सहकाराचा अभाव हे मुख्य कारण दिसतं आहे.

स्पर्धा आणि सहकार हे केवळ दोन शब्द नाहीत, तर दोन जीवन दृष्टिकोन आहेत. 'आनंदनिकेतन'मध्ये आम्ही सहकार ही शाळेची जीवनदृष्टी मानतो. हा निर्णय केवळ प्रतिक्रिया म्हणून आलेला नाही, तर मुलाला पुढच्या वाटचालीसाठी आणि आनंदी जीवनासाठी काय उपयुक्त आहे, याचा विचार करून घेतला आहे.

शिकणं ही व्यक्तिगत प्रक्रिया आहे; पण ती घडते मात्र समूहाच्या अवकाशात. आसपासच्या समूहाशी, परिसराशी स्वत:ला जोडत, मूल स्वत:ला समृद्ध करण्याची धडपड करत असतं. प्रत्येक मूल ही एक अद्वितीय निर्मिती असते. प्रत्येकाची आवडनिवड वेगळी, शरीरप्रकृती वेगळी, मनोधर्म वेगळा. त्यांना एका साच्यात कोंबून एका छापाचे गणपती घडवणं हे शिक्षणाचं काम नाही, याबाबत आमचं एकमत आहे. जर हे सारे निसर्गत: भिन्न आहेत ही वस्तुस्थिती असेल, तर त्यांच्यात मागे-पुढे, जिंकणं-हरणं यासारखे भ्रम निर्माण करून काय साधणार? त्यानं प्रगती होणं तर दूरच, उलट न्यूनगंड वा अहंगंड तेवढा वाढीस लागेल. स्वत:च्या क्षमतांची ओळख व विकास हे शिक्षणाचं उद्दिष्ट असायला हवं. यात जिंकण्या-हरण्याचा प्रश्नच कुठे येतो? कुणाला तरी मागे टाकत पुढे जाणं, हे काही जीवनाचं उद्दिष्ट नाही. यामुळे दोन्ही मुलांचं नुकसानच होतं.

या दृष्टिकोनाची चर्चा करून ज्या पालकांना हा विचार पटतो, त्यांच्या मुलांनाच शाळेत प्रवेश दिला जातो. बालवाडीपासूनच गटात काम करण्याची, वस्तू-साहित्य वाटून वापरण्याची सवय केली जाते. पुढेही प्रत्येक वर्गात ४-५ मुलांचे गट केलेले असतात. काही उपक्रम गटागटानं पूर्ण करायचे, अगदी





हस्तकलेपासून गणितं सोडवण्यापर्यंत. अशा वेळी मुलंच एकमेकांना समजावून सांगतात. सहकारानं शिकणं सोपं होतं आणि दोघांनाही उपयुक्त ठरतं. काही उपक्रम वर्गानं एकत्रितपणे जसं वर्ग सजावट, तर काही पूर्ण शाळेनं मिळून करायचे असतात. गटाला नेमून दिलेलं काम सुंदर व्हावं, यासाठी सर्व जण प्रयत्नशील राहतात.

सहकाराचं उत्तम उदाहरण म्हणजे आमचं स्नेहसंमेलन! स्नेहसंमेलनात शाळेतले एकूणएक जण सहभागी होतात. रंगमंचावर येतात. अगदी बालवाडीपासून १० वी पर्यंत. स्नेहसंमेलन हा निवडक थोड्या मुलांच्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम नसतो. रंगमंचावरून आपल्या आई-बाबांना शोधणारी बालवाडीतली मुलं, नाचातली स्टेप चुकली, तर थांबून शेजाऱ्याकडे पाहून स्वत:ला सुधारणारी मुलं, नाटकातला संवाद म्हणताना माईकपाशी घोटाळणारी मुलं, आत्मविश्वासानं कविता वाचणारी मुलं या साऱ्यातून एक धमाल निर्माण होते. कुणालाही आपण वगळलेले आहोत, अशी नकारात्मक भावना टोचत नाही. मग दुसऱ्याच्या कौतुकातही मुलं मनापासून सहभागी होतात. कार्यक्रमात चांगलं काम करणाऱ्यावरच कमी पडणाऱ्याला सांभाळून घेण्याची जबाबदारी असते.

स्नेहसंमेलनात भाड्यानं किंवा नवीन कपडे, विकतचं इतर साहित्य आणायचं नाही, पर्यावरणस्नेही साहित्यच वापरायचं असा शाळेचा नियम आहे. त्यामुळे पालक एकमेकांची मदत घेत मुलांना सजवतात, कागदाचे कपडे तयार करतात, काही अडलं तर शिक्षकांची मदत घेतात. प्रत्येक जण आपले कपडे, आपल्याकडचं साहित्य कोणत्या कार्यक्रमासाठी उपयुक्त आहे, हे शोधून ते

देण्यासाठी उत्सुक असतात. स्नेहसंमेलन एका विशेष सूत्राभोवती गुंफलेलं असतं. कधी पाऊस, कधी रंग तर कधी शांता शेळके यांचं साहित्य! मग यासाठी सर्व वयोगटाच्या मुलांना साजेशा कविता, गाणी, नाच, नाटकं शोधली जातात, मिळाली नाहीत तर लिहिली जातात! यासाठीही पालक मदतीला येतात. रंगमंचाची सजावट तर बहुतेक वेळा पालकच करतात. यामुळे स्नेहसंमेलनात मुलं, पालक आणि ताई यांच्या आनंदाचा गोफ विणला जातो.

याचा अर्थ मुलांना स्पर्धेची ओळखच नसते असं नाही. साधारणपणे दहा वर्षांपर्यंतच्या मुलांना स्पर्धेचं आकर्षण नसतं. या मुलांना सर्वांबरोबर राहणं, खेळणं मनापासून आवडतं. हे स्पर्धेचं वेड पालकांच्या डोक्यात असतं. यामुळे इयत्ता चौथीपर्यंत तर कुठल्याच स्पर्धेला शाळेतर्फे मुलांना पाठवलं जात नाही. चौथीच्या पुढे काही स्पर्धांना मुलांना पाठवलं जातं. कारण या वेळेपर्यंत स्वत: काही वेगळं करणं, याचं मुलांना आकर्षण वाटू लागतं; पण याही बाबत शाळा तो प्रतिष्ठेचा विषय करून मुलांकडून विषय रटवून घेत नाही. वक्तृत्व असो वा निबंधलेखन, मुलांनी आपल्या भाषेतच भावना व्यक्त कराव्यात, त्यांची उत्स्फूर्तता कायम राहावी, असं कटाक्षानं बघितलं जातं. यामुळे बक्षीस मिळो की न मिळो, मुलांच्या अभिव्यक्तीत सुधारणा होते आणि तेच आमचं उद्दिष्ट असतं.



शाळेतही आम्ही काही स्पर्धा घेतो, पण त्या योग्य वयात स्वत:च्या क्षमतांचा कस तपासण्यासाठी. स्पर्धेसाठी स्पर्धा असं रूप त्याला येऊ नये, याची काळजी घेतो.

''तुम्ही स्पर्धा नको म्हणता, मग क्रीडास्पर्धा कशा काय घेता?'' एक पालक कुतूहलानं विचारत होते.

''आम्ही क्रीडास्पर्धा घेत नाही, क्रीडामहोत्सव घेतो. यात शाळेतलं प्रत्येक मूल सहभागी असतं. त्यात वैयक्तिक, जोडीचे व सांघिक खेळ असतात. सर्व शाळेतल्या मुलांचे चार गट असतात व त्यात चुरसही असते; पण 'जिंकण्यासाठी काय वाट्टेल ते' अशा थराला मुलं गेली, की चुरस संपून विरस व्हायला लागतो. ते टाळण्याचा आम्ही प्रयत्न करतो.''

ताईंचं हे निवेदन ऐकून पालकांचं फारसं समाधान झालं नाही, तरी क्रीडामहोत्सव संपल्यावर कशातही पहिलं न आलेलं त्यांचं मूलही जेव्हा खेळाच्या आनंदानं रंगून, सहभागाचे प्रशस्तिपत्रक घेऊन घरी येतं, तेव्हा त्यांना समाधान वाटतं. मुलांना आपण शाळेत पाठवतो ते या आनंदासाठी, यशस्वी वा अयशस्वी असे शिक्के मारून घेण्यासाठी नव्हे.

स्पर्धा म्हटल्यावर साधारणपणे जे चित्र डोळ्यांसमोर येतं, त्यापेक्षा आमच्या स्पर्धाही वेगळ्या असतात. आम्ही नावीन्यपूर्ण खेळ शोधून प्रत्येकाला सहभागी होता येईल, अशी काळजी घेतो. स्पर्शानं भाज्या ओळखणं, स्मरणशक्ती, आवाज ऐकून वाद्य ओळखणं, पानांचं-नाण्यांचं वर्गीकरण, एका वस्तूचे निरनिराळे उपयोग यांसारख्या वैयक्तिक आणि मखर बनवणं, धड्यांचं नाट्यरूपांतर व सादरीकरण अशा अनेक स्पर्धा गटांसाठी घेतल्या जातात. मुलांना कल्पकतेनं फॅन्सीड्रेस करणं, डब्यात वैविध्यपूर्ण पौष्टिक खाऊ देणं अशा पालकांसाठीही स्पर्धा असतात.

अर्थात शाळेत मुलांमध्ये सतत एकोप्याचं वातावरण असतं, असं नाही. शाळेनं जरी आपल्या परीनं मुलांना जीवनातल्या सहकाराच्या मूलभूत कल्पनेची ओळख करून दिली, त्याचे फायदे दाखवून दिले, तरी मुलं शाळेव्यतिरिक्त घरातून, समाजातून अनेक संदेश ग्रहण करत असतात. काही बाबतींत आपसूकच स्पर्धा सुरू होते. त्या त्या वेळी शाळा त्यांना आवरते. 'परीक्षेतले गुण हे तुला स्वत:ची वाटचाल कळण्यासाठी आहेत, त्यांचा संबंध तू क्षमताविकासासाठी कर', असंच सतत सांगितलं जातं.

केंब्रिजच्या इंग्रजी विषयाच्या मूल्हर्स, फ्लायर्स अशा परीक्षा, होमीभाभा

बालवैज्ञानिक स्पर्धा, शिष्यवृत्ती परीक्षा अशा स्पर्धापरीक्षांना दरवर्षी मुलं बसतात आणि चांगल्या गुणांनी उत्तीर्णही होतात. वैयक्तिक प्रावीण्य मिळवण्यासाठी मुलांना स्पर्धेची सवय लावायलाच हवी, या सर्वमान्य समजाला या मुलांनी छेद दिला आहे. स्पर्धेपेक्षा सहकारावर भर देण्याच्या शाळेच्या धोरणानं मुलांची क्षमता कमी होत नाही, हे दाखवून दिलं आहे.

शिक्षणाला स्पर्धेकडून सहकाराकडे नेण्याविषयीचा हा विचार जगभरातले लोक करत आहेत. अनेक गट याच विचारासाठी काम करत आहेत. आपण सर्व जण यात सामील होऊया.

●



जबाबदार नागरिक बनण्यासाठी...

नीलिमा कुलकर्णी

“आपल्यावर दुसऱ्या कोणी नियम लादले आहेत आणि ते पाळण्याची सक्ती आहे, असं वाटू नये म्हणून पाचवीपासून पुढे वर्षाच्या सुरुवातीलाच एक सभा घेतली जाते. यात नियम कशासाठी यावर चर्चा करून मुलांच्या मदतीनंच प्रत्येक वर्गाची एकेक नियमावली तयार होते आणि वर्गात लावली जाते. त्याची गरजेनुसार उजळणीही केली जाते. आपण केलेले नियम आपण पाळले पाहिजेत, अशी बांधिलकीची भावना मनात रुजावी, अशी अपेक्षा असते.”

वर्गात नागरिकशास्त्राचा तास चालू आहे. मुलं शिकण्यात रंगून गेली आहेत. शिक्षक उत्साहानं शिकवत आहेत... असं दृश्य काल्पनिक वाटतं ना? बरोबरच आहे! अभ्यासक्रमातले काही विषय शिकणं मुलांसाठी अगदीच कंटाळवाणं असतं आणि म्हणूनच असे विषय वर्गात शिकवताना शिक्षक म्हणून खरी कसोटी लागते.

असाच कसोटी पाहणारा एक विषय म्हणजे नागरिकशास्त्र. यातले सारे धडे मुलांना उपदेशपर आणि नीरस वाटतात (म्हणजे ते तसे असतातही!). एक तर यात लोकशाही, राष्ट्र, स्वातंत्र्य, हक्क इत्यादी अमूर्त संकल्पना भरपूर असतात. त्या समजावून सांगताना भाषणबाजी केली, की मग वर्गात जांभयांचं भरघोस पीक येणारच.

यावर तोडगा म्हणून स्वातंत्र्य, हक्क, कर्तव्य यांबाबत वर्गात चर्चाच घ्यायला लागते. या संकल्पनांच्या व्याख्या जरी मुलांना माहीत नसल्या, तरी त्यांचा अर्थ समजलेला असतो, असं त्यांच्या बोलण्यातून जाणवलं. ''तुम्हाला शाळेत कोणकोणत्या गोष्टींचं स्वातंत्र्य आहे, याची यादी करा'', असं म्हटल्यावर मुलांनी उत्साहानं 'मधल्या सुट्टीत खेळायचं, बरं नसल्यास झोपून राहायचं, बुधवारी वेगळे कपडे घालायचं, ताईंना प्रश्न विचारण्याचं, मनानं चित्र काढायचं...' अशी मोठी

यादी केली; पण काही मुलांना मात्र हे पटत नव्हतं. ते म्हणाले, ''आम्हाला कुठलं आलंय स्वातंत्र्य! शाळेचे भरपूर नियमदेखील आहेतच की.'' त्याचं उत्तरही परस्पर मुलांनीच दिलं. कुठल्याही ठिकाणी नियम नसतील, तर सगळीकडे एकच गोंधळ उडेल. कोणालाही स्वातंत्र्याचा उपभोग घेता येणार नाही. आपलं स्वातंत्र्य हे दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारं असू नये. हक्क-कर्तव्यांबद्दलही अशीच चर्चा होते. शाळेतल्या वस्तूंचा वापर करणं, हा आपला हक्क आहे, तर त्या जागच्या जागी ठेवणं, हे आपलं कर्तव्य आहे, अशी वाक्यं मुलंच आपणहून सांगतात.

आपल्यावर दुसऱ्या कोणी नियम लादले आहेत आणि ते पाळण्याची सक्ती आहे, असं वाटू नये म्हणून पाचवीपासून पुढे वर्षाच्या सुरुवातीलाच एक सभा घेतली जाते. यात नियम कशासाठी यावर चर्चा करून मुलांच्या मदतीनंच प्रत्येक वर्गाची एकेक नियमावली तयार होते आणि वर्गात लावली जाते. त्याची गरजेनुसार उजळणीही केली जाते. आपण केलेले नियम आपण पाळले पाहिजेत, अशी बंधिलकीची भावना मनात रुजावी, अशी अपेक्षा असते. ती काही प्रमाणात पूर्णही होते. निदान मुलांच्या मनात नियमांविषयी अढी तरी राहत नाही. त्याचप्रमाणे खिलाडू वृत्तीनं खेळण्याबाबत, शालेय साहित्य नीट वापरण्याबाबत, सर्वांशी चांगलं वागण्याबाबत मुलं स्वत: प्रतिज्ञा तयार करून म्हणतात.

लोकशाही हा विषय शिकवताना निवडणुका का अपरिहार्य आहेत, त्या कशा पद्धतीनं होतात, अशी चर्चा सुरू असतानाच मी पाचवी ते सातवीच्या वर्गप्रतिनिधींच्या निवडणुका जाहीर केल्या. हा विषय नुसता प्रतीकात्मक निवडणुकांपुरता ठेवायचा नाही, असं ठरवून त्याला अभ्यासाचा एक भाग बनवण्याचा प्रयत्न करायचं ठरवलं.

उमेदवार ठरवणं, सूचक-अनुमोदक, बोधचिन्ह, मतदान, मतमोजणी, अंतिम



निकाल या सर्व पायऱ्यांबद्दल चर्चा झाली. त्यानुसार मुलांनी अर्ज भरले. स्वत:ची चिन्हं ठरवली. कल्पकतेनं प्रचार केला. मी वर्गासाठी काय काय करेन, स्वतः कसा/कशी वागेन हे सांगितले. पत्रकं तयार केली. वर्गप्रतिनिधींची कर्तव्यं कोणती हे ठरलं. त्यातून त्यांना जबाबदारीची जाणीव झाली. शिवाय वर्गप्रतिनिधी म्हणून निवडून आलेल्यांनी कर्तव्य बजावलं नाही तर काय करावं, याचाही विचार करण्यात आला. निवडणुका मजेत पार पडल्या. वर्गप्रतिनिधी जाहीर झाले. कमी-जास्त प्रमाणात त्यांनी वर्गाची जबाबदारी घ्यायला सुरुवात केली. निवडून आल्यावर आदित्य तर इतका समंजसपणे वागायला लागला की सर्वांना आश्चर्य वाटलं.

त्याच वेळी महाराष्ट्रात निवडणुका जाहीर झाल्या. त्या दिवाळीच्या सुट्टीत असल्यानं त्यावर्षी पाचवी ते सातवीच्या मुलांना दिवाळीच्या सुट्टीत विधानसभा निवडणुका हाच विषय प्रकल्पासाठी दिला. त्यासाठी त्यांना त्यांच्या इयत्तेनुसार प्रश्नही काढून दिले. 'पालकांची मदत लागली तर घेऊ शकता; पण स्वत: वृत्तपत्रं, टीव्ही, रेडिओ यांचा वापर करून जाणून घ्या', असं सुचवलं. बरीच मुलं सुट्टीत गावी जातात. त्यांना तिथेही हा अभ्यास करता येणं शक्य होतं. प्रश्नावलीत ही कितवी विधानसभा निवडणूक आहे, तुझ्या मतदारसंघात कोण उभं होतं, त्यांची निशाणी काय होती, त्यांनी प्रचार कसा केला, प्रत्यक्ष निवडणूक कधी झाली, कोण निवडून आलं, कुणाला सर्वाधिक जागा मिळाल्या, सत्ताधारी पक्ष म्हणजे कोण, विरोधी पक्ष म्हणजे काय, मुख्यमंत्री कोण झालं, मंत्रिमंडळ केव्हा स्थापन झालं, कुणाला काय खाती मिळाली यांसारखे प्रश्न होते. मुलं सुट्टीभर सर्व साधनांचा वापर करून उत्साहानं माहिती मिळवत होती. यामध्ये मुद्दामच पालकांचा सहभाग असावा, असं सांगितलं होतं.

सुट्टीनंतर मुलं शाळेत आली तेव्हा समजलं, की सुरुवातीला पालकांचा प्रतिसाद नकारात्मक होता. 'तुला काय कळणार आहे राजकारणातलं? राजकारण म्हणजे घाणेरडा विषय. त्यावर कशाला बोलायचं?' अशा प्रतिक्रिया पालकांनी व्यक्त केल्या होत्या; पण मुलांनी सातत्यानं पाठपुरावा केला आणि पालक मुलांशी बोलायला लागले. मुलांनी प्रसारमाध्यमांचाही चांगला उपयोग केला. सर्व माहिती स्वत:च जमवल्यानं त्यांना हा विषय वर्गात न शिकवताही उत्तम समजला.

'सुट्टीत कशाला हो ताई अभ्यास', असं म्हणणाऱ्या मुलांनी सर्वांत आधी आपला प्रकल्प सादर केला. मंत्रिमंडळ जाहीरच झालेलं नसल्यानं मुलांचा एक प्रश्न अपुरा होता. अर्थात, त्यात त्यांचा काही दोष नव्हता. मराठीतून शपथ घेणं, त्यावेळी झालेली मारामारी यावरही वर्गात हिरिरीनं चर्चा झाली. हा रुक्ष विषय

पाहता-पाहता बोलका झाला.

मुलांनी केवळ निवडणुकीचीच माहिती मिळवली नाही, तर आई-वडिलांना मतदान करण्यास प्रवृत्त केलं. सातवीच्या मुलांनी विचारपूर्वक उत्तरं लिहिली, शिवाय स्वत:ची मतंही मांडली. उमेदवार गुन्हेगार प्रवृत्तीचा नसावा, पैसे देऊन मत विकत घेऊ नये, लाऊडस्पीकरचा वापर कमी करावा, अशी मतं मुलांची या विषयाबाबतची सजगता दर्शवणारी होती.

या प्रकल्पातून आम्हाला काय मिळालं, याचा विचार केला, तर 'ही मुलं लहान आहेत, यांना काय कळतं' हा आमचा आणि पालकांचा भ्रम दूर झाला. मुलं टीव्हीवर बातम्या पाहू लागली. वर्तमानपत्रं वाचू लागली. दैनंदिन घडामोडींची माहिती आपल्याला असायला हवी, हे त्यांना पटलं. सहावीतल्या उमानं तर तिच्या घराजवळील मैदानात खेळताना होणाऱ्या भटक्या कुत्र्यांच्या त्रासाविषयी त्या भागातल्या नगरसेवकाकडे तक्रार करून त्यांचा बंदोबस्त केला! हा प्रश्न घरापर्यंतही जाऊ न देता मुला-मुलींनी स्वत: सोडवला. यापेक्षा नागरिकशास्त्र हा विषय मुलांना चांगला समजला, याची कसोटी वेगळी कुठली असू शकेल?

मराठी शाळांच्या मान्यतेबाबत झालेल्या आंदोलनानंही मुलांना बरंच काही समजलं. आपले प्रश्न दमदाटी-दादागिरी करून नव्हे, तर शांततेच्या मार्गानं सोडण्याचा प्रयत्न करण्याचा धडाच मिळाला. धरणं आंदोलन, मोर्च्यातला सहभाग, स्वत: तयार करून घोषणा देणं अशा इतिहासात वाचलेल्या गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. अरुणदादांच्या उपोषणानं गांधीजींनी घालून दिलेल्या मार्गानं आपण जात आहोत आणि त्याचे फळ आपल्याला मिळेलच असा विश्वासही मिळाला.

याबाबत पालकांची भूमिका महत्त्वाची ठरते. पालकांनी मुलांना राजकारणाबद्दल समजेल अशा भाषेत माहिती दिली, निवडणुकीच्या प्रचारसभांना त्यांना घेऊन गेले, घरातले आणि समाजातले सर्व नियम स्वत: कसोशीनं पाळले, वृत्तपत्रवाचन, टीव्हीवर बातम्या बघणं या गोष्टींमध्ये मुलांना आवर्जून सहभागी करून घेतलं, दैनंदिन घडामोडींची माहिती मुलांना दिली, मुलांनी पुढाकार घेऊन एखादी गोष्ट केली तर त्यांना प्रोत्साहन दिलं, त्यांच्यातल्या नेतृत्वगुणांना वाव दिला, तर त्यातूनच सुजाण नागरिकांची निर्मिती होऊ शकेल, केवळ नागरिकशास्त्राचं पुस्तक वाचून नव्हे! ●



अनुभव हाच गुरू

दीपा पळशीकर

“ मुलांना बोलण्याची, स्वत:ला व्यक्त करण्याची संधी हवी असते. मुलांच्या या व्यक्त होण्यातून शिक्षक मुलांच्या अंतरंगात डोकावून बघू शकतात. त्यांच्या भावविश्वात काय सुरू आहे, त्यांची घडण कशी होत आहे, काही चुकीच्या संकल्पना घेऊन तर ती पुढे जात नाहीत ना, हे सहज लक्षात येतं. ”

नवीन अभ्यासक्रमानुसार तयार केलेल्या मराठीच्या पाठ्यपुस्तकांमध्ये भाषिक कौशल्यांबरोबरच जीवनकौशल्यांचा समावेश केलेला आहे. त्यासाठी अनुभवकथन, बातम्या, अहवाल, माहितीपत्रकं, जाहिराती असे विविध लेखनप्रकार पाठ्यपुस्तकांत दिलेले आहेत. पाठ्यपुस्तकांमध्ये त्यांचा समावेश होण्यापूर्वीच आमच्या शाळेत अध्यापनाचा रोख जीवनकौशल्यं मुलांमध्ये रुजवणं, हाच राहिला आहे. कारण मुळात जीवन आणि शिक्षण या दोन भिन्न गोष्टी आहेत, असं आम्ही मानतच नाही. आपल्याकडे जे अध्यापनसाहित्य आहे त्याचा वापर करून, प्रसंगी स्वत:च असं साहित्य निर्माण करून, तसंच क्षेत्रभेटी, सहली व विविध उपक्रम राबवून, आपली कल्पनाशक्ती पणाला लावत आमचे शिक्षक शिक्षण जीवनाशी जोडण्याचा प्रयत्न करतात. हे कसं साधतं? उदाहरणादाखल आपण इयत्ता तिसरीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातला 'माझा अनुभव' हा पाठ पाहू. या पाठात तिसरीच्या वयोगटातल्या दोन मुलींचे अनुभव दिले आहेत. त्यातला फुलकई नावाच्या मुलीचा एक अनुभव पुढे दिला आहे.


''सुधीर शाळेकडे जात होता. पाठीमागून येणाऱ्या वाहनाचा त्याला अचानक धक्का लागला. तो खाली पडला. वाहन निघून गेलं. मी सुधीरच्या मागे होते. मी चटकन सुधीरच्या जवळ गेले. त्याची चौकशी केली. त्याला उठता येत नव्हतं. रस्त्यानं जाणाऱ्या लोकांना मी थांबवलं. त्यांच्या मदतीनं सुधीरला दवाखान्यात

नेलं. डॉक्टरांनी सुधीरला तपासलं, औषधं दिली. सुधीरला फारसं लागलं नव्हतं. डॉक्टरांनी सुधीरला घरी नेण्याची परवानगी दिली. मी सुधीरला घरी नेऊन सोडलं. त्याच्या आईला सगळी हकीकत सांगितली. औषधं त्याच्या आईकडे दिली. सुधीरच्या आईनं माझं कौतुक केलं.''

- कु. फुलकई

या पाठाच्या शेवटी स्वाध्याय नाही. मुलांनी आपण केलेल्या चांगल्या गोष्टी लिहून ठेवाव्यात, अशी अपेक्षा पाठाच्या सुरुवातीलाच व्यक्त केली आहे. त्यामुळे या अनुभवांच्या लेखन-वाचनाबरोबरच या पाठातून मुलांपर्यंत काय पोचवता येईल, यावर विचार करून हा पाठ शिकवायचं ठरवलं.

प्रत्यक्ष पाठ्यपुस्तक हाती घेऊन वाचताना सुरुवात करण्यापूर्वी 'अनुभव' या शब्दावर मुलांबरोबर चर्चा केली. 'अनुभवातून शिक्षण' हे शाळेचं ब्रीद असल्यानं 'अनुभव' हा शब्द मुलांच्या चांगल्याच परिचयाचा आहे. 'अनुभव' म्हणजे काय, असं विचारल्यावर- १. जे आपल्याला माहीत असतं ते, २. जे आपल्याला कळतं ते, ३. जे आपल्याला 'फील' होतं ते... अशी उत्तरं मुलांकडून आली. मग उदाहरण म्हणून ''आज सकाळी खूप थंडी पडल्याचा अनुभव मला आला'', असं मी मुलांना सांगितलं. आणि मग सकाळी उठल्यापासून आत्ता शाळेत येईपर्यंत आपल्याला आलेले अनुभव मुलांना सांगायला सांगितले. मुलांनी आपापले अनुभव सांगितले. स्वप्नीलनं ''इतरांना आलेले अनुभव ऐकण्याचा अनुभव मिळाला'', असं सांगितलं. यानंतर हे वेगवेगळे अनुभव आपल्याला कशामुळे समजतात, यावर गप्पा झाल्या. आपण जे करतो, वागतो, बोलतो, बघतो, ऐकतो, स्पर्श करतो, चव घेतो, वास घेतो... या सगळ्यांतून आपण अनुभव घेतो, आपले अनुभव आपण एकमेकांना सांगतो, या अनुभवांचा आपल्याला पुढे कसा उपयोग होतो, यांवरही गप्पा झाल्या. हे अनुभव एकमेकांना सांगण्याच्या पद्धती कोणत्या असतील, यावर लिहून-बोलून, या उत्तरांबरोबरच- खुणा करून, नजरेनं, हावभाव करून, चित्र काढून, कविता करून, फोटो काढून, अभिनय करून... अशी उत्तरं मुलांकडून आली. यानंतर मुलांनी पाठाचं वाचन केलं. वाचन केल्यानंतर प्रत्यक्ष पाठावर आधारित मुद्द्यांवर चर्चा केली. उदा. या अनुभवात एकूण व्यक्ती किती? कोणत्या? त्यांचं एकमेकांशी नातं काय? यातली मुख्य घटना कोणती? या घटनेतल्या किती व्यक्तींच्या वागण्यामागील, बोलण्यामागील कार्यकारणभाव कोणता? अपघातानंतर सुधीरची परिस्थिती कशी झाली? सुधीरला घरी कुणी नेऊन सोडलं?... पाठातल्या मजकुरावर आधारित अशा प्रश्नांनंतर या प्रसंगामध्ये मुलांनी जास्त खोलवर जाऊन विचार करावा, यासाठी थोडी चर्चा



सारस, इ. तिसरी

घेतली. मुलांचे प्रतिसाद कंसात दिले आहेत.

• सुधीरला अपघात झाल्याचं समजल्यावर आईला काय वाटलं असेल? तिनं काय केलं असेल? (काळजी वाटली असेल, टेन्शन आलं असेल, ती आपल्या स्कुटीवरून सुधीरला बघायला ताबडतोब बाहेर पडली असेल, रडू आलं असेल, तिनं सुधीरच्या बाबांना फोन केला असेल, देवाकडे प्रार्थना केली असेल, इ.)

• फुलकई मागून येत नसती तर काय झालं असतं? (सुधीर थोड्या वेळानं स्वत:च उठून उभा राहिला असता, त्याला कुणीतरी मदत केली असती, मागून येणाऱ्या शाळेच्या रिक्षाकाकांनी मदत केली असती, इ.)

• रस्त्यानं जाणाऱ्या लोकांना काय बोलून फुलकईनं थांबवलं असेल? (या प्रश्नाच्या उत्तरासाठी मुलांनी गटागटानं प्रसंगाचं नाट्यीकरण केलं. घाबरून रडत मदत मागणाऱ्या मुलीपासून ते 'एका लहान मुलाला अपघात झाला असताना तुम्ही थांबलंच पाहिजे', अशी 'दादागिरी' करणाऱ्या मुलीपर्यंत अनेक फुलकई साकारल्या.)

• पाठीमागून येणारं वाहन कोणतं असेल? (या प्रश्नावर तर आपल्याला किती गाड्यांची नावं माहिती आहेत, हे सांगण्याची चढाओढच सुरू झाली.)

• वाहनचालकानं धक्का लागल्यावर काय करायला हवं होतं? (या प्रश्नावर मात्र सगळ्यांचं एकमत होतं, की त्यानं थांबून सुधीरला दवाखान्यात न्यायला हवं होतं.)

• वाहनचालक का थांबला नसेल? (तो घाबरला असेल, पोलिसांची भीती वाटली असेल, त्याला उशीर होत असेल म्हणून तो घाईनं गेला असणार, त्याला गाडी पकडायची असेल, त्याला इंटरव्ह्यूला जायचं असेल, इ.)

याचप्रमाणे पुढील प्रश्नांवरही चर्चा झाली- रस्त्यातले लोक मदतीला थांबले नसते तर? त्या वेळी तू रस्त्यात असतास/असतीस तर काय केलं असतंस? तू एखादा अपघात बघितला असशील तर त्याबद्दल सांग.

मुलांच्या प्रतिसादावरून हे सहज लक्षात येतं, की मुलं एकाच प्रसंगाकडे किती वेगवेगळ्या दृष्टीनं पाहतात... चर्चा करू शकतात... आपलं म्हणणं सगळ्यांना पटवून देण्यासाठी युक्तिवादही करू शकतात. आपल्यावरच्या सामाजिक जबाबदारीची त्यांना जाणीव आहे, हेही त्यांच्या प्रतिसादावरून आपल्या लक्षात येतं. कारण अपघात झाल्यानंतर दुर्लक्ष करून निघून जाणं त्यांना मान्य झालेलं नाही. अशी संवेदनशील मुलं मोठी झाल्यावर जबाबदार नागरिक का नाही बनणार? त्यांच्या संवेदना जाग्या करणं, त्या ओळखायला शिकवणं आणि आपल्या संवेदनांना योग्य प्रतिसाद देण्याची संधी उपलब्ध करून देणं, एवढं तर आपण नक्कीच करू शकतो ना?

जीवनकौशल्यांबरोबरच भाषिक कौशल्यं वाढवण्यासाठीसुद्धा या पाठाचा उपयोग झाला. पाठ्यपुस्तकात हा अनुभव प्रत्यक्ष त्या प्रसंगात नसलेल्या अशा तिसऱ्या व्यक्तीनं सांगितला आहे. तेव्हा हाच अनुभव फुलकई, किंवा सुधीर आपल्याला सांगत आहे, अशा प्रकारे लिहायला मुलांना सांगितलं. सुधीरची आई आणि तिची मैत्रीण या अपघाताबद्दल बोलत आहेत अशी कल्पना करून संवादलेखन करायला आणि नंतर तो संवाद सादर करायलाही मुलांना मजा आली. परवानगी, चटकन, तपासणं, हकीकत अशा शब्दांचा वाक्यांत उपयोग करायला मुलांना सांगितलं, चटकन सारखे आणखी शब्द शोधण्यात मुलं रमली. आपण शिक्षकांनी ठरवलं तर एकाच पाठाचा उपयोग किती वेगवेगळ्या प्रकारे करता येऊ शकतो ना?



११

शाळेचं घरपण

विनोदिनी पिटके-काळगी

> **सारी रात्र माझी याचाच मुलांना मोठा आनंद असतो. झोपायचं कधी हा निर्णय आपण घेणार, याचंही त्यांना अप्रूप असतं. यावर्षी तर पहिलीच्या मुलांनी ठरवलंच होतं, की दोन वाजल्याशिवाय झोपायचं नाही. साऱ्यांना झोप येत होती; पण तरी ते एकमेकांना जागं ठेवत आपला पण पुरा करण्याचा प्रयत्न करत होते. शेवटी गुपचूप शाळेच्या घड्याळ्यातले काटे दोनवर नेऊन त्यांना दाखवले, तेव्हा ते क्षणात गुडूप झोपले!**

''आमचा मृण्मय अजून मला सोडून एकदा पण झोपला नाही. रडला तर फोन करा, आम्ही लगेच न्यायला येऊ.'' बालवाडीतल्या मृण्मयची आई.

''ताई, तिकडे काहीतरी हलतंय. मी तुमचा हात धरून झोपू?'' बालवाडीतली प्राप्ती.

''आम्हाला माहीत आहे मोठी मुलं रात्री दोन वाजेपर्यंत जागतात. आम्ही पण आज दोनपर्यंत जागणार.'' पहिलीतला श्लोक.

''जेवण झाल्यावर सगळ्यांना आम्ही बसवलेलं नाटक करून दाखवणार आहोत.'' चौथीतली अर्पिता.

''बारा वाजता गच्चीवर आलास तर मी तुला भूत दाखवीन.'' सातवीतला अक्षय.

''आपण रात्रभर गप्पा मारूया.'' नववीतल्या मुली.


हे सर्व संवाद आहेत शाळेच्या रात्रनिवास या उपक्रमाच्या वेळी काढलेले.

मुलांचं शाळेशी, शिकवणाऱ्या ताईंशी घट्ट नातं निर्माण झालं पाहिजे, मुलं आणि शाळा यांत भावनिक बंध तयार झाला पाहिजेत, हा विचार शाळा सुरू करताना पक्का होता. हे होण्यासाठी कोणते उपक्रम घेता येतील, असा विचार सतत डोक्यात असायचा. त्यातून एक रात्र मुलांना शाळेत जेवायला आणि राहायला

बोलवायचं, ही कल्पना सुचली. पहिल्या वर्षी फक्त बालवाडीचा वर्ग चालू होता. त्यामुळे इतकी लहान मुलं शाळेत राहायला तयार होतील का? त्यांचे पालक त्यांना पाठवतील का? याबाबत आम्ही साशंकच होतो. शाळेची प्रयोग करून बघण्याची वृत्ती पालकांनी मान्य केली असावी म्हणून सर्वांनी मुलांना शाळेत आणून सोडलं. अर्थात, कोणी रडलं तर रात्रीतून परत नेण्याची तयारीही दाखवली; पण मुलांनी तशी वेळ येऊ दिली नाही. त्यांना वर्गातले सर्व जण एकत्र जेवण करणार, शेजारी शेजारी झोपणार याचं खूप औत्सुक्य वाटत होतं. कढी-खिचडीचा बेत होता. जेवणानंतर थोडा वेळ दंगामस्ती आणि मग ताईची गोष्ट ऐकता ऐकता एकेक जण झोपी गेले. दुसऱ्या दिवशी रविवार होता. त्यामुळे शाळेला सुट्टी होती. सोमवारी शाळेत आल्यावर काल आपण कसे राहिलो होतो, याच्याच गप्पा रंगात आल्या होत्या. शिवाय परत राहायची तयारीही होती. बरीच मुलं प्रथमच आई-बाबांना सोडून राहिली होती. त्यातून त्यांना आपण असे राहू शकतो, हा आत्मविश्वास आला. नंदाची आई तर सांगायला आली, की नंदा तोपर्यंत आईला सोडून झोपत नव्हती. ती आता आजीजवळ, मावशीजवळ झोपायला लागली. या सर्वांतून आम्हाला जाणवलं, की आपल्याला सुचलेला उपक्रम योग्य आहे. मग काय आमचाही आत्मविश्वास वाढला. दरवर्षी असा रात्रनिवास करायचं ठरलं आणि गेली चौदा वर्षं तो सुरू आहे.

प्रत्येक वर्षी मुलांची संख्या आणि इयत्ता वाढत होती. त्यामुळे स्वाभाविकपणे रात्रनिवासातल्या कार्यक्रमांचं स्वरूप बदलत गेलं. बालवाडी ते तिसरीसाठी एक दिवस आणि चौथी ते नववीसाठी वेगळा दिवस करावा लागला. त्यानुसार रात्री घ्यायच्या कार्यक्रमांची आखणी सुरू केली. लहानांसाठी गोष्टी सांगणं, वेगळे खेळ घेणं, तर मोठ्यांसाठी आकाशदर्शन, प्रश्नमंजूषा असं नियोजन असतं. अर्थात, जास्तीत जास्त वेळ मुलांना स्वत:च्या मनाप्रमाणे खेळण्याची, कार्यक्रम करण्याची, गप्पा मारण्याची मुभा असते.

सारी रात्र माझी याचाच मुलांना मोठा आनंद असतो. झोपायचं कधी हा निर्णय आपण घेणार, याचंही त्यांना अप्रूप असतं. यावर्षी तर पहिलीच्या मुलांनी ठरवलंच होतं, की दोन वाजल्याशिवाय झोपायचं नाही. साऱ्यांना झोप येत होती; पण तरी ते एकमेकांना जागं ठेवत आपला पण पुरा करण्याचा प्रयत्न करत होते. शेवटी गुपचूप शाळेच्या घड्याळ्यातले काटे दोनवर नेऊन त्यांना दाखवले, तेव्हा ते क्षणात गुडूप झोपले! एकदा पहिलीच्या मुलींना सारखा नाचच करायचा होता. खूप वेळ नाचून झाल्यावर ताईंनी सगळ्यांना आडवं पडायला सांगितलं, तर त्या मुली



प्राची, इ. पहिली

आडवं पडून नाच करत होत्या. शिवाय पांघरुणात शिरल्यावरही खुसपूस करत हसणं, खिदळणं याचाही आनंद मोठा असतो.

सगळी मुलं रात्रनिवासाची आतुरतेनं वाट पाहत असतात. एकेक महिना आधीपासून त्यांचं प्लॅनिंग चालू असतं. मोठ्यांचा सर्वांत आवडता विषय म्हणजे भूत. लाईट बंद करून भुतांच्या गोष्टी सांगणं, किंवा सर्वांनी एका पांघरुणात शिरून भूत-आत्मा यावर गप्पा मारणं, हे तर दरवर्षी ठरलेलंच. भुताच्या गोष्टींची गंमत म्हणजे सांगणारा व ऐकणारा दोघंही घाबरलेले असतात! पण तरीही नवनव्या गोष्टी सांगण्याची चढाओढ सुरूच असते. या रात्री लवकर झोपणं हा मुलांमध्ये शिस्तभंग मानला जातो. यातून कोणता वर्ग सर्वांत जास्त वेळ जागतो, याची स्पर्धा लागते. पेंगुळलेले डोळे, भरलेलं पोट आणि थकलेलं शरीर सांभाळत जागणं हे

काही सोपं नसतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी आपणच कसे सर्वांत शेवटी झोपलो, हे प्रत्येक जण सांगत असतो. रात्री स्वत:चं अंथरूण स्वत: टाकलेलं असतं, ते सकाळी स्वत:च आवरलंही जातं. एरवी घरी ही मुलं काहीच काम ऐकत नाहीत, असं सांगणारे पालक हे पाहून आश्चर्यच करतात. छोट्या मुलांना एकट्याला अंथरूण, चादर टाकणं जमत नाही. मग तिघं-चौघं मिळून ही कामं करतात. सकाळी पांघरुणाची घडी करताना बऱ्याचदा ते निसटतं. शेवटी जमली की आनंद. त्यांचे ते प्रयत्न बघायला फार मजा येते.

दुसऱ्या दिवशी ताईही मुलांशी या विषयावर बोलतात, त्यांचे अनुभव विचारतात. त्या वेळी मुलांनी दिलेल्या प्रतिक्रिया अगदी बोलक्या असतात. या वर्षी रात्रनिवासाविषयी बोलताना सातवीतली धनश्री म्हणाली, ''ताई रात्रनिवासानं शाळेला घरपण येतं.' किती सुंदर कल्पना आहे ना.

यातून दोन गोष्टी साधल्या जातात. आपलं मूल आपल्याशिवाय राहूच शकत नाही, या समजुतीतून पालक बाहेर येतात. त्यामुळे विशेषत: बालवाडीच्या मुलांचं स्वतंत्र जीवन खऱ्या अर्थानं सुरू होतं आणि पालकही थोडे नि:शंक होतात. स्वावलंबनातला आनंद व स्वातंत्र्य सर्व जण अनुभवतात. कुटुंबापलीकडे असलेल्या मोठ्या समुदायात ते स्वतंत्रपणे जुळवून घ्यायला शिकतात. भीतीचा मुकाबला करायला शिकतात. यासाठी मित्रांचा खूप उपयोग होतो हे उमगतं व त्यातून कुटुंबापलीकडे नवी नाती आकाराला येतात. मोठी मुलं लहान मुलांची काळजी घेताना दिसतात. त्यातून जबाबदारीची जाणीव विकसित होते. रात्रनिवास हा एक केवळ नावीन्यपूर्ण उपक्रम नाही, तर तो मुलांचं शाळेशी असलेलं नातं दृढ करणारा, मुलांना आत्मविश्वास देणारा व पालकांना मोकळीक देणारा जीवनोपयोगी कार्यक्रम आहे.

●



इतिहासाचं वर्तमान

दीपा पळशीकर

“ इतिहास म्हणजे काय, हे समजण्यासाठी मुलांच्या आईच्या लहानपणी, आजीच्या लहानपणी काय होतं, आज काय आहे, अशा गप्पा मुलांबरोबर करतो. आता तुमच्या लहानपणी काय आहे, तुम्ही सात/आठ वर्षांचे होईपर्यंत हे आठवायला सांगत पूर्वी घडून गेलेल्या गोष्टी म्हणजे इतिहास हे मुलांपर्यंत पोचतं. मुलं त्यांच्याबाबतीत घडून गेलेल्या महत्त्वाच्या गोष्टी आठवतात. आई-बाबांना विचारून काही नोंदी ठेवतात आणि मग स्वत:च्या इतिहासाकडून ती माणसाच्या इतिहासाकडे वळतात. ”

'इतिहास' हा विषय म्हटलं की आपल्या सगळ्यांना आठवतो एक कंटाळवाणा 'बोअरिंग' तास! त्या सनावळ्या, राजेरजवाड्यांच्या नावांच्या जंत्र्या, वेगवेगळी घराणी, निरनिराळी युद्धं, ती घडण्याची कारणं, युद्धाचे परिणाम, विविध प्रकारच्या क्रांत्या... सगळं डोळ्यांसमोर फेर धरून नाचू लागतं आणि आपण नकळतच गुणगुणू लागतो, 'सिकंदरने पोरस से की थी लडाई, जो की थी लडाई, तो मैं क्या करूँ?' खरंच, आपला काहीच संबंध नाही इतिहासाशी? आपला असा समज का झाला? खरंतर आपण विचार करायला सुरुवात करतो ती स्वत:पासून आणि आपल्या परिसरापासून. आणि इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्राचा अभ्यास म्हणजे स्वत:चाच अभ्यास, वेगळं काय? याच इतिहासाकडे आपण थोड्या वेगळ्या कोनातून बघूया! आपल्या सभोवतालच्या माणसांना... त्यांच्या बनलेल्या समाजाला... त्यांच्या भूतकाळाला समजून घेणं म्हणजे इतिहास! आपल्या भूतकाळाबद्दल जाणून घ्यायला कुणाला नाही आवडणार?

इतिहास हा विषय म्हणून पहिल्यांदा मुलांसमोर येतो तिसरीत गेल्यावर. खरंतर लाखो वर्षापूर्वीचा इतिहास ही संकल्पना तोपर्यंत संख्यांच्या पातळीवर जेमतेम शतकापर्यंत पोचलेल्या मुलांना समजावणं तसं कठीणच! इतिहास म्हणजे काय, हे समजण्यासाठी त्यांच्या आईच्या लहानपणी, आजीच्या लहानपणी घरात

कोणत्या वस्तू होत्या, स्वयंपाकाची भांडी कोणती होती, परगावी जाण्यासाठी काय सोयी होत्या ते विचारून या अशा गप्पा मुलांबरोबर करत, आता तुमच्या लहानपणी काय आहे, तुम्ही सात/आठ वर्षांचे होईपर्यंत हे आठवायला सांगत पूर्वी घडून गेलेल्या गोष्टी म्हणजे इतिहास हे मुलांपर्यंत पोहोचतं. मुलं त्यांच्याबाबतीत घडून गेलेल्या महत्त्वाच्या गोष्टी आठवतात. आई-बाबांना विचारून काही नोंदी ठेवतात. उदा. पहिला दात कधी आला, पहिलं पाऊल कधी टाकलं, पहिल्यांदा वरण-भात कधी खाल्ला. या सगळ्या नोंदी म्हणजेच तुमचा इतिहास हे मुलांना पटतं, आणि मग स्वत:च्या इतिहासाकडून ती माणसाच्या इतिहासाकडे वळतात. अश्मयुगीन अवजारं तयार करण्यासाठी दगडधोंडे, माती धुंडाळतात. दगडाला आकार देऊन चित्रात दाखवल्यासारखी कुऱ्हाड बनवण्याचा प्रयत्न करतात. एखादा भाल्याच्या टोकासारखा चपटा दगड सापडला, की त्याला एक लांब काठी बांधून भाला तयार करतात. आणि यातूनच अश्मयुगीन अवजारांचं प्रदर्शन साकारतं. इतर वर्गांतली मुलं हे प्रदर्शन बघायला येतात आणि तिसरीची मुलं या अवजारांची माहिती सांगतात.

चौथीत असणारा शिवरायांचा इतिहास तर मुलांना आवडतोच. शिवरायांबद्दल त्यांनी बरंच काही ऐकलेलं असतं. त्याचबरोबर शिवरायांच्या पुतळ्यासंबंधीचा वाद, शिवरायांशी संबंधित घडणाऱ्या ताज्या घटनाही मुलं टिपत असतात. इतिहासाच्या तासाला या सगळ्यांबद्दल आवर्जून चर्चा होतात. चौथीच्या टप्प्यावर मुलांना ऐतिहासिक पुरावे म्हणजे काय, याची तोंडओळख करून देण्याचा आम्ही प्रयत्न करतो. इतिहासकार इतिहास कसा शोधून काढतात, कथा-कादंबऱ्यांतून, चित्रपटांतून दाखवला जाणारा इतिहास खरा असेलच असं नाही, इतिहासाला पुरावे लागतात, या सगळ्यांवर बरीच चर्चा होते. मग मुलं त्यांचे 'ऐतिहासिक' पुरावे गोळा करून त्याचं प्रदर्शन मांडतात. आम्ही त्यांच्या जन्मतारखेचा पुरावा म्हणून त्यांचे जन्मतारखेचे दाखले त्यांना दाखवतो. पालकही उत्साहानं त्यांचे लहानपणीचे किस्से लिहून पाठवतात. (अर्थात, हा पुरावाही ऐकीव आहे, त्यावर विश्वास ठेवायचा का, असाही कुणाचा तरी आक्षेप असतोच!) छोटी-छोटी झबली, दुपटी, खुळखुळे, बारशाचे, पहिल्या वाढदिवसाचे फोटो, खेळणी, एखाद्या आईनं कौतुकानं जपून ठेवलेला चमचाही या प्रदर्शनात अवतरतो. मुलांच्या बालवाडीतल्या मूल्यमापन पत्रिका, मुलांची सुरुवातीची चित्रं, घडीकामाची जपून ठेवलेली होडीही या प्रदर्शनात दिसते. या सगळ्यांतून पुरावे म्हणजे काय आणि इतके जुने, शेकडो वर्षांपूर्वीचे पुरावे कसे गोळा करत असतील, याची थोडीफार कल्पना मुलांना येते. शिवरायांचा इतिहास शिकताना कधी मुलं शिवरायांच्या सैन्यात नोकरी मिळवण्यासाठी अर्ज लिहितात,

पाठ्यपुस्तकातल्या अवघड शब्दांचा शब्दकोश तयार करतात, कधी 'शिवकालीन दैनंदिनी' प्रकल्पाच्या रूपात साकारते, तर कधी शिवरायांचे मंत्रिमंडळ आणि महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ अशी तुलनात्मक चर्चाही होते! हा इतिहास शिकताना मुलांच्या अंगात जोश संचारतो. शिवरायांचं शौर्य, लढाया, युद्धनीती मुलांना आकर्षक वाटते. अशा वेळी त्यांना वेगळ्या नजरेनं शिवरायांची थोरवी शिकवणं आवश्यक ठरतं. मुलांचे अनुभव, मत यांवर अनेक गोष्टींचा पगडा असू शकतो. त्यातला सगळाच भाग चांगला असेल असं नाही. अशा वेळी अतिशय संवेदनशीलतेनं, हळुवारपणे चुकीच्या गोष्टींकडे मुलांचं लक्ष वेधावं लागतं. आपली मतं कठोरपणे त्यांच्यावर न लादता सारासार विचारांच्या रस्त्याकडे त्यांना नेणं हे मोठं कौशल्याचं काम ठरतं. मुलांची मतं काय आहेत, हे जाणून घेण्यासाठी दैनंदिन घटनांवर सातत्यानं चर्चा होत राहतात. मुलांनी त्यांची स्वत:ची मतं एकांगी न बनवता दुसरीही बाजू बघावी, यासाठी सतर्क राहून प्रयत्न करावे लागतात.

चौथीपर्यंतचा इतिहास शिकताना मुलांना मजा वाटते. पाचवीपासून पुढची पुस्तकं मात्र त्यांना कंटाळवाणी वाटू शकतात. (सनावळ्यांच्या याद्या पाठ्यपुस्तकातून आता काढून टाकल्या असल्या तरी!) पण हा अभ्यासक्रमही रंगतदार, शिकवायला आणि शिकायलाही आवडेल असा करण्याचा प्रयत्न आम्ही करतो. मध्य प्रदेशातल्या 'एकलव्य' या सामाजिक संस्थेनं प्रकाशित केलेल्या सामाजिक अध्ययन या पुस्तकांच्या आणि 'नॅशनल कौन्सिल फॉर एज्युकेशनल रिसर्च अ‍ॅन्ड ट्रेनिंग' (एन. सी. ई. आर. टी.)नं तयार केलेल्या पुस्तकांच्या मदतीनं. मुलांची मनं आशयापर्यंत पोहोचण्यासाठी अनेक पद्धतींचा वापर या पुस्तकांनी सुचवला आहे. आशय समजावा म्हणून घटनेचं वर्णन, स्पष्टीकरण, आजच्या परिस्थितीशी तुलना, कारण आणि परिणाम, परस्परसंबंध जोडणं, अनुमान करणं अशा टप्प्यांतून गेल्यानंतर इतिहास आपलासा वाटू लागतो. मुलं ज्या सामाजिक, सांस्कृतिक वातावरणात वाढत आहेत त्याचा संदर्भ सतत जागता ठेवण्याचा प्रयत्न



असतो.

पाचवीमध्ये भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास अभ्यासताना मुलं वेगवेगळे स्वातंत्र्यसेनानी, त्यांचं चरित्र अभ्यासतात. या नेत्यांची चरित्रं सांगणारी पुस्तकं वाचतात, नाट्यीकरण करतात. वेगवेगळ्या प्रांतातल्या भाषांची गोडी समजून घेतात, त्या प्रांतातलं समाजजीवन, खाद्यसंस्कृती, कलाप्रकार यांच्यातलं वैविध्य जाणून घेतात. चित्रं, वस्तुसंग्रह, मुलाखती या माध्यमांतून वेगवेगळ्या प्रांतांचं सादरीकरण करतात. इतिहासाबद्दल त्यांना कुतूहल वाटू लागतं. इतिहास समजून घेण्याची भौतिक, मौखिक, लिखित साधनं कोणती असू शकतात, यावर विचार करताना त्यांना आपल्याच घराण्याचा शोध घ्यावासा वाटू लागतो. आजी-पणजीच्या तोंडी असणारी गाणी, म्हणी यांच्याकडे ती औत्सुक्यानं बघतात. तेव्हाची मनोरंजनाची साधनं कोणती असतील, आपले पणजोबा दात कशानं घासत असतील, फोनशिवाय लांबच्या नातेवाइकांची खबरबात त्यांना कशी कळत असेल, आजी स्वयंपाक कसा करत असेल, हे जाणून घेतात. लिखित साहित्याचा शोध घेताना मुलांच्या हाती जुन्या डायऱ्या, पत्रं लागतात. जुनी वर्तमानपत्रंही सापडतात. मुलं वस्तुसंग्रहालयाला भेटी देतात. आपण शोधलेल्या साधनांचं प्रदर्शन भरतं. सहावीत सम्राट अशोकाचा अभ्यास करताना ताई त्यांना 'सम्राट अशोकाची दैनंदिनी' वाचून दाखवतात. मग सम्राट अशोक नाट्याच्या रूपात त्यांना मांडावासा वाटतो. पुस्तकातली कालरेषा शिकता शिकता स्वत:च्या आयुष्याचीही कालरेषा काढून काळाच्या या अफाट विस्तारात आपण कुठे आहोत, याचं किंचित भानही त्यांना येतं.

इतिहास शिकवण्यासाठी, समजून घेण्यासाठी अनेक संदर्भपुस्तकांचा वापर आम्ही करतो. 'गांधी'सारखे चित्रपट दरवर्षी आठवीच्या मुलांना आवर्जून दाखवतो. दरवर्षी वस्तुसंग्रहालयाला, एखाद्या किल्ल्याला भेट ठरलेली. वेळोवेळी गोळा केलेली चित्रं, वर्तमानपत्रातली कात्रणं, बातम्या इत्यादी गोष्टी मदतीला असतातच. मग इतिहास म्हणजे फक्त राज्यकर्त्यांच्या, जेत्यांच्या, नेत्यांच्या कहाण्या असं स्वरूप राहत नाही, तर सर्वसामान्यांच्याही आयुष्यावर परिणाम करणाऱ्या घटनांचा धांडोळा घेणं, परिणाम समजून घेणं, त्यातून आपल्या विचारांची बैठक पक्की करणं, कुठल्याही घटनेबद्दल आपली मतं तयार करताना एकांगी विचार न करणं, हे सगळं म्हणजे इतिहास बनतो. हे सगळं घडण्यासाठी गरज आहे इतिहास या विषयाकडे बघण्याचा आपला 'चष्मा' बदलण्याची!



२१

हिरव्या भविष्यासाठी...

शोभना भिडे

"आपण या सृष्टीचे स्वामी नाही, तर भाग आहोत, ही जाणीव म्हणजेच पर्यावरणशिक्षण! म्हणूनच या विषयाच्या मूल्यमापनात प्रश्नांची उत्तरं तपासण्याऐवजी मुलांचं पर्यावरणाबाबतचं भान आणि जाण वाढली आहे का, हे तपासता येईल. Reduce, reuse, recycle यासारखे उपाय योजतात का? गरज-हौस-चैन यातला फरक मुलं जाणू शकतात का, हे तपासता येईल. काही घटना देऊन त्यांचं विश्लेषण करणं असे प्रयोग करता येतील."

पर्यावरण हा आज सार्वत्रिक चिंतेचा, गांभीर्यानं विचार करण्याचा व वेळीच उपाययोजना करण्याचा विषय बनला आहे. पर्यावरणस्नेही जीवनशैली ही काळाची गरज आहे, असं पर्यावरणतज्ज्ञ सांगतात. या विषयाचं महत्त्व लक्षात घेऊन तो शालेय अभ्यासक्रमाचा घटकविषय बनला आहे. उक्ती आणि कृती यांतलं अंतर मिटवून या विषयातून वृत्तीबदल घडावा, ही यामागील अपेक्षा असते. म्हणूनच याचं मूल्यमापन गुणांमध्ये होत नाही. विचार आदर्शच आहे; पण हे घडावं कसं, हा कळीचा मुद्दा आहे. त्यामुळे 'जमेल तेव्हा, जमेल तसं' अशी धाटणी न ठेवता मिळालेल्या प्रत्येक संधीद्वारे हा विषय मुलांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न आम्ही करतो.

कागदाचा वापर काटकसरीनं करण्याबरोबरच चित्रकलेसाठी झेरॉक्सच्या दुकानातून अथवा विविध कार्यालयांतून पाठकोरे कागद जमा करून वापरतो. वर्तमानपत्राच्या रद्दीतून हस्तकलेच्या लगद्याच्या वस्तू बनवणं, शाळेत गांडूळ खत प्रकल्पासाठी टाकी बांधून ती कार्यान्वित करणं हे काही उपक्रम पर्यावरणाची जाण व भान निर्माण करण्यासाठी राबवले जातात. महाराष्ट्रात पर्यावरणाची हानी मोठ्या प्रमाणात होते ती गणपती उत्सवात. त्याचं कारण असतं प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या

मूर्ती, निर्माल्याचं विसर्जन आणि थर्माकोलची आरास. आमच्या शाळेतली मुलं आणि पालक मात्र यात सामील असणार नाहीत, याची दक्षता घेतली जाते. चौथी ते सहावी अशा तीन इयत्तांना सलग तीन वर्षं शाडूच्या मातीचा गणपती बनवण्यास शिकवणं, हेच गणपती पालकांनी घरी बसवणं, शाळेचा गणपती मुलांसमोर बादलीत विसर्जन करणं, घरचं निर्माल्य गांडूळ खतासाठी वापरणं, रंगपंचमीसाठी नैसर्गिक रंग बनवणं, पक्षी-वृक्षसंवर्धन करणाऱ्या कार्यकर्त्यांना शाळेत बोलावून मुलांशी गप्पा हे सर्व दरवर्षी ठरलेलं. शाळेच्या वर्गखोल्यांची रचना अशी की उजेड आणि हवा भरपूर. लाईट आणि पंख्यांची गरजच पडू नये. संडासही शोषखड्ड्यांचं तंत्र वापरून बनवलेले; पण या सर्व ठरवून केलेल्या गोष्टी. मात्र योग्य संधी, योग्य वेळी उपयोगात आणली, तर एखाद्या विषयाचा मोठा आवाका मुलांसमोर आणता येतो.

असाच एक अनुभव. शहरातल्या एका मोठ्या मैदानावर स्टेशनरीचं प्रदर्शन भरलं होतं. त्या प्रदर्शनात शंभरावर स्टॉल्स होते. ते बघायला प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती. त्या गर्दीतल्या लोकांच्या हातात जाहिरातीची पत्रकं कोंबली जात होती. एवढ्या मोठ्या प्रदर्शनात क्षुधाशांतीच्या व्यवस्थेसाठी खाद्यपदार्थांचे स्टॉल्स उभारण्यात आले होते. एकूणच प्रदर्शनाच्या ठिकाणी कागद, पाण्याच्या रिकाम्या बाटल्या व सरबताचे पेले यांचा खच पडला होता. प्रदर्शन संपलं तरी मैदान भरलेलं होतं. आधी स्टॉल्सनं आणि मग प्रचंड कचऱ्यानं. त्याच दिवशी मुक्ता, सम्राट, हर्षिल, सखी या अस्वस्थ कॉलेजकुमारांचा गट शाळेत आला. प्रदर्शनाच्या मैदानावरचा कचरा आम्ही गोळा करणार आहोत, तर तुमची मुलं मदतीला येतील का, अशी विचारणा केली. मी मुलांसमोर याबाबत प्रस्ताव मांडला आणि मुलं लगेच तयार झाली. दुसऱ्या दिवशी भर दुपारी मुलांची फौज मैदानात होती. दिवसभर काम केल्यावर १६ पोती पाण्याच्या बाटल्या व १२ पोती कागदाची रद्दी जमा झाली. प्लॅस्टिकचं भंगार गोळा करणाऱ्यांना बाटल्या देऊन टाकल्या. रद्दीही रद्दीवाल्याला देता आली असती; पण मुलांच्या सभेत ठरलं, की याचा लगदा बनवू. त्यापासून शोभेच्या वस्तू व कागद बनवू.

या कलेची ओळख मुलांना शाळेत करून दिलेली होतीच. त्याचा मोठ्या प्रमाणातला पहिला प्रयोग शाळेतच खूप उत्साहात यशस्वीपणे पार पडला. लगदा बारीक करण्यासाठी सायकलची चाकं फिरवून तयार होणाऱ्या ऊर्जेवर चालणारा मिक्सर वापरला. अत्यंत माफक तंत्रज्ञान वापरून चांगला कागद तयार झाला. (या कागदावर पर्यावरणरक्षणासंबंधी मजकूर लिहून स्टॉलधारकांना देण्याची महत्त्वाकांक्षी योजनाही होती.) पेपरवेट, फळांची टोपली, तबक अशा वस्तू तयार



झाल्या. आता या लगद्याच्या वस्तूंचं प्रशिक्षण इतर मुलांना द्यावं, अशी इच्छा निर्माण झाली. त्यानुसार आमची मुलं व त्यांचे ताई-दादा यांनी अजून एका शाळेतल्या व बालसुधारगृहातल्या मुलांनाही प्रशिक्षण दिलं. सुधारगृहातला तो प्रशिक्षणाचा दिवस तर आमच्यासाठी अविस्मरणीय होता. सकाळी ११ च्या सुमारास सुधारगृहात पोहोचल्यावर तिथल्या मुलांबरोबर या मुलांचा संवाद प्रस्थापित व्हावा म्हणून थोडे खेळ, गप्पा, परस्परांची ओळख असा कार्यक्रम झाला. त्यानंतर त्यांचे गट करून लगदा बनवणं, मळून तो एकजीव करणं, त्याच्या वस्तू व कागद बनवणं हे शिकवलं. सुधारगृहातल्या मुलांना या मुलांच्या रूपानं बाहेरचं जगच आपल्याला भेटतंय याचा आनंद होत होता, तसंच हातानं काही करून पाहण्याचा उत्साह त्यांच्या डोळ्यांतून ओसंडत होता.

उपक्रमात सहभागी झालेल्या आमच्या मुलांनाही हाती घेतलेली एक कृती पूर्ण केल्याचं समाधान होतं. या सर्व कामात मुलांचे चार दिवस गेले; पण त्यातून त्यांना अप्रत्यक्षरीच्या जे शिकायला मिळालं, ते खूप मोठं होतं. त्यांच्यात पर्यावरणाचं भान आलं. सुधारगृहातल्या वातावरणाची ओळख झाली. समाजानं 'गुन्हेगार' असा शिक्का मारलेल्या मुला-मुलींचं जग त्यांना निरखता आलं. तिथे राहूनही शिकण्यासाठी धडपडणारी मुलं पाहायला मिळाली. या सर्वांबरोबरच लगद्यापासून वस्तू, कागद बनवण्याचं कौशल्य शिकायला, अनुभवायला मिळालं.

संधी आमच्यासोर अचानक उभी राहिली आणि आम्ही तो क्षण सजगपणे साधला. त्या क्षणानंच शाळेबाहेरील जगाशी संवाद साधण्याची संधी दिली.

पर्यावरण हा विषय म्हणून ९ वी, १० वीच्या स्तरावर शिकवला जात असला, तरी ज्या झपाट्यानं पर्यावरणाचा ऱ्हास होतोय तो पाहता लहान इयत्तांमधूनही त्यांच्या वयाला अनुरूप असे पर्यावरणासंबंधीचे मुद्दे त्यांना परिचित

करून देणं गरजेचं आहे. आपल्या आजूबाजूचा निसर्ग किती समृद्ध आहे, याचं भान येण्यासाठी निसर्ग अनुभव आवश्यक आहे. प्रकल्प, क्षेत्रभेटी, चित्रपट अशा माध्यमातूनही संधी घेता येतील. तर आपणही परिसरातल्या कीटकांचं जग, फुलपाखरं, वनस्पती यांचं जग जाणून घेऊ. पाणीपुरवठ्याची ठिकाणं, कचरा डेपो, नदी किनारा इ. ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊ. नॅशनल जिऑग्राफीकवरील माहितीपट, कचरा कोंडी, Story of stuff, Story of bottled water यासारखे माहितीपट मुलांसमवेत बघू. भविष्यकालीन धोके आणि ग्रीन करीअर्सच्या संधी यांचं भान मुलांची पर्यावरणविषयक कृतिशीलता नक्कीच वाढवेल.

मग काही निश्चयही करूया.

- सणसमारंभाला, पूजेला घराघरात फुलापानांची तोरणं लागतात. ती वाळल्यावर आजूबाजूच्या सर्व घरांची तोरणसफाई करू.
- घरातला हिरवा कचरा घरातल्या कुंड्यांमध्ये कुजवून त्याचं खत करू.
- घरातले पाठकोरे कागद उपयोगात आणू.
- विविध प्रदर्शनांतून फिरताना निरुपयोगी हस्तपत्रकं नाकारू.
- प्लॅस्टिकच्या पिशव्या, चॉकलेटच्या चांद्या, खाद्यपदार्थांचे पुडे कचराकुंडीतच टाकू...

उद्याच्या स्वच्छ पर्यावरणासाठी एवढं तरी करूयाच! या सर्व सवयी आपल्या अंगी मुरल्या तरच आपल्या शब्दांना वजन असेल.

ता. क. - 'नेमेचि येतो मग पावसाळा' या उक्तीप्रमाणे या वर्षीही प्रदर्शन भरलं. मी मुलांना म्हटलं, आपण प्रदर्शनातच Say no to handbills अशा पाट्या लावूयात. त्यावर ऋताची प्रतिक्रिया होती, 'पण ताई, कचरा गोळा करायला मजा येते.'

आपण पर्यावरणाचा एक भाग म्हणून जन्माला येतो. शिक्षणाकडे जर केवळ व्यक्तीच्या प्रगतीचं साधन म्हणून पाहिलं, तर पर्यावरण हाही केवळ एक पेपर बनून राहतो, मुलांच्या जीवनात त्याचा जिवंत प्रत्यय येत नाही. पर्यावरण म्हणजे केवळ झाडाझुडपांची वा पशुपक्ष्यांची माहिती जमवणं नव्हे, पर्यावरणाशी ओळख म्हणजे एकात्म जीवनाची जाणीव. खरं म्हणजे या जीवसृष्टीशी मुलांचं नातं असतंच, आपण त्यांना ते नातं विसरायला लावून उपयुक्ततावादी बनवतो! आम्ही ते सृष्टीचं नातं कायम राहील एवढंच पाहतो. ●



सहल स्मशानाची

विनोदिनी पिटके-काळगी

“ अनेक ठिकाणी मुलांना घेऊन जाणाऱ्या आमच्या शाळेनं अजून हा प्रयोग केला नव्हता. मुलांची ही मागणी पूर्ण करायची का, यावर शनिवारच्या ताईंच्या सभेत चर्चा झाली. शाळेच्या प्रयोगांना नेहमीच साथ देणाऱ्या पालकांनी या सहलीला कुठलीच हरकत घेतली नाही. ”

शाळेत प्रत्येक वर्गाच्या काही क्षेत्रभेटी वार्षिक नियोजनातच ठरवलेल्या असतात, तर काही अगदी अचानक ठरतात. अनेक घटनांवर वर्गात चर्चा होतात आणि एखादी चर्चा क्षेत्रभेटीला कारण ठरते. अशीच ही एक गोष्ट. त्या दिवशी सकाळीच आमच्या शाळेतल्या मृण्मयीचे आजोबा गेल्याचा निरोप मिळाला. हसतमुख, उत्साही गृहस्थ. व्यवसायानं डॉक्टर होते. त्यांच्या घरी भेटायला गेले, तेव्हा समजलं की त्यांनी नेत्रदान आणि देहदानही केलं आहे. एवढी सामाजिक जाणीव, बुद्धिप्रामाण्यता मानणारी माणसं विरळाच!

घरातली कामं आटपून शाळेत पोहोचले, तरी तो विषय डोक्यातून जातच नव्हता. शाळेत आठवीवर पहिलाच विज्ञानाचा तास होता. मी मुलांना सकाळचा प्रसंग सांगितला. मुलांनी नेत्रदान हा शब्द ऐकला होता; पण त्यांच्या मनात त्याविषयी अनेक प्रश्न होते. माणूस गेल्यावर किती वेळात डोळा काढावा लागतो, किती वेळात तो दुसऱ्या माणसाला बसवावा लागतो, नेत्रदान करणाऱ्या माणसाला चष्मा असेल तर काय होतं? वगैरे. काही प्रश्नांना मुलांनी परस्पर उत्तरं दिली, तर काहींना मी उत्तरं दिली. एका माणसाचे डोळे दोन अंधांना दृष्टी देऊ शकतात. मरणानंतरही आपण कोणाला तरी उपयोगी पडू शकतो, हे समजल्यावर गार्गी म्हणाली, ''मग सरकार नेत्रदान करण्याचा नियमच का नाही करत? म्हणजे कुणी अंध राहणार नाही.'' मुलं मुळात सामाजिक हिताला जपणारी, विवेकनिष्ठ विचार


करणारीच असतात, याचाच परत प्रत्यय आला.

नेत्रदानाविषयी शंकासमाधान झालं; पण देहदान ही गोष्टच मुलांना माहीत नव्हती. मग स्वाभाविकपणेच चर्चा तिकडे वळली. वैद्यकीय महाविद्यालयात शरीराच्या रचनेचा अभ्यास करण्यासाठी मानवी देहांची गरज असते; पण ते सहज उपलब्ध होत नाहीत, हे डॉक्टर असल्यानं मृण्मयीच्या आजोबांना माहीत होतं म्हणून त्यांनी आपला देह नाशिकच्या वैद्यकीय महाविद्यालयास देण्यात यावा, अशी इच्छा आधीच फॉर्म भरून प्रकट केली होती. घरच्यांनी त्यांच्या इच्छेचा मान ठेवत त्यांचा देह महाविद्यालयाला दिला, असं मी सांगितलं. मग मृण्मयीचे आजोबा किती ग्रेट आहेत, अशी टिप्पणी झाली.

एकूणच मरण या गोष्टीविषयी मुलांना भयंकर कुतूहल असतं; (तसं तर ते मोठ्यांनाही असतं!) पण आपण सहसा मुलांशी या विषयावर बोलत नाही. आम्ही मात्र शाळेत सगळ्या विषयांवर मोकळेपणानं बोलतो आणि वेगवेगळ्या विषयांवर बोलायची संधी शोधत असतो. आज मरणाबद्दल चर्चा रंगली. माणूस गेल्यावर त्याच्या देहाची विल्हेवाट लावण्याच्या वेगवेगळ्या जातींच्या वेगवेगळ्या पद्धती असतात, याची काहीशी कल्पना मुलांना होती. हिंदूंमध्ये मृतदेह जाळतात आणि ख्रिश्चन व मुस्लिमांमध्ये पुरतात, हे घरातल्या मोठ्यांच्या गप्पांमधून, सिनेमा व मालिकांमधून मुलांना माहीत झालं होतं; पण फिल्मी स्मशानापलीकडे गावातलं खरं स्मशान कुणीच पाहिलेलं नव्हतं. सगळ्यांना ते पाहायची अनावर उत्सुकता होती. नाशकातल्या स्मशानात विद्युतदाहिनी असल्याचं आपण रेडिओवर ऐकल्याचं वीणानं सांगितलं. मग विद्युतदाहिनी म्हणजे काय, असा प्रश्न आलाच. यातलं काहीच मीही पाहिलेलं नव्हतं. त्यामुळे मी पण ऐकीव माहितीच सांगितली. त्यावर आपण स्मशान पाहायलाच जाऊ, अशी सूचना कुणीतरी केली. विशेषत: मुली तर मागेच लागल्या, ''ताई, आपण जाऊच स्मशान पाहायला.''

अनेक ठिकाणी मुलांना घेऊन जाणाऱ्या आमच्या शाळेनं अजून हा प्रयोग केला नव्हता. मुलांची ही मागणी पूर्ण करायची का, यावर शनिवारच्या ताईंच्या सभेत चर्चा झाली. स्मशान दाखवायला हे वय योग्य आहे का, हे समजत नव्हतं; पण तोत्तोचानच्या शाळेतली स्मशानसहल आठवली. लीलाताईंनी लिहिलेला सृजनआनंद शाळेतल्या स्मशानसहलीचा प्रसंग आठवला आणि आपणही न्यायला काही हरकत नाही, असं वाटलं. शाळेतल्या अरुणदादांच्या पुढाकारानं स्मशानसहल ठरली!

शाळेच्या प्रयोगांना नेहमीच साथ देणाऱ्या पालकांनी या सहलीला कुठलीच



गौरी, तेजस्विनी, पलकेश, मल्हार इ. सातवी

हरकत घेतली नाही. गाडीत बसल्यापासून आत्मा, भूत या विषयावर घनघोर चर्चा सुरू झाली. स्मशानाच्या आसपास कुणी राहतात का, त्यांना भीती वाटत नसेल का, आपण जाऊ तेव्हा प्रेत बघायला मिळेल का, असे अनेक प्रश्न मुलांच्या डोक्यात होते आणि पोटात भीतीचा गोळा होता!

नदीच्या दोन्ही तीरावर स्मशान का? या प्रश्नाचं उत्तर देत दादांनी, पंचवटीतलं स्मशान जास्त प्रशस्त असल्यानं तिथे आधी जाऊ, असं सांगितलं. हे स्मशान एकदमच छान होतं. मोठं प्रवेशद्वार, चिता रचायच्या सात-आठ लोखंडी कठड्याच्या जागा, पुढे ऐसपैस पायऱ्या आणि सुरुवातीला लाकडाची वखार. या वखारीत लाकडं फोडण्याचं काम करणारं कुटुंब तिथेच राहत होतं. एकूण एखाद्या रम्य स्थळासारखंच वातावरण होतं! चितेवर एक प्रेत जळत होतं ते मुलांनी उत्सुकतेनं पाहिलं. हिंदूंमध्येही काही जातीत पुरतात, असं सांगत दादांनी त्यांची

पुरण्याची जागा दाखवली. ही माहिती मुलांना नवीन होती. दोन्ही तीरावरल्या स्मशानातल्या पायऱ्यांवर बरीच मुलं अभ्यास करत बसलेली पाहून तर मुलांची भीती पळालीच. इथे शांतता असल्यानं अभ्यास चांगला होतो, असं त्या मुलांनी सांगितलं! डिझेलवर चालणारी विद्युतदाहिनी बंद असल्यानं पाहता आली नाही; पण माहिती समजली.

येताना ऋता म्हणाली, ''मला वाटलं, की अंधारी जागा असेल; पण तो परिसर शांत, स्वच्छ होता.'' अक्षयला तिथे भिण्यासारखं काहीच वाटलं नाही. सर्वच मुलं यावर उत्साहानं गप्पा मारत होती. एकूण इतर क्षेत्रभेटींहून परतलो तितक्याच सहजतेनं आम्ही परत आलो. शाळेत आल्यावरही मुलं इतर मुलांना वर्णन करत होती. आम्हाला तिथे थोडी भीती वाटली असं गौरी आणि साक्षीनं कबूल केलं. मुलांनी त्यावर लेखन केलं, चित्रं काढली. पुढचे चार दिवस शाळेत तोच विषय होता. स्मशान या शब्दाबरोबर असलेल्या अनेक धूसर, गूढ प्रतिमा पुसल्या गेल्या व स्मशान हे गावातल्या अनेक स्थळांसारखंच एक ठिकाण आहे, असं मुलांना पटलं. त्यामुळे दरवर्षीच आठवीच्या मुलांची ही क्षेत्रभेट नक्की झाली.

कुठलाही विषय आपण मुलांशी बोलायचा टाळला, तरी आजूबाजूच्या घटनांतून, वर्तमानपत्रांतून, पडद्यावरून तो मुलांपर्यंत पोचत असतो. मुलांची उत्सुकता ताणून गैरसमज, भीती निर्माण होण्यापेक्षा मोकळेपणानं बोललेलंच बरं असतं. मात्र काही विषय असे असतात, की कसं आणि किती सांगावं हे आपल्याला समजत नाही. अशा वेळी एखाद्या मित्र-मैत्रिणीची मदत घेता येते. एकट्या मुलाशी बोलण्याऐवजी ५-६ मुलांचा गट करून बोलणं सोयीचं ठरतं. अनेक गोष्टींची उत्सुकता, त्याबाबत पडणारे प्रश्न, त्यांची उत्तरं शोधण्याची धडपड याच तर शिक्षणाच्या पायऱ्या आहेत. म्हणूनच मार्ग शोधायचे; पण मुलांचे प्रश्न थांबवायचे नाहीत, हे ठरवणं महत्त्वाचं.

●



२३

चित्राच्या पलीकडे

दीपा पळशीकर

“ लहान गटापासून मोठ्या गटांपर्यंत वापरता येईल असं चित्रवाचन हे एक साधन आहे. चित्रवाचनातून मुलांची निरीक्षणक्षमता वाढते, ढोबळ गोष्टींपासून बारकाव्यांपर्यंत अनेक गोष्टी मुलं पाहतात, त्यांचा एकमेकांशी संबंध जोडतात, स्वतःच्या अनुभवाशी ताडून बघतात. आठवणं, कल्पना करणं, शब्दसंग्रह वाढवणं, शब्दांचा अचूक वापर करणं, स्मरणशक्तीला चालना देणं, आस्वादक्षमता विकसित करणं अशा अनेक गोष्टी यातून साध्य करता येतात. ”

टीव्ही, कॉम्प्युटरच्या विळख्यातली मुलं संवेदनक्षमता हरवून बसली आहेत, अशी तक्रार आपण करतो. आपण त्यांना सुरक्षित कप्प्यात बंद करून ठेवतो आणि त्यांनी संवेदनक्षम असलं पाहिजे, असंही म्हणतो. अर्थात, संवेदनक्षम असण्यासाठी प्रत्येक अनुभव स्वतःच घेतलेला असणं गरजेचं नाही; पण आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना, वर्तमानपत्रांतल्या बातम्या, छायाचित्रं, इतरांचे अनुभव आपल्याला काहीतरी सतत सांगत असतात. त्यांच्याकडे उघड्या डोळ्यांनी सहजतेनं बघण्याची दृष्टी मात्र पालक म्हणून, किंवा शिक्षक म्हणूनही आपणच मुलांना द्यावी लागते. त्यामुळे त्यासाठी मुळात आपण आधी संवेदनशील असणं गरजेचं आहे.

मूल भाषा शिकतं, तेव्हा ते सतत भाषा वापरण्यासाठी उत्सुक असतं; पण पुढे लिखाणाची वेळ येते तेव्हा मात्र मुलं कंटाळा करू लागतात. त्यात निबंधाचे साचेबंद विषयही त्यांना वैताग आणतात. म्हणून 'आनंदनिकेतन'मध्ये आम्ही त्यापलीकडे जायचा प्रयत्न करतो. प्रस्तुत लेख हा अशाच एका चित्रवर्णनाच्या तासाला आलेल्या अनुभवावर आधारलेला आहे.

'परिवर्तनाचा वाटसरू' या पाक्षिकाच्या मुखपृष्ठावरील चित्र मी मुलांसमोर

ठेवलं. त्यात एक मध्यमवयीन कष्टकरी माणूस महानगरात आपल्या जीवनाची संघर्षमय वाटचाल करताना दिसतो. सोबत त्याची छोटी मुलगीही आहे. हे चित्र आठवीच्या मुलांसमोर ठेवलं. तेव्हा मुलं काय टिपतात, याविषयी उत्सुकता होती. 'आनंदनिकेतन'चा 'समान शिक्षण' (Common School) या संकल्पनेवर विश्वास असल्यामुळे आमच्या प्रत्येक वर्गात सर्व उत्पन्न गटांमधली मुलं समाविष्ट असतात. हे चित्र विविध समाजगटांतून आलेल्या मुलांना कशा प्रकारे आवाहन करतं, हे पाहण्याचं कुतूहल होतं.

मुलांनी चित्र पाहिलं आणि सर्व जण लिखाणात बुडून गेले. त्यांचे लिखाणाचे कागद घेऊन मी शिक्षकांच्या दालनात गेले आणि वाचताना मलाही भरून आलं. आमच्या दालनात सर्वच शिक्षिका आपापले अनुभव एकमेकींना सांगतात. त्यानुसार हे कागद मी टेबलावर ठेवल्यावर सर्वांनीच ते आवर्जून वाचले आणि त्याही माझ्या इतक्याच आनंदित झाल्या.

हे चित्र कुठल्या गावातलं आहे, ते काही त्यावर लिहिलेलं नव्हतं; पण यशनं चित्रातला तपशील अचूक वाचत लिहिलं होतं - 'मुंबई म्हटलं, की डोळ्यांसमोर येते ती श्रीमंतांची मुंबई; पण त्याच मुंबईत दुसरीकडे आहेत ते श्रमजीवी बहुजन लोक! आपल्या जिवावर उदार होऊन पैसा मिळवण्यासाठी धडपडणारे डोंबारीही या मुंबईत आहेत. त्यातलाच एक हा असावा. आपल्या शाळेत जाण्यायोग्य वयातल्या लहान मुलीला शाळेत न टाकता तो खेळ करायला बरोबर घेऊन निघाला आहे. त्याच्या खांद्यावर असलेल्या कावडीतल्या एका पारड्यात ही मुलगी बसलेली आहे. तिचं नाक वाहतंय. तिनं घातलेला फ्रॉक तिच्या अंगापेक्षा मोठा आहे.'



यशला मुंबईत विरोधाभास जाणवला होता. शाळेत जाण्यायोग्य वयातल्या मुलीचं शाळेत जाऊ न शकणं त्यानं टिपलं होतं. मुलीचा फ्रॉक तिच्या मापाचा नाही, म्हणजे नक्कीच तो तिचा नसणार, हेही त्याला जाणवलं. आपल्या मुलीच्या पोटात चार घास पडावेत, म्हणून बापाची चाललेली वणवण, गर्दीतून वाट काढणं या गोष्टीही त्याला काही सांगत होत्या.

वीणा म्हणते, 'कुठेतरी पर्यटनाच्या ठिकाणी जाऊन ढोलकं वाजवून हा माणूस पैसा मिळवत असेल आणि ती चिमुरडी त्याला साथ देत असेल.' या छोट्या मुलीवर अकाली पडलेली जबाबदारी आणि त्याची दाहकता वीणाच्या मनाला स्पर्श करून गेली होती.

अमितला हे चित्र पाहून, आपल्या आंधळ्या आई-वडलांना कावडीतून घेऊन जाणारा श्रावणबाळ आठवला. त्यानं लिहिलं होतं, 'या चित्रात वडिलांचं मुलीवर किती प्रेम आहे, ते समजतं. हे चित्र मुंबई शहरातलं असावं. राहायला जागा नाही म्हणून त्यांना असं जगावं लागतंय, ते भर रस्त्यावरून वाट काढत चालले आहेत.'

चित्रातले बारकावे अचूक टिपत अक्षयनं नोंदवलं होतं - 'चित्रातला माणूस काळा आहे. कारण त्याला उन्हात काम करावं लागतं. त्याचा डोंबाऱ्याचा खेळ चालू राहावा, त्याला पैसे मिळावेत व त्याचं स्वत:चं घर व्हावं, असं मला वाटतं.' स्वत: निम्न आर्थिक स्तरातल्या घरातून आलेल्या अक्षयला आपल्या आई-वडलांचे कष्ट यात दिसत असावेत.

गार्गीनं लिहिलं होतं, की 'कामानिमित्त हे कुटुंब दुसऱ्या गावी जात असेल व ही मुलगी मागे वळून आपल्या आधीच्या घराकडे बघत असेल, असं वाटतं. मुलीच्या भविष्यासाठी बापानं निग्रहानं आपल्या आधीच्या मुक्कामाकडे पाठ फिरवली (गार्गीचे वडील नोकरीनिमित्त परदेशी राहतात); पण मुलीला मात्र आधीच्या घराशी असलेलं नातं तोडणं कठीण जातं.'

खरंतर सर्वांचीच निरीक्षणं सूक्ष्म, नेमकी आणि चित्राच्या पलीकडे जाऊ पाहणारी आणि आपल्या अनुभवविश्वाशी चित्रातला अनुभव ताडून पाहणारी. त्यातल्याच या काही नोंदी!

या सगळ्या लेखनाची भाषा साधी, सरळ आणि म्हणूनच मनाला भिडणारी आहे. अलंकारिक, शब्दबंबाळ लेखनापेक्षा मुलांना नेमका आशय मांडणं आवडतं. चित्रातलं कारुण्य त्यांच्या मनाला भिडतं व दाहक वास्तवाला ती संवेदनक्षम मनानं सामोरी जातात.

चित्राच्या पलीकडे ही मुलं कशी पोचली, हे आपण बघूया.

मुलांच्या क्षमतांचा, बुद्धीचा व विचारशक्तीचा विविध अंगांनी विकास

करणं, कल्पनाशक्तीला वाव देणं या गोष्टी साधण्यासाठी क्रमिक पुस्तकं सोडून अन्य साधनांकडे वळणं अपरिहार्य आहे, ही बाब आता सर्वमान्य आहे. लहान गटापासून मोठ्या गटांपर्यंत वापरता येईल असं चित्रवाचन हे एक साधन आहे. चित्रवाचनातून मुलांची निरीक्षणक्षमता वाढते, ढोबळ गोष्टींपासून बारकाव्यांपर्यंत अनेक गोष्टी मुलं पाहतात, त्यांचा एकमेकांशी संबंध जोडतात, स्वतःच्या अनुभवाशी ताडून बघतात. आठवणं, कल्पना करणं, शब्दसंग्रह वाढवणं, शब्दांचा अचूक वापर करणं, स्मरणशक्तीला चालना देणं, आस्वादक्षमता विकसित करणं अशा अनेक गोष्टी यातून साध्य करता येतात. आपल्या चित्रवाचन या संचाच्या प्रस्तावनेत माधुरी पुरंदरे म्हणतात त्याप्रमाणे, 'नजरेला, बुद्धीला, विचारांना आणि कल्पनाशक्तीला दिलेला हा एक प्रकारचा व्यायाम आहे.'

'आनंदनिकेतन'मध्ये हे साधन कसं वापरलं जातं?-

बालवाडीतली मुलं चित्रं पाहतात. त्यावेळी मुलं एकमेकांशी बोलतात, गप्पा मारतात, त्यांच्या गप्पांतून चित्रविषय मुलांनी ओळखला आहे की नाही, हे लक्षात येतं. दहा-पंधरा मुलांच्या गटात ही चित्रं बघून झाली की ताई त्यांच्याशी या चित्रांबद्दल गप्पा मारतात. चित्र आवडलं का, काय आवडलं, कशाचं आहे, चित्रात काय काय दिसलं, कोण काय करतं आहे, चित्रातली एखादी वस्तू/व्यक्ती/प्राणी इ. कसा आहे, केवढा आहे, किती आहेत, रंग कसा आहे, कुठे आहे, (शेजारी, पाठीमागे, पुढे, पलीकडे... इ.) किंवा चित्रातली मुलगी कशी हसते आहे, भोवरा कसा फिरतो आहे (गरागरा...) अशा सर्व मुद्द्यांवर गप्पा होतात. बोलताना मुलांनी जास्तीत जास्त शब्दांचा वापर करावा, त्यात वस्तू, ठिकाणं, रंग इत्यादींची नावं येतील, वर्णनं येतील, क्रियांबद्दल मुलं बोलतील याकडे आवर्जून लक्ष दिलं जातं. 'तू रेल्वे स्टेशनवर कधी गेली आहेस का?' 'तू पाहिलेलं दृश्य आणि चित्रातलं दृश्य यात काय सारखं, काय वेगळं?' 'आगगाडीत बसून तू कुठे गेली होतीस, काय पाहिलंस?' अशा प्रश्नांमधून मुलांना त्यांचे अनुभव सांगण्यास उद्युक्त केलं जातं. तेच चित्र पुन्हा पुन्हा बघून, मुलांचा अंदाज घेऊन, थोड्या वरच्या गटात मुलांच्या कल्पनेला चालना देणारे प्रश्न ताई विचारतात. उदा. ही आगगाडी कुठून आली असेल? कुठे चालली? चित्रातल्या या मुलीच्या मनात कोणते विचार असतील? आता किती वाजले असतील? इत्यादी. पहिली-दुसरीतल्या मुलांना विशिष्ट निकष देऊन निरीक्षण करायला ताई सांगतात. चित्रात कोणते व्यावसायिक दिसतात, कोणकोणत्या प्रकारची वाहनं आहेत इत्यादी. कधीकधी चित्रं बाजूला ठेवून काही गोष्टी आठवून लिहिण्यास सांगितलं जातं, किंवा छोटी छोटी वाक्यं तयार करून मुलं लिहितात. तिसरी-

चौथीची मुले चित्रातल्या व्यक्तींमधले संवाद कल्पना करून सादर करतात. किंवा (रेल्वे स्टेशन) सार्वजनिक ठिकाणी काय करावं, करू नये, यांसारख्या विषयांवर चर्चा होते. आणखी थोड्या मोठ्या वयोगटाला हे चित्र बघून तुझ्या मनात कुठले शब्द उमटतात ते लिही, किंवा प्रत्यक्षातलं हे ठिकाण चित्रातल्यासारखं दिसावं म्हणून काय करता येईल, वेळेची मर्यादा देऊन चित्राशी संबंधित जास्तीत जास्त शब्द आठवून लिहिणं असे अनेक खेळ ताई घेतात. चित्रातली एखादी व्यक्ती किंवा प्रसंग निवडून त्याभोवती छोटा मजकूर किंवा कथा लिहायला सांगतात. त्यापूर्वी त्यावर थोडी चर्चाही घेतली जाते- 'पूर्वी हा मुलगा काय करत असेल, इथून कुठे जाईल, गाडीत चढताना त्या मुलाची चप्पल पडली, आता पुढे काय होईल, किंवा एकाच जागेचं आरक्षण चुकून दोघांना मिळालं, आता पुढे काय काय होईल, संवाद लिही.' अशा अनेक प्रकारांनी चित्रवाचनाचा उपयोग केला जातो.

चित्रवाचनासाठी लागणारं एकमेव साहित्य म्हणजे चित्र! आपल्या आजूबाजूला आपण असंख्य चित्रं रोज पाहत असतो- वर्तमानपत्रं, नियतकालिकांची मुखपृष्ठं, जाहिराती इत्यादी. माधुरी पुरंदरे यांचा चित्रवाचनाचा संचही आता उपलब्ध आहे, ज्यात सर्व वयोगटांतल्या मुलांचा विचार करून खास चित्रवाचनासाठी चित्रं काढलेली आहेत. या चित्रांबरोबर ही चित्रं कोणत्या वयोगटाच्या मुलांसाठी कशी वापरावीत, याची मार्गदर्शक पुस्तिकाही आहे. त्याचप्रमाणे सृजनआनंद, कोल्हापूरच्या लीलाताई पाटील यांच्या शिक्षणविषयक पुस्तकांमधूनही चित्रवाचनाचे अनेक संदर्भ आपल्याला मिळतात. आठवीपर्यंतच्या सर्व भाषांच्या पाठ्यपुस्तकांमध्येही चित्रवाचनाला स्थान दिलेलं आहे.

पूर्वी एकच शुद्धोधन आपल्या मुलाला दुःखाचा वाराही लागू नये, अशी व्यवस्था करत होता. आता घराघरांत आपण सर्व पालक शुद्धोधन होत आहोत आणि पुढे मुलांनी मात्र श्रावणबाळ व्हावं, अशी अपेक्षा करत आहेत. समाजात बधिरीकरणाची प्रक्रिया इतकी जोरात सुरू आहे, की आसपासच्या परिस्थितीविषयी उदासीन राहणं, हाच सर्वांचा स्वभाव बनला आहे. अशा परिस्थितीत पालक म्हणून आपले, किंवा थोडक्या प्रयोगशील शाळांमधल्या शिक्षकांनी केलेले प्रयत्न कुठवर पुरे पडणार, असं म्हणायला जागा आहे; पण आपली पणती पेटवून बघायला काय हरकत आहे? आणि यासाठी वेगळं काही करायचं नाहीय, फक्त आपलं आणि मुलांचं मन जागं ठेवायचं आहे.



२४

'जागो, ग्राहक जागो'

माधुरी कुलकर्णी

"पुढचं टेबल फारच महत्त्वाचं होतं. तिथे आपण खरेदी केलेल्या वस्तूंचं स्वत:ची गरज, हौस, चैन या प्रकारांत वर्गीकरण करायचं व सातवीच्या मुलांनी ते चूक/बरोबर ठरवून ग्राहकाला पटवून द्यायचं. ग्राहक मुलं आधी बहुतेक वस्तू गरजेच्या जागीच ठेवत होती. हौसेच्या वस्तू गरजेच्या ठरवण्यासाठी बऱ्याच जणांनी युक्तिवाद केला; पण सातवीची मुलं हिरिरीनं आपला मुद्दा पटवून देत होती."

एका वर्गातल्या मुलांनी प्रदर्शन भरवायचं आणि इतर वर्गातल्या मुलांना ते बघायला बोलवायचं हे तर शाळेत नेहमीच होतं. कधी विविध प्रकारचे दगड, तर कधी दिव्यांचे प्रकार, तर कधी निरनिराळी फुलं; पण आज सातवीच्या मुलांनी दुकानं थाटली होती आणि पाचवी-सहावीच्या मुलांना चक्क खरेदी करायला बोलावलं. त्यामुळे हा काय प्रकार आहे, याबाबत सर्व मुलांमध्ये खूपच उत्सुकता होती.

पहिल्या वर्गात स्टेशनरी, खेळणी व जनरल स्टोअर्स अशी दुकानं होती. दुसऱ्या वर्गात हिशेबाचं टेबल होतं. आत जातानाच प्रत्येकाला एकेक कागदी पिशवी व दोनशे रुपयांच्या खोट्या नोटा देण्यात आल्या. त्यापेक्षा जास्त रुपयांची खरेदी करण्याची इच्छा असेल, तर तीनशे रुपयांचं क्रेडिट कार्डसुद्धा उपलब्ध होतं. प्रत्येकाला मनाप्रमाणे खरेदी करण्याची मुभा होती.

या उपक्रमाची पूर्वतयारी आठ दिवसांपासून सुरू होती. असा उपक्रम करायचं ठरल्यावर मुलांच्या अंगात प्रचंड उत्साह संचारला. लगेच त्यांनी दुकानात ठेवायच्या वस्तूंची भलीमोठी यादी सुरू केली. त्या यादीला कुठेतरी आवर घालायलाच हवा होता. मग तुमच्या वयाची मुलं आवडीनं खरेदी करतील अशाच प्रकारच्या वस्तू आणि त्यांची दुकानं निश्चित करा, असं सांगितल्यावर स्टेशनरी, खेळणी व जनरल स्टोअर्स यांवर शिक्कामोर्तब झालं. खरेदी करणाऱ्यांनी वस्तू घरी न्यायच्या नव्हत्याच. त्यामुळे दुकानात ठेवण्यासाठी घरातल्याच वस्तू आणायच्या होत्या. शिवाय पेस्ट, क्रीम इत्यादींची रिकामी खोकी, कोल्ड्रिंक्सच्या रिकाम्या बाटल्या असं पण चालणार होतं. प्रत्येकाला तो आणणार असलेल्या वस्तूचं नाव, तसंच त्या वस्तूची खरेदी व विक्री किंमत लिहून आणायला सांगितली. मुलांनी भरपूर वस्तू आणल्या. मग किमतीबाबत वर्गात चर्चा केली.

वैष्णवीनं साबणाची वडी १२ रुपयांना घेतली होती. त्यामुळे तिनं खरेदी १२ रुपये व विक्री १५ रुपये असं लिहिलं. मग तिला सांगितलं, की वस्तूवर जी 'एमआरपी' लिहिलेली असते, त्यापेक्षा जास्त किमतीला कोणी विकत घेणार नाही. दुकानदार जेव्हा या वस्तू खरेदी करतो, तेव्हा त्याला उत्पादकाकडून, किंवा होलसेलरकडून वस्तू कमी किमतीला मिळतात. ती सूट म्हणजेच दुकानदाराचा फायदा असतो. ''तरीच आमच्या शेजारचे दुकानदारकाका आम्हाला एक-दोन रुपयांनी वस्तू स्वस्त देतात. मला वाटायचं की त्यांना कसं परवडतं.'' ऋचा म्हणाली. फैजनं एका वस्तूची विक्री किंमत रुपये १०० व खरेदी किंमत रुपये ६० ठेवली होती. त्यावर मुलं म्हणाली, ''अबब! एवढा नफा.'' तेव्हा त्यांना नफा म्हणजे नुसतंच विक्री किंमत वजा खरेदी किंमत नसते, तर खरेदी किमतीमध्ये इतर खर्चही मिळवावे लागतात, हे समजावलं. तर यावर इतर खर्च कोणते ही चर्चा झाली. त्यात दुकानाचं भाडं, वीजबिल, दुकानात काम करणाऱ्यांचे पगार, वाहतूकखर्च, जकात, कर इत्यादी अनेक गोष्टींचा उलगडा झाला. या चर्चेमुळे मुलांच्या मनातले किमतीबद्दलचे अनेक संभ्रम दूर झाले. एकाच्या दृष्टीनं विक्री किंमत ती दुसऱ्याच्या दृष्टीनं खरेदी किंमत कशी असते, मधली साखळी जेवढी मोठी तशी किंमत वाढत जाते, उत्पादक - होलसेल विक्रेता - किरकोळ विक्रेता इ. गोष्टी समजल्या. मगच दुकानांची उभारणी झाली. खेळण्यांच्या दुकानात रिमोटवर चालणाऱ्या गाड्या, जिगसॉपासून उडीच्या दोऱ्या, भोवऱ्यापर्यंत भरपूर खेळ होते. स्टेशनरी मार्ट सजावटीची पाकिटं, गोष्टींची पुस्तकं, व्यवसायमाला, रंगाचं सामान इ. गोष्टींनी सजलं, तर जनरल स्टोअर्समध्ये कोल्ड्रिंक, सरबतं, चॉकलेट्स, साबण, शाम्पू, क्रीम अशा वस्तूंनी गर्दी केली होती.

खरेदी करणारी मुलं आपल्या स्वभावाला मिळतीजुळती अशीच खरेदी करत होती. महेशनं खाण्याचे पदार्थ जास्त खरेदी केले. साक्षीची बाहुल्यांची आवड समजली. काही मुलं फुकट मिळणार म्हणून भरपूर खरेदी करत होती, तर काहींच्या मनात याचे नंतर पैसे मागतील का, अशी शंका असावी. कारण त्यांनी दोन-तीन वस्तूच खरेदी केल्या. काही जण आपल्याजवळच्या पैशांचा विचार न करता आवडली वस्तू की टाक पिशवीत, असं करत होते.

जागो ग्राहक जागो

स्वस्तात स्वस्त, खेळणी मस्त

महाग, परदेशी खेळण्यांऐवजी 'आपली' खेळणी घ्या

गोट्या, भोवरा, लगोऱ्या, दोरीच्या उड्या असे खेळ खेळा

आनंदावर आरोग्य FREE

What will you choose?

Cold drink or coconut water?

Cold drinks are artificial

Coconut water is fresh and natural

या प्रलोभनांना भूलणार का?

★ Buy two get one free

★ साबणामध्ये सोन्याचे नाणे

★ Buy 2 pizzas now in ~~Rs 300~~ Rs 199

✗	✓	✗	✓
चॉकलेटस्	खजूर	रसना सरबते	कोकम, आवळा, लिंबू सरबत
जेली चॉकलेटस्	आवळा कँडी	कुरकुरे, लेज्	राजगिरा लाडू
मॅगी	शेवया	शांपू	शिकेकाई

खरेदी करून दुसऱ्या वर्गात गेल्यावर दोन जण त्याचा हिशेब करून किती रुपयांची खरेदी झाली, दिलेल्या पैशात भागवलं का वगैरे सांगत होती. पुढचं टेबल फारच महत्त्वाचं होतं. तिथे आपण खरेदी केलेल्या वस्तूंचं स्वत:ची गरज, हौस, चैन या प्रकारांत वर्गीकरण करायचं व सातवीच्या मुलांनी ते चूक/बरोबर ठरवून ग्राहकाला पटवून द्यायचं. ग्राहक मुलं आधी बहुतेक वस्तू गरजेच्या जागीच ठेवत होती. हौसेच्या वस्तू गरजेच्या ठरवण्यासाठी बऱ्याच जणांनी युक्तिवाद केला; पण सातवीची मुलं हिरिरीनं आपला मुद्दा पटवून देत होती. मुलांचं संवादकौशल्य पणाला लागत होतं. कोल्ड्रिंक्स तुला हौसेची खरेदी वाटते; पण ती हौस नसून, चैन आहे. तू जाहिरातीला भुलून ते घेतो आहेस, शिवाय ती पेयं आरोग्याला अपायकारक आहेत, अशी मांडणी चालू होती. एकावर एक फ्री म्हणून अनावश्यक गोष्टी घेणार का वगैरे सांगून पटलं, तर वस्तूची जागा बदलतही होती. खाण्याचे पदार्थ घेताना मुदतीची तारीख बघितली का, हे पण विचारलं गेलं. ज्यांची गरजेच्या वस्तूंची खरेदी इतर प्रकारांपेक्षा जास्त होती, त्यांचं अभिनंदन केलं गेलं, तर ज्यांची चैनीच्या गोष्टींची खरेदी जास्त होती, त्यांना उपदेशाचे डोस मिळाले. तुम्ही खरेदी केलेली कोणतीच गोष्ट गरजेची कशी नाही, हे पटवून देण्याच्या अति उत्साहापायी बऱ्याच गमतीजमती घडत होत्या. साबणाशिवाय तू राहू शकत नाहीस का? त्याऐवजी डाळीचं पीठ, हळद, साय वापर असा सल्ला एकाला दिला गेला. कोल्ड्रिंक्सऐवजी लिंबू सरबत घ्या, असं सांगणं योग्य होतं; पण सौमित्रनं लिंबू सरबत गरजेच्या भागात ठेवलं, तर त्याला जीवननं, विकतचं सरबत कशाला घेतोस, लिंबू आणून ते घरीही बनवू शकतोस, असा सल्ला दिला. (सौमित्रनं लिंबं घेतली असती, तर जीवन म्हणाला असता- लिंबू विकत कशाला घेतलंस? त्यापेक्षा लिंबाचं झाड लाव- असा मजेशीर विचार माझ्या मनात आला.) एक सुंदर टेडी उमानं गरजेच्या भागात ठेवला. ताबडतोब एक उत्साही कार्यकर्ता म्हणाला, ''टेडी ही काय गरजेची गोष्ट आहे? ती तर चैनीची, फारतर हौसेची गोष्ट होईल.'' पण उमा ठामपणे म्हणाली, ''नाही. मला ती गरजेचीच गोष्ट वाटते. कारण नुकतंच आम्ही नवीन घर घेतलं आहे व ते सजवण्यासाठी मला हा टेडी हवाच आहे.'' सातवीची मुलं काही जणांना पटवण्यात यशस्वी झाली, तर काही ग्राहकांनी आपलं म्हणणं पटवून दिलं. दुकानातून बाहेर पडताना सगळ्या वस्तू परत कराव्या लागल्यानं काही जणांच्या चेहऱ्यावर नाराजी स्पष्ट दिसत होती.

या सुंदर प्रयोगाची मूळ कल्पना 'अभिव्यक्ती' या संस्थेची होती व ती त्यांनी 'जीवन उत्सव' या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून मांडली होती. त्या कार्यक्रमाला मी सातवीच्या मुलांना घेऊन गेले होते. त्यांना ही कल्पना फारच आवडली. आपण

५ वी, ६ वीलाही आणायला हवं होतं, अशी त्यांना रुखरुख लागली होती. त्यातून शाळेतल्या प्रयोगाची कल्पना साकारली. 'अभिव्यक्ती'नं याला 'इडियट बझार' असं नाव दिलं होतं; पण सातवीच्या मुलांनी त्याला 'सेव्हन स्टार' असं नाव ठरवलं. त्यांनी आळीपाळीनं विक्री, हिशेब, प्रबोधन हे विभाग सांभाळले. प्रबोधनाचा किल्ला फैज व अक्षयनं लढवला. ऋतुजा व जीवननं त्यांना चांगली साथ दिली. नंतर 'अभिव्यक्ती' व 'जीवन उत्सव' या दोन्ही ठिकाणी मुलांनी आभारदर्शक पत्रं पाठवली.

आभारप्रदर्शन झालं. आता या माहितीचा उपयोग करून नफा-तोटा काढणं, खरेदीची तीन गटांत वर्गवारी करून त्याचं शेकडा प्रमाण काढणं, त्यावरून जोडस्तंभालेख काढणं असं काम होतं; पण हे सर्व मुलांनी आनंदानं व आवडीनं केलं. कारण आता या संख्या त्यांच्या स्वतःच्या होत्या. हे सर्व त्यांनी अनुभवलं होतं.

या उपक्रमातून नकळत कितीतरी गोष्टी मुलं शिकली, तसंच त्यांच्यातल्या अनेक जाणिवांची-संवेदनांची आम्हाला ओळख झाली. सहकार्यानं व जबाबदारीनं कामं करणं, खरेदी करताना अंथरूण पाहून पाय पसरणं, अनावश्यक व आरोग्याला अपायकारक वस्तू घेणं टाळणं इत्यादी मूल्यं मुलांत रुजली. आपण घेतलेला सुंदर अनुभव इतरांना मिळावा, ही त्यांची जाणीव आणि त्यासाठी त्यांनी घेतलेली मेहनत, शिवाय ज्याचं श्रेय त्याला देण्यासाठी पाठवलेली आभारपत्रं या सगळ्याचंच मला कौतुक वाटलं.

आज प्रथमच मुलांना आपण खरेदी केलेल्या वस्तूंचे असे प्रकार असतात हे समजलं होतं. आपण गरजेपेक्षा किती जास्त वस्तू घेतो, अशी चर्चाही सुरू झाली. मुलांनी घरी गेल्यावरही गरज आणि चैनीच्या वस्तूंची यादी करायला सुरुवात केली. यानिमित्तानं आपणही क्षणभर थांबून स्वतःत डोकावून बघूया. आपण चैनीच्या वस्तूंनाच गरज मानायला लागलोय की काय? हा बदल कधी झाला समजलंच नाही, असंही वाटू शकेल. यातून आपण मुलांपर्यंत काय पोहोचवतोय?

एकदा नाशिकमध्ये सुधा मूर्तींना मुलाखतीत विचारलं होतं, की तुम्हाला आयुष्यात सर्वांत अवघड वाटलेली गोष्ट कोणती? तेव्हा त्या म्हणाल्या होत्या, की घरात भरपूर पैसा असून मुलांना चैनीची सवय न लागू देणं.

तुम्हाला काय वाटतं?

●



'बसेरा-ए-तबस्सुम'

अरुण ठाकूर

“ एक मराठी मुलगा पुण्याहून उठून सरळ काश्मीरला जातो आणि तिथे अतिरेक्यांच्या हल्ल्यात बळी पडलेल्या नागरिकांच्या वा पोलिसांकडून मारल्या गेलेल्या अतिरेक्यांच्या मुलींसाठी वसतिगृह चालवतो, ही गोष्ट मुलांचं औत्सुक्य जागं करण्यास पुरेशी होती. त्याच्या वसतिगृहाचं नाव आहे 'बसेरा-ए-तबस्सुम' (स्मितहास्याचं घर). ”

मुलांना बाहेरच्या जगाची ओळख व्हावी म्हणून आपण आवर्जून वर्तमानपत्रं वाचायला सांगतो, बातम्या बघायला सांगतो. यातून वर्तमानपत्रं व अन्य माध्यमांवरचा विश्वास वाढत जातो; पण यात एक धोकाही असतो. माहिती अनेकदा अपुरी असते, पूर्वग्रहदूषित असते, किंवा एकांगी असते. गेल्या काही वर्षांपासून वर्तमानपत्रांत काश्मीरचा प्रश्न रोजच झळकत आहे. घरीदारी यावर विविध प्रकारची चर्चा होते, तीही मुलं ऐकतात. त्यातून बॉंबस्फोट, अतिरेकी हल्ले म्हणजे काश्मीर अशी धारणा आपोआप बनत जाते.

पण या प्रश्नाला केवळ राजकीय बाजूच नाही, तर मानवी बाजूही आहे, हे मुलांना कसं समजावं, असा प्रश्न शाळेपुढे होता. एक दिवस काश्मीरमध्ये अनाथ मुलींसाठी वसतिगृह चालविणारे अधिक कदम हे नाशिकला येणार आहेत, अशी बातमी वृत्तपत्रांत आली आणि शाळेनं ही अचानक चालून आलेली संधी साधायचीच, असं ठरविलं. स्थानिक संयोजकांनीदेखील अतिशय उत्साही प्रतिसाद दिला व अधिक कदम यांची शाळाभेट ठरली.

आधी मुलांशी बोलून त्यांना अधिक कदम यांच्या कार्याची थोडक्यात कल्पना दिली. एक मराठी मुलगा पुण्याहून उठून सरळ काश्मीरला जातो आणि तिथे अतिरेक्यांच्या हल्ल्यात बळी पडलेल्या नागरिकांच्या वा पोलिसांकडून मारल्या गेलेल्या अतिरेक्यांच्या मुलींसाठी वसतिगृह चालवतो, ही गोष्ट मुलांचं औत्सुक्य जागं करण्यास पुरेशी होती. या त्याच्या वसतिगृहाचं नाव आहे 'बसेरा-ए-तबस्सुम' (स्मितहास्याचं घर). लागलीच मुलांच्या प्रश्नांची सरबत्ती सुरू

झाली, तेव्हा आम्ही त्यांना हे सर्व त्यालाच विचारा, असं म्हणून थोपवून धरलं. अधिकदादाची भेट न रंगती तरच नवल. 'तुम्हाला अतिरेक्यांनी त्रास नाही का दिला?' इथपासून प्रश्नोपनिषद सुरू झालं. 'आपल्याला १९ वेळा अतिरेक्यांनी पकडलं होतं,' असं दादाचं निवेदन ऐकल्यावर मुलं स्तंभित झाली. त्यानं अवघ्या विशीतच या कामाला सुरुवात केली, हे ऐकल्यावर सातवीतला चिन्मय म्हणाला, ''वीस म्हणजे काही फार वय नाही, एवढ्या लहान वयात तुला एवढं अवघड काम कसं करावंसं वाटलं?'' चिन्मयच्या प्रश्नाला सारेच हसले; पण दादानं जेव्हा, ''आपण एखादं मोठं काम स्वीकारतो तेव्हा ते कामच आपल्याला मोठं करतं'', असं उत्तर दिलं, तेव्हा सर्व जण गंभीर झाले. आजवर अनेकदा दहशतवाद्यांनी पकडून नेलं, धमक्या दिल्या तरी आपण काश्मीरमध्ये काम करतच राहिलो. कारण कुठल्याही जाती-धर्म-राष्ट्रभेदापलीकडे मुलांचं हे निरागस जीवन असतं, ते वाऱ्यावर सोडणं म्हणजे माणूसपण हरवणं आहे, अशा शब्दांत अधिकदादानं आपल्या कार्याचं सूत्र मांडलं. दहशतवाद्यांनी पहिल्यांदा पकडलं तेव्हा खूप भीती वाटली; पण त्यानंतर भीती कायमची संपली. मी दहशतवाद्यांशी राजकीय वाद घालत नाही. माझा शांतपणाच त्यांना प्रभावित करतो व संवाद होतो.

मुलांना हा जगावेगळा दादा मनापासून आवडला. काश्मीरचा प्रश्न नुसता दहशतवाद्यांचा नाही, तर आपल्याचसारख्या तिथल्या मुलामुलींच्या जीवनाचाही प्रश्न आहे, हे त्यांना नीट उमगलं. काश्मीरच्या मुली नाशिकला राहायला येणार आहेत, असं दादानं सांगितल्यावर, त्यांना आपल्या शाळेत आणाच, असा मुलांचा ताईंना आग्रह सुरू झाला. आणि अखेर डिसेंबर २०११ मध्ये हिवाळी सुट्टी घालवायला काश्मिरी मुली नाशकात आल्या तेव्हा सातवी ते नववीच्या मुला-मुलींनी स्वतः तयार केलेली फुलं व माळा देऊन, गाणं म्हणून व लेझीम खेळून त्यांचं जोरदार स्वागत केलं. आता त्या मुली शाळेत आल्या, की काही गोष्टी आपण त्यांच्याकडून शिकू, तर काही आपण त्यांना शिकवू, असा मुलांचा बेत ठरला.

अधिकदादा पहिल्यांदा भेटला तेव्हा विद्यार्थ्यांच्या मनात काय तरंग उमटले, ते सर्वांना लिहायला सांगितलं. खरंतर सगळ्यांनीच छान लिहिलं आहे, त्यातील दोघांचे लेखन पुढे दिले आहे.

''काश्मीर म्हणजे मला आजपर्यंत भारताचा स्वर्ग व छान निसर्गसान्निध्यात असलेलं राज्य वाटायचं; पण काश्मीरचं वर्णन करायचं झालं, तर 'हवामानानं शीत पण राजकीयदृष्ट्या उष्ण' हेच योग्य आहे. तिथे नेहमी अतिरेकी येतात व जवान, पोलीस यांच्यावर हल्ला करतात. मग अतिरेकी व जवान, किंवा पोलीस यांच्यात गोळीबार होतो. तसंच तिथे बऱ्याच वेळा दंगली होत असतात. तिथले स्थानिक तर घाबरूनच जातात. त्यांना जवानही त्रास देतात व आतंकवादीही त्रास देतात. अशा परिस्थितीत तिथले स्थानिक अतिशय हलाखीचं जीवन जगत

असतात. अशी थोडीफार माहिती मला होती.

जेव्हा अधिक कदम येणार आहे, असं समजलं व त्याला आतंकवाद्यांनी खूप मारलं आहे आणि तिथे तो अनाथालय चालवतो, हे समजलं तेव्हा त्याला भेटण्याची माझी उत्सुकता वाढली होती. तो एम. ए. झाला आहे. ते पण फॅक्सवरून नोट्स मिळवून, फोनवर लेक्चर ऐकून. अशी काही माहिती त्याच्याबद्दल समजली, तेव्हा त्याला भेटण्याची उत्सुकता वाढली होती.

त्यानं आम्हाला काश्मीरविषयी एका वेगळ्या दृष्टीनं माहिती सांगितली. तिथे जे आतंकवादी असतात ते जेव्हा इतरांना मारतात किंवा बॉम्बस्फोट घडवतात, तेव्हा तिथल्या लोकांची अनेक मुलं अनाथ होतात. पोलीस किंवा लष्कराच्या कारवाईत, गोळीबारात, दंगलीत अनेक मुलं-मुली अनाथ होतात. काश्मीरमध्ये फक्त मुलांसाठी अनाथालय आहे; पण मुलींसाठी नव्हतं. ते या अधिकदादानं सुरू केलं. त्याची चार अनाथालयं आहेत. त्यात दीडशे मुली राहतात. संपूर्ण काश्मीरमध्ये जवळजवळ एक लाख बावीस हजार अनाथ मुलं आहेत. दादानं सुरू केलेली ही अनाथालयं तो तिथल्या स्थानिकांच्या वरदहस्तानंच चालवतो. तिथल्या स्थानिकांच्या मनात दादाविषयी आपुलकी आहे म्हणून दादाला ते मदत करतात.

दादा जे अनाथाश्रम चालवतो त्या प्रत्येकात पन्नास ते साठ मुली आहेत. त्या अनाथालयास घर मानूनच राहतात. एकमेकींना समजून घेतात. त्यानं पहिला आश्रम कुपवाडा इथे चालू केला आहे. ते भारत व पाकिस्तानच्या सीमेवर आहे. तिथल्या मुली मोठमोठी स्वप्नं बाळगून आहेत. कुणाला भारतीय प्रशासनिक सेवेत जायचं आहे.

जिथे तेरा-चौदा वर्षांची मुलं स्वतःला बॉम्बनं उडवायला तयार असतात, तिथे हा दादाचा उपक्रम म्हणजे खरोखर कौतुकास्पदच आहे. तो दादा केवळ त्या मुलींचा दादा नाही तर बाबा, भाऊ सगळा आहे. दादानं केवळ विसाव्या वर्षी असं आव्हान स्वीकारलं. सतत अत्याचारग्रस्त विभागातच या मुली राहत असल्यानं, त्यांच्या भोवतालच्या परिस्थितीमुळे, त्या मुलींचं मानसिक स्वास्थ्य ढासळत असेल. त्यांना गरज असते ती मानसिक आधाराची, मानसिक स्वास्थ्याची. ती गरज हा दादा भागवत होता. त्या मुलींनी अज्ञानाचे परिणाम अनुभवले आहेत. त्यामुळे त्या ज्ञानसाधना करत होत्या. जरी त्यांनी अत्याचार भोगले होते, तरी त्यांना पुढील पिढ्यांना अत्याचार सोसू द्यायचे नसावेत. त्या मुली जेव्हा समाजात वावरतील, तेव्हा नक्कीच समाजपरिवर्तन होईल व त्या मोठा बदल घडवून आणतील.

आपण जेव्हा जगत असतो, तेव्हा फक्त स्वतःचाच विचार करतो; पण जेव्हा हे दुरून चांगल्या वाटणाऱ्या काश्मीरचं भीषण रूप कळतं, तेव्हा हादरायच बसतो. मुंबईत एक बॉम्बस्फोट झाला, तर आपण त्याला खूप मोठं करतो; पण तिथे हे रोजचं असतं. अशा स्थितीत जगणं कठीण, तर दुसऱ्याचा विचार करणार कधी?

आणि आपल्याला तर इतरांचा विचार करायला वेळच नसतो. अशा जीवनात जेव्हा कोणी असं काम करतो त्याला खरोखरच सलाम! आपणही त्याला काहीतरी मदत करायला हवी, एवढंच वाटतं!''

– यश गुजराथी, इ. १० वी

''धरतीवरला स्वर्ग' अशी जम्मू-काश्मीरची ख्याती किती चुकीची आहे, हे मला अधिकदादा भेटल्यावर कळलं. तिथला निसर्ग सुंदर आहे; पण जगणं नाही. 'वेनसडे'मध्ये दाखवल्याप्रमाणे 'सकाळी बाहेर गेलेला माणूस संध्याकाळी निवांत परतेल का?' हा प्रश्न मुंबईपेक्षा काश्मीरलाच जास्त योग्य आहे.

पुण्यातल्या १९ वर्षीय अधिकदादाला काश्मीरमधल्या त्या जीवनातला धोका कळला. तिथल्या अनाथ मुलांचं नंतर काय होतं, हा प्रश्न वाऱ्यावर सोडून न देता त्यानं स्वतःच त्यांना मदत करण्याचा निश्चय केला. कारण तिथल्या अनाथ मुलांना अतिरेकी पाकिस्तानमध्ये घेऊन जातात व नंतर आतंकवादी बनण्याचं शिक्षण देऊन भारतात परत पाठवतात. अशी १३-१४ वर्षांची मुलं स्वतःला बॉम्ब बांधून लष्करी ठाणी (भारतीय) उडवतात. हे ऐकल्यावर वाटतं, आपण किती सुखी आहोत.

काश्मीरमध्ये स्त्रियांना योग्य स्थान नाही. त्यामुळे तिथे मुलांसाठी जरी अनाथाश्रम असले, तरी मुलींसाठी तसं काहीच नव्हतं. अशा अनाथ मुलींचा सांभाळ करावा, असं वाटून अधिकदादा काश्मीरमध्ये घरच्यांचा विरोध असताना गेला व त्यानं तिथल्या मुलींसाठी तसे चार आश्रम सुरू केले. प्रथम तिथल्या लोकांनी नेहमीप्रमाणे त्याला विरोध केला; पण आज त्याच्या आश्रमात एकशे सत्तावन मुली राहतात. अधिकदादाच्या आश्रमात राहणाऱ्या काही मुली अशा आहेत ज्यांची आई आहे, पण वडील नसल्यानं व इतर भावंडांना सांभाळण्यासाठी आईनं मुलीला अनाथाश्रमात ठेवलं आहे. अशा मुलींना वर्षातून एखाद्या दिवशी त्यांच्या घरी व शेजारी नेलं जातं. जेणेकरून त्यांना आपलं गाव व कुटुंबाबद्दल माहिती राहील व त्या मुली शिकून मोठ्या झाल्यावर गावात सुधारणा घडवतील.

आई-वडलांना अतिरेक्यांनी मारलं म्हणूनच मुलं अनाथ होतात असं नाही, तर अनेकांचे आई-वडील, लष्कर आणि अतिरेक्यांच्या मध्ये जेव्हा संघर्ष होतो तेव्हा मारले जातात. त्यामुळे त्या मुलांकडून दादाला अनेकदा प्रश्न विचारला जातो, की 'अतिरेकी तर त्रास देतातच, पण मग लष्करही का त्रास देतं?'

दहा वर्षांच्या काळात दादाला १९ वेळा पकडून नेलं होतं. तेव्हा तो लष्कराचा वा पोलिसांचा हस्तक नाही, हे पाहून त्याला सोडून दिलं. अधिकदादाला 'त्या वेळी तू घाबरला होतास का?' असं विचारलं, तेव्हा त्यानं सांगितलं, की तो फक्त पहिल्या वेळी घाबरला, नंतर मात्र तो त्या अतिरेक्यांमध्ये असला की, शांत बसून

देवाची प्रार्थना करत असे. एकदा तर दादानं एका अतिरेक्याला सांगितलं, ''मी अनाथ मुलींसाठी आश्रम सुरू केले आहेत. तू मेलास की मी तुझ्या मुली सांभाळीन.''

दादानं तिथल्या काही मुलींबद्दल पण सांगितलं. त्यातली एक रुबीना. तिचे वडील आधी काही काळ अतिरेकी होते. नंतर ते सामान्य माणसाचं आयुष्य जगत होते. त्यामुळे त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या अतिरेक्यांनी त्यांना रुबीनासमोर गोळी घालून मारलं. नंतर जेव्हा रुबीनाला तिच्या घरी नेलं, तेव्हा तिनं त्या सर्व प्रकाराचं स्वतः वर्णन सांगितलं. दुसरी मुलगी सारा. तिचे वडीलसुद्धा अतिरेकी होते. ते भारतीय लष्कराच्या संघर्षात ठार झाले; पण आज त्या मुलीला आय. ए. एस. ऑफिसर बनायचं आहे. ती अकरावीत आहे व ती दादाच्या अनाथाश्रमातल्या हुशार मुलींमधली एक म्हणून ओळखली जाते.

असं हे 'बसेरा-ए-तबस्सुम' (जिथे आनंद वसतो असं ठिकाण) अधिकदादानं तयार केलेलं. खरंच किती धैर्य असेल त्याच्याकडे! किती चांगले विचार असतील त्याचे! दररोजच्या गर्दीच्या जगात राहून त्याच त्याच राजकारण्यांच्या भांडणाचा विषय उगाळत बसण्यापेक्षा, पाय-वड्याचं नाव कोणतं ठेवायचं अशा बालिश विचारांच्या राजकारण्यांकडे लक्ष देण्यापेक्षा, अधिकदादासारख्यांना मदत करणं नेहमीच चांगलं नाही का?

खरंच! आपण अनेकदा काश्मीरला झालेल्या घटना ऐकतो, जरा चर्चा करतो, त्या लोकांबद्दल हळहळ व्यक्त करतो; पण त्यापलीकडे काहीच करत नाही. अनेकदा असं नवीन काही करणाऱ्या लोकांना खाली खेचायचा मात्र प्रयत्न करतो. किती एकाच गोष्टीत अडकतो आपण! त्यापेक्षा असं काहीतरी नवीन करून, या धरतीवर स्वर्ग तयार करणं चांगलं! ताई म्हणतात ते बरोबरच आहे. जगात अशी माणसं आहेत म्हणूनच जग नीट चाललं आहे.''

– गार्गी पाटील, इ. १० वी.

'नर्मदा बचाव आंदोलना'च्या जीवनशाळा, कुकुडण्याची आश्रमशाळा, अंध मुलींचं विद्यालय आणि आता काश्मिरी मुलींचं आगमन या साऱ्यांनी मुलांना खूप समृद्ध केलं. दृष्टी विस्तारली. घटनांच्या पलीकडे असलेल्या माणसांकडे नजर पोचली. बंदुकांच्या समोरही शांतता व प्रेमाचा संदेश निर्भयपणे देणाऱ्या अधिकदादाच्या रूपात त्यांना नवा निःशस्त्र नायक मिळाला. आसपासच्या हिंसक वातावरणात ही केवढी दिलासादायक गोष्ट आहे. 'आनंदनिकेतन'ला हेच तर हवं असतं.



२६

आपलं जग

दीपा पळशीकर

“ भूगोलाच्या पाठ्यपुस्तकात या सर्वच विषयांची कप्पेबंद विभागणी केलेली आहे. या सगळ्या गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या असतात, त्या एकमेकांवर अवलंबून असतात, एकमेकांवर परिणाम घडवत असतात, याचा थांगपत्ताही लागू नये अशी रचना या पुस्तकांची आहे. त्यामुळे भूगोल शिकवताना या सुटलेल्या साखळ्या जोडून घेणं आवश्यक ठरतं. ”

जमीन, माती, पाणी, वारा, नद्या, समुद्र, सूर्य, चंद्र, तारे, डोंगर, दऱ्या हे सगळं आपलं रम्य जग! लहानपणी गोष्टींमधून, गाण्यांमधून आपण या जगाचा फेरफटका मारतो. त्याचं एक कल्पनाचित्र आपण मनात रेखाटलेलं असतं. या सगळ्या गोष्टींशी आपल्या अनेक आठवणी निगडित असतात. अशा या आपल्या जगात मोजकीच मंडळी असतात. त्यांच्याशीच आपली सुखदुःखं जोडलेली असतात. त्यातच आपण खूश असतो. माती कशाची बनलेली आहे आणि चंद्र किती दूर आहे, अशा चौकश्या करण्याच्या भानगडीत आपण शक्यतो पडत नाही आणि या सगळ्याचा आपल्या आयुष्याशी संबंध असू शकतो, अशी शंकाही आपल्या मनात डोकावत नाही. मात्र भूगोल शिकायला सुरवात केली, की ही सगळी रहस्यं उलगडत जातात.

तिसरीपासून भूगोल असा वेगळा विषय सुरू होतो. भूगोलात प्राकृतिक भूगोल आणि प्रादेशिक भूगोल असे दोन भाग केले जातात. प्राकृतिक भूगोलात जमीन, पाणी आणि वातावरण अशा तीन घटकांचा शास्त्रीय अभ्यास केला जातो, याबरोबरच खगोलशास्त्र, खडकांचा अभ्यास, पृथ्वीची उत्पत्ती व हालचाली, समुद्राचा अभ्यास, भूकंप, वादळ, पूर, ज्वालामुखी अशा भौगोलिक घटनाही सामील केलेल्या असतात. दुसऱ्या बाजूला प्रादेशिक भूगोलात भौगोलिक प्रदेशांची माहिती असते. भूगोलाच्या पाठ्यपुस्तकात या सर्वच विषयांची कप्पेबंद विभागणी केलेली आहे. या सगळ्या गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या असतात, त्या एकमेकांवर अवलंबून असतात, एकमेकांवर परिणाम घडवत असतात, याचा थांगपत्ताही लागू नये अशी रचना या पुस्तकांची आहे. त्यामुळे भूगोल शिकवताना या सुटलेल्या साखळ्या जोडून घेणं आवश्यक ठरतं. आपल्या जीवनाशी, परिसराशी, आपल्या दैनंदिन गोष्टींशी असलेला भूगोलाचा संबंध दाखवून दिला, तर हळूहळू भूगोलातले पारिभाषिक शब्द, क्लिष्ट आकडेवाऱ्या, नकाशे मुलांच्या पचनी पडू लागतात; पण त्यासाठी सुरुवात जाणीवपूर्वक करावी लागते.


प्रत्यक्ष भूगोल हा विषय जरी तिसरीपासून सुरु होत असला, तरी 'आनंदनिकेतन'मध्ये त्यातल्या नकाशा, आलेख या संकल्पनांची ओळख खेळातून अप्रत्यक्षपणे आधीच होत असते. वर्गातल्या भिंतींवर दिशांची नावं लिहिलेली असतात. फळ्यावर वर्गखोलीचं चित्र काढून, त्यात आपण बसतो त्या चौकोनात आपलं नाव लिहायला ताई सांगतात. चिन्हानं दाखवलेल्या गोष्टींना मुलं नावं देतात, किंवा कुठल्या गोष्टीसाठी कुठली चिन्ह असावी, अशी चर्चा लहान वर्गांपासूनच सुरू होते. त्यामुळे माझी जागा कुठे, सुमेधच्या डावीकडे की उजवीकडे, पूर्वेकडच्या खिडकीजवळ की उत्तरेच्या अशा गोष्टी मुलं जाणीवपूर्वक बघतात. वर्गात कोणतं वर्तमानपत्र किती जणांकडे येतं किंवा प्रत्येकाची आवडती भाजी कोणती, यावर चर्चा करून आलेख काढला जातो. अर्थात, याला आलेख म्हणतात, हे मुलांना माहीत नसतं; पण आलेख काढणं, वाचणं या गोष्टींची त्यांना नकळतच सवय होते. तिसरी-चौथीत मुलं पुस्तकात प्रत्यक्ष नकाशा बघतात; पण त्याआधी त्यांनी वर्गाचा नकाशा, आपल्या घराचा नकाशा काढलेला असतो. सुरुवातीला अगदी बारीकसारीक वस्तूही नकाशात दाखवण्यासाठी आटापिटा करणारी मुलं प्रमाण समजून घेतात आणि मग पुन्हा प्रयत्न करतात. चिन्हांची गरज समजून घेतात. आम्ही यासाठी होशंगाबाद (मध्यप्रदेश) इथल्या 'एकलव्य' संस्थेनं तयार केलेल्या 'खुशी खुशी' या पुस्तकांतल्या वेगवेगळ्या नकाशांचा वापर मुक्तपणे करतो. आपल्या जीवनाशी नकाशाचा काही संबंध असतो, हे अधिक स्पष्टपणे या नकाशातून मुलांना जाणवतं आणि नकाशे आपलेसे वाटू लागतात. नकाशातल्या रामूच्या शेताजवळून कालवा वाहताना दिसतोय म्हणून त्याचं शेत तरारलंय, हे मुलं समजू शकतात. राधाचं घर डोंगरावर आहे. वाटेत नदी दिसते आहे. म्हणजे पावसाळ्यात शाळेत जाताना तिला अडचणी येत असणार, हेही मुलांच्या लक्षात आणून देता येतं. असा संबंध जोडायला मुलं सरावली, की मग पाठ्यपुस्तकातली औपचारिक भाषा 'वाचायला' मुलं शिकतात. नैसर्गिक भूगोल

आणि प्रादेशिक भूगोल यांतला आंतरसंबंध स्पष्ट होऊ लागतो.

तिसरीमध्ये 'आपला जिल्हा' शिकताना मग जिल्ह्यातल्या नद्या, धरणं कोणती, कुठे आहेत, हे कधीकधी प्रत्यक्ष जाऊन बघतात. जिल्ह्यातले कोणते तालुके डोंगराळ भागात आहेत, तिथे राहणाऱ्या लोकांचं राहणीमान कसं असेल, त्यांचं अन्न काय असेल, असे अंदाज बांधत, पडताळून पाहतात. पुढे चौथीत गेल्यावर, 'दळणवळणाच्या' सोयी झाल्यामुळे डोंगराळ भागात राहणाऱ्या आदिवासींचं राहणीमान सुधारलं असं पुस्तकातलं वाक्य वाचून त्यावर चर्चा होते. 'राहणीमान सुधारलं' म्हणजे नेमकं काय झालं, जे झालं ते योग्य होतं की अयोग्य, आपलं राहणीमान सुधारलं, असं आपण केव्हा म्हणू शकतो, अशा चर्चा हिरिरीनं होतात. एखाद्या प्रदेशातल्या लोकांच्या अन्नात प्रमुख पदार्थ कोणते, हे समजल्यावर तिथले हवामान कसं असेल, याचा ढोबळ अंदाज मुलं बांधू शकतात.

आम्ही आमच्या शाळेत महाराष्ट्रातल्या सर्व जिल्ह्यांची तिसरीच्या भूगोलाची पुस्तकं गोळा केली आहेत. तिसरीत आपल्या जिल्ह्याचं पुस्तक मुलांनी अभ्यासलेलं असतंच. चौथीत मग मुलं इतर जिल्हे बारकाईनं बघतात. त्यात जिल्ह्याची केवळ भौगोलिक माहितीच नाही, तर सामाजिक, ऐतिहासिक माहितीही गोळा करतात आणि प्रकल्पाच्या माध्यमातून सादर करतात. त्या जिल्ह्याचा S.T.D code, MH (वाहनांचे) नंबर कोणता, त्या जिल्ह्यातल्या वेगवेगळ्या क्षेत्रातल्या प्रसिद्ध व्यक्तींची माहिती गोळा करतात, आपल्या आसपास त्या जिल्ह्यात राहणारं कुणी आहे का, याचा शोध घेतात, त्यांच्या मुलाखती घेतात. असा सर्वार्थानं तो जिल्हा समजून घेण्याचा प्रयत्न करतात. भूगोलाची परीक्षाही 'ओपन बुक' स्वरूपाची असते. माहिती पाठ करण्याऐवजी माहितीचा अर्थ लावणं, आपल्या आयुष्याशी ही माहिती कशी निगडित आहे हे समजून घेणं, ही माहिती वेगवेगळ्या स्वरूपात मांडणं हे कौशल्य ही मुलं शिकतात. चौथीच्या भूगोलातल्या 'महाराष्ट्रातली पिकं' या पाठात वेगवेगळ्या नकाशांमध्ये, वेगवेगळी पिकं कुठे घेतली जातात, हे दर्शवलं आहे. मुलं हे सगळे नकाशे बघून, ही सगळी माहिती एका सारणीमध्ये संकलित करतात. अशा सगळ्या कृतींमुळे मुलांना भूगोल आवडायला लागतो.

काही गोष्टींवर मात्र इयत्ता ४ थी मध्ये आम्ही फारसा भर देत नाही. उदा. पृथ्वी सूर्याभोवती कशी फिरते, चंद्राच्या कला कशा तयार होतात, या गोष्टी अमूर्त पातळीवर राहतात. चंद्र, सूर्य, पृथ्वीची अंतरं, त्यांचं परिवलन हे सगळं समजून घेणं आणि शिक्षकानं समजावून सांगणं खूपच गुंतागुंतीचं ठरतं. मात्र पुढे ७ वी ८ वीच्या पातळीवर मुलं हे समजून घेऊ शकतात आणि वेगवेगळ्या साधनांच्या




मदतीनं हे साध्य होतं.

भूगोल शिकवताना मुलांच्या समजेपर्यंत पोचण्यासाठी निरीक्षण, वर्गीकरण, मापन, विश्लेषण, नकाशावाचन या क्षमतांचा विकास होणं गरजेचं ठरतं. भूगोल शिकवताना निसर्ग आणि माणूस यांच्यातलं बदलत जाणारं नातं समजून घेणंही आवश्यक आहे. हे सर्व साधण्यासाठी परिसरभेटी, क्षेत्रभेटी, सहली, वर्तमानपत्रातल्या बातम्या या सर्वांचा वापर करता येतो. मोठ्या सहलींचं नियोजन करताना विविध भौगोलिक वैशिष्ट्यं असलेले प्रदेश आवर्जून निवडले जातात. पाचवी, सहावी, सातवी या तीन वर्षांमध्ये एका वर्षी समुद्रकिनारा असलेल्या ठिकाणी भेट ठरलेली असते. एका वर्षी अहमदनगर जिल्ह्यातलं रांजणखळगे बघणं होतं. प्रवास करताना दिसणाऱ्या भूरूपांकडे आवर्जून लक्ष वेधलं जातं. आठवीची मुलं कोकणातल्या सहलीला गेली, तेव्हा त्यांनी आर्टेशियन विहिरीसारखी वैशिष्ट्यपूर्ण दुर्मीळ रचना बघितली.

पाचवीत भारताचा नकाशा राज्यानुसार कापून प्रत्येक जण जिगसॉ तयार करतो आणि लावतो. देशातल्या राज्याचं निश्चित स्थान समजायला यामुळे सोपं जातं. तसंच त्या त्या राज्याची बाह्यरेषा (Outline) मुलांना परिचयाची होते. नुसती

बाह्यरेषा बघूनही मुलं राज्याचं नाव ओळखू शकतात. एखाद्या राज्याची भौगोलिक रचना आणि वैशिष्ट्यांबरोबरच, त्या राज्याचा इतिहास शोधणं आणि त्यांचा परस्परसंबंध शोधणं (उदा.- महाराष्ट्राची भौगोलिक रचना वैशिष्ट्यपूर्ण असल्यानं गनिमी काव्यानं लढणं शिवरायांना शक्य झालं.) असा जोडप्रकल्पही मुलं सहावीत करतात. सातवीत जग समजून घेताना देशांच्या भौगोलिक माहितीबरोबरच जागतिक भौगोलिक वैशिष्ट्यांचाही मुलं शोध घेतात. गिझाचा पिरॅमिड, बर्म्युडा त्रिकोण, सहारा वाळवंट, ग्रँड कॅनियनची रचना यांचा सखोल अभ्यास करून मुलं प्रकल्प तयार करतात. ही सर्व माहिती मिळवण्यासाठी पुस्तकं शोधणं, विश्वकोश धुंडाळणं, इंटरनेट सर्फिंग करणं, नेमकी माहिती मिळवणं, इंग्रजीतली माहिती वाचून मराठीत ती भाषांतरित करणं या सगळ्या प्रक्रियांचा आनंद मुलं घेतात. गटकामात रमतात. एकमेकांच्या मदतीनं प्रकल्प तयार होतो. तक्ता (Chart) स्वरूपात माहिती सादर करणं शिकतात. ॲटलासचा भरपूर वापर करतात. पाचवीपासून प्रत्येक विद्यार्थ्याजवळ ॲटलास असतोच. कुठलाही विषय शिकवताना भौगोलिक संदर्भ स्पष्ट करायचा असेल, तर नकाशाचा वापर आवर्जून केला जातो. इतिहासाच्या तासालाही नकाशे दाखवूनच इतिहास समजावला जातो. भारताचा स्वातंत्र्यलढा समजून घेताना वेगवेगळ्या कालखंडात भारतावर कोणाची सत्ता कुठल्या प्रदेशात होती, यासाठी किंवा जागतिक युद्धांची व्याप्ती समजून घेण्यासाठी भूगोल समजून घेणं, नकाशे बघणं याला पर्याय नाही.

असा हा भूगोल सर्वव्यापी आहे. मुलांमध्ये भूगोलाची आवड निर्माण करण्यासाठी योग्य अशी पर्यटनस्थळं निवडून पालकही प्रयत्न करू शकतात. दैनंदिन जीवनामध्ये आपल्याला खुणावणाऱ्या भूगोलाला प्रतिसाद देणं आपल्याच हातात आहे. आपण भूगोल चांगला समजून घेतला, तर इतिहासही चांगला घडवू शकू, हे नक्की !



वरील छायाचित्र नीट बघून, त्यासोबत असलेली वाक्ये नीट वाचून, पुस्तकाच्या मदतीने, विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वच्छ कागदावर व्यवस्थित ओळी आखून लिही.

(१) हे छायाचित्र किती तारखेला, कोणत्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले?
(२) धरणाचे दरवाजे का उघडण्यात आले?
(३) उजनी धरण कोणत्या नदीवर बांधले आहे?
(४) हे छायाचित्र कोणी काढले आहे? कुठल्या गावाला?
(५) उजनी धरण कोणत्या जिल्ह्यात आहे?
(६) 'सोलापूरला दिलासा' असे का म्हटले आहे?
(दिलासा वाटणे म्हणजे आधार वाटणे, बरं वाटणे)
(७) पाऊस पडण्याआधी जिल्ह्यातील परिस्थिती कशी असेल?
(८) यावरून धरण बांधण्याचे कोणते फायदे होतात असे तुला वाटते?
(९) अशा प्रकारची आणखी एखादी बातमी तू वाचली असल्यास तिचे कात्रण आण.
(१०) या वर्कशीटच्या आधी, प्रश्नांच्या सुरुवातीला कोणकोणत्या सूचना दिलेल्या आहेत ते लिही. त्या सर्व सूचना तू पाळल्यास का?

इयत्ता चौथीच्या प्रश्नपत्रिकेतला एक प्रश्न -

खालील परिच्छेद वाचा आणि विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं लिहा -

या वर्षी आमच्याकडे फारच कमी पाऊस झाला. आमचं सगळं जीवनच पावसावर अवलंबून असतं. पाऊस नाही म्हणजे शेती नाही. पोटाला अन्न नाही. या वर्षी मी शेतात ज्वारी लावली होती; पण सगळी करपून गेली. गाई-म्हशींनाही दुष्काळामुळे चारा मिळाला नाही, त्यामुळे त्यांच्यापासून मिळणारं उत्पन्नही बंद! आमचं हवामानही कसं, दिवसा कडक ऊन आणि रात्री थंडी! आता मला शहराकडे जाऊनच कामधंदा बघावा लागणार. मुलाबाळांची पोटं भरायची तर कष्ट करावेच लागणार. यंदाचा पोळाही सुनासुनाच गेला! आता दसरा-दिवाळीसुद्धा तशीच जाणार.

प्रश्न

१) वरील वाक्यं ज्यानं म्हटली त्याचा व्यवसाय काय असेल?
२) तो महाराष्ट्राच्या कुठल्या प्राकृतिक विभागात राहणारा असेल?
३) त्या विभागात पावसाचं प्रमाण किती असतं? तिथलं हवामान कसं असतं?
४) तो कुठला जोड व्यवसाय करतो?
५) शहरात आल्यावर त्याला कुठला व्यवसाय मिळेल?
६) शहरात आल्यामुळे त्याचं राहणीमान सुधारलं, असं म्हणता येईल का? का किंवा का नाही?



२७

लैंगिकतेचं भान

विनोदिनी पिटके-काळगी

“ दोन मुलग्यांच्या आईचे मला फोन आले. म्हणाल्या, ''मुलांनी घरी येऊन सगळी चर्चा सांगितली. 'आई, आता तू मला सांगत जा. मी तुला त्या दिवसांत मदत करेन!' असं मुलांनी आश्वासनही दिलं. आम्हाला हा विषय काढणं अवघड वाटत होतं; पण आता मुलं इतकी मोकळेपणानं बोलत आहेत, हे बघून आम्हीही बोलू शकलो.'' ”

कोणत्याही तासाला शिकवायला जाताना, आज कोणता पाठ्यविषय घ्यायचा, तो समजण्यासाठी काय साहित्य वापरायचं वगैरे गोष्टी मनात योजलेल्या असतात. वर्गात गेल्यावर मुलांचे प्रश्न आणि चर्चेच्या ओघात प्रत्येक वेळी वेगवेगळ्या तऱ्हेनं विषय फुलतो, तर कधी कधी नवीनच प्रयोग साकार होतो.

एकदा मी इयत्ता सहावीच्या वर्गात विज्ञानाचा तास घेत होते. सजीवांची लक्षणं हा पाठ चालू होता. त्यात सजीवांची वाढ होते, सजीव हालचाल करतात वगैरे चर्चा झाली. पुढचं लक्षण होतं प्रजनन. प्रत्येक सजीव आपल्यासारखा दुसरा सजीव निर्माण करू शकतो, असा त्याचा अर्थ पुस्तकात दिला होता. तो अर्थ नीट समजावा म्हणून मी काही उदाहरणं देऊ लागले. जसं मांजराच्या पोटातून मांजराचं पिल्लू येतं. चिमणीच्या अंड्यातून चिमणीच जन्म घेते. आंब्याची कोय लावली तर आंब्याचंच रोप येतं वगैरे.

शाळेत कुठलाही विषय हा चर्चेतूनच शिकवला जातो. तशी याही विषयावर मुलांची चर्चा सुरू झाली. मध्येच अभिलाष म्हणाला, ''ताई, प्रत्येक सजीव कुठे दुसरा सजीव निर्माण करू शकतो?'' मी विचारलं, ''म्हणजे काय? उदाहरण देऊन सांग बरं.'' तेव्हा तो म्हणाला, ''पुरुषांना कुठे बाळ होतं? नर कुठे बाळाला जन्म देतात?'' बाळ जरी आईच्या पोटातून बाहेर येत असलं, तरी बाळ तयार होण्यासाठी आई आणि बाबा दोघांचीही आवश्यकता असते. मग तो प्राणी असो, माणूस असो किंवा वनस्पती. वनस्पतीचं बाळ म्हणजेच फळ असं मी समजावत होते.

मुलांच्या मनात बाळाचा जन्म याबाबत खूप उत्सुकता आहे, असं त्यांनी विचारलेल्या प्रश्नांवरून माझ्या लक्षात आलं. प्राण्यांमध्ये शी होते तिथून बाळ येतं

का? (डिस्कव्हरी चॅनेलवर बघून त्यांना तसं वाटत होतं.) मानसी म्हणाली, ''माणसाचं बाळ नेहमी पोट कापूनच बाहेर काढावं लागतं का? की आपोआप पण बाहेर येऊ शकतं?'' असा प्रश्नांचा महापूरच सुरू झाला. या विषयावर मुलांशी बोलायची इच्छा होतीच; पण कधी? कसं? ते ठरवलेलं नव्हतं. हा आमचा पहिलाच सहावीचा वर्ग होता. बालवाडीपासून शाळा सुरू केली आणि दरवर्षी एकेक इयत्ता पुढे जात ही मुलं सहावीत आली होती. त्यामुळे आमचाही प्रत्येक अनुभव नवाच होता. ही मुलं चौथीत असताना त्यांच्या शंका, मुला-मुलींचे एकमेकांशी वागणे बघून त्यांच्याशी काही बोलण्याची आवश्यकता लक्षात आली होती. त्यामुळे मुलगा आणि मुलगी यांत सारखं आणि वेगळं काय, अशी चर्चा ठरवून घेतली होती. ती चांगली दोन तास चालली होती. शेवटी शू करण्याची जागा सोडून आपल्या वयात मुला-मुलींच्या शरीरात कोणताही फरक नाही, हे साऱ्यांना पटलं. पुढे जेव्हा वयानुसार काही फरक होतील, तेव्हा परत आपण या विषयावर बोलू, असं ताईंनी सांगितलं होतं. सहावीत दुसऱ्या सत्रात काही मुलींची पाळी सुरू होते, दिसण्यातल्या बदलाला सुरुवात होते. त्यामुळे आता त्यांच्याशी बोलणं गरजेचंही वाटत होतं. अचानक हा विषय समोर आला तेव्हा वाटलं, हीच संधी आहे बोलण्याची; पण त्याचबरोबर मुलांच्या प्रतिक्रिया काय असतील? त्यांचे पुढचे प्रश्न काय असतील? त्याला आपण उत्तरं देऊ शकू का? अशी धाकधूकही वाटत होती. मी एक मिनिट शांत बसले आणि मग मुलांना म्हणाले, ''चला आज आपण याच विषयावर बोलू. आजचा आपला पाठ बाजूला ठेवून द्या.''

मग त्यांच्या वयानुसार, त्यांना समजेल अशी वाक्यरचना करण्याचा प्रयत्न करून मी या विषयावर बोलू लागले. बाळ वाढण्यासाठी आईच्या पोटात एक पिशवी असते. फुग्यासारखा तिचा आकार लहान मोठा होऊ शकतो. बाळाचा आकार मोठा होतो, तसा पिशवीचा आकारही मोठा होत जातो. म्हणून आईचं पोट आपल्याला मोठं दिसतं. त्या पिशवीला एक तोंड असतं. पिशवीप्रमाणेच त्याचाही आकार मोठा होऊ शकतो. त्या पिशवीलाच गर्भाशय म्हणतात. प्रत्येक मुलीला जन्माला येतानाच गर्भाशय असतं. त्याचं तोंड शूच्या जागेजवळच असतं. त्यातून शू किंवा शी बाहेर येत नाही. फक्त बाळच बाहेर येतं. तयार होणारं बाळ सुरक्षित राहावं म्हणून गर्भाशयात दर महिन्याला एक अस्तर तयार होतं. जर पिशवीत बाळ आलं नाही, तर हे अस्तर पिशवीच्या तोंडावाटे बाहेर पडतं. ते पडून जाताना रक्तासारखं दिसतं. ही क्रिया चार दिवस चालते. त्यालाच मासिक पाळी, किंवा एम. सी. म्हणतात. हे पडणारं रक्त कपड्यांना लागू नये म्हणून सॅनेटरी नॅपकिन वापरतात.

या नॅपकिनबाबत मुलांना जाहिरातींमुळे फारच उत्सुकता होती. विशेष म्हणजे बहुतेकांना आपली आई हे वापरते, तसंच कोणत्या कंपनीचं वापरते, हेही

माहीत होतं. जगातल्या प्रत्येक बाईला, मग ती भारतातली असो, अमेरिकेतली वा आफ्रिकेतली, सुंदर, कुरूप, हुशार, ढ, उंच, बुटकी कशीही असो, तिला पाळी येतेच आणि ती आलीच पाहिजे. ती एक नैसर्गिक घटना आहे. त्यात घाबरण्याजोगं, वाईट वाटण्याजोगं काही नाही, असं पुन्हा पुन्हा सांगितलं. मुलगी बारा-तेरा वर्षांची झाली की दर महिन्याला तिची पाळी सुरू होऊ शकते. या दिवसात कंबर दुखते, अशक्तपणा येतो. तुमची आई कधी कधी म्हणत असेल 'आज मला बरं वाटत नाहीये, कंबर दुखतीये, जरा पडते', तेव्हा कदाचित तिची पाळी चालू असेल. तर आता तुम्ही त्या दिवसांत आईला विश्रांती घेऊ देत जा. कामात मदत करा, असंही सुचवलं. आईने विश्रांती म्हणून काम न करणं स्वाभाविक आहे. मात्र पाळी ही नैसर्गिक आणि प्रत्येक मुलीला येणारी गोष्ट आहे. त्यात देवा-धर्माचा काही संबंध नाही हेही सांगितलं.

हे जसे मुलींमधले बदल सांगितले तसे मुलांमध्येही शारीरिक बदल होतात. मात्र ते थोडे उशिरा म्हणजे साधारण आठवी-नववीत होतात. कुठले ते मुलांनीच सांगितले. जसे दाढी मिशा येतात, छातीवर केस येतात. आवाजही बदलतो, असं मी सांगितलं, तेव्हा ते मात्र मुलांना समजेना. मग त्यांना उदाहरण देऊन समजावावं लागलं. जसं आपण लहान मुलाचं गाणं ऐकलं, तर मुलगा म्हणतोय की मुलगी, हे समजत नाही; पण मोठ्या माणसांच्या आवाजातला फरक लगेच समजतो.

वर्गातली सर्व मुलं-मुली मन लावून, स्तब्ध बसून ऐकत होती. अनिवार उत्सुकतेनं शंकाही विचारत होती. वर्गातली मुलांची संख्या कमी, ताईशी असलेलं जिव्हाळ्याचं नातं व काहीही शंका विचारण्याची मुभा असल्यानं मुलं मनात येईल ते लगेच विचारतात. या चर्चेत एक जण म्हणाला, ''ताई, तुम्हाला एक गंमत सांगू का? मी लहान असताना आई ऑफिसला गेली, की मी हे पॅड काढून पायाला बांधायचो आणि घरभर फिरायचो. मला तो मऊ मऊ स्पर्श फार आवडायचा.'' यावर त्याच्यासह सर्व जण खूप हसले.

त्यानंतर जुळी मुलं कशी होतात? कधी सारखी, कधी वेगळी का असतात? छक्के म्हणजे काय? यावरही थोडी चर्चा झाली. त्यांना समजेल इतपत मीही उत्तरं दिली. सलग दोन-तीन तासिका ही चर्चा रंगली होती. तुम्ही अजून थोडे मोठे झालात की परत या विषयावर बोलू, असं म्हटल्यावर मुलं मैदानावर खेळायला गेली. मुलांशी हे बोलणं गरजेचं होतं. नाहीतर ती चुकीच्या मार्गानं माहिती मिळवण्याचा प्रयत्न करणार, जे अजिबात योग्य नाही, हे समजत होतं. इतकी सहज आणि व्यवस्थित चर्चा झाली, की मला आश्चर्य आणि समाधान वाटलं.

सर्व मुलांनी ही चर्चा घरी जाऊन सांगितली. दोन मुलग्यांच्या आईचे मला फोन आले. म्हणाल्या, ''मुलांनी घरी येऊन सगळी चर्चा सांगितली. 'आई, आता

तू मला सांगत जा. मी तुला त्या दिवसांत मदत करेन!' असं मुलांनी आश्वासनही दिलं. आम्हाला हा विषय काढणं अवघड वाटत होतं; पण आता मुलं इतकी मोकळेपणानं बोलत आहेत, हे बघून आम्हीही बोलू शकलो.''

पुढे ही मुलं आठवीच्या दुसऱ्या सत्रात आली आणि पुन्हा त्यांच्या शंका त्यांच्या वागणुकीतून जाणवायला लागल्या. आता ही मुलं आपल्याशी पूर्वीच्या मोकळेपणानं बोलतील का आणि आपणही त्यांच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं देऊ शकू का, अशी धास्ती वाटत होती. त्याच सुमारास आम्हाला, डॉ. मोहन देशपांडे, वैशाली वैद्य आणि त्यांचा गट मिळून या वयाच्या मुलांसाठी शिबिर घेऊन खूप छान प्रकारे माहिती देतात, असं समजलं. आम्ही लगेच त्यांच्याशी संपर्क करून शाळेत शिबिर घेण्याची विनंती केली. त्यांनी स्वतःचं शरीर, स्वतःचा जन्म, जन्माआधीचे घर, त्यात आपण कसे आलो. असं सर्व जवळिकीच्या सूत्रात बांधून खूप हळुवारपणे विषय उलगडत नेला आणि मुलांनी सगळी माहिती दिली. मुलांकडून बरीच चित्रं काढून घेतली, गाणी म्हटली, गोष्टी सांगितल्या, चित्रं दाखवली. चित्रकथेमधून मुलींवर होणाऱ्या लैंगिक अत्याचारांची जाणीव करून दिली. शिव्यांचे अर्थ, त्यातून आपण कुणाचा अपमान करतो, हे समजावलं. शिवाय मुलींना शोभेची वस्तू मानू नका आणि मुलींनीही स्वतःच्या दिसण्यापेक्षा गुणांकडे लक्ष देणं कसं गरजेचं आहे, हेही लक्षात आणून दिलं. मुलांसाठी हे शिबिर फार उपयुक्त ठरलंच, त्याबरोबर आम्हालाही हा नाजूक विषय कशा प्रकारे मांडावा, हे समजलं.

आता दरवर्षी ही चर्चा चौथीपासूनच्या प्रत्येक टप्प्यावर केली जाते. त्याचा चांगला परिणाम जाणवतो आहे व त्यास पालकांचाही पाठिंबा आहे.

काय करावं ? काय टाळावं ?

१. मुलांना मनमोकळा संवाद साधता येईल, असा विश्वास निर्माण करावा.

२. मुलांचे प्रश्न टाळू नयेत.

३. आपली या विषयावर चर्चा करण्याची मानसिक तयारी नसेल, तर निदान मुलांचे या विषयावरील प्रश्न ऐकून घ्यावेत व त्यावर तज्ज्ञ व्यक्तींचं मार्गदर्शन घ्यावं.

४. आपण हा विषय टाळला, तर मुलं वेड्यावाकड्या मार्गानं त्याची माहिती मिळवतात. त्याचा उलट वाईट परिणाम होऊ शकतो.

५. इतर विषयांसारखाच हाही एक ज्ञान विषय आहे, त्यात गुप्त, भयंकर व घाणेरडं असं काही नाही, अशीच दृष्टी आपणही ठेवावी व मुलांनाही तेच जाणवू द्यावं.

●



मूल्यमापन : कशाचं ? कशासाठी ?

अश्विनी अडावदकर

“ आमच्या शाळेतही परीक्षा होतात. मात्र त्यामध्ये पाठांतरापेक्षा आकलनावर, मुलांच्या ग्रहणशक्तीवर, त्यांची विचार करण्याची क्षमता, उपयोजन यांवर आधारित प्रश्न असतात. मुलांना स्वतःची मतं व्यक्त करता येतील, असे प्रश्न मुद्दाम विचारले जातात. परीक्षांचा निकाल नसतो, तर असतं 'मूल्यमापन.' ”

'पेपर कसा गेला ?' परीक्षेहून मुलं घरी आली की घरच्यांचा ठरलेला प्रश्न.

'सोप्पा.' मुलांचं ठरलेलं उत्तर.

'कळेलच रिझल्ट लागल्यावर.' पालकांच्या मनात उमटलेली प्रतिक्रिया.

हे सगळं आपण आपल्या लहानपणापासून आपल्या मुलांपर्यंत अनुभवतो आहोत. मुलांना पेपर खरोखरच सोपा गेलेला असतो. कारण आपण लिहिलेलं बरोबर आहे, अशी त्यांची समजूत असते; पण पालकांच्या मनात मात्र मार्क्स, टक्के, नंबर, पास-नापास, भीती... अशी यादी तयार झालेली असते. कारण अशा निकालावरच आपल्या मुलांची 'हुशारी' ठरणार असते. जेव्हा निकाल हातात येतो, तेव्हा पालक टक्क्यांच्या तुलनेत अडकतात आणि नक्की काय कमतरता राहिली, हे ना मुलाला समजतं, ना पालकांना. मग पुन्हा सुरू होते टक्के वाढवण्यासाठी पाठांतराची धडपड.

जेव्हा पालक आमची शाळा बघायला येतात आणि शाळेचे उपक्रम समजून घेतात, तेव्हा 'परीक्षा घेता का नाही ? रिझल्ट कसा लावता ?' असे प्रश्न हमखास विचारले जातात. आमच्या शाळेतही परीक्षा होतात. मात्र त्यामध्ये पाठांतरापेक्षा

मूल्यमापन (जानेवारी २०१२-एप्रिल २०१२)

मराठी

- पाठांतर, शब्दांचे उच्चार स्पष्ट असतात.
- जाहिरात पाहून त्यावरील प्रश्नांची उत्तरे समजून लिहिता येतात.
- गोष्टीतील घटना समजून त्यांचा क्रम लावणे जमते. परीक्षेत काही चुकले आहे.
- अक्षरे व शब्द यांचे सलगपणे वाचन जमते.
- योग्य गतीने लेखन जमते.
- अटीनुसार शब्द तयार करणे सांगता व लिहिता येतात.
- शब्दांचा वाक्यात उपयोग करता येतो.
- पाठाचे आकलन झाले आहे.
- वाक्यरचना योग्य असते.
- दिलेल्या विषयावर लेखन बऱ्यापैकी जमते.
- या विषयातील एकंदर प्रगती - उत्तम / चांगली / समाधानकारक / बरी / असमाधानकारक

श्रुतलेखन छान लिहिले आहे. पेपर समजून सोडवला आहे. मराठीचे पाठ्यपुस्तक बरेच दिवस नव्हते.

परिसर

- पृथ्वीवर माणसाने केलेले बदल सांगता व लिहिता येतात.
- केलेल्या बदलांचे परिणाम माहीत आहेत.
- दिवसा-रात्री केलेली निरीक्षणे सांगता येतात.
- सूर्यापासून मिळणाऱ्या उष्णतेचे उपयोग माहीत आहेत.
- पारंपरिक आणि अपारंपरिक ऊर्जासाधने सांगता येतात.
- दिशांची समज आहे.
- तिथींची नावे सांगता येतात.
- या विषयातील एकंदर प्रगती - उत्तम / चांगली / समाधानकारक / बरी / असमाधानकारक

पेपर समजून सोडवला आहे. काही प्रश्नांची उत्तरे लेखी चुकली पण तोंडी उत्तरे देता आली.

आकलनावर, मुलांच्या ग्रहणशक्तीवर, त्यांची विचार करण्याची क्षमता, उपयोजन यांवर आधारित प्रश्न असतात. मुलांना स्वत:ची मतं व्यक्त करता येतील, असे प्रश्न मुद्दाम विचारले जातात. परीक्षांचा निकाल नसतो, तर असतं 'मूल्यमापन.' यात परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्याला काय लिहिता आलं, यापेक्षा महत्त्वाचं ठरतं वैयक्तिक पातळीवर आज तो कुठे आहे, पूर्वीपेक्षा त्यानं कशात किती प्रगती केली आहे, हे समजणं. मूल्यमापनाचा संदर्भ विषयांप्रमाणेच वागणुकीशीसुद्धा असतो.

गुणांमुळे स्पर्धा निर्माण होते. ही स्पर्धा मुलांपेक्षाही पालकांमध्ये अधिक जाणवते. यामुळे शिकण्यातला आनंद हिरावला जातो. म्हणून जोपर्यंत मुलांना स्वत:ला आपल्याला मिळालेल्या किंवा गेलेल्या गुणांचा अर्थ कळत नाही, तोपर्यंत गुण द्यायचे नाहीत, असं आम्ही ठरवलं. म्हणून चौथीपर्यंत आम्ही गुण किंवा श्रेणी काहीच देत नाही. प्रत्येक गोष्टीची विस्तृत शाब्दिक नोंद केली जाते. मुलांची लेखी-तोंडी परीक्षेतली कामगिरी, पूर्ण सत्रातला त्याचा वर्गात विषय शिकण्यातला सहभाग, गृहपाठ, वर्कशीट्स इत्यादींबाबत ताईंनी नोंदवलेली निरीक्षणं असं विषयांच्या नोंदीचं स्वरूप असतं, तर विशेष नोंदीत राहणी-साहित्य यातला व्यवस्थितपणा, स्वभाव, वर्तणूक, ताईशी- इतर मुलांशी वागणूक अशा सामाजिक-भावनिक विकासाच्या नोंदी असतात. नमुन्यादाखल या काही नोंदी पाहा -

'अनुज वर्गातल्या चर्चेत मनापासून सहभागी होतो.'

'अर्पिताला अनुक्रमणिका वाचता येते व समजते.'

'यशला दाखवलेल्या दहा फुलांपैकी दोनच फुलं ओळखता आली.'

'गायत्रीला अनेक शब्द त्यांच्या अर्थासह माहीत आहेत.'

'मृण्मयीला स्वत:च्या मनानं गुणाकाराचं शाब्दिक उदाहरण तयार करता येतं.'

'स्वप्नाला दोन गोष्टींमधलं साम्य व फरक तोंडी सांगता येतात; पण ती लिहू शकली नाही.'

'रोहितच्या हस्ताक्षरात सफाई आहे.'

'योगेश गटकाम करताना पूर्वीपेक्षा जास्त समजूतदारपणे वागतो.'

वर्षाच्या शेवटी प्रत्येक मुलाच्या मूल्यमापनपत्रिकेत १०-१२ पानं जमा होतात. याचा उपयोग पालकांना आपलं मूल समजून घेताना होतोच, तसंच पुढील

मूल्यमापन (जानेवारी २०११-एप्रिल २०११)

इंग्रजी

- शाळेत शिकवलेल्या कविता हावभावासहित म्हणणे जमते.
- कविता म्हणताना उच्चारांची स्पष्टता अजून हवी.
- वस्तू ओळखून नावे सांगणे (e.g. bucket, mug, glass, spoon etc.) जमते.
- इंग्रजीतून दिलेल्या सूचनांचे आकलन होते
- व त्यानुसार योग्य कृती जमते.
- एकवचन - अनेकवचन ही संकल्पना पक्की आहे.
- इंग्रजीच्या तासाला सहभाग घोकरता असतो.
- I am, she is, He is यांचा वाक्यात योग्य वापर करणे जमते.
- सूचनेप्रमाणे वर्कशीट सोडवणे जमते.
- या विषयातील एकंदर प्रगती - उत्तम / चांगली / समाधानकारक / बरी / असमाधानकारक

नीट लक्ष देऊन करते.

गणित

१ ते १०० पर्यंतच्या संख्या

- म्हणणे ८० पर्यंत म्हणायला येतात.
- ओळखणे संख्या ओळखता येतात.
- अंक लिहिणे जमते. अक्षरी लिहिणे जमते.
- लहान व मोठी संख्या ओळखता येतात
- दशक व एकक यांची ओळख आहे.
- १ ते ३० मधील संख्यांची बेरीज करणे जमते.
- १ ते ३० मधील संख्यांची वजाबाकी करणे जमते.
- शाब्दिक उदाहरणातील क्रिया ओळखून गणित सोडवणे जमते
- वेळेच्या पूर्व तयार करणे जमते
- आठवड्याचे वार सांगून त्यावरील प्रश्नांची उत्तरे देता येतात.
- दिलेल्या आकारांचा वापर करून चित्र काढणे छान जमते.
- चित्रांची साखळी वाढवणे ठीक जमते.
- दाखवल्याप्रमाणे चौकोन रंगवणे जमते.
- या विषयातील एकंदर प्रगती - उत्तम / चांगली / समाधानकारक / बरी / असमाधानकारक

पुढे

वर्षीच्या ताईनाही होतो. पाचवीपासून श्रेणी व गुण दिले जातात; पण जोडीला वर्णनात्मक नोंदीही असतात.

मूल्यमापन कशासाठी, तर वयाप्रमाणे प्रत्येक टप्प्यावर अपेक्षित असणाऱ्या क्षमता, कौशल्यं, ज्ञान मुलानी आत्मसात केलं आहे का, हे समजण्यासाठी. मुलातली प्रगती-बदल यांची नोंद घेण्यासाठी, असं एकदा पक्कं केलं, की आपोआप त्यानुसार विचारचक्र सुरू होतं. वयानुसार अपेक्षित क्षमतांचा अभ्यास करूनच अभ्यासक्रम तयार केलेला असतो आणि पाठ्यपुस्तक हा त्याचा केवळ एक नमुना. त्यामुळे फक्त धड्यांवरील प्रश्नांची उत्तरं देता येणं, हे महत्त्वाचं राहत नाही.

भाषेचा परिचय होणं, शब्दांचा चपखल वापर करता येणं, आपले विचार-भावना व्यक्त करता येणं, हे भाषा शिक्षणाचे हेतू असतात. परीक्षेत चित्रावरून गोष्ट तयार कर, यमक जुळव असे प्रश्न असतात. पेपरमध्ये सोपी कविता देऊन त्यावर प्रश्न विचारता येतात. शिवाय मुक्त अभिव्यक्तीसाठी 'आमचा चौथीचा वर्ग', 'माझी बालवाडीतली आठवण' असे विषय दिले जातात. कधी शाळेच्या वक्तृत्वस्पर्धेसाठी विषय सुचव, असंही विचारलं जातं.

प्रत्येक मुलाच्या विचारांची दिशा, क्षमता वेगळी असू शकते. या क्षमता तपासण्यासाठी मुक्तोत्तरी प्रश्नांचा उपयोग होतो. एका प्रश्नाची अनेक उत्तरं असू शकतात व ती सर्व बरोबर असू शकतात. अशा प्रकारचे प्रश्न काढता येणं, ही ताईची कसोटीच असते; परंतु त्यामुळे मुलांमधली बहुदिक् विचारक्षमता जागृत होते. तसंही मुलांच्या मनातले विचार अनेक दिशांनी धावतात. त्याला वेळोवेळी कुंपणं घालून बंदिस्त करण्याचं काम आपण मोठेच करत असतो. वेगवेगळ्या दिशांनी विचार करणं ही सृजनशील विचारांची पायाभरणी आहे आणि म्हणूनच मुक्तोत्तरी प्रश्नांची आवश्यकताही! याचं एक उदाहरणच पाहू या. एकदा चौथीच्या विज्ञानाच्या परीक्षेत प्रश्न होता- 'पुढील गोष्टींमध्ये वेगळं काय, ते लिही आणि त्याचं कारणही लिही.' फुगा, बुडबुडा, फुटबॉल, क्रिकेटचा बॉल. या प्रश्नाला विविध उत्तरं मिळाली. १) फुगा- तो हवेत उंच जातो. २) बुडबुडा- तो हातात धरता येत नाही. ३) क्रिकेटचा बॉल- तो भरीव असतो. इ. योग्य कारण देता आलं, तर अशी सर्वच उत्तरं ग्राह्य धरली जातात.

गणितात परिमाण ही संकल्पना स्पष्ट झाली की नाही, हे समजण्यासाठी

मूल्यमापन (जानेवारी २०१०-एप्रिल २०१०)

कार्यानुभव

○ **घडीकाम** (पंखा, नाव, टोपी, [illegible])
• [illegible] जमते. [illegible] कधी कधी मदत लागते.
• योग्य माप घेऊन घड्या घालणे जमते. कामातील सुबकता बरी.
○ **कातरकाम, चिकटकाम** ([illegible])
• आखून दिलेल्या रेषेवर व्यवस्थित कापणे जमते.
• दिलेल्या चित्रात कागदाचे तुकडे व्यवस्थित चिकटवणे जमते.
• चिकटवण्याचा योग्य वापर करते.
○ **मातीकाम** (प्लास्टिसीन)
• [illegible] विविध आकार तयार करणे जमते.
○ **शिवणकाम** - सरळ रेषेत धावदोरा घालणे जमते.
• टाके व्यवस्थित असतात. कामातील [illegible] चांगली.
○ **रांगोळी** (मुक्तहस्त रांगोळी)
• रांगोळी काढण्याची आवड आहे.
• रांगोळीची सुबकता चांगली.
• रंगकाम - [illegible] चित्र तयार करणे जमते.

चित्रकला

○ रंगसंगती चांगली आहे.
○ रेषेवरील नियंत्रण चांगले आहे.
○ तन्मयता चांगली आहे.

संगीत

○ गाणी म्हणण्याची आवड आहे.
○ पाठांतर आहे.
○ नवीन गाणी शिकण्याची इच्छा असते.
○ गाण्यावर मोकळेपणाने नाच करणे खूप आवडते. छान नाच करते.

विशेष नोंद

○ क्रीडामहोत्सव व स्नेहसंमेलनातील सहभाग चांगला होता.
गृहपाठ असतो.
[illegible] साहित्य बऱ्याचदा असते.
वर्गातील वर्तन खोडकर. इतर मुलांच्या [illegible].
○ एकंदर प्रगती चांगली.
- [illegible]
- [illegible]
- [illegible]

इयत्ता शिफारस [illegible]

'रिकाम्या जागी योग्य एकक लिहा' असं विचारता येतं. जसं १) काल आईनं ५००.... साखर आणली. २) दादाच्या स्कुटीमध्ये ..... पेट्रोल मावलं. ३) मृण्मयीच्या सोन्याच्या कानातल्याचं वजन ३... आहे इत्यादी.

भूगोलाच्या परीक्षेत कोणत्याही जिल्ह्याचा-राज्याचा नकाशा पाहून उत्तरं शोधायला विचारतात, तर नागरिक शास्त्रात आपल्या वाचनालयासाठी नियम तयार कर, असं विचारता येतं. शाळेत बनवलेले खाऊ, त्यांचं साहित्य-कृती, त्यातलं विज्ञान, क्षेत्रभेटीतून मिळालेली माहिती, हस्तकलेचा अनुभव, पाहुण्यांची मुलाखत अशा सर्वच गोष्टींचं प्रतिबिंब परीक्षेत असतं. मुलांनी हे सर्व अनुभवलेलं असतं. त्यामुळे प्रश्नांची उत्तरं पाठ करावी लागत नाहीत, तर विचारपूर्वक लिहावी लागतात.

चौथीपासून मुलं निरनिराळे प्रकल्प करतात. गाणी-कोडी यांचा संग्रह, देशातल्या राज्यांचा जिगसॉ, मूलद्रव्यांची माहिती वगैरे. अशा प्रकल्पांची मूल्यमापनात दखल घेतली जाते. शिवाय स्नेहसंमेलन, क्रीडामहोत्सव, इतर वेगवेगळ्या उपक्रमांतल्या सहभागाचीही नोंद ठेवली जाते.

मूल मोठं होऊन जेव्हा समाजाचा घटक म्हणून वावरू लागतं, तेव्हा परीक्षेतली घोकंपट्टी, किंवा नुसती प्रखर बुद्धिमत्ता उपयोगी पडत नाही. म्हणून मुलांच्या सर्वांगीण आणि निकोप वाढीसाठी अशाच मूल्यमापनाची आवश्यकता आहे. देशात शिक्षण हक्काचा कायदा लागू झाला आहे. मूल्यमापन पद्धतीतली सुधारणा ही त्यातली महत्त्वाची शिफारस आहे. २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून सरकारनं सर्व शाळांना मूल्यमापनाचा नवीन जी. आर. पाठवला आहे. प्रयोगशील शाळा जी पद्धत वर्षानुवर्षं वापरत आहेत, त्या पद्धतीचा अंगीकार आता सर्वच शाळांमधून व्हावा, असं यात सांगितलं आहे. 'आकारिक मूल्यमापन' हे शब्द आज सर्व शिक्षकांच्या व शाळा व्यवस्थापकांच्या तोंडी पूर्णपणे बसले आहेत; परंतु त्याच्या अर्थाविषयीची स्पष्टता पालक व शिक्षक या दोघांमध्येही नाही. आता काय परीक्षाच नाही, शाळेत न जाताही मुलांना पास करणार, लिहिता-वाचता न येणारी मुलंही आता नववीत येणार, हे या तंत्राविषयीचे गैरसमज सर्रास ऐकायला मिळतात. केवळ 'गुण' हा यशस्वितेचा एकमेव मापदंड मानणाऱ्या आपल्या विचारांची दिशा जेवढी लवकर बदलेल तेवढं या पद्धतीतल्या फायद्यांकडे आपलं लक्ष जाईल.

मूल्यमापन व अध्यापनपद्धती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मुलांमधल्या सर्व प्रकारच्या क्षमतांचं मूल्यमापन करायचं असेल, तर त्या विकसित करण्याच्या संधी त्यांना मिळायला हव्या. अशा संधी पुरवणारी संवादी अध्यापनपद्धती ही या मूल्यमापनाची पूर्वअट आहे. पाठ्यमुद्द्यांवर चर्चा, प्रश्ननिर्मिती, क्षेत्रभेट, प्रकल्प, माहिती संकलन, सृजनात्मक निर्मिती, वर्गप्रदर्शन ही अध्यापनाचीच विविध रूपं आहेत. यांचा खूप जवळचा संबंध मूल्यमापनाशी आहे, हे विसरून चालणार नाही. अध्यापनपद्धती मुलांच्या सहभागाला उत्तेजन देणारी, कृतीला वाव देणारी, त्यांच्या पूर्वज्ञानाचा उपयोग करणारी असेल, तर मुलांच्या अध्ययनाच्या कक्षा रुंदावतील व त्या कवेत घेण्यासाठी मूल्यमापनाचं स्वरूप अधिक मुक्त, अधिक खुलं करावंच लागेल.

●



आज का खाना, बहुत अच्छा!

स्वप्ना खडीकर (पालक)

“ शाळेनं एक गोष्ट जाहीर केली. त्यामुळे सगळ्याच आई-पालकांना आनंद झाला. ती अशी की शाळा या रेसिपीजचं पुस्तक छापणार आहे. शाळेनं हे काम आठवीच्या मुलांवर सोपवलं. संगणकावर प्रिंट काढली. झेरॉक्स करून छोट्या पुस्तिका बनवल्या. पाचवी-सहावीच्या मुलांनी प्रत्येक पुस्तिकेत पदार्थांची चित्रं काढून हातानं रंगवली. अशा तयार झालेल्या सुंदर पुस्तिका दुकानजत्रेत विकायला ठेवल्या. म्हणजे पालकांपासून मुलांपर्यंत सहभाग असणारा एक छान प्रकल्पच तयार झाला. ”

एक दिवस शाळेतून घरी आल्यावर उमानं शाळेची चिठ्ठी वाचून दाखवली. चिठ्ठी ऐकून उमा खूष, तर मी टेन्शनमधे! शाळेनं पालकांसाठी स्पर्धा जाहीर केली होती. पुढचे १५ दिवस मुलांच्या डब्यात पौष्टिक व समतोल आहार मागवला होता. माझ्या मुलींच्या खूप अपेक्षा होत्या. त्या अपेक्षा किमान पूर्ण करणं तर भाग होतं. मग त्यावर विचार करायला सुरुवात केली आणि मला शाळेनंच आयोजित केलेलं डॉ. नीलिमा जाधव यांचं 'मुलांचा आहार' हे व्याख्यान आठवलं. त्यांनी सांगितलेल्या काही टिप्स आठवल्या. मग ठरवलं, स्पर्धेत बक्षीस मिळो न मिळो, मुलींच्या अपेक्षा नक्की पूर्ण करूयात.


ठरवलं तर खरं, पण मी पडले एक व्यावसायिक. दुकान, घर, मुली सगळं सांभाळून रोजच्या स्वयंपाकाव्यतिरिक्त नवीन आणि पौष्टिक पदार्थ बनवणं सोपं नव्हतं. तरीदेखील पूर्वतयारी सुरू केली. टीव्हीवर बघितलेल्या काही रेसिपीज लिहिलेल्याही होत्या. त्या वाचून काढल्या. आपल्या रोजच्या स्वयंपाकातही थोडंसं नावीन्य आणून काय साधता येईल, हा विचार केला आणि सगळ्यांत पहिल्यांदा त्या १५ दिवसांची आखणी केली. कोणत्या रेसिपीज करायच्या, त्याला लागणारं सामान, बनवण्याचा वेळ आणि माझा वेळ या गोष्टी सर्वसाधारणपणे ठरवल्या. याबरोबरच एखादी वस्तू न मिळाल्यास त्याऐवजी ऐन वेळेस काय करता येईल, तेही ठरवलं.

वाढत्या वयात मुलांना भाज्या व फळं या गोष्टी तर आवश्यकच असतात.

थंडीचा ऋतू असल्यानं तेव्हा बाजारात भाज्यांची रेलचेल होती. हा विचार करून सगळी जीवनसत्त्वं व क्षार यांचा समावेश असलेले पदार्थ बनवण्याचं ठरवलं. मुलींच्या बाबांनी सांगितलेल्या भाज्या बाजारातून उत्साहानं आणून दिल्या. भाज्या वेगळ्या करायला, तसंच निवडायला मुली उत्साहानं बसल्या. घरातल्या मावशीसुद्धा लवकर येऊन भाज्या चिरून देण्यास मदत करायच्या. व्हेज कटलेट, पालक-पनीर कोफ्ता, कॉर्न भेळ, मिक्स डाळवडा, व्हेज मंच्युरियन, व्हेज रोट, कडधान्याची उसळ इत्यादी पदार्थ बनवले. हे बनवताना यात शक्य त्या सर्व डाळी, दोन-तीन प्रकारची पिठं, सर्व भाज्या, फळं यांचा समावेश केला. तोंडी लावायला सलाड, कोशिंबीर, एखादं फळ (न चिरता) हेही लक्षात ठेवून डब्यात दिलं.

रोज सकाळी फक्त १०-१५ मिनिटं नेहमीच्या वेळेच्या आधी उठून हे सगळं व्यवस्थित जमलं. मुलींना काही आणायला सांगितलं तर पळत जाऊन घेऊन यायच्या. रोज डब्यात काय असेल, याची त्यांनाही उत्सुकता असे. त्यामुळे त्या मदतीला तत्पर होत्या. परितोषच्या आईनी तर मस्त युक्ती केली होती! त्यांनी १५ दिवस निरनिराळ्या भाज्यांचे पराठे करून दिले होते. प्रसादनं एकदा सोयाबीनची भाजी आणली होती. शाळेच्या २-३ ताई मिळून रोज सर्वांचा डबा टेस्ट करायच्या. उमाच्या डब्याला छान म्हटलं की त्या दिवशी घरी येऊन 'आई, तू किती ग्रेट आहेस!' अशी पावती मिळायची. ही पावती कुठल्याही बक्षिसापेक्षा मोठी होती. वेगळा पदार्थ असला, तर 'आईकडून रेसिपी लिहून आण!' असंही सांगितलं जात होतं. रोज कुणी डब्यात काय आणलं होतं, आपल्याला आणखी नवीन काय करता येईल, यावर चर्चा होत होती. ऋताचे बाबा, सौमित्रचे बाबा अशा काही बाबा पालकांनीही पदार्थ बनवले. ते १५ दिवस आम्ही सगळेच पालक जणू काही 'पौष्टिक खाऊमय' झालो होतो. यानिमित्तानं शाळेतल्या विद्यार्थ्यांच्या आई-पालकांचीसुद्धा परस्परांत विचारांची देवाण-घेवाण झाली. गंमत म्हणजे पाचवीतल्या मानसनं या स्पर्धेवर कवितासुद्धा केली. शाळेला बक्षीस देण्याच्या वेळेस इतका प्रश्न पडला, की कोणाला बक्षीस द्यावं? कारण या स्पर्धेला सगळ्याच पालकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. शेवटी शाळेनं नंबर न काढता उल्लेखनीय सहभागाचीच बक्षिसं दिली. आणि बक्षीस काय दिलं असेल? मोड आलेली कडधान्यं! आईला बक्षीस मिळालं, याचा मुलांना प्रचंड अभिमान असतो! कारण आई हा कुठल्याही मुलासाठी महत्त्वाचा घटक असतो. थोडक्यात काय, बच्चे भी खूश, बच्चे की माँ भी खूश !

या सगळ्याच्या पलीकडे शाळेनं एक गोष्ट जाहीर केली. त्यामुळे सगळ्याच आई-पालकांना आनंद झाला. ती अशी की शाळा या रेसिपीजचं पुस्तक छापणार आहे. शाळेनं हे काम आठवीच्या मुलांवर सोपवलं. मग त्यांनी उल्लेखनीय पदार्थ



ज्या पालकांनी बनवले होते त्यांना पत्र पाठवून साहित्य-कृती मागवली. त्याची संगणकावर प्रिंट काढली. झेरॉक्स करून छोट्या पुस्तिका बनवल्या. पाचवी-सहावीच्या मुलांनी प्रत्येक पुस्तिकेत पदार्थांची चित्रं काढून हातानं रंगवली. अशा तयार झालेल्या सुंदर पुस्तिका दुकानजत्रेत विकायला ठेवल्या. म्हणजे पालकांपासून मुलांपर्यंत सहभाग असणारा एक छान प्रकल्पच तयार झाला.

या स्पर्धेच्या निमित्तानं एक गोष्ट नक्कीच घडली. आजच्या धकाधकीच्या जीवनात आपण मुलांना हवा तसा वेळ देऊ शकत नाही, हे जरी खरं असलं, तरी थोडासा बदल नक्कीच देऊ शकतो. एरवी शाळेत डब्यात पोळी-भाजी आणण्याचा नियम होताच. तेव्हा मुलांना काय देत होतो?... तर नेहमीच्याच चवीच्या भाज्या, कधी सकाळच्या जेवणाचीच भाजी दुपारच्या डब्यात, अशा वेळी मुलांना डबा संपवण्याचा आग्रह करावा लागे. या १५ दिवसांत नावीन्यपूर्ण काय देऊ शकतो, हे लक्षात आलं. एकच भाजी वेगवेगळ्या पद्धतीनं साधे घरगुती मसाले, अगदी धने-जिरे पूड वापरूनसुद्धा करू शकतो. मुलांनाच काय, खरं सांगायचं तर आम्हालाही जेवायला मजा आली, चार घास जास्त जेवण गेलं. हा उपक्रम मुलांना आणि आपल्याला बळ देणारा ठरला.

आजचं मूल हे उद्याचा पालक असणार आहे. त्यालाही या जगातल्या धकाधकीमधे उभं राहायचं आहे. यासाठी उत्तम शिक्षणाबरोबर पौष्टिक आहाराची सवय लावणं जरुरीचं आहे. हे सगळं आपल्यालाही पटत असतं. फास्टफूडच्या विळख्यातून मुलांना बाहेर काढायचं असतं. कारण शरीरस्वास्थ्य हे मन:स्वास्थ्यावरही परिणाम करतं. यासाठी योग्य नियोजन, पूर्वतयारी आणि योग्य व्यवस्थापन या महत्त्वाच्या पायऱ्या आहेत, असं मला वाटतं. हे नियोजन आपण आठवड्याचं, किंवा महिन्याचंही करू शकतो. मुलांच्या निमित्तानं आपण आपल्या स्वत:कडेही लक्ष देऊ शकतो आणि हेदेखील महत्त्वाचं आहे. ●



विस्तारलेलं कुटुंब

सुप्रिया आगाशे (पालक)

"आमची मुलं पहिली ते चौथीत असेपर्यंत, शाळेत, तोंडी परीक्षांच्या काळात ताईंना मदत म्हणून मुलं सांभाळायला या, असं पालकांना बोलावणारी शाळा आमच्या उपक्रमाला पोषकच म्हणून खूप आवडायला लागली. उत्साहानं आम्ही वार ठरवून दोघी-दोघी मुलांना सांभाळायला जायचो आणि दोन्ही बाजूंनी अक्षरश: खांद्याला लटकायला येणारी, 'ओ ताई... ओ ताई' करून भंडावणारी आपलीच मुलं या वर्षभर कशी सांभाळतात म्हणून अचंबा करायचो."

माझा मुलगा सौमित्र 'आनंदनिकेतन'मध्ये खेळवाडीपासून आहे. तो शाळेत जायला लागला, तेव्हा प्रयोगशील शाळेत वेगळं काय शिकवतात, अशी नव्यानंच आई-बाबा झालेल्या आम्हाला उत्सुकता असायची; पण सुरुवातीच्या वर्षात सौमित्र शाळेत गेला की खूप वेळ रडायचा. या त्याच्या वागण्यानं आम्हाला काही सुचूच दिलं नाही. त्याच्या वर्गातली इतर मुलं केव्हाच रडायची बंद होऊन शाळेत रमली होती. तो सतत आईच्या वाटेकडे डोळे लावून बसत असल्यानं त्याची वर्गातल्या इतर मुलांशी ओळख-मैत्री पण होत नव्हती. यावर मला एक छानसा पर्याय सुचला. तो म्हणजे त्याच्या वर्गातल्या मुला-मुलींना आणि त्यांच्या आई-बाबांना घरी बोलावणं, मुलांबरोबर त्यांच्या आई-बाबांशी ओळख करून घेणं. उद्देश असा, की आपल्या मुलाबरोबर शिकणाऱ्या इतर मुलांची ओळख त्याला होईल, एक भावनिक नातं निर्माण होईल. त्यामुळे घरासारखं ओळखीचं वातावरण शाळेतही मिळेल आणि मग तो चटकन रुळेल. हा उपाय छान लागू पडला. आज हे सुंदर नातं मुला-मुलींमध्येच नाही, तर पालकांमध्येही निर्माण झालं आहे. जेव्हा पहिल्यांदा मी त्याच्या वर्गातल्या सगळ्या पालकांना चिठ्ठ्या लिहून घरी बोलावलं, तेव्हा सगळे खुशीनं आले. मुलं खेळली, ओळखी झाल्या. त्यानंतर आजतागायत गेली आठ वर्षं आम्ही सगळे एकत्र जमतो, गप्पा मारतो, चर्चा करतो, सहलीला जातो. आता सगळे पालक एकमेकांचे मित्र-मैत्रिणी झालो आहोत. त्यामुळे प्रयोगशील शाळेत मुलांना घातल्याच्या निर्णयाचं आधी आलेलं ओझं आपोआपच वाटलं गेलं. मुलांविषयी, शाळेविषयी काही प्रश्न-शंका निर्माण झाल्या असतील, तर आपापसांत चर्चा केली, की नवनवीन मार्ग सुचतात, प्रश्न सुटत जातात आणि ताण हलके होतात, मजा येते. प्रयोगशील शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालकही प्रयोगशीलच असले पाहिजेत नाही का? आता मुलांना पालकांनी जमवण्याची वाट पाहावी लागत नाही. तेच एकमेकांना फोन करून जमतात, खेळतात, एकमेकांकडे राहायला जातात.

सात-आठ वर्षांपूर्वीची आम्हा 'आनंदनिकेतन'च्या पालकांची परिस्थिती मला आठवते. शाळेची वारंवार बदलणारी जागा, पैशांची अडचण, शिकवण्याची नवीन पद्धत, परीक्षा-स्पर्धा-गुण याबाबत शाळेच्या नावीन्यपूर्ण धोरणांमुळे बाहेरच्या स्पर्धेच्या शाळांमध्ये जाणाऱ्या मुलांच्या पालकांकडून येणारं दडपण, इतरांचे अडचणीत टाकणारे प्रश्न या सगळ्यांमुळे पालकांमध्ये संशयाचं वातावरण असायचं. काही पालक यापैकी काही कारणांमुळे आपल्या पाल्याला शाळेतून काढूनच घ्यायचे; पण आता शाळेची स्वत:ची इमारत झाली. शाळेला भेडसावणाऱ्या व्यावहारिक अडचणींची झळही जरा कमी झाली. चांगल्या परिणामांमुळे शाळेची तत्त्वं सर्वांना पटू लागली. त्यामुळे शाळा सगळ्यांना आपलीशी वाटायला लागली आहे.

मुलांच्या पालकांचं शाळेशी नातं जोडलं जावं, दृढ होत राहावं, असे अनेक नवनवीन उपक्रम शाळा सुरू ठेवते. पालकांना पाल्याविषयी, शिकवण्याविषयी, परीक्षांविषयी, अभ्यासाविषयी काही अडचणी असतील, सूचना असतील, तर मांडण्यासाठी प्रत्येक शनिवार खुला असतो. यात मोकळेपणानं चर्चा होते. पालकांच्या सूचनांचा विचार केला जातो. शाळेत नियमितपणे पालकसभा होतात. फॅन्सीड्रेस स्पर्धेत मुलांबरोबर पालकांना कल्पकतेचं बक्षीस असतं. पौष्टिक खाऊस्पर्धेत पालकांना शाबासकीची थाप मिळते. स्नेहसंमेलन, दुकानजत्रा अशा उपक्रमांमध्ये पालकांचा सहभाग घेतला जातो. एका वर्षी पालकांचा क्रीडामहोत्सव होता, तर एका वर्षी पालकांसाठी निसर्गरम्य ठिकाणी निवासी शिबिर घेतलं. असं आणखी कितीतरी. याशिवाय शाळेत घातलं, की आपलं कर्तव्य संपलं असं नाही, तर शाळा आणि घर दोघं मिळून मुलांचा विकास होण्यासाठी प्रयत्न करायचा आहे, याची वेळोवेळी जाणीवही करून दिली जाते.



शाळेत प्रवेश घेताना मुलांची नाही, पण पालकांची मुलाखत अवश्य घेतली जाते. यात शाळेची तत्त्वं, वैचारिक भूमिका, शिक्षण व मूल्यमापनपद्धती यांविषयी सविस्तर माहिती देऊन पालकांची मतं शाळेशी जुळणारी आहेत, याची खात्री करून घेतली जाते. तरीसुद्धा काही पालक पुढे जाऊन शाळेच्या भूमिकेशी विसंगत वागणारे, ताईंशी हुज्जत घालणारे निघतातच. पण त्यांची संख्या खूपच कमी असते.

वेगवेगळ्या इयत्तांमधल्या मुलांच्या आई-बाबांमधले गुण हेरून त्यांना त्यांचं कौशल्य शिकवायला शाळेत बोलावून परिवारात सामावून घेतलं जातं. आमच्यापैकी मानसची आई, मुग्धाची आई, मृण्मयीची आई या आता शाळेत पूर्ण वेळ शिक्षिका आहेत. त्याशिवाय अनेक जण आठवड्यातून एकदा येतात. हर्षचे बाबा आणि रीमाचे बाबा आपापले नोकरी-व्यवसाय सांभाळून शाळेत स्कॉलरशिपचे क्लास घेतात. अमोघचे बाबा मुलांना उद्योजकतेचे धडे देतात, तर सुमेधचे आई-बाबा स्क्रीन प्रिंटिंग शिकवतात. मी संगीत शिकवते, तर अमेयची आई पाककलेचे धडे देते. 'आनंदनिकेतन'नं पालकांनाही मुलांबरोबर वाढायला सुंदर संधी दिली आहे. यात आपल्या कौशल्याचा मुलांना उपयोग होतो, याचा पालकांना आनंद आहेच; शिवाय मुलांना अनेक गोष्टी शिकायला मिळतात. मुलांना स्वत:ची आवड आणि कौशल्याची ओळख व्हावी आणि पुढे त्याच दिशेनं मुलांनी वाटचाल करावी, या शाळेच्या भूमिकेला हे फारच उपयुक्त ठरतं.

शाळेची आर्थिक गरज जाणून पालक देणगीदार शोधतात. दोन वर्षांपूर्वी सुबोधदादांच्या पुढाकारानं शाळेतले अनेक पालक एकत्र आले आणि त्यांनी अरुण दातेंची गाण्याची मैफल जमवली आणि त्यासाठी अथक परिश्रम करून बऱ्यापैकी निधी शाळेला जमवून दिला.

आमची मुलं पहिली ते चौथीत असेपर्यंत, शाळेत, तोंडी परीक्षांच्या काळात ताईंना मदत म्हणून मुलं सांभाळायला या, असं पालकांना बोलावणारी शाळा आमच्या उपक्रमाला पोषकच म्हणून खूप आवडायला लागली. उत्साहानं आम्ही वार ठरवून दोघी-दोघी मुलांना सांभाळायला जायचो आणि दोन्ही बाजूंनी अक्षरश: खांद्याला लटकायला येणारी, 'ओ ताई... ओ ताई' करून भंडावणारी आपलीच मुलं या वर्षभर कशी सांभाळतात म्हणून अचंबा करायचो.

शाळेबाहेर आम्ही पालक जमतो त्याचा काय उपयोग झाला? मुलांना कळायला लागल्यापासून शाळेमध्ये अगदी जाणवणारा असा फरक म्हणजे मुलगा-मुलगी भेदभाव, बेशिस्त, मत्सर, द्वेष, चढाओढ-स्पर्धा या सर्वसाधारण शाळांमध्ये दिसणाऱ्या गोष्टी यांच्या वर्गात अगदी दुर्मीळच. सगळी मुलं-मुली डबा खायला एकत्र गोल करून बसतात. वर्गात निर्माण झालेले वाद, भांडणं, समस्या पेल्यातल्या वादळासारख्या उद्भवतात आणि संपतातही. घरी एकेकटी वाढणारी मुलं, वाटून घेणं, तडजोड करणं हे गुण बाळगून आहेत.

शाळेनं आम्हा पालकांच्या प्रयोगशीलतेलाही नेहमीच प्रोत्साहन दिलंय. आमच्या आनंदी ग्रुपनं लिहिलेल्या निरोपाच्या चिठ्ठ्यांचं वाटप करण्यापासून भेटण्यासाठी प्रसंगी शाळेची जागा उपलब्ध करून देण्यापर्यंत मदत केली. शाळेबाहेर भेटण्यामुळे वर्गातलं वातावरण मुलांच्या भावनिक विकासाला पोषक होतंय, हे दिसल्यावर इतर इयत्तांमधल्या पालकांना असा उपक्रम सुरू करण्यासाठी प्रोत्साहित केलं. आता ही शाळा म्हणजे विस्तारलेलं कुटुंबच आहे.

विद्यार्थी-पालक आणि शिक्षक या तिघांचं नातं अशा प्रकारे एकमेकांशी जेव्हा दृढ होतं, तेव्हा सगळ्यांनाच एकत्र प्रगती करायची संधी मिळते. प्रत्येक पालकांमध्ये काहीतरी कौशल्य असतंच. अधूनमधून शाळेत जाऊन योग्य वयाच्या मुलांना ते कौशल्य शिकवलं तर मुलांना पुस्तकी ज्ञानापलीकडे अनेक गोष्टी शिकायला मिळतील. पालकांनी शाळेच्या, शिक्षकांच्या अडचणी समजून घेऊन मदतीचा हात पुढे करावा, तसेच शिक्षकांनी पालकांबद्दल आपुलकी बाळगावी, असं सहकाराचं तत्त्व सर्वच पालक आणि शाळांनी आत्मसात केलं, तर किती बहार येईल.



मिळून साऱ्याजणी

नीलिमा कुलकर्णी

"इथे अधिकारांची उतरंड नाही, संस्थाचालकांचं दडपण नाही. दुसऱ्यांनी निर्णय घ्यायचे आणि आपल्याला पटो न पटो, आपण ते राबवायचे असं स्वरूप नाही. प्रत्येक निर्णय हा ताईंशी चर्चा करूनच ठरवला जातो. तो कृतीत उतरवायला त्यांना पूर्ण स्वातंत्र्य असते."

आपल्या पाल्याला शाळेत घालण्यापूर्वी पालक एक प्रश्न नेहमी विचारतात तो म्हणजे, 'तुमची शाळा कायम विना-अनुदानित तत्त्वावर चालणार आहे, तर मग तुमच्याकडे शिक्षिका टिकतात का?' अर्थात, हे विचारणंही साहजिकच आहे. कारण दर दोन-तीन महिन्यांनी ताई बदलल्या, तर मूल शाळेत रमेल का?

सुदैवानं ही समस्या शाळेला कधी आलेलीच नाही. अगदीच अपरिहार्य कारण असल्याशिवाय कोणतीच ताई शाळा सोडून जात नाही. पगारासाठी तर मुळीच नाही. अर्थात, पगाराचं प्रलोभन नसूनही शिक्षिका भरपूर काम तेही वर्षानुवर्षं, करतात तरी कशा, हा प्रश्न बाहेरून आलेल्यांना नेहमीच पडतो.

या प्रश्नानं मला चार-पाच वर्षं मागे नेलं. आधीची नोकरी कमी पगाराची म्हणून सोडून दिली होती. ती संस्था प्रचंड मोठी आणि श्रीमंत, तरी शिक्षिकांना अत्यल्प पगार. संस्थाचालक मालक आणि शिक्षक नोकर अशी वागणूक. बऱ्याचदा शिक्षकही 'चला, पाटी टाकून येतो' असं म्हणत. त्यामुळे मन अजिबात रमत नव्हतं.

दरम्यान माझ्या मुलीसाठी शाळेचा शोध घेणं चालू होतं. शिक्षणाचं माध्यम मराठीच हवं याबद्दल आम्हा दोघांत एकमत होतं. इतर शाळांमधली वाढती विद्यार्थिसंख्या, खालावलेली शैक्षणिक गुणवत्ता पाहून मन निराश होत होतं. तेव्हा कुणीतरी 'आनंदनिकेतन'बद्दल सांगितलं. त्यावेळी शाळा खरंतर एका छोट्या बंगल्यात भरत होती. तिथे असणाऱ्या ताईंनी शिकवण्याची वेगळी पद्धती समजावून सांगितली. वर्गात प्रत्यक्ष फेरफटका मारून आल्यावर शिकवण्यातलं वेगळेपण लक्षात आलं. मग आम्ही मुग्धासाठी हीच शाळा योग्य, असं ठरवलं. मुग्धाला शाळेत घातलं आणि या ना त्या निमित्तानं ताईंशी, शाळेशी जवळीक वाढली. शाळेनं तर पालकांना फॉर्ममध्येच खुलं आमंत्रण दिलं होतं, की ते शाळेला कुठल्याही प्रकारची मदत करू शकतात. देणगीरूपानं, वस्तुरूपानं किंवा स्वत:चं एखादं कौशल्य देऊन! या आमंत्रणाचा मी स्वीकार केला. सहज म्हणून शाळेत डोकावले आणि कधी 'आनंदनिकेतन'ची सदस्य झाले, ते माझं मलाच कळलं नाही. आधीचा पगाराचा मुद्दा आता मागे पडला होता. कारण इथे शिकवणाऱ्या सगळ्याच ताई अल्प मानधनावर काम करीत होत्या. काही ताई आधीची नोकरी सोडून तर काही घरचे क्लासेस बंद करून इथे काम करीत होत्या. शाळेच्या संस्थापिका विनोदिनीताई यांनी महाविद्यालयाची चांगल्या पगाराची नोकरी सोडून शाळा सुरू केली होती. बी. एड., डी. एड.ची अट इथे नव्हती. अर्थात, सर्वजणी छान शिकलेल्या होत्या. ज्यांना ज्यांना मुलांबद्दल प्रेम आहे, मुलांबरोबर नवीन काही करून पाहण्याची आवड आहे आणि स्वत: शिकत राहण्याची इच्छा आहे अशा सर्वांचं शाळेनं स्वागत केलं. आम्हाला सुरुवातीला थोडं प्रशिक्षण दिलं. मग हळूहळू आमचं आम्हालाच समजलं, की आपल्याला कोणत्या वर्गाला, कोणता विषय शिकवायला आवडेल? त्यात नवीन काय करून पाहता येईल? पुस्तकापलीकडे जाण्याचा प्रयत्न कसा करता येईल? आमच्यासाठी शाळेनं वेगवेगळी शिबिरं, प्रशिक्षणवर्ग आयोजित केले. दरवर्षी शाळा सुरू होण्यापूर्वी दोन दिवस एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी शिबिर आयोजित केलं जातं. त्यानं ताईंमधली जवळीक वाढते. सुटी संपून शाळेच्या वातावरणात प्रवेश होतो. या शिबिरात कधी मुलांच्या प्रश्नांवर एखाद्या मनोविकास तज्ज्ञाला मार्गदर्शनासाठी बोलावलं जातं, कधी भाषातज्ज्ञाशी संवादकौशल्य कसं वाढवावं या विषयावर चर्चा होते. एखादी हस्तकला शिकवली जाते. दंगामस्ती, गप्पाही होतात. दीपाताईंना तर कधीही शिक्षिका व्हायचंच नव्हतं; पण त्या लीलाताई पाटील यांच्या कार्यशाळेस गेल्या आणि आता शिक्षिकाच होणार, असा निश्चय करून परतल्या. आतातर त्या शाळेच्या मुख्याध्यापिका आहेत. सर्वांना वेगवेगळ्या जबाबदारीच्या पदावर आळीपाळीनं काम करायला देणं, हेही शाळेचं एक वैशिष्ट्य आहे. त्यामुळे दर तीन वर्षांनी मुख्याध्यापिका पदावरील शिक्षिका बदलते. सर्वांना ही जबाबदारी कधी ना कधी सांभाळावी लागणारच याची जाणीव असते.

शाळेनं प्रत्येकीला आपला अवकाश दिला. संसारातली ठरावीक भूमिका

बजावताना नकळत साचलेपण येत जातं. स्वत:च्या ऊर्मींना वाव मिळत नाही. या कोंडीतून त्यांना इथे वाट सापडली. स्वत:च्याच अंगभूत गुणांचा त्यांना शोध लागत गेला आणि त्यांच्या जीवनाला नवी पालवी फुटली.

त्यांनी केलेल्या नवीन प्रयोगांना शाळेनं प्रोत्साहन दिलं. स्वत:तले गुण व कौशल्यं ओळखायला, जोपासायला व वाढवायला संधी दिली. आम्ही सुचविलेल्या नवीन उपक्रमांचं स्वागत केलं. शाळेचं सर्वांत महत्वाचं वैशिष्ट्य म्हणजे इथे अधिकारांची उतरंड नाही, संस्थाचालकांचं दडपण नाही. दुसऱ्यांनी निर्णय घ्यायचे आणि आपल्याला पटो न पटो, आपण ते राबवायचे असं स्वरूप नाही. प्रत्येक निर्णय हा ताईंशी चर्चा करूनच ठरवला जातो. तो कृतीत उतरवायला त्यांना पूर्ण स्वातंत्र्य असते. त्याबद्दल सतत चर्चा होत असतात. चुका योग्य पद्धतीनं दर्शवल्या जातात. सहिष्णू वातावरणामुळे चुका सकारात्मकरित्या स्वीकारण्याची व सुधारण्याची नकळतच सवय लागते. कुणीही कोणतंच काम दुसऱ्याला सांगत नाही, तर स्वत:च करून मोकळ्या होतात. मुख्याध्यापिका, संस्थाचालक हे कुठल्या स्वतंत्र कक्षात बसत नाहीत तर ते सर्वांबरोबर बसतात. त्यांच्याशी सहज संवाद साधता येतो. त्यामुळे ताईंवर कधीच कुणाचं दडपण नसतं. नवीन



छायाचित्रात पुढील रांगेत डावीकडून श्रीमती मुग्धा कर्वे, सारिका वैजापूरकर, सोनाली साळगावकर, अनघा जलतारे, भारती खैरनार, अर्चना दौंड.
मागील रांगेत डावीकडून सुजाता सावळे, वंदना खरोटे, निवेदिता भालेराव, गीता देशमुख, भावना भट, विनोदिनी काळगी.



छायाचित्रात पुढील रांगेत डावीकडून श्रीमती अश्विनी अडावदकर, माधुरी कुलकर्णी, उज्वला मोरे, शिल्पा भाटीया, वसुधा फाळके, दीपा पळशीकर.
मागील रांगेत डावीकडून स्वाती थोरात, सुचेता कुलकर्णी, सुषमा मरकळे, कल्पना हिरे, सुनिता दिवेकर, नीलिमा कुलकर्णी, शोभना भिडे.

शिकण्याची, प्रयोग करण्याची, समृद्ध होण्याची प्रक्रिया अखंडपणे सुरू असते. 'लोकसत्ता'मध्ये जेव्हा शाळेच्या अनुभवांवर आधारित लेखमाला सुरू करण्यात आली, तेव्हा प्रत्येकीनं त्यात लिहिलंच पाहिजे, अशा प्रोत्साहनामुळे अनेक जणींना प्रथमच लिखाणाची संधी मिळाली व आनंदही मिळाला.

शाळेत काम करण्याची इच्छा असणारीला आधी तीन महिने शाळेतील ताईंचे तास बघायला दिले जातात, मग पुढचे तीन महिने तिला प्रत्यक्ष शिकवायला संधी मिळते. या दरम्यान शाळेच्या वैचारिक भूमिकेबद्दल वेळोवेळी चर्चा होते. या कालावधीत शाळेला व नवीन ताईला आपले सुर जुळतात की नाही याचा अंदाज येतो. काहीजणी स्वत: नाही म्हणतात तर शाळेच्या भूमिकेशी विसंगत वागणाऱ्यांना (जसे मुलांमध्ये भेदभाव करणे, एखाद्या धर्माबद्दल चांगले किंवा वाईट बोलणे इ.) शाळेकडून नकार दिला जातो. हे सर्व होऊन ज्या येतात त्या शाळेशी समरस होतात.

मलाही इथे स्वतंत्र अवकाश मिळाला. आत्मविश्वास वाढला, स्वत:शी, इतरांशी संवाद साधता आला. वेगवेगळ्या शिबिरांमुळे, पालकसभेसाठी बोलावण्यात आलेल्या पाहुण्यांचे विचार ऐकून स्वत:मध्ये सकारात्मक बदल घडवता आले. स्वत:चा नव्यानं शोध लागला. मुलांच्या दृष्टिकोनातून पाहण्याची

सवय लागली. नेहमी स्वत:कडे कमीपणा घेण्याची वृत्ती असल्यानं माझ्यात एक न्यूनगंड वाढत होता. तो आता हळूहळू कमी होत आहे. आत्मभान जागृत झालं. समविचारी मैत्रिणी मिळाल्या. अडीअडचणींच्या वेळी हक्कानं ज्यांची मदत घेता येईल, असा एक छान आधारगट तयार झाला आहे. एवढ्या २०-२५ बायका एकत्र आल्या की त्यांच्यात गटबाजी, भांडणं सुरू होतात, असा सर्वसाधारण समज आहे; पण 'आनंदनिकेतन'मध्ये हे खोटं ठरलं आहे. ताईंच्या कक्षात सदैव कुठल्या ना कुठल्या विषयावर गप्पा होत राहतात. कुणी काही चांगलं वाचलं वा बघितलं, की त्या इतरांसाठी ते घेऊन येतात. आपल्या अडचणींवर खुलेपणानं एकमेकींशी चर्चा करत असतात. कुणी अज्ञानाची लाज बाळगत नाही, तर कुणी ज्ञानाचा गर्व करत नाही. शाळेतले नवनवीन उपक्रम आणि कार्यक्रमांमुळे आमच्या कल्पनाशक्तीला सतत आव्हान मिळत असतं. आणि ही नित्यनूतनताच आम्हाला शाळेशी बांधून ठेवते.

असं काही सांगितलं, की ऐकणाऱ्याला वाटतं, हे सगळीकडे कसं शक्य आहे? पण आम्हाला असं वाटतं, की आपल्या समाजात अनेकांची विशेषत: स्त्रियांची सुप्त कार्यशक्ती वायाच जाते आहे. त्यांना योग्य ते वातावरण मिळालं, तर त्या काहीही करू शकतील. कारण अनेक कुटुंबांत स्त्रियांना अर्थार्जनासाठीच काहीतरी केलं पाहिजे, अशी गरज नसते. अशा वेळी सासू-सुनांच्या कपट-कारस्थानांच्या मालिका बघण्यापेक्षा अनेक जणींना हा सृजनशील पर्याय पसंत पडू शकेल. गरज आहे ती पुढाकाराची, हे शक्य आहे, असं वाटण्याची आणि थोड्या वेडेपणाची!

●



शाळेची वाटचाल

१

अंधारातली उडी

अरुण ठाकूर

“

विनोबांनी लिहिलं होतं, 'अश्व या शब्दाचा अर्थ तबेल्यात उभा असतो, तो साक्षात बघायचाच असतो! अर्थाचं वर्णन नको, दर्शन हवं, भगवंतांनी अर्जुनाला काही आधी भगवद्‌गीतेचा क्लास लावून मग कुरुक्षेत्रात ढकललं नाही. भगवद्‌गीता जशी कुरुक्षेत्रात, तसं शिक्षण जीवनक्षेत्रातच द्यायला हवं. त्यासाठीच शाळा जीवनाशी एकरूप असायला हवी.'

”

कुठल्याही साहसाची सुरुवात ही बहुधा अविचारानंच होत असते! आम्ही काही फार मोठं काम केलं आहे, असं नाही; पण जे काही केलं त्याची सुरुवात अंधारात उडी ठोकण्यासारखीच होती. शाळांमधली वाढती गर्दी, खालावलेली गुणवत्ता, मुलांना आपल्या महत्त्वाकांक्षेचं घोडं समजण्याची पालकांची वृत्ती, वर्गीय भावनेची जोपासना करणाऱ्या शाळांचा उदय, स्पर्धेच्या नादात करपलेली मुलं हे पाहून मनात वाईट वाटत होतं. काही तरी वेगळं करा, असं आम्ही मित्र संस्थांना सांगत होतो; पण ते सारे स्पर्धेत गुंतलेले होते. 'समरहील', 'तोत्तोचान', 'टीचर' यांसारखी पुस्तकं, लीलाताईंचं कोल्हापूरचं 'सृजन आनंद' खुणावत होतं. हे जर त्यांना शक्य आहे, तर इथल्या शाळा ते का करत नाहीत, या प्रश्नानं शेवटी 'आपणच करून पाहूया' असा प्रस्ताव विनोदिनीने मांडला आणि आम्ही सर्वांनी त्याला पाठिंबा दिला. यात मी, राज काळगी, माधव पळशीकर, विवेक गरुड, मुकुंद कोकीळ असे अनेकजण होतो. आपण किती अवघड कामाला हात घालतोय, याची कल्पना नसल्यानं आम्ही 'आनंदनिकेतन'चा संकल्प करून मोकळे झालो. हाती ना पैसा, ना कुणा धनिकाचं पाठबळ, ना कुणा राजकीय नेत्याचा वरदहस्त, शुद्ध अविचार!

आम्ही काही कुणी शिक्षणतज्ज्ञ नव्हतो. आमचं मन खुलं होतं. शिक्षण आनंददायी व अर्थपूर्ण असावं, एवढाच आमचा संकल्प होता; पण त्यासाठी नेमकं काय करायचं ते ठाऊक नव्हतं. आज शिक्षण आनंददायी का नाही, याचा आम्ही शोध सुरू केला. आम्हाला दिसलं, की मुलं खूप ओझ्याखाली आधीच दडपली गेलेली आहेत. आता आनंददायी व अर्थपूर्ण करण्याच्या नादात आम्ही त्यात कुठलीही नवी ओझी वाढवायची नाहीत, असं ठरवलं. मग आम्ही उलटाच विचार सुरू केला. आजच्या शिक्षणात असं काय आहे, जे वगळलं तरी शिक्षणावर त्याचा अजिबात विपरीत परिणाम होणार नाही, उलट मुलांवरील ओझं कमी होण्यास मदत होईल? आणि मग अशा अनेक गोष्टी सापडू लागल्या.

आठवड्यातून तीन प्रकारचे झकपक युनिफॉर्म, टाय, बूट हे खरंतर वर्गीय अलगतावाद जोपासण्यासाठी आहेत. त्याचा शिक्षणाशी काहीच संबंध नाही. याबाबतीत आम्हाला तोत्तोचानमधल्या कोबायाशींचे शब्द मार्गदर्शक वाटले, मुलांना साधे व मळले तरी चालतील असे कपडे हवेत! काही शाळांमध्ये मेंदी काढली, तर चालत नाही. काही शाळांमध्ये टिकली लावली नाही, तर भारतीय संस्कृतीची पडझड होते! अशी बंदीची वा सक्तीची संस्कृती कशाला लादायची?

कृत्रिम शिष्टाचाराचं स्तोम हेही व्यक्तिमत्त्वाची गुणवत्ता वाढवत नाही. अंतर मात्र वाढतं. शिक्षक व मुलं यात अंतर कमीत कमी असावं. मुलांना बोलतं करणं हे शिक्षकाचं काम आहे; गप्प करणं हे नव्हे.

संगणक इत्यादी शोभिवंत यांत्रिक साधनांवर अवास्तव भर दिल्यानं मेंदूच्या विकासात काही भर पडत नाही. तेव्हा त्यांचा समावेश आवश्यक तेवढाच व आवश्यक त्या टप्प्यावरच करावा. तयार प्रश्नावलीच्या व्यवसायमाला शिक्षकांची व मुलांची कल्पनाशक्ती मारतात व मुलांच्या पाठीवरचा व पालकांच्या पाकिटावरचा बोजा वाढवतात, तेव्हा त्या टाळाव्यात.

झकपक इमारती व फर्निचर यापेक्षा मुलांना आवश्यक आहे मोकळा अवकाश व स्वातंत्र्य. त्याच्या आड येईल अशा श्रीमंती थाटाला फाटा देणं योग्य ठरेल.

पण या अनावश्यक गोष्टी शिक्षणक्षेत्रात आल्या कुठून? आदर्श माणूस कसा असावा, याची एक तयार कल्पना आयात केली गेली. हा आदर्श माणूस म्हणजे अर्थातच कुठला तरी चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर (सीईओ) असावा. त्याचीच लहान प्रतिकृती म्हणजे चांगलं मूल, असं सर्व पालकांनी व शाळांनी मानून घेतलं. यानं मुलांचं मूलपणाचं स्वातंत्र्यच संपलं! त्यानं काय करायचं ते मोठ्यांनी ठरवून टाकलं. त्याला काय हवं असेल, याचा विचार करण्याची गरजच कुणाला वाटली

नाही. नाहीतरी शाळा हा एकच उद्योग असा आहे, ज्यात ग्राहकाला काय हवं आहे, याचा मुळीच विचार केला जात नाही! कारण जो शाळेत येतो तो विद्यार्थी हा काही आपला ग्राहक नाही, जो शाळेची अवाढव्य फी भरू शकतो, तो आपला ग्राहक आहे, असंच शाळांनी मानल्यानं पालकांच्या गरजा पूर्ण करणं हा एकमेव कार्यक्रम बनला. वर्गीय भेदभाव ही अशा पालकाची गरज होती, सीईओ हा त्याचा आदर्श होता. यांत्रिक साधनं ही त्याची मागणी होती व या सर्वांसाठी तो जादा किंमत मोजायला तयार होता! हे अर्थशास्त्र व्यापार म्हणून बरोबर होतं, शिक्षण म्हणून चूक होतं, एवढंच!

खरंतर पूर्वीही शिक्षणव्यवस्था अशीच होती; पण तेव्हा पालक मुलांकडे पुरेसं दुर्लक्ष करत असल्यानं मुलांना काही प्रमाणात स्वातंत्र्य होतं. आता जागरूक पालक खेळवाडीपासून मुलांवर स्वार होतात. आधी अभ्यासातून आनंद हद्दपार झाला. आता खेळाकडे व कलेकडेही केवळ करिअर म्हणूनच पाहायला लागल्यावर, खेळण्यातला व कलेतला आनंदही स्पर्धेच्या मागे लागून करपवून टाकण्यात पालक व शाळा यशस्वी होत आहेत, असं जाणवलं. पालकांच्या या वृत्तीमुळे मुलांचं शिकण्याचं स्वातंत्र्यच लोप पावलं आहे!

हे लक्षात आल्यावर आम्ही आमची शाळा विद्यार्थिकेंद्री राहील, पालककेंद्री नाही, असा निर्णय घेतला. काहीही करताना पालकांच्या नाही, तर मुलांच्या दृष्टिकोनातून पाहायची आम्ही सवयच लावून घेतली. विद्यार्थ्यांसाठी शाळा नको, विद्यार्थ्यांची शाळा हवी.

यासाठी आम्ही स्वत:वर काही बंधनं घालून घेतली.

- शिक्षण आनंददायी व सहभागशील असेल.
- शाळेचं माध्यम मराठीच असेल.
- प्रत्येक वर्गात २५-३० च मुले असतील.
- समाजाच्या सर्व स्तरांतली मुलं आपल्या शाळेत असलीच पाहिजेत.
- शारीरिक धाकदपटशांवर पूर्ण बंदी असेल.
- सरकारी हस्तक्षेप नको असेल तर सरकारी अनुदान घ्यायचं नाही.
- शिक्षण जीवनाशी जोडलेलं असेल.

शाळेत शिक्षकालाच फक्त क्रियाशील भूमिका असते. मुलांना केवळ ऐकण्याचं काम करावं लागतं. त्यामुळे साहजिकच ती कंटाळून जातात. शिक्षण सहभागशील असेल, तर मुलांना त्यात रस निर्माण होऊन ते आनंददायी ठरू शकेल. पाठ्यपुस्तकांच्या जोडीला हातांनी करायच्या अनेक गोष्टी मुलांना दिल्या

पाहिजेत. सर्व विषय जीवनाशी आणि निसर्गाशी जोडून शिकवले पाहिजेत. विनोबांनी लिहिलं होतं, 'अश्व या शब्दाचा अर्थ तबेल्यात उभा असतो, तो साक्षात बघायचाच असतो! अर्थाचं वर्णन नको, दर्शन हवं, भगवंतांनी अर्जुनाला काही आधी भगवद्गीतेचा क्लास लावून मग कुरुक्षेत्रात ढकललं नाही. भगवद्गीता जशी कुरुक्षेत्रात, तसं शिक्षण जीवनक्षेत्रातच द्यायला हवं. त्यासाठीच शाळा जीवनाशी एकरूप असायला हवी.'

हे सर्व करायचं, तर विद्यार्थिसंख्या मर्यादित असायला हवी. यासाठी प्रत्येक वर्गात २५ मुलांमागे एक शिक्षक असायला हवा, असं ठरलं. शाळांतली गर्दी शिक्षकांना ओरडायला आणि मुलांना त्यांच्याकडे दुर्लक्ष करायला भाग पाडते. इतकी मुलं एकाच ठिकाणी शिकवण्याचा नेमका काय फायदा होतो? विभागवार छोट्या शाळा काढायला काय हरकत आहे?

शिक्षण हे जीवनाचा पाया म्हणून हवं आहे. दहावीची गुणांची शर्यत जिंकण्याची तयारी म्हणून त्याकडे बघता कामा नये. स्पर्धेपेक्षा सहकारावर भर दिला जावा. मुलांमधली उत्स्फूर्तता स्पर्धेत हरवते. मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या उभारणीच्या काळात केवळ गुणपत्रिकेपेक्षा अधिक योग्य मूल्यमापन करायला हवं, ज्यामुळे पालकांनाही आपल्या पाल्याच्या विषयातल्या आकलनाबरोबर स्वभाववैशिष्ट्याचीही नेमकी माहिती मिळेल. यासाठी वर्णनात्मक गुणपत्रिका हा पर्याय निवडण्याचं ठरवलं.

मुलं आणि शिक्षक या दोघांचीही सतत काही शिकण्याची वृत्ती असायला हवी. दोघंही एकाच प्रक्रियेचे भाग असल्यानं मुलांना मारता कामा नये, हे सहजपणे ठरलं.


शाळा ही सर्व समाजाचं प्रतिबिंब असलीच पाहिजे. आता शाळा या पालकांच्या प्रतिष्ठेचं व अहंकाराचं प्रतिनिधित्व करू लागल्या आहेत. गरिबांसाठी वेगळ्या व कमी दर्जाच्या शाळा काढल्यानं केवळ त्यांचंच नाही, तर सर्व समाजाचं नुकसान होतं आहे. कृष्ण व सुदामा एकाच शाळेत शिकल्यानंच पुढे कृष्णाला सुदाम्याचं दु:ख कळू शकलं. आता तर कृष्णाला सुदाम्याचं दर्शनही होत नाही. दु:ख जाणण्याची तर गोष्टच दूर!

शाळेतून बाहेर पडताना मुलाकडे आपली आवड व कौशल्य या विषयीचा अचूक अंदाज असेल, कमजोरीचीही जाणीव असेल व यातून येणारा आत्मविश्वास असेल. आपल्या शक्तीनुरूप समाजात स्थान मिळवण्यास तो सक्षम असेल. विशिष्ट स्थान म्हणजेच साफल्य, असा भ्रम नसेल.

हे सारं करायचं तर सरकारी हस्तक्षेप कमीत कमी हवा, यासाठी अनुदान न घेता स्वत:च्या हिमतीवरच शाळा चालवावी, असा आम्ही निश्चय केला.

एवढ्या घनघोर चर्चेनंतर शाळा सुरू करण्याचा निर्णय झाला. जून १९९८ पासून शाळा प्रत्यक्ष सुरू करण्याचं ठरलं. चर्चा करायला अनेकजण होते; पण शाळा चालवायची तर कुणीतरी पूर्ण वेळ जबाबदारी घेणं आवश्यक होतं. त्यावेळी विनोदिनी काळगी यांनी महाविद्यालयातल्या नऊ वर्षांच्या आपल्या नोकरीवर पाणी सोडून, या कामी पूर्ण वेळ देण्याचं मान्य केलं. या बिनशिडाच्या जहाजाला कप्तान तर मिळाला! विनोदिनीचा निर्णय ऐकून तिचे हितचिंतक म्हणाले, ''तू एक वेडी बाई आहेस; पण शाळा चालवायची म्हणजे अजून बरीच मोठी टीम लागणार आहे. एवढे वेडे लोक कुठून मिळणार?''

●



२

शाळा एक मजा

अरुण ठाकूर

"शाळेत मुलांना मोकळेपणानं बोलू दिलं, वातावरण खेळकर ठेवलं. ताई व मुलं यात दिखाऊ आदराचं अंतर ठेवलं नाही. हवं ते विचारा, आपण मिळून शोधू, अशी भूमिका घेतल्यावर मुलं निर्भय झाली. मग त्यांना शाळा आपली वाटायला लागली. हेच तर आम्हाला हवं होतं."

कुठल्याही प्रवासवर्णनात प्रवाशांनी प्रत्यक्ष प्रवास करताना अनुभवलेला थरार वाचकांपर्यंत पोहोचवणं हा सर्वांत अवघड भाग असतो. कारण महासागरात प्रवास करताना महाकाय शार्क जेवढा धोकादायक असतो, तेवढाच इंजिनाचा खराब झालेला स्पार्क प्लगही धोकादायक असतो; पण वाचकाला शार्कशी घेतलेली झुंजच जास्त भावते, त्या मानानं स्पार्क प्लग साफ करणं त्याला तेवढं रोमँटिक वाटत नाही!

'आनंदनिकेतन'चा प्रवास सुरू झाला तेव्हा 'सरकार' या शार्कचा जेवढा त्रास झाला, त्यापेक्षा जास्त त्रास मराठी समाजाच्या हरवलेल्या 'स्पार्क'चा झाला! आत्ताच्या जमान्यात मराठी शाळा काढण्याचं प्रयोजनच काय, असा प्रश्न विचारण्यात मराठी मंडळीच सर्वांत जास्त होती. त्यात आम्ही तर संपूर्ण मराठी माध्यमाची शाळा काढण्याचा निश्चय केलेला! आता सेमी इंग्लिशची चलती होती. अर्थात, यात दोष शाळांचा नसून, पालकांच्या नादावलेपणाचा आहे; पण आम्ही या मागणी-पुरवठ्याच्या बाजारप्रणालीत न अडकता केवळ शैक्षणिक हेतूंनाच प्रधानमूल्य द्यायचं ठरवलं.

१९९८ साली नाशिकच्या माणिकनगर भागात एका मोठ्या खोलीत आमची बालवाडी सुरू झाली. सुरुवातीला आम्ही आमचीच मुलं आमच्या शाळेत दाखल केली. आमच्यावर विश्वास असणाऱ्या काही मित्रांची मुलं व परिसरातली काही

मुलं अशी पहिल्याच दिवशी दहा नवीन मुलं बालवाडीत दाखल झाली. बालवाडीचा वर्ग आटोपून विनोदिनीताई व त्यांच्या सहकाऱ्यांची मुलं शोधण्यासाठी परिसरात भ्रमंती सुरू व्हायची. लोक सर्व काही ऐकून घेत. चांगला उपक्रम म्हणून कौतुक करत; पण मुलांना मात्र दुसऱ्या शाळेत घालत! असं असलं तरी दरवर्षी एका इयत्तेनं शाळा पुढे जात होती. एका वर्गात २५ मुलं हा मुद्दा काहींना आवडला, काहींना मराठी माध्यमातून शिकल्यानं मुलांना शिक्षणाचं ओझं होत नाही, हा मुद्दा पटला. असा हळूहळू प्रसार होऊन कधीही जाहिरात न देता आम्हाला दरवर्षी मुलं मिळत गेली. शाळा दहावीपर्यंत करणार का, असं लोक विचारत व नक्की करणार, असं आम्ही सांगत असू. तोपर्यंत सरकारी शार्कचा हिंसकपणा आम्ही अनुभवला नव्हता. शाळेच्या मान्यतेसाठी आम्ही प्रस्ताव दाखल केला आणि शार्कच्या अस्तित्वाची जाणीव आम्हाला पदोपदी होऊ लागली. शिक्षण खातं हे शाळांना साहाय्य करण्यासाठी नसून, असहाय्य करण्यासाठी आहे, याची प्रचिती येत गेली. मात्र तोपर्यंत तरी मराठी शाळा काढणं, हा गुन्हा समजला जात नव्हता. आमच्यासमोर मुलं मिळवणं, त्यांच्यासाठी सुयोग्य इमारत मिळवणं, सहभागशील शिक्षणपद्धती तयार करणं, शिक्षणसाधनं तयार करणं व या सर्वांसाठी आवश्यक तो पैसा जमवणं असं बहुमुखी आव्हान होतं.



आम्ही समरहील (इंग्लंड), तोत्तोचान (जपान), टीचर (न्यूझीलंड) या पुस्तकातून तेथील शिक्षकांनी त्यांच्या शाळेत केलेले प्रयोग वाचले होते. महात्मा गांधी, आचार्य विनोबा, रविंद्रनाथ ठाकूर यांनी मांडलेले विचार, केलेले प्रयोग, गिजुभाई बधेका, ताराबाई मोडक अशा अनेकांनी दाखवलेली वाट या साऱ्यांचा आम्हाला आमची शिक्षणपद्धती तयार करताना फार उपयोग झाला. महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या सृजन आनंदच्या लीलाताई पाटील, अक्षरनंदनच्या विद्याताई पटवर्धन व ग्राममंगलचे रमेश पानसे यांचे मार्गदर्शन लाभले व त्यांच्या शाळांतील प्रयोगही पाहायला मिळाले.

पैशाचं पाठबळ नसल्यानं आधीच मोठी जागा घेणं शक्य नव्हतं. दर दोन वर्षांनी जागा अपुरी पडू लागली, की जागेचा शोध घेणं सुरू होई. सर्व जण मोहिमेवर निघत. त्यावेळी पुढील वर्षी शाळा कुठे असेल ते पालकांना समजावणं, हे एक कामच होतं. मात्र आमची मुलं व पालक आमच्याबरोबर वेगवेगळ्या आठ ठिकाणी आले.

एका बाबतीत मात्र आम्ही पहिल्यापासून नशीबवान ठरलो, ते म्हणजे शाळेला योग्य ताई (शिक्षिका) मिळणं. शिक्षिका हवी आहे, अशी आम्ही कधीही जाहिरात दिली नाही. काही जणी कुतूहलानं शाळेत डोकावल्या. त्या चांगल्या शिकलेल्या होत्या व त्यांना मुलांसोबत काही करून पाहायची इच्छा होती. त्या बी. एड./डी.एड. झालेल्या आहेत का, असं त्यांना कुणीही विचारलं नाही. 'या आणि सामील व्हा', असं शाळेचं खुलं निमंत्रण होतं. शाळेच्या दोनच कसोट्या होत्या. मुलांविषयी प्रेम हवं व नवीन काही करून पाहायची तयारी हवी. आणि पाहता पाहता २४ जणींचा मेळा जमला. आमची सर्वांत मोठी संपत्ती आमच्या या २४ ताईच आहेत.

शिक्षणपद्धती आनंददायी व अर्थपूर्ण असली पाहिजे हे ठरलेलं होतं. आता प्रत्येक विषयासाठी त्याची अंमलबजावणी करणं ही कसोटी होती. बालवाडी ही मुलांच्या सामाजिक जीवनाची सुरुवात असते, तिथे ताई ही त्यांची मैत्रीणच असायला हवी. मुलांमध्ये प्रचंड ऊर्जा असते, ती ऊर्जा वापरून आम्ही विविध खेळांतून अंक, अक्षरांची नकळत ओळख करून दिली. लिहिणं मात्र टाळलं. भाषा हे केवळ संवादाचं साधन नाही, तर विचारशक्ती व कल्पनाशक्तीच्या विकासाचंही साधन आहे, हे लक्षात घेऊन भाषांशी मुलांना भरपूर खेळू दिलं. त्यांच्या भावविश्वातले शब्द वापरून भाषाशिक्षण सुरू केलं. गणितासाठी तार्किक विचार करणं, परस्परसंबंध शोधणं, संगती लावणं अशा अनेक गोष्टी पायाभूत ठरतात. या

क्षमतांचा विकास होण्यासाठी प्रत्येक टप्प्यावर अनेक खेळ, उपक्रम तयार केले. संकल्पना समजावण्यासाठी प्रत्यक्ष वस्तूंचा वापर केला. विज्ञान हा धडा वाचून प्रश्नोत्तरं लिहिण्याचा विषयच नाही. प्रयोग, निरीक्षण, नोंदी यांची सवय होण्यासाठी काही उपक्रम आम्ही विकसित केले होते. त्यांच्याशी जुळणारी 'होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रा'नं बनवलेली पाठ्यपुस्तकं आम्हाला सापडली. त्यांचा आम्ही अनुवाद करून वापरायला सुरुवात केली. (पुढे आमच्या ताईंनी केलेल्या अनुवादाचं पुस्तक 'भाभा केंद्रा'नं छापलं) अभ्यासाइतकंच हस्तकलेला महत्त्व दिलं. कार्यानुभवाचा तास हा प्रत्यक्ष निर्मितीचा तास बनला.

शाळेत मुलांना मोकळेपणानं बोलू दिलं, वातावरण खेळकर ठेवलं. ताई व मुलं यात दिखाऊ आदराचं अंतर ठेवलं नाही. हवं ते विचारा, आपण मिळून शोधू, अशी भूमिका घेतल्यावर मुलं निर्भय झाली. मग त्यांना शाळा आपली वाटायला लागली. हेच तर आम्हाला हवं होतं.

●



३

उजळत्या दिशा

अरुण ठाकूर

❝

मुलांना शांत ठेवायचा चांगला मार्ग म्हणजे त्यांच्यातल्या ऊर्जेचा वापर करणं आणि ऊर्जा वापरण्याचं एक साधन म्हणजे हाताला काम देणं. हातांनी काम करताना निर्मितीचा आनंद मिळतो. एकाग्रता वाढते, श्रमप्रतिष्ठा समजते. सर्जनशीलतेला वाव मिळतो, कल्पनाशक्तीला बहर येतो.

❞

'मुलांना सुटी नको असलेली शाळा' ही आमची सगळ्यांत मोठी ओळख बनली. हे आमचं एकट्याचं यश नव्हतं. आमच्यावर विश्वास टाकणाऱ्या पालकांचंही ते यश होतं. त्यांनी आमच्या तत्त्वांना पूर्ण पाठिंबा दिला. आधी त्यांना थोडी धाकधूक वाटणं स्वाभाविकच होतं. स्पर्धेपेक्षा सहकारावर आमचा विश्वास आहे, असं म्हटल्यावर आजकाल कुणीही बिचकणारच की! कारण हे स्पर्धेचं युग आहे, असं ठसवणाऱ्या जाहिराती जागोजाग झळकत असताना, 'हे काय भलतंच!'


शाळेत शारीरिक धाकदपटशा चालणार नाहीत, असं ठरवल्यावरही त्यांना जरा चिंता वाटलीच. सुविचार लिहून शाळेच्या भिंती खराब करायच्या नाहीत, यानंही ते जरा गडबडले; पण एवढ्या संस्कारानं सजलेल्या शाळेत शिकलेल्या अधिकाऱ्यांच्या व नेत्यांच्या एकेक लीला पाहिल्यावर त्यांना सुविचारापेक्षा आचारानं संस्कार होतो; हे पटलं. मग 'आम्ही मूल्यशिक्षणाचा वेगळा तास घेत नाही' हे आमचं बिरुद त्यांनाही भावलं.

साचेबद्ध कल्पना हा सर्व विकासातला प्रमुख अडथळा असतो. त्यामुळेच पाठ्यपुस्तकाच्या कैदेतून आमच्या शिक्षिका मुक्त राहाव्यात, असा आग्रह आम्ही धरला. धडे पूर्ण करणं नाही, तर विषय शिकवणं हे उद्दिष्ट आहे, असं मानल्यावर विषय शिकवण्यासाठी अनेक नवनवी साधनं, पद्धती त्यांनी शोधल्या. शाळेबाहेर

क्षेत्रभेटीसाठी नेणं आवश्यक वाटलं तर तसं नेतात. लोहारांच्या दुकानातून तर वीटभट्टीपर्यंत, कल्हईवाला तर शाळेतच बोलावतात. एखादं वेगळं फूल, कीटक हेही मुलांना दाखवण्यासाठी शाळेत आणतात. रेशीम किड्यांचे कोष आणले की त्यातून फुलपाखरू बाहेर येईपर्यंत निरीक्षण चालतं व उत्साहानं नोंदी होतात. पाठ्यपुस्तकाचं बंधन काढल्यावर शिक्षकांच्या कल्पनांना बहर आला आणि शिक्षण आपोआप समृद्ध बनलं. शिक्षिकांचं स्वातंत्र्य व क्रियाशीलता आम्ही महत्त्वाची मानली आहे.

मग शिस्तीचं काय होत असेल असं तुम्हाला वाटत असेल ना? मुलांना शांत ठेवायचा चांगला मार्ग म्हणजे त्यांच्यातल्या ऊर्जेचा वापर करणं आणि ऊर्जा वापरण्याचं एक साधन म्हणजे हाताला काम देणं. हातांनी काम करताना निर्मितीचा आनंद मिळतो. एकाग्रता वाढते, श्रमप्रतिष्ठा समजते. सर्जनशीलतेला वाव मिळतो, कल्पनाशक्तीला बहर येतो. कल्पनाशक्ती हेच तर माणसाच्या प्रगतीचं मुख्य साधन आहे. मुलं कितीतरी सुंदर सुंदर वस्तू बनवतात. बागकाम, कातरकाम, घडीकाम, विणकाम, भरतकाम, ठसेकाम, कोलाज असं सृजनाचं अनेक प्रकारचं कार्य शाळेत सुरू असतं. यातून निर्माण होणाऱ्या वस्तूंची विक्रीही मुलं स्वतःच दुकानजत्रा भरवून करतात. सर्व मुलं आणि मुली शाळेच्या स्वयंपाकघरात अनेक पदार्थ बनवतात.





PAGE NO.:
DATE: / /

मिळालीच पाहिजे, मिळालीच पाहिजे
मराठी शाळांना मान्यता मिळालीच पाहिजे

केले उपोषण बेमुदत
सरकारने मागितली तीन महिन्याची मुदत,
महिने सरले, वर्ष सरली
मराठी शाळांची मान्यता फायलीमध्येच राहिली ॥१॥

नको अनुदान आम्हाला
हवी फक्त मान्यता,
मातृभाषेतून शिकू द्या
आमची मराठी असे म्हणू द्या ॥२॥

परकियांची भाषा चालली पुढे
मराठी भाषेला ठेवली मागे,
१०० इंग्रजी शाळांमागे २० तरी मराठी शाळा असू द्या
मराठी शाळांना मान्यता मिळू द्या ॥३॥

माळले लढले ह्याच मराठीसाठी
कुसुमाग्रजांनी गायली हिची महती,
त्यांचा वारसा पुढे चालवू द्या
मराठीला मान्यता द्या ॥४॥

चिमुरडे राहिले उन्हात उभे
घसे त्यांचे घोषणा देऊन सुकले
मानवी साखळी, धरणे आंदोलन सगळे उपाय शोधले
तरी अधिकाऱ्यांच्या हृदयाला पाझर नाही फुटले ॥५॥

मिळालीच पाहिजे, मिळालीच पाहिजे
मराठी शाळांना मान्यता मिळालीच पाहिजे

ओवी भालेराव ७वी
आनंद-निकेतन

सकाळ झाली, सूर्य उगवला
मराठी शाळा सुरू झाल्या,
सगळीकडे मराठी शाळा, मराठी भाषा

वर्षे लोटली काळ बदलला.
इंग्रजीचे वेड लागले;
जिकडेतिकडे इंग्रजी शाळा;
मराठी लोक त्रासू लागले,

बंदी, बंदी मराठी शाळेला बंदी
आता वाजते इंग्रजी शाळांची घंटी
मराठी भाषेच्या शाळा कमी
मात्र, दिली खोटी मान्यतेची हमी

जिकडेतिकडे आंदोलनं
मात्र मराठी शाळांची मोडली मनं
अशीच दिली सातवी पर्यंत मान्यता
ह्याच्या पुढे नाही काही शक्यता.

यशोधन जलतारे

शाळा संपवून बाहेर पडताना मुलांमध्ये स्वतःच्या गुणवत्तेचा अचूक अंदाज घेण्याची क्षमता यायला हवी. त्याआधारे आपण काय करू शकतो, या विषयीचा विश्वास हवा. हात व बुद्धी यांना सारखंच महत्त्व देत झेप घेण्याचं साहस यावं. हा आत्मविश्वास, हे साहस पुस्तकं वाचून येत नाही. त्यासाठी प्रत्यक्ष निर्मितीची प्रक्रिया अनुभवावी लागते. शिक्षण जीवनाशी जोडावं लागतं. याला आम्ही म्हणतो उद्योजकतेचा विकास. यात मुलं काही उद्योजकांच्या मुलाखती घेतात. कारखाना पाहतात. कधी दिवसभर दुकानावर उभं राहून विक्रीचा अनुभव घेतात, हिशेब ठेवतात, वर्गीकरण शिकतात.

मुलांचा सामाजिक विकास हाही आम्ही तेवढाच महत्त्वाचा मानतो. त्यामुळे सफाई कामगारांची मुलाखत, अंधशाळेस भेट व तिथल्या मुलांसाठी काहीतरी स्वतः करून नेणं यांसारखे उपक्रम आमच्या शाळेचा अपरिहार्य भाग बनले आहेत. जीवनाचं हे दर्शन मुलांना जे काही देतं ते वर्गात शिकवून देता येण्यासारखं नसतंच. समाजात घडणाऱ्या सर्व घटकांची चर्चा आम्ही मुलांशी करतो. आम्ही जाणीवपूर्वक सर्व जाती-धर्म-वर्ग गटातली मुलं एकत्र शिकतील असं पाहतो. गरिबांसाठी वेगळी शाळा चालवली तर अनेक ट्रस्ट पैसे द्यायला तयार होते; पण आम्हाला हे समान पण वेगळं (equal but separate) वागवण्याचं तत्त्वच मंजूर नसल्यानं आम्ही ते नाकारलं.

पर्यावरण शिक्षण म्हणजे केवळ इंटरनेटवरील फोटो वा माहितीचं संकलन नव्हे. पर्यावरणाशी ओळख म्हणजे एकात्म जीवनाची जाणीव. खरंतर मुलांचं सृष्टीशी नातं असतंच, आपल्या प्रत्येक कृतीचे निसर्गावर काय परिणाम होतात, ते पाहायला मुलं शिकतात. मग मुलं सहलीच्या वेळी पिशवीत कचरा जमवून योग्य ठिकाणी टाकतात. मुलं शाळेत व आपल्या घरीही शाडूचे गणपती स्वतः बनवतात. सजावट करताना थर्माकोल वापरत नाहीत. आपण या सृष्टीचे स्वामी नाही, तर भाग आहोत, ही जाणीव म्हणजे पर्यावरणशिक्षण.

स्नेहसंमेलनात आमची सर्व मुलं रंगभूमीवर येतात. त्यामुळे ती स्पर्धा राहत नाही. खऱ्या अर्थानं स्नेहसंमेलन होतं. स्नेहसंमेलनाचे कार्यक्रम सादर करताना वेशभूषेचं सर्व साहित्य आम्ही स्वतः करतो. मुलांना पारितोषिक देण्यासाठी पाहुणे म्हणून कुणातरी मुलाच्या आजी व आजोबांनाच बोलावतो. त्याचे दोन फायदे होतात. एक म्हणजे पाहुण्यांना खरंच कार्यक्रमात रस वाटतो व दुसरं म्हणजे मुलांची उपदेशपर भाषण ऐकण्यातून सुटका होते. क्रीडामहोत्सवातही आम्ही प्रत्येक मूल सहभागी होऊ शकेल असे खेळ शोधतो. वैयक्तिक, सांघिक खेळ चार

दिवस रंगतात.

अशा असंख्य घटनांचा कॅलिडिओस्कोप दाखवणार तरी किती? आता १४ वर्षांच्या अखंड परिश्रमानंतर शाळेची इमारत झाली. आम्हाला कुणी एक मोठा दाता मिळाला नाही; पण असंख्य हितचिंतकांच्या साथीनं हा 'गोवर्धन' उचलला गेला. चौदा वर्षांत मराठी शाळाही उत्तम दर्जाचा विकास घडवू शकते, यावर मराठी लोकांचा विश्वास बसू लागला. मराठी स्पार्क आमच्यापुरता तरी पडू लागला; पण सरकारी शार्क मात्र आता अधिक हल्लेखोर व हिंस्र झाला. २००५ साली आमच्या शाळेचा आठवीचा वर्ग सुरू व्हायला हवा होता; पण शासनानं परवानगी दिली नाही. २००८ पासून तर शासनानं मराठी शाळांवर अधिकृतपणे बंदीच घातली. उलट चालू असलेल्या शाळा बंद करण्यासाठी शिक्षण खात्याचे प्रयत्न सुरू झाले. सर्व मराठी मुलांनी सरकारी शाळेतच गेलं पाहिजे, असं अधिकारी व मंत्री सांगू लागले. (त्यांची स्वत:ची मुलं मात्र खासगी इंग्रजी शाळेत जातात.) इंग्रजी शाळांना मुक्तहस्ते परवाने दिले जात आहेत, उलट मराठी शाळा चालवणं हा गंभीर गुन्हा ठरवला जाऊन अनेक संस्थाचालकांना तुरुंगात डांबण्यात आलं आहे.

आम्ही आजही अनुदान घेत नाही, भविष्यातही मागणार नाही; पण सरकार मात्र मराठी शाळांच्या जिवावरच उठलं आहे. त्यात मध्यमवर्गीयांचा मराठी स्पार्क अधू झालेला! अशी ही शार्क आणि स्पार्कच्या ओढाताणीत अडकलेली मराठी शाळेची कथा. आम्ही शाळा चालवत राहू, लढा पुढे नेत राहू. आज ना उद्या समस्त मराठीजन आमच्या लढ्यात येतील, अशी आम्हाला आशा आहे.

ताजा कलम : पैसे नको केवळ मान्यता द्या या मागणीसाठीही सरकारने आम्हाला भरपूर दमविले. चार वर्षांच्या संघर्षानंतर मराठी शाळांना स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर (म्हणजे कायम विनाअनुदान) मान्यता देण्यास सरकार तयार झाले आहे.

●

